13-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1

SGB/ D/ MMP/ 12:00

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : आज माझ्याकडे डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. प्रस्तावातील सूचनेचा विषय हा प्रामुख्याने "मागील काही दिवसांपासून पुणे शहर, पिंपरी-चिंचवड येथे महिलांवरील अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. मुंबई-पुणेसारख्या औद्योगिकदृष्टया विकसित असलेल्या ठिकाणी हजारो महिलांना होत असलेला असुरक्षिततेचा त्रास, त्याबाबत शासनाने कडक पावले उचलण्याची गरज" अशा प्रकारचा आहे. हा विषय स्त्रियांशी संबंधित आणि अत्यंत महत्वाचा आहे. म्हणून मी या अनुषंगाने याबाबत दीड तासाची चर्चा मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह घेण्यास अनुमती देत आहे. या प्रस्तावावर आमच्या भगिनींना, सन्माननीय महिला सदस्यांना प्राधान्याने बोलण्यास संधी दिली जाईल. अपवाद म्हणून सन्माननीय बंधू सदस्यांनी विचार मांडले तरी चालेल. परंतु चर्चा कोणत्याही परिस्थितीत दीड तासात संपली पाहिजे. जर दीड तासात चर्चा संपली नाही तर ती आहे त्या परिस्थितीत संपेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धन्यवाद.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी देखील नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे.

**सभापती** : आपण दिलेली सूचना अद्याप माझ्याकडे प्राप्त झालेली नाही.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

## उद्योग विभागाने सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील जमिन लिलावाद्वारे विकण्यास आय.डी.बी.आय. बँकेला परवानगी दिल्याबाबत

**(१) * ३००५ श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, श्री.अनिल परब :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील आय.डी.बी.आय. बँकेने लिलाव केलेल्या सुमारे १४९ हेक्टर जमिनीला उद्योग खात्याने परवानगी दिलेली असून जमीन लिलावाद्वारे मे.उत्तम स्टीलच्या ताब्यात दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.उत्तम स्टीलच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण जमीन सुमारे ७०० हेक्टर आय.डी.बी.आय. कडून लिलावात घेतल्याचे भासवून शेतकऱ्यांकडून बाजार भावापेक्षा कमी दराने जमीन खरेदी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप चौकशी केली नसल्यास, विलंबाची, कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
आय.डी.बी.आय.बँकेने केलेल्या लिलावामध्ये १४४.६५ हेक्टर शेत जमीन मे.उत्तम पॉवर अँड स्टील लि.,मुंबई यांनी विकत घेतली आहे. सदर जमीन मुंबई कूळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम १९४८ कलम ६३(१) (अ) अंतर्गत दिनांक १४.१.२००७ रोजीच्या आदेशान्वये जमीन हस्तांतरणाकरीता उद्योग संचालनालयाने परवानगी दिली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यामध्ये उषा इस्पात कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत खरेदी करार केला होता. या जमिनी कंपनीने आयडीबीआय बँकेकडे गहाण ठेवल्यानंतर कंपनीकडून सर्व सुविधा घेण्यात आल्या. त्यानंतर कंपनी डबघाईला आल्यामुळे बँकेने जमिनींचा लिलाव केला. शेतकऱ्यांच्या जमिनींचा चढ्या भावात लिलाव करण्यात आला. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या आहेत त्यांना प्रचलित दराने जमिनीची किंमत द्यायला शासन संबंधितांना भाग पाडणार आहे काय?

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३००५......

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये उषा इस्पात कंपनीने कर्ज घेतलेली रक्कम न फेडल्यामुळे, कंपनी डिफॉल्टर ठरल्यामुळे संबंधित बँकेने ती कारवाई केली आहे. कंपनी ॲक्टप्रमाणे बँक आणि त्या कंपनीशी संबंधित हा विषय आहे. शेतकऱ्यांचा यामध्ये कुठेही संबंध येत नाही. याचे कारण असे की, मुळामध्ये जमीन ज्यावेळी घेण्यात आली त्यावेळी इस्पात कंपनीने ही जमीन बँकेकडे गहाण ठेवली होती. कंपनीच्या प्रिमायसेसमध्ये असलेल्या अतिरिक्त जमिनीचा लिलाव करण्याचे काम त्याठिकाणी झालेले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ७०० एकर जमीन आयडीबीआय बँकेने लिलावात काढली. ७०० एकर जमीन शेतकऱ्यांकडून विकत घेण्यात आली. ७०० एकर जमीन एकाच शेतकऱ्याच्या नावावर नसते. त्यामध्ये अनेक शेतकरी, आदिवासी, प्रकल्पग्रस्तांचा समावेश असतो. ज्यावेळी आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जातात, त्यानंतर त्या जमिनी दुसऱ्यांना विकल्या जातात. अशा वेळी आदिवासींच्या जमिनी विकल्या जाण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन शासन आदिवासींना संरक्षण देणार आहे का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, त्या विभागामध्ये आदिवासी क्षेत्र नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात आदिवासी कूळ कायदा आहे. या कायद्यांतर्गत कोणी जमीन हस्तांतरण करण्याचा प्रयत्न केला तर त्याबाबत कायदेशीर तरतूद असल्यामुळे तसे त्यांना करता येत नाही. कायदेशीर तरतुदीमुळे आदिवासींची जमीन त्यांना विकत घेता येत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आयडीबीआय बँकेने जमीन लिलावात काढली. अशाच प्रकारे अनेक ठिकाणी जमिनींचे व्यवहार झाले आहेत. चिपी येथील विमानतळासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी कॉन्ट्रॅक्टरसाठी घेऊन त्या दुसऱ्यांना दिल्या जातात. या जमिनी इस्पात कंपनीने घ्यायच्या आणि त्या दुसऱ्यांकडे गहाण ठेवून लिलाव करायचा असे जे प्रकार चालतात, या संदर्भात शासनाकडून कडक निर्बंध घातले जातील का?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर बी.1....

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले...... 12:05

ता.प्र.क्र.3005.....

श्री. सचिन अहिर : महोदय, मुळात शेतकरी आणि कंपनीतील हा व्यवहार असून त्यानुसार अशी जमीन घेण्याचे काम केले जाते. नंतर संपूर्ण प्रोजेक्ट कंपनी तयार करते आणि बँकेकडून कर्ज घेण्यात येते. ते कर्ज न फेडल्यामुळे डीआरआय अंतर्गत कारवाई करण्यात येते. ज्यावेळेस अशा जमिनी विकल्या जातात त्या जमिनी ट्रान्सफर करण्याचे अधिकार डी.सी. च्या माध्यमातून करण्याची भूमिका घेतली जाते. अशी तरतूद करीत असता हा देखील निर्णय आम्ही घेणार आहोत की यापुढील काळात अशा जमिनी हस्तांतर केल्यानंतर किमान 5 वर्षामध्ये तरी तेथे उद्योग आणला पाहिजे, अन्यथा हे फक्त लिजिंगसारखे काम करतात आणि जमिनीचे बाजारभाव वाढल्यानंतर त्या विकल्या जातात अशा प्रकारचे ट्रेडिंग थांबविण्याचे काम करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, एमआयडीसी ज्या पध्दतीने जमिनी ग्रहण करते आणि त्या भागात उद्योग वाढावेत म्हणून इतरांना दिल्याजातात. अशा प्रकारे संपूर्ण राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमिनी घेतलेल्या आहेत. ज्या उद्योगांना अशा जमिनी दिलेल्या आहेत त्यांनी तेथे उद्योगांची उभारणी केली नाही अशा प्रकारची संपादित केलेली जमिनीची क्षेत्रे अनेक ठिकाणी आहेत. यासंदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेऊन काही कालमर्यादा घालून, उदा. अमुक इतक्या वर्षात जर उद्योग उभारला नाही तर अशा जमिनी परत घेण्याची व्यवस्था शासन करणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अनेक वेळा शेतकऱ्यांकडून जमीन घेत असताना उद्योग व्हावा ही भावना असली तरी तेथे उद्योग उभारले जात नाहीत असे आढळून आले आहे. अशा प्रकारे प्लॉट अलॉट केल्यानंतर सुध्दा अशा भागात कारखाने टाकले जात नाहीत. अशा बाबतीत कायद्यामध्येच तरतूद आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे अजून जाचक करता येईल काय याचाही विचार केला जाईल. तसेच यापुढील काळात अशा ज्या उद्योजकांनी प्लॉट घेतले असतील आणि एक्स्टेंशन दिल्यानंतर सुध्दा विशिष्ट मुदतीत तेथेउद्योगांची उभारणी केली नसेल तर असे सर्व प्लॉट काढून घेतले जातील आणि दुसरे जे इच्छूक उद्योजक आहेत त्यांना देण्याचे काम करण्यात यईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, आयडीबीआयकडे ही जमीन कशी आली ? तसेच उत्तम पॉवर स्टील लि. या कंपनीने ती जमीन विकत घेतली. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यावरणाचा विचार केला तर अशा पॉवर प्रकल्पांना त्या भागात विरोध आहे. शासन याप्रकरणी जनसुनावणी घेणार काय ?

....2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3005....

श्री.सचिन अहिर : महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी दिलेलेच आहे. ते म्हणजे या कंपनीने कर्ज घेतले होते ते फेडले नसल्याने उषा इस्पात या कंपनीने या जमिनीचा लिलाव केला. दुसऱ्या कंपनीने ती कंपनी टेक-ओव्हर करण्याचे काम केले आणि त्याला शासनाने मान्यता दिली. हे करीत असताना पुढील पाच वर्षात कारखाना तेथे आला पाहिजे ही अट कडक करण्यात येईल. तसेच दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, याप्रकरणी जन सुनावणी घेतली जाईल.

श्री. विनोद तावडे : या शेतकऱ्यांच्या जमिनी नाममात्र करार पत्रावर उषा इस्पात या कंपनीने घेतल्या होत्या आणि आयडीबीआयने त्या जमिनी गहाण करुन घेतल्या. परंतु ती जमीन दुसऱ्या एका कंपनीने विकत घेतली हा व्यवहार शासन थांबविणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, यासंबंधी कुठल्याही शेतकऱ्याची तक्रार नाही. तशी तक्रार असेल तर त्याची योग्य प्रकारे दखल घेतली जाईल.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत पोलिस उपनिरीक्षकाच्या घेतलेल्या खातेअंतर्गत परिक्षेच्या तारखांचा झालेला गोंधळ**

**(2) * 4490 श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, श्री.परशुराम उपरकर, डॉ.दिपक सावंत, श्री.अनिल परब** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत सन 2006 साठी माहे 2008 मध्ये घेतलेल्या खातेअंतर्गत परिक्षेत (एमपीएससी) तारखांचा गोंधळ झाल्याने शेकडो पोलिस उपनिरिक्षकांचे नुकसान होणार असल्याचे नुकतेच माहे, फेब्रुवारी, 2010 मध्ये वा त्या दरम्यान, उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, एमपीएससीच्या अनागोंदी कारभारामुळे अधिकारी होण्याची शेवटची संधी गमावण्याची वेळ शेकडो पोलिसांवर आली आहे हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी मॅट कोर्टाकडे न्याय मागितला आहे हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.आर.आर.पाटील** : (1) व (2) हे खरे नाही. परीक्षेच्या दिनांक 15.2.2008 रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात दि.1.1.2008 हा अर्हता गणण्याचा दिनांक ठेवल्याचे नमूद केले होते.

(3) परीक्षेत अयशस्वी झालेल्या उमेदवारांनी मा.मॅट कडे याचिका दाखल केल्या होत्या. त्यामध्ये ह्या मुद्याचा समावेश होता. मात्र मा.न्यायाधिकरणाने हा मुद्दा मान्य केला नाही.

(4), (5) व (6) मा.न्यायाधिकरणाने याचिकेतील इतर मुद्याबाबत दिलेल्या निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करण्याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे.

श्री. किरण पावसकर : महोदय, एमपीएससी च्या वतीने सन 2006 साठी खातयाअंतर्गत परीक्षेत बसलेल्या शेकडो पोलिसांचे भविष्य अंधारात लोटले गेले आहे. दि. 1 जानेवारी, 2006 रोजी पोलीस उप निरीक्षकांसाठी विभागाच्या अंतर्गत परीक्षेला बसण्याची पात्रता पूर्ण करण्यासाठी एमपीएससी ने सन 2008 मध्ये परीक्षा घेतली होती. त्या परीक्षेत 31 डिसेंबर, 2007 पर्यंत पात्र असणाऱ्यांनाच परवानगी देण्यात आली हे खरे आहे काय ? पदवीधरांसाठी चार वर्षे आणि जे पदवीधर नसतील त्यांना 5 वर्षे अशा प्रकारे अट शिथील करण्यात आली होती.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :4490......

श्री. किरण पावसकर ......

उत्तरात म्हटले आहे की, हे लोक मॅटमध्ये गेलेले आहेत. त्यामुळे राज्यामध्ये पालीस उपनिरीक्षकांची किती पदे रिक्त आहेत? सन 2008 मध्ये आपण खातेअंतर्गत परीक्षा घेतली होती परंतु आता ते एजबार झालेले असल्यामुळे त्यांना तुम्ही परत परीक्षेस बसण्याची परवानगी देणार आहात काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रिक्त पदे किती आहेत असा प्रश्न विचारलेले आहे. पोलीस उपनिरीक्षकांची मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. आपल्याकडे पीएसआयचे 3741 पदे रिक्त आहेत. ही पदे मोठया प्रमाणात रिक्त रहाण्याचे कारण असे आहे की, आपण पीएसआयची पदे थेट भरतीने 50 टक्के पदे भरतो. जे सेवेमध्ये कॉन्स्टेबल म्हणून लागलेले असतात त्यातून 25 टक्के पदे एमपीएससीमार्फत भरली जातात. म्हणजे जे पदवीधर असतील व त्यांची चार वर्षे सेवा पूर्ण झाली असेल तर त्यांना परीक्षेस बसता येते. बारावी पास असेल आणि त्यांची पाच वर्षे सेवा झाली असेल तर ते परीक्षेस बसू शकतात आणि दहावी पास असेल तर सहा वर्षाने पीएसआयच्या परीक्षेस एमपीएससी मार्फत बसता येते. तसेच 25 टक्के पदे ही प्रमोशनने भरली जातात. प्रमोशनची पदे शासनामार्फत भरली जात असतात. प्रमोशनची पदे रिक्त नसून शासनाने वरच्यावर प्रमोशनची पदे भरलेली आहेत. परंतु सन 2002-2006 पर्यंत एमपीएससीचा कारभार जवळ जवळ ठप्प झालेला असल्यामुळे चार वर्षाचा बकलॉग 3741 पदांचा आहे. 3741 पदे एवढी पदे रिक्त राहिलेली आहेत. ही पदे रिक्त राहण्याची आणखी एक कारण असे आहे की, आपण दर वर्षी 11000 पदे वाढवतो व त्यामध्ये सुध्दा काही पीएसआयची पदे आहेत. 3741 पदांमध्ये 1300 पदे वाढवलेली आहेत. पदाची वाढ झाल्यामुळे ही पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याच्या कामाला एमपीएससीने अलिकडच्या काळात गती दिलेली आहे. सन 2006 मध्ये परीक्षा झाली नव्हती ती परीक्षा सन 2008 मध्ये घेण्यात आली होती. या विद्यार्थ्यांचे म्हणणे असे आहे की, 1.1.2006 रोजी जेवढे लोक पात्र होते तेवढयाच लोकांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली पाहिजे. एमपीएससीच्या रुलप्रमाणे ज्यावर्षी नोटीफिकेशन काढले जाते त्यावर्षाची 1.1.2008 अशी तारीख दिली जाते. त्यामुळे त्यांनी अर्ज मागवितांना 1.1.2008 रोजी जे पात्र

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :4490......

श्री. आर.आर.पाटील....

होते त्यांचे अर्ज मागवले. म्हणजे जे पदवीधर असून ज्यांची सेवा 4 वर्षे पूर्ण झालेली आहे, बारावी असून ज्यांची सेवा पाच वर्षे पूर्ण झालेली आहे, दहावी असून ज्यांची सेवा सहा वर्षे पूर्ण झालेली आहे असे 1.1.2008 मध्ये जे पात्रतेत बसतात त्यांनी अर्ज करावेत म्हणून एमपीएससीने त्यांच्याकडून अर्ज मागितले. सर्व परीक्षा इंटरव्हयूसह एमपीएससीने पूर्ण करुन यादी सुध्दा तयार केली व त्यानंतर 1.1.2006 ते 1.1.2008 मधील काळातील लोक आले नसते तर आपला क्लेम लागला असता म्हणून सिलेक्ट न झालेल्या मुलांनी मॅट मध्ये केस केली. परंतु त्यांचा हा मुद्दा मॅटने फेटाळून लावला होता. या लोकांनी अनेक मुद्दे मॅटमध्ये उपस्थित केले होते परंतु मॅटने त्यातील दोन मुद्देच ग्राहय मानलेले आहेत. एमपीएससीने परीक्षा घेतांना काही ठिकाणी 200 मिटरचा ट्रॅक वापरला गेला व दोन राऊंड मारण्यास सांगितले होते तर काही ठिकाणी 400 मिटरचा ट्रॅक वापरला गेला होता. या विद्यार्थ्यांचे म्हणणे असे आहे की, 200 मिटरच्या ट्रॅकमध्ये जास्त वळणे असल्यामुळे आम्हाला स्पीड घेता आला नाही त्यामुळे आम्ही परीक्षेत पात्र होऊ शकलो नाही. तसेच त्यांचा दुसरा मुद्दा मॅटने ग्राहय मानला होता आणि तो म्हणजे शैक्षणिक पात्रतेचा. पदवीधर असेल तर चार वर्षे. काही कॉन्स्टेबल बारावी झाल्यानंतर सिलेक्ट होतात व दोन वर्षाने पदवीधर होतात. पदवीधर झाल्यापासून चार वर्षे म्हणजे कॉन्स्टेबल जर तिस-या वर्षी पदवीधर झाला तर त्याची सेवा ग्राहय मानायची आणि त्याला परीक्षेला बसण्यास संधी द्यायची हे दोन मुद्दे मॅ्टने ग्राहय मानल्यामुळे 533 लोकांची निवड होऊन सुध्दा त्यांना त्या पदावर सेवेत घेता आले नाही. दोन मुद्दे सोडले तर मॅटने त्यांचे सर्व मुद्दे फेटाळलेले आहेत. या दोन मुद्याच्या बाबत एमपीएससीच्या सल्ल्याने राज्यशासन हायकोर्टात गेलेले असून आता ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एमपीएससीचा कारभार जसा होम डिपार्टमेंटला कारणीभूत ठरतो तसाच तो सर्व डिपार्टमेंटमध्ये कारणीभूत ठरलेला आहे. अनेक डिपार्टमेंटमध्ये एमपीएससीने परीक्षा न घेतल्यामुळे गोंधळ झालेला आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4490

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. सन 2002 ते 2006 पर्यंत एमपीएससीची परीक्षा झालेली नाही. त्यामुळे पदवीधर उमेदवारांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे. त्या काळामध्ये 100 उमेदवार परीक्षेला बसणार असतील तर त्या ऐवजी आज 400 उमेदवार बसत आहेत. त्यामुळे आधी पदवीधर झालेल्या उमेदवारांवर अन्याय झालेला आहे, असे प्रथमदर्शनी दिसत आहे. लेखी उत्तरामध्ये "परीक्षेत अयशस्वी झालेल्या उमेदवारांनी मा.मॅटकडे याचिका दाखल केल्या होत्या," असे नमूद केले आहे. मध्यंतरी तोंडी परीक्षा घेऊन उमेदवारांना पात्र करण्यात आले होते. तशा प्रकारचे धोरण यांच्याबाबतीत शासन अवलंबिणार आहे काय ? आपल्याकडे रिक्त पदे आहेत. त्यामुळे यामध्ये शासन वेगळा व्हाया मीडिया काढणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही केस कोर्टामध्ये प्रलंबित आहे. त्यामुळे त्यावर आज भाष्य करणे योग्य नाही. कोर्टामध्ये आम्ही आमची बाजू मांडली आहे. सिलेक्ट लिस्ट लवकर करून उमेदवारांना पीएसआयचे प्रशिक्षण कसे लवकर मिळेल या गोष्टीला शासनाने प्राधान्य दिलेले आहे. पीएसआयची खूप मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. यात ज्यांच्यावर अन्याय झाला असेल त्यांच्याबाबत निश्चितपणे विचार करण्याची भूमिका शासनामार्फत घेतली जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, बारावी-दहावी पास असणाऱ्या शिपायांना पीएसआयच्या खातेअंतर्गत परीक्षेसाठी कोणते निकष आहेत, हे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. तरूण तसेच 40 वर्षे वयाच्या पोलीस शिपायाला शारीरिक चाचणीचे निकष सारखे आहेत. जे पदवीधर आहेत त्यांना 4 ते 5 वर्षाचा कालावधी व त्याहून कमी अर्हता प्राप्त पोलीस कर्मचारी आहेत त्यांना जास्त सेवा कालावधी पीएसआयच्या परीक्षेसाठी ठेवलेला आहे. त्यामुळे ज्यांचे वय जास्त त्यांच्याबाबत शारिरीक परीक्षेची पात्रता शासन शिथिल करणार आहे काय ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस दलामध्ये पीएसआय नेमले जाताना ते कार्यक्षम असणे आवश्यक आहे. त्यांना शारिरीक परिस्थितीनुसार काम करता येत नसेल तर संपूर्ण विभाग अपंग होईल, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री एस.क्यू जमा : माननीय सभपति महोदय, माननीय गृह मंत्री महोदय ने यहां पर विस्तार से उत्तर दिया है. डिपार्टमेंटल प्रमोशन देते समय या एमपीएससी के थ्रु अपाइंटमेंट करने का जो क्राइटेरिआ माननीय मंत्री महोदय ने यहां पर बताया है, वह बहुत सही है. लेकिन मुझे पूछना है कि जो लोग ग्रेज्वुएट हैं या हायर सैकेंडरी पास हैं या सैकेंडरी पास हैं और उनके द्वारा उनका पीरियड क्वालिफाय करने के बाद और फिजिकल फिटनेस पास करने के बाद यदि किसी ने कोई एडीशनल प्रोफेशनल क्वालिफिकेशन प्राप्त कर रखी है. उदाहरण के तौर पर डॉक्टरेट की डिग्री या दूसरी कोई हायर क्वालिफिकेशन उनके पास है तो एमपीएससी के थ्रु या डायरेक्ट डिपार्टमेंटल प्रमोशन देने के संबंध में उनको प्राधान्य देने की कोई प्रोवीजन आपके विभाग में है क्या ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पदवीधरांना न्याय देण्याची भूमिका शासनाने आता स्वीकारली आहे. उच्च शैक्षणिक पात्रता धारण करणारे उमेदवार पीएसआय होत असतील तर सध्याच्या गुन्ह्यांचे स्वरूप विचारात घेऊन त्यांना देखील पोलीस दलामध्ये सामावून घेण्याचा जरूर विचार करू. सायन्स, लॉ ची पदवी प्राप्त केलेले कॉन्स्टेबल मिळत असतील तर त्यांचा देखील विचार करू. सजेशर फॉर ॲक्शन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, निवड प्रक्रिया कलुषित झाल्यासंबंधीची कारणे मॅटने दिलेली आहेत. उमेदवार परीक्षा देण्यास पात्र आहेत की नाही असे कारण दिले आहे. याची शहानिशा मुलाखती टप्प्यापर्यंत केली गेलेली नाही. हे सर्व आपण मान्य केले आहे. हे प्रमुख कारण दिलेले आहे. परिणामी लेखी परीक्षा देण्यास अपात्र असलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले गेल्याने त्यांना मिळालेल्या गुणांचे चुकीचे कट ऑफ गुण ठरले. त्यामुळे अनेक पात्र ..

...3

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

उमेदवारांना संधी नाकारली गेली. हे मुद्दे सुद्धा ही प्रक्रिया कलुषित झाल्याबद्दल मॅटने म्हटले आहे. ही वस्तुस्थिती आहे काय ? असल्यास, ती आपण कशी प्लीड करणार ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदर मुद्दा मॅटमध्ये मांडण्यात आला होता. त्यांनी ऑब्जेक्शन घेतले होते. याबाबतीत पोलीस कर्मचाऱ्यांची आवश्यक ती सेवा पूर्ण केल्याची प्रमाणपत्रे गट प्रमुखांनी प्रमाणित केली होती. तसेच आयोगाने देखील मुलाखतीपूर्वी सर्व बाबी तपासल्या होत्या. त्यामुळे त्यांनी जो मुद्दा मांडला होता तो मॅटने फेटाळला आहे.

=========

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शहापूर (जि.ठाणे) येथील मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याबाबत**

**(३) * २७४० श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथे मुंबई-नाशिक महामार्गावर दिनांक २ जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास वाहतुक सुमारे आठ तास ठप्प होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी बायपासवरील सोनाळे फाटा ते कसारा बायपास अशा ७३ कि.मी. क्षेत्रासाठी ३० अधिकारी व कर्मचारी मंजूर असताना केवळ १८ अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारची वाहतूक कोंडी होवू नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) वाहतुक ठप्प झाली नव्हती. तथापि, दि.२७/१२/२००९ रोजी दुपारी १.३० वाजता शहापूर (जि.ठाणे) येथे मुंबई-नाशिक महामार्गावर खातीवली गावाच्या हद्दीत व्हॅगन कार व ट्रेलरचा अपघात झाल्यापासून सदर मार्गावरील वाहतूक एकेरी करण्यात आली होती व वाहतूक दिनांक २८/१२/२००९ पहाटे ३.५० पर्यंत वाहतूक मंद गतीने सुरु होती.

(२) भिवंडी बायपासवरील सोनाळे फाटा ते कसारा या ७३ कि.मी.क्षेत्रासाठी वाहतूक नियमन करण्यासाठी शहापूर पोलीस ठाणे याकरिता मंजूर असलेल्या ३६ अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी २२ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) सदर बायपास रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालण्यासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी कार्यरत असून त्यांच्याकडून वेळोवेळी वाहतूक नियंत्रणासाठी मोबाईल पेट्रोलिंग सुरु असते. तसेच महामार्गावर नियमित वाहतूक पोलीसांची गस्त सुरु असून वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2740..

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दिनांक 28.12.2009 रोजी पहाटे 3.00 वाजेपर्यत मुंबई - नाशिक महामार्गावरील शहापूर येथे वाहतूक ठप्प झाली होती. शहापूर येथे एका पुलाचे काम सुरु आहे त्याचबरोबर मुंबई - नाशिक हा रस्ता चौपदरी करण्याचे काम देखील सुरु आहे. त्यामुळे चार ते पाच ठिकाणी वाहतुकीचे प्रश्न निर्माण होत असतात.दिनांक 28.12.2009 रोजी वाहतूक ठप्प झाल्यामुळे मी स्वत: सात तास तेथे अडकलो होतो . त्या ठिकाणी जी पोलीस यंत्रणा कार्यरत होती ती जवळजवळ साडेचार तासानंतर आली होती हे खरे आहे काय ? येथील वाहतूक सुरळीत होण्यासाठी शासन काही सुधारणा करणार आहे काय ? या महामार्गावर मुंबई पासून 100 किलोमिटर्स अंतरापर्यतची वाहतूक सुरळीत होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय,मुंबई - नाशिक महामार्गावर वाहतूक ठप्प झाली होती या सबंधी सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र पाटील यांनी माहिती दिलेली आहे. त्या ठिकाणी व्हॅगन कार आणि ट्रेलरचा अपघात झाल्यामुळे तेथे मंद गतीने व एकरी वाहतूक सुरु होती ही गोष्ट खरी आहे.सदरच्या ठिकाणी वाहतूक सुरळीतपणे व्हावी यासाठी पोलिसांनी 40 टनाची एक क्रेन ठेवलेली आहे. त्याचबरोबर वाहतूक मदत केन्द्र सुरु करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर शहापूर हद्दीत अपघातात जखमी झालेल्या व्यक्तिंना त्वरित खाजगी वा सरकारी दवाखान्यात नेण्याची सोय करण्यात आली आहे.वाहतूक सुरळीत होण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत असे सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी फिक्स पॉईटवर चार कर्मचारी दिवसा आणि रात्री चार कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत त्याचप्रमाणे रेल्वे क्रॉसिंगवर आसनगाव फाटयाजवळ दोन अंमलदार नेमण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी पुलीचे काम सुरु आहे त्या ठिकाणीसुध्दा दोन अंमलदार नेमण्यात आलेले आहेत. तसेच त्या ठिकाणी ट्राफिक मोबाईल व्हॅन देखील ठेवण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी कर्मचारी अपुरे पडतात म्हणून एक महिन्यात कर्मचा-यांची भरती करुन येथून पुढच्या काळात वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2..

ता.प्र.क्र.2740..

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटलेले आहे की, "त्या ठिकाणी 36 अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत" मुंबई नाशिक हा रस्ता केवळ अपघातामुळे ठप्प होत नाही.अपघात न होता सुध्दा अनेक वेळा हा रस्ता ठप्प होत असतो. ज्या ठिकाणी वाहतूक ठप्प झ ालेली असते त्या ठिकाणी पोलीस नसतात. ते दुसरीकडे वेगळया कामाला लागलेले असतात अनेक वेळा हे पोलीस मोठया प्रमाणावर हप्ते वसूल करतात. केवळ अपघातामुळे वाहतूक ठप्प होत नाही तर मुंबई नाशिक हा अत्यंत रहदारीचा महामार्ग आहे परंतु वाहतुक सुरळीत होण्यासाठी पोलिसांचे त्यावर नियंत्रण नसते. या रस्त्यावरुन जलद गतीने वाहतूक व्हावी म्हणून बायपास रोड करण्यात आला आहे तसेच आता हा रस्ता चौपदरीसुध्दा करण्यात येत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनेक ठिकाणी ट्रक्स व टॅन्कर्स उभे असतात परतु त्याकडे पोलीस दुर्लक्ष करीत असतात . दोन्ही बाजूला गाडया उभ्या असल्यामुळे देखील वाहतूक ठप्प होत असते तेव्हा ही वाहतूक ठप्प होऊ नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? एका बाजूला ऑक्ट्राय वसूल करणारी नाकी असतात तर दुस-या बाजूला टोल वसूल करणारी टोल नाकी असतात. त्या ठिकाणी अर्धा तास वाहनांना थांबावे लागते . त्याचबरोबर या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ट्रक्स आणि टॅकर्स उभे असल्यामुळे वाहतूक ठप्प होत असते त्यावर शासन कोण्ंती उपाययोजना करणार आहे?

श्री.आर.आर.पाटील : सभ्ंापती महोदय,चार सहा पोलिसांची नेमणूक करुन हा प्रश्न सुटणार नाही. हा रस्ता चौपदरी करण्यात आल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न लवकर संपेल.या रस्त्यावर अनेक ठिकाणी कामे सुरु असून ती प्रगती पथावर आहेत अनेक ठिकाणी कामे सुरु असल्यामुळे अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक सुरु आहे. अशा वेळी रस्त्यावर जर अपघात झाला तर दोन्ही बाजूची वाहतूक थांबते त्यांना रिस्क्यू करण्यासाठी पोलिसांचे वाहन पाठवावयाचे ठरविले तरी तेथपर्यंत पोहोचता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. वाहतूक विभागामध्ये जी रिक्त पदे आहेत ती पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल त्याचबरोबर लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना सबंधित ॲथॉरिटीला दिल्या जातील त्यामुळे अपघाताचे प्रमाण आणि वाहतूक खोळंबण्याचे प्रमाण कमी होईल.

ता.प्र.क्र.2740..

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मुंबई नाशिक हा अत्यंत रहदारीचा महामार्ग असून त्या रस्त्यावरील वाहतूक वाढलेली आहे. त्या रस्त्यावर अनेक ठिकाणी कामे सुरु आहेत या रस्त्यावरुन किती वजनाच्या ट्रेलर्सना किती वाजता जाण्या येण्याची परवानगी दिली पाहिजे यासबंधी कोठलेही नियंत्रण नसल्यामुळे मोठी वाहने रस्त्याच्या मध्यभागी बंद पडल्यानंतर दोन्ही बाजूची वाहतूक थांबते तेव्हा अशा प्रकारच्या मोठया वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस विभागाला शासन काही सूचना देणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2740...

श्री. रमेश बागवे : त्याठिकाणी आपण 40 टन क्षमतेची क्रेन ठेवली आहे. वाहनांमुळे रस्त्यावरील वहातूक बंद पडली तर त्या क्रेनमार्फत वाहने उचलली जातात. मुंबई-नाशिक रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियामार्फत सन 2006 मध्ये सुरु झालेले हे काम सन 2010 पर्यंत पूर्ण करण्यासाठी मुदत दिली होती. हे काम मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे त्यांना आणखी 374 दिवसांची मुदत दिली आहे. त्यामुळे चौपदरीकरणाचे सुरु असल्यामुळे मंद गतीने वहातूक सुरु आहे. त्यामुळे त्याठिक्णी मोबाईल पोलीस व्हॅन व क्रेन ठेऊन रस्त्यामध्ये अडथळा येणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी आता पोलिसांची कमतरता असल्यामुळे रिक्त पदे भरली जाणार आहेत असे सांगितले. परवाच्या दिवशी या सभागृहामध्ये सुरक्षा रक्षक महामंडळ बनविण्यासाठी विधेयक मंजूर करण्यात आले. त्यावेळी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी पोलिसांमधून प्रतिनियुक्तीवर घेणार आहोत असे सांगितले. म्हणजे त्याठिकाणी असलेला खड्डा आपण आणखी खणल्यानंतर हे सर्व वाढणार नाही काय? म्हणून माझा प्रश्न आहे की, त्याठिकाणी प्रतिनियुक्तीवर पाठविल्यानंतर आपण आणखी भरती कशासाठी करणार आहात?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विषय समजून घेतला पाहिजे. आज सुध्दा आस्थापनांना पोलिसांची सेवा पुरविली जात आहे. यामध्ये रिझर्व्ह बँक, स्टेट बॅकेला सुध्दा आपण पोलिसांची सेवा उपलब्ध करुन देत आहोत. त्यामुळे त्याठिकाणी सुरक्षा रक्षक नेमल्यानंतर पोलिसांवरील ताण कमी होईल. आज आपल्याला 100 टक्के पोलीस द्यावे लागत आहेत त्याठिकाणी 25 टक्के किंवा 50 टक्के पोलीस डेप्युटेशनवर द्यावे लागतील.

श्री. दिवाकर रावते : आपण आता पदे भरावी लागतील असे सांगितले. आणि आपण परवा सांगितले की, प्रतिनियुक्तीवर पोलिसांना पाठविणार आहोत. मी आपल्या माहितीसाठी सागतो की, 25 सिक्युरिटी गार्ड उभे करा, आणि त्यांच्यासमोर 1 खाकी वर्दीतील दांडका घेतलेला पोलीस उभा केला, या एका पोलिसाचा जो दबाव आहे तो त्या 50 लोकांचा नसतो. त्यामुळे त्या खाकी वर्दीची ही वट मुंबईमध्ये आहे ती घालविणार आहात. हा विषय वेगळा असला तरी आपण पदे भरण्याबाबत सांगत आहात, ती पदे भरल्यानंतर हे लोक प्रतिनियुक्तीवर जाणार मग ही व्यवस्था कशी करणार? म्हणून मी हा विषय उपस्थित केला.

----

13-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नांदेड मधील भोंदूबाबाने गुप्त धन मिळवून देण्याचे**

**आमिष दाखवून अनेकांना फसविल्याबाबत**

**(४) * ४८३६ श्री.अरुण गुजराथी :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड मधील भोंदूबाबाने गुप्त धन मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील विविध भागात राहून अनेकांना फसविल्याच्या घटना दिनांक ६ जानेवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर भोंदूबाबाला पकडून त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** १) नांदेड येथे घटना घडलीच नाही. नांदेड मधील भोंदूबाबाने गुप्त धन मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील विविध भागात राहून अनेकांना फसविल्याची घटना घडल्याबाबत नांदेड जिल्हयात गुन्हा घडलेला नाही. तथापि, महाराष्ट्रातील विविध भागात भोंदूबाबाने गुप्त धन मिळवून देण्याच्या तसेच विविध आमिषाने फसवणूक केल्याचे पुणे, अहमदनगर, ठाणे, रायगड, सोलापूर येथे ८ विविध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(२),(३) व (४)

१) मांत्रिक कार्य करुन अडचणी दूर करतो असे सांगून मडक्यावर हात ठेवण्यास लावून मडक्यामध्ये स्फोटक पावडर ठेवून आग निर्माण करुन त्यावरचा हात काढू नका अन्यथा तुमची आई मरेल अशी धमकी देऊन रु. ३२,५००/- खंडणी स्वरुपात घेऊन फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन लष्कर पोलीस स्टेशन, पुणे गु.र.नं.३६/२०१०-कलम ४२०, ३८५,३८६,३४ औषधी व तिलस्मी उपचार अधिनियम १९५४ चे कलम ३ व ७ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपी निष्पन्न झाले असून त्या सर्वांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

२) वरीलप्रमाणे मांत्रिक कार्य करुन अडचणी दूर करतो असे सांगून फिर्यादीस मरण्याची भिती निर्माण करुन त्याचेकडून रु. २१,३००/- खंडणी स्वरुपात घेऊन फसवणूक केल्याच्या तक्राकीवरुन

३







असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समर्थ पोलीस स्टेशन, पुणे गुरनं. ३०/२०१० भा.दं.वि. कलम ४२०,३८५,३८६,३४ औषधी व तिलस्मी उपचार अधिनियम १९५४ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तिसऱ्या फरार अरोपीचा शोध घेण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

३) घराच्या तळघरात ३६ किलो सोने असल्याचे सांगून ते काढून देण्याच्या आमिषाने फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन पाथर्डी पोलीस स्टेशन, अहमदनगर, गुरनं. १२/२०१० भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, १२० ब, १०९ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध व गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

४) शेतात २० किलो सोने असल्याचे सांगून ते काढून देण्याच्या आमिषाने १६ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन पाथर्डी पोलीस स्टेशन, अहमदनगर, गुरनं. २७/२०१० भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

५) गुप्तधन प्राप्त करण्याच्या हेतुने एका लहान मुलीला ठार केल्याच्या तक्रारीवरुन मुरबाड पोलीस स्टेशन, गुरनं. १६/२००९ भा.दं.वि. कलम ३०२,२०१,३६३,३६४,१२०ब आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ९ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या ४ आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. एका आरोपीविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. उर्वरित चार आरोपींचा शोधही सुरु आहे.

६) गुप्त धन मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेशी जबरी संभोग करुन फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन कर्जत पोलीस स्टेशन, गुरनं. ११/२००९ भा.दं.वि. कलम ३७६,४२०,५०४,५०६ आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ७ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून गुन्हा





न्यायप्रविष्ठ आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

७) विविध आजारावर उपचार करतो असे खोटे भासवून रु. ५५०/- घेऊन फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन महाड शहर पोलीस स्टेशन, गुरनं. ८२/२००९ भा.दं.वि. कलम ४१७, ४२० सह औषधे व जादूच्या सहाय्याने रोगावर इलाज करण्याबाबत अधिनियम १९५६ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्याचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

८) शेतात सोन्याचा हंडा आहे तो काढून देण्याच्या आमिषाने ५ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याच्या व पैसे परत मागितल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरुन करमाळा पोलीस ठाणे, जि. सोलापूर येथे गु.र.नं. ०६/२०१० भा.दं.वि. कलम ४२०, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक ४८३६...

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, वितरीत केल्याप्रमाणे. आपल्या अनुमतीने छापील उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "नांदेड येथे घटना घडलीच नाही" असे वाचावे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्नाला इतके लांब लचक दोन पानांचे उत्तर पहिल्यांदाच देण्यात आले आहे. या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "पुणे, अहमदनगर, ठाणे, रायगड, सोलापूर येथे ८ विविध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत". या गुन्हयांची मोडस ऑपरेंडी पाहिली तर "मडक्यावर हात ठेवण्यास लावून मडक्यामध्ये स्फोटक पावडर ठेवून आग निर्माण करुन त्यावरचा हात काढू नका अन्यथा तुमची आई मरेल अशी धमकी देऊन रु.३२,५००/- खंडणी स्वरुपात घेऊन फसवणूक करणे, मांत्रिक कार्य करुन अडचणी दूर करतो असे सांगून फिर्यादीस मरण्याची भिती निर्माण करुन त्यांच्याकडून रु.२१,३००/- खंडणी स्वरुपात वसूल करुन फसवणूक करणे, घराच्या तळघरात ३६ किलो सोने असल्याचे सांगून ते काढून देण्याच्या आमिषाने फसवणूक करणे, शेतात २० किलो सोने असल्याचे सांगून ते काढून देण्याच्या आमिषाने १६ लाख रुपये घेऊन फसवणूक करणे, गुप्तधन प्राप्त करण्याच्या हेतूने एका लहान मुलीला ठार करणे, गुप्त धन मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेशी जबरी संभोग करुन फसवणूक करणे, विविध आजारावर उपचार करतो असे खोटे भासवून रु.५५०/- ची





श्री. अरुण गुजराथी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फसवणूक करणे, शेतात सोन्याचा हंडा आहे तो काढून देण्याच्या आमिषाने ५ लाख रुपये घेऊन फसवणूक करणे" अशा विविध प्रकारे गुप्त धन देण्याच्या संदर्भात प्रकार घडले आहेत. याबाबत शासन काय कारवाई करणार आहे? अंधश्रध्देच्या संदर्भात लोकांची मानसिकता बदलण्यासाठी गेल्या वर्ष-दोन वर्षापूर्वी या सभागृहामध्ये अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक मांडण्यात आले होते. त्या विधेयकाच्या बाबतीत सर्व पक्षाच्या माननीय सदस्यांना योग्य वाटणाऱ्या नवीन सुधारणा करुन परिपूर्ण अशाप्रकारचे विधेयक आणून या संदर्भात कायदा करण्याचा शासन विचार करील काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अंधश्रध्देच्या माध्यमातून फसवणूक करणारे जे प्रकार घडले आहेत त्यामध्ये गुप्त धन काढून देतो अशाप्रकारचे आमिष दाखवून फसविण्यात आले आहेत. गुप्त धन मिळवून देतो असे सांगून लाखो रुपयांची फसवणूक केली गेली आहे. त्याचप्रमाणे विवाहित महिलेवर बलात्कार करणे. गुप्तधन मिळवून देतो असे सांगून लहान मुलीला पळवूननेऊन तिचा नरबळी देणे असे प्रकार घडले आहेत. या गुन्हयांचे स्वरुप पाहिलेतर बलात्कार करणे, लहान मुलांची पळवा पळवी करणे, फसवणूक करणे असे अनुचित प्रकार अंधश्रध्देच्या माध्यमातून भोंदू बाबाने केल्याचे आढळले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4836 . . . .

श्री.आर.आर.पाटील . . . .

आता सन्माननीय सदस्यांनी विचारले की,याबाबत संबंधितांवर काय कारवाई केली आहे ? इंडियन पिनल कोड प्रमाणे जी कलमे लागतात,ती लावून मग कलम 376 हे रेपसाठी आहे, कलम 302 हे खुनासाठी आहे.या कलमांतर्गत सगळयांवर कारवाई केलेली आहे. पण हे सर्व प्रकार पाहिल्यानंतर यामध्ये खूप मोठया प्रमाणात अवेअरनेसची गरज आहे, लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी वेगवेगळया माध्यमांचा वापर करुन लोकशिक्षण देणे आणि हे फसवणुकीचे प्रकार असून, हे भोंदूबाबा कशा प्रकारे फसवतात याची लोकांना माहिती देणे आवश्यक आहे आणि असे प्रकार घडल्यानंतर हे सगळे गुन्हे लावण्यात आलेले आहेत. पण मुळातच अशा गोष्टी घडू नयेत म्हणून काही प्रतिबंधात्मक कायदे असण्याची निश्चितपणे आवश्यकता आहे. या सभागृहामध्ये अंधश्रध्दा विषयक विधेयक चर्चेसाठी आले होते, परंतु विधानसभेच्या निवडणुकांमुळे ते लॅप्स् झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जी गोष्ट सांगितली, ती गोष्ट खरी आहे की, कोणाच्याही श्रध्देला तडा न जाता, असे प्रकार जेथे होतील, त्या प्रकारांच्या बाबतीत आपल्या राज्यामध्ये काही ना काही रेग्युलेशन, कायदे असण्याची आवश्यकता आहे. सर्व पक्षाच्या संमतीने सामाजिक न्याय विभागाच्या मार्फत अशा पध्दतीचे विधेयक लवकरच आणण्याचा प्रयत्न केला जाईल. पण मध्यंतरी जे विधेयक आणण्याचा प्रयत्न केला होता, त्यातून लोकांमध्ये एवढे गैरसमज पसरले की, सरकारला देखील ते विधेयक मंजूर करुन घेता आले नाही आणि त्या विधेयकासाठी विरोधकांचीही संमती मिळविता आली नाही. कोणाच्या श्रध्देला बाधा न येता, जेथे अशा स्वरुपाचे प्रकार घडत आहेत, जे अतिशय गंभीर आहेत त्यांच्या संदर्भात एकत्र बसून जरुर विचार केला जाऊ शकतो आणि याबाबतीत शासन पुढाकार घेईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गृह मंत्रालय अस्तित्वात आहे काय ? असा प्रश्न माननीय गृह मंत्र्यांच्या उत्तरामुळे निर्माण झालेला आहे. माननीय गृह मंत्र्यांनी उत्तरामध्ये इंडियन पिनल कोडबाबत उल्लेख केला आहे. तसेच यातील कोणकोणत्या कलमानुसार कारवाई केली आहे याचीही माहिती दिलेली आहे. याचा अर्थ अशा प्रकारे भोंदूगिरी करणे, बनवाबनवी करणे, फसवाफसवी करणे यासाठी कारवाई करण्याच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद आहे आणि तो कायदा अस्तित्वात आहे.

(सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी खाली बसून बोलतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4836 . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे ॲडव्होकेट जनरल आहेत. त्यामुळे त्यांनी शेवटी बोलावयाचे आहे. तेव्हा जर इंडियन पिनल कोड हे सक्षम नसेल तर केंद्र शासनाकडे जावयास पाहिजे. मी याठिकाणी एवढे सगळे गुन्हे झाल्याची यादी बाजूला काढून ठेवलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने या कायद्यानुसार गुन्हे दाखल केलेले आहेत. परंतु या कायद्याअंतर्गत त्यांना शिक्षा होऊ शकत नाही असे माननीय गृहमंत्री महोदयांचे मत आहे काय ? जर होत नसेल तर हे कायदे सक्षम करण्यासाठी आपण भारतीय दंडविधान संहितेमध्ये बदल करणार आहात काय ? आपल्या नवीन कायद्यामध्ये याबाबत कोणती तरतूद आहे, कारण मी तो वाचलेला आहे. त्यामध्ये यासंबंधात नियम नाहीत, त्यामुळे सध्या तरी प्रचलित कायद्याअंतर्गत कारवाई करावी लागणार आहे. तसेच जो नवीन कायदा येत आहे, तो मी वाचला आहे. त्यामध्ये हे नियमच नाहीत, त्यामुळे सध्याच्या भारतीय दंडविधान संहितेखालील जी कलमे आहेत, त्या अंतर्गतच कारवाई करावी लागणार आहे. म्हणून याठिकाणी जे निवेदन देण्यात आलेले आहे, त्यावरुन आता हे कायदे कुचकामी आहेत असा आपल्या निवेदनातून अर्थ ध्वनित होत आहे. त्याबद्दल आपले काय मत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, इंडियन पिनल कोडमध्ये तरतुदी आहेत. पण त्या पुरेशा आहेत काय ? हे आम्ही तपासून पाहू आणि जर आणखी काही यामध्ये बदल करावयास हवे असतील तर तेही तपासून पाहू आणि मध्यंतरी नवा कायदा आणला होता, त्याबाबतीत आपली ऑब्जेक्शन्स् काय आहेत हेही तपासून पाहू.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यामध्ये अनेक कलमे लावलेली आहेत आणि ती अतिशय गंभीर आहेत. आपल्याला आय.पी.सी.मध्ये कोणते संशोधन करावयास पाहिजे हा नंतरचा विषय आहे. परंतु आपल्या राज्याकडे मोक्का सारखा एक कायदा आहे. याठिकाणी संघटितपणे गुन्हेगारी झाली आहे. अनेक गुन्हे केलेले आहेत. तेव्हा या सर्वांना मोक्का लावण्यात येणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मोक्का कायदा लावण्याच्या बाबतीत काही नियम

. . . .जी-3

आहेत. त्यासाठी संबंधितांवर गंभीर गुन्ह्यांच्या संदर्भातील पूर्वीची दोन चार्टशीट असावी लागतात. असे असेल तर आपण संबंधितांना मोक्का कायदा लावतो. पहिला असेल तर लागत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी आठ गुन्हे केलेले आहे.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, महाराष्ट्रात असे भोंदूबाबा पुष्कळ आहेत आणि ते लोकांच्या अंधश्रध्देचा फायदा घेऊन वेगवेगळया प्रकारच्या क्लृप्त्या करतात ही वस्तुस्थिती आहे. पण त्याशिवाय पुष्कळ ठिकाणी परंपरा म्हणून अंधश्रध्देपोटी अत्यंत क्रूर प्रथा सुरु आहे. उदाहरण द्यावयाचे तर एके ठिकाणी लहान मुलांना रोगराई होऊ नये म्हणून वरुन खाली फेकण्यात येते. दुसऱ्या ठिकाणी लहान मुलांना . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, याबाबतीत थोडी पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. दुसऱ्या ठिकाणी लहान मुलांना एका खोल विहिरीमध्ये एका पाळण्यामध्ये घालून तेथे फिरविण्यात येते.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4836.... श्री. एन. पी. हिराणी.....

अशा प्रकारच्या क्रूर परंपरा वर्षानुवर्षे सुरु आहेत. अशा परंपरांपासून लोकांना परावृत्त करण्याकरिता शासन त्या ठिकाणी लोकांना वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमातून शिक्षित करुन या परंपरांपासून परावृत्त करणार काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, होय. ज्या ठिकाणी असे प्रकार घडतात त्या ठिकाणी अवेअरनेस निर्माण करुन, लोकांमध्ये जागृती निर्माण करुन या गुन्ह्यापासून परावृत्त करण्यासाठी शासन प्रयत्न करील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नवीन कायदा करणार आहोत अशी चर्चा बरेच दिवस चालू आहे. ही घटना घडली आणि अशाच पध्दतीने हिंगोलीमध्ये सुध्दा नरबळीची घटना घडली. त्याबाबतीत लक्षवेधी सूचना दिली होती. काही वेळा लोकांकडून माहिती मिळते किंवा पोलिसांना स्वत:हून माहिती होते. पुणे जिल्ह्याच्या बाबतीत मी सांगू शकेन. काही वेळा पोलिसांनी भक्ताच्या वेशात जाऊन बाबांना पकडले आहे अशा घटना घडलेल्या आहेत. त्या ठिकाणी महिला पोलिसांना पाठविले होते. आम्ही हाताळलेली ती केस आहे. तो माणूस शोषण करीत होता.. त्याला अटक झाली तसेच शिक्षा झाली. आपण कायदा कराल तेव्हा कराल परंतु ज्या ठिकाणी अशा पध्दतीची फसवणूक होण्याची शक्यता आहे त्या ठिकाणी पोलीस स्वत: प्रतिबंधात्मक काय कारवाई करण्यात येते ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न महत्वाचा आहे. तो बाबा लोकांच्या श्रध्देचा आहे की की अंधश्रध्देचा आहे हा फरक अनेक वेळा करता येत नाही. प्रत्यक्ष फसवणूक करेपर्यंत पोलीस ॲक्शन घेऊ शकत नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे कोणत्या पधतीची आमिषे दाखविली जातात त्यावर चर्चा करुन अशा गोष्टी रोखण्यासाठी एक कायदा असण्याची निश्चितपणे आवश्यकता आहे. आय.पी.सी. मध्ये काय बदल केले पाहिजेत हे आम्ही जरुर बघू परंतु अशी फसवणूक होण्याची शक्यता आहे, यातून अशी फसवणूक होऊ शकते यासाठी कसे निर्बंध आणता येतील हे शासन बघेल.

-----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यात पोलीस दलाने पोलीस कल्याण निधी**
**नावाने जनतेकडून वर्गणी जमा केल्याबाबत**

**(५) * ५४१९ श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यात माहे जानेवारी २०१० मध्ये पोलीस कल्याण निधी या नावाने पोलीस दलाने जनतेकडून वर्गणी जमा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अशाप्रकारे जनतेकडून वर्गणी जमा करणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.आर.आर. पाटील** : (१), (२) व (३) नाही,

परंतू बीड जिल्ह्याची पोलीस कल्याण निधीची रक्कम वृध्दींगत करण्यासाठी माहे जानेवारी, २०१० मध्ये सप्तरंग या ऑर्केष्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी तिकीटांची छपाई करुन ज्यांची इच्छा असेल अशा लोकांनाच तिकाटांची विक्री करण्यात आलेली आहे. कोणासही सक्ती करण्यात आलेली नाही. तसेच कोणाकडूनही वर्गणी स्वरुपात रक्कम घेण्यात आलेली नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाला सपशेल असत्य उत्तर देण्यात आले आहे. पोलीस कल्याण निधी हा पोलिसांना कौटुंबिक अडचण निर्माण झाली तर त्यासाठी असतो आणि तो जमा करावा लागतो याबाबतीत वाद नाही. माझ्याकडे 29 जानेवारी, 2010 रोजीच्या दैनिक झुंजार या वर्तमानपत्राचे कात्रण आहे. त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, कल्याण निधीच्या नावावर अशी लूट केली जाते. सामान्य माणसांकडून तसेच अनेक वेळा व्यावसायिकांकडून जबरदस्तीने ऑर्केष्ट्रा आणून निधीची तिकिटे खपविली जातात. या ठिकाणी प्रश्नाला उत्तर देताना 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. याबाबतीत फेरचौकशी केली जाईल काय आणि पुन्हा अशी घटना घडू नये याची दक्षता घेतली जाईल काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा पध्दतीने दरवर्षी पोलीस कल्याण निधीच्या नावाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. निधी गोळा करण्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही परंतु वाहन अडवून सक्तीने पावत्या दिल्या जातात, तिकिटे दिली जातात. त्यासंदर्भात शासन काय उपाययोजना करणार आहे ?

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5419 ....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, त्या ठिकाणी सक्ती किंवा जबरदस्ती केली जात नाही. मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. पोलीस कल्याण निधीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तशा प्रकारचे काही घडत नाही. जबरदस्ती केली जात नाही. पोलीस कल्याण निधीच्या माध्यमातून ऑर्केस्ट्रा दाखविला जातो तसेच पोलीस बांधवांची जी मुले आहेत त्यांच्या शैक्षणिक, क्रीडा स्पर्धा भरविणे, त्यांना अडचणीमध्ये मदत करणे अशा कामांसाठी हा निधी वापरला जातो. त्या ठिकाणी कार्यक्रम घेताना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतली जाते तसेच रीतसर कर वगैरे भरला जातो. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करुन अशा तऱ्हेचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तो निधी पोलीस आयुक्त, आय. जी. यांच्या माध्यमातून वितरित केला जातो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. शासन पोलिसांच्या मुलांची काळजी वाहात नसल्यामुळे पोलिसांना अशा पावत्या बनवून नाक्यावर उभे राहून स्वखुशीने ट्रकवाल्यांकडून त्यांच्या मुलांच्या भवितव्याकरिता पैसे जमा करावे लागतात अशा पध्दतीचे जे निवेदन माननीय मंत्रिमहोदयांनी केले त्याबद्दल धन्यवाद देतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5419..... श्री.दिवाकर रावते....

शासन पोलिसांच्या मुलांच्या शिक्षणाची आणि उन्नतीची जबाबदारी घेणार काय आणि स्वखुषीची जबरदस्ती शासन बंद करुन शासन स्वत: काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, हा पोलीस कल्याण निधी अनेक माध्यमाद्वारे उभा राहतो. पोलीस कल्याण निधीसाठी सरकारच्यावतीने दरवर्षी 50 लाख रुपयांचे अनुदानही दिले जाते. पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून 20 ते 100 रुपयांची वर्गणी गोळा केली जाते, अशा निरनिराळया माध्यमातून हा निधी गोळा केला जातो. केवळ ऑर्केस्ट्रासारखे करमणुकीचे कार्यक्रम करुन हा निधी गोळा केला जात नाही. शासन सबळ आहे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने अशाप्रकारे निधी गोळा करण्यावर बंदी केली असताना सांगलीला राखी सावंतचा कार्यक्रम करण्यात आला, कोल्हापूरला अमेरिकन मुलींचा कार्यक्रम झाला. पोलीस निधीकरिता तेथे अमेरिकन मुलींचा तमाशा दाखविला होता. हे सर्व टी.व्ही.वर दाखविले होते. या कार्यक्रमांना शासनाचे आशीर्वाद असल्याशिवाय ते होतात काय ? खाकी ड्रेसवाल्यांकडून पावत्या फाडल्या जात आहेत. हे संस्कृतीमध्ये बसते का ते सांगावे.

श्री.रमेश बागवे : हा निधी गोळा करण्यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती केली जात नाही किंवा सक्ती केली जात नाही.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील मे.नकार टेक्साईल्सने यंत्र मागधारकांची केलेली फसवणूक**

**(६) * ६५०६ श्री.प्रितमकुमार शेगांवकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील मे.नकार टेक्साईल्समधून सुमारे दीड ते दोन कोटी रुपयांची यंत्र मागधारकांची फसवणूक केल्याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान तक्रार करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार संबधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय.
(२) व (३) या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे भाग-५ गु.र.नं. २१/२०१० भां.द.वि.क.४२०, ४०६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात चार आरोपी निष्पन्न झाले आहेत. आरोपीनी एक महीन्याच्या मुदतीत पैसे देण्याच्या अटीवर कापड खरेदी करुन त्याचे पैसे न देता शहरातील २५ व्यापाऱ्यांची सुमारे १,०३,९४,२५१/- रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे चारही आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, इचलकरंजी येथील यंत्रमाग धारकांची कापड व्यापा-यांनी फसवणूक केल्यामुळे त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनवर मोर्चा काढला होता. ज्या लोकांनी फसवणूक केली त्या दलालांची नावे मोर्चेक-यांनी पोलिसांना दिली होती. परंतु त्यांच्याकडे चौकशी न करता याप्रकरणातील आरोपी फरार दाखविलेले आहेत. या दलालांना अटक करुन फरार आरोपींचे पत्ते माहीत करुन घ्यावेत आणि त्या फरार आरोपींना अटक करावी. याप्रकरणातील आरोपींना केव्हा अटक केली जाईल ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, इचलकरंजी शहरामध्ये मे.नकार टेक्साटाईल्स या नावाने फर्म सुरु करुन 3-4 लोक त्या शहरामध्ये आरोपी क्रमांक 4, 1 व 3 हे मागील 3-4 वर्षापासून दलालीचा व्यवसाय करीत होते. चढत्या भावाने आर्थिक व्यवहार करुन त्यांनी लोकांचा विश्वास संपादित केला होता. अशाप्रकारे इचलकरंजी येथील 25 लोकांचा विश्वास संपादित करुन त्यांच्याकडून क्रेडिटद्वारे कापड खरेदी करुन पैसे देण्याच्या अटीवर बँकेचे चेक दिले आणि फर्म बंद करुन निघून गेले. त्यामुळे या प्रकरणी भा.दं.वि.क.420, 406 व 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. संबंधित सर्व आरोपींची राजस्थान या राज्यातील जनकपूर, पिंपोळा, जिल्हा शिरोर येथे त्यांची घरे असल्याचे निष्पन्न झाले आहे. राजस्थानच्या पोलिसांना तसे कळविण्यात आलेले आहे. लवकरच त्या आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6506.....

श्री.एस.क्यू.जमा : माननीय सभापति जी, यहां पर माननीय मंत्री महोदय ने जो उत्तर दिया है वह एक विशेष केस के बारे में है. मैं पूछना चाहता हूं कि किसी भी क्राइम के बारे में जब पुलिस के द्वारा या सीआईडी के मार्फत इन्वेस्टीगेशन होता है और खासकर वह क्राइम यदि इकॉनामिक क्राइम होता है तो कहा जाता है कि उनका पता नहीं लग रहा, वे भाग गए हैं या अनट्रेसेबल हैं. जब कि वे लोग वहीं पर रह रहे होते हैं. इसलिए क्राइम करने वाले लोगों को भगोड़े बताकर बहुत दिनों तक जिस केस का इन्वेस्टीगेशन पूरा नहीं होता है ऐसे केस में क्या पुलिस विभाग यह पता लगाने की कोशिश करेगा क्या, कि पुलिस विभाग के लोग या सीआईडी के लोग क्राइम करने वाले लोगों से मिले हुए तो नहीं हैं ?

यानंतर श्री.शिगम.....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

ता.प्र.क्र.6506...

श्री. रमेश बागवे : आरोपींचे घर देखील सापडलेले आहे. आरोपींची छायाचित्रे राजस्थान पोलिसांच्या स्वाधीन केलेली आहेत. तसेच मोबाईल हॅण्डसेट आणि आयएमई क्रमांक दख्ील राजस्थान पोलिसांकडे दिलेले आहेत. तपास जारोने सुरु आहे. तपासामध्ये आरोपी लवकरच सापडतील आणि त्यांना अटक करण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : आरोपींची नावे काय आहेत ?

श्री. रमेश बागवे : आरोपींची नावे याप्रमाणे आहेत, 1) लाल शंकर उर्फ लालूराम भवानी शंकर उर्फ बुभाराम रावल 2) राजेंद्र उर्फ राजू लालूराम रावल 3) नरेश लालूराम रावल 4) प्रवीण शंकरलाल घोरा, मूळ गाव राजस्थान, हा दलाल आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## गंगाखेड (जि.परभणी) येथील एका गोदामावर घातलेला छापा

**(७) * ४४२७ प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील तहसिलदारासह महसूलखाते व पोलीस यांच्या पथकाने दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी शहरातील दत्तमंदिर परिसरातील एका गोदामावर छापा घालून दोन माल मोटारीसह सरकारी योजनेतील गव्हाची १५० पोती असा सुमारे साडेचार लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) होय. तथापि या छाप्यामध्ये पोलीसांनी भाग घेतलेला नाही. सदर छापा पुरवठा निरिक्षक गंगाखेड, तहसीलदार, नायब तहसीलदार व तलाठी यांनी घातलेला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गंगाखेड येथे जिवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७ अन्वये गु.र.नं.३००४/२०१० असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात सुमारे ४,५००००/- किंमतीचे शासकीय गहु तांदुळ जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

प्रा. सुरेश नवले : या अटक केलेल्या आरोपीवर पूर्वीही साठेबाजी केल्याचे गुन्हे दाखल झालेले आहेत. या आरोपींचे नाव काय आहे ? पूर्वी त्याच्यावर असे गुन्हे दाखल होते काय ?

श्री. रमेश बागवे : अटक केलेल्या आरोपीचे नाव महेश माधवराव फणकरकर असे आहे. तो आडत व्यापारी आहे. त्याच्यावर जीवनाश्यक वस्तू कायदा 1955 च्या कलम 3 आणि 7 अन्वये गुन्हा दाखल केलाला असून 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी घेतलेली आहे. या आरोपीने शासकीय अन्नधान्याचा फार मोठ्या प्रमाणावर अपहार केलेला आहे. गहू, तांदूळ अशा जवळ जवळ 4 लाख 50 हजार किंमतीच्या मालाचा अपहार केलेला आहे. या तपासाची व्याप्ती फार मोठी आहे. या प्रकरणी सखोल तपास व्हावा म्हणून हे संपूर्ण प्रकरण सी.आय.डी.कडे सोपवित आहोत.

श्री. दिवाकर रावते : या छाप्यामध्ये पोलिसांनी भाग घेतलेला नाही, फक्त महसूल खात्याच्या अधिका-यांनी भाग घेतला असे छापील उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पोलिसांकडे हे प्रकरण आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदविला. माल जप्त करण्यात आला. अन्न व नागरी पुरवठा खात्याचा यामध्ये काही संबंध नाही काय ? छापा घालण्याचे काम अन्न व नागरी पुरवठा विभागाने करावयास पाहिजे. अन्न व नागरी पुरवठा खात्याने काय केले ? यामध्ये त्या खात्याचा सहभाग का नाही ?

श्री. आर.आर.पाटील : छापा हा नायब तहसीलदारांनी पोलिसांच्या मदतीने घातलेला आहे. पोलिसांनी तपास केलेला आहे. ज्याच्याकडे माल सापडला त्याला अरेस्ट करुन माल जप्त केलेला आहे. ब्रिफिंग घेताना माझ्या असे लक्षात आले की, पोलिसांनी याही पुढे जाऊन माल कोठून आणला, व्यापा-याला माल कोणी दिला, माल कुणाचा आणि कोणत्या गावातील होता, कोणत्या शाळेतील होता हे सर्व तपासायला पाहिजे होते. ज्यांनी हा माल दिला तेथपर्यन्तच्या सर्व लोकांना आरोपी करायला पाहिजे होते. हे या प्रकरणी केलेले मला दिसले नाही म्हणून आज सकाळीच सूचना केलेल्या आहेत की, त्याने माल कोठून आणला आणि माल कोणाचा आहे याचीही चौकशी करण्यासाठी हे संपूर्ण प्रकरण आम्ही सी.आय.डी.कडे देऊ आणि सी.आय.डी.मार्फत या प्रकरणाची डिटेल चौकशी करु. माल कोणी दिला, तो कोणत्या धान्य दुकानातील आहे, कोणत्या शाळेतील आहे, कोणत्या गावाचा आहे, हे तपासून माल देणारे देखील याप्रकरणी आरोपी करु.

श्री. विक्रम काळे : आरोपी हा आडत दुकानदार आहे. हा माल देखील दुकानदारालाच विकलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्याने या मालाची चोरी केली तो आडत दुकानदार आहे. त्याचे लायसन्स आपण रद्द करणार आहात काय ? तसेच ज्या दुकानदाराने माल घेतला त्याचेही लायसन्स रद्द करणार काय ?

श्री. रमेश बागवे : या प्रकरणी संबंधीत खात्याला शिफारस करुन त्यांचे लायसन्स देखील रद्द करु. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या गुन्ह्याची व्याप्ती मोठी आहे. या प्रकरणी सखोल तपास करण्यासाठी हे प्रकरण आम्ही सी.आय.डी.कडे देत आहोत.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नवी मुंबईतील एमआयडीसी परिसरात मुंबईहून दररोज हजारो टन डेब्रीज टाकण्यात येत असल्याबाबत

**(८) * ५०४१ ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.रामदास कदम, श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील एमआयडीसी परिसरात मुंबईहून दररोज हजारो टन डेब्रीज टाकण्यात येत असल्याप्रकरणी दि. १ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास एमआयडीसीने मज्जाव करुनही उक्त ठिकाणी डेब्रीज टाकण्याचे प्रकार चालूच आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील उक्त डेब्रीज हे मुंबईच्या विकासासाठी शासन व खाजगी विकासकांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांच्या कामामुळे निर्माण होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त एमआयडीसी क्षेत्रात डेब्रीज टाकण्यास उक्त विकासकांनी पूर्व परवानगी घेतली आहे काय,

(५) नसल्यास, सर्व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अशोक चव्हाण** : 1), 2), 3), 4) व 5) नवी मुंबई एम.आय.डी.सी. क्षेत्रामध्ये डेब्रीज टाकण्यासाठी विकासकांनी एम.आय.डी.सी.चा ना-हरकत दाखला सादर केल्यावरच नवी मुंबई महानगरपालिकेकडून सदर ठिकाणी वाहतूक करण्यास ना-हरकत दाखला देण्यात येतो. असे बहुतांशडेब्रीज मुंबईमध्ये सुरु असलेल्या सार्वजनिक/शासकीय तसेच विकासकामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांमुळे निर्माण होते. नवी मुंबई एम.आय.डी.सी. क्षेत्रात काही वेळा अनधिकृत डेब्रीज टाकल्याचे आढळते व अशा वेळी एम.आय.डी.सी. क्षेत्रातील कसूरदार व्यक्तींच्या विरोधात पोलीस कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पोलीस यंत्रणेशी संपर्क साधला जातो.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृतपणे डेब्रीज टाकणा-यांचे वाहन महानगरपालिकेचे डेब्रीज विरोधी भरारी पथक जप्त करते व त्यांच्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करते :-

1) विनापरवानगी अनधिकृतरित्या डेब्रीज टाकताना पहिल्या वेळेस वाहन जप्त केल्यास रु. 5000/- इतका दंड आकारुन वाहन सात दिवसानंतर सोडले जाते.

2) दुस-यांदा वाहन जप्त केल्यास रु. 10,000/- इतका दंड आकारुन वाहन पंधरा दिवसानंतर सोडले जाते.

3) तिस-यांदा वाहन जप्त केल्यास संबंधित वाहनाचे नोंदणीकरण रद्द करण्यासाठी परिनवहनविभागाला कळविण्यात येते.

श्री. किरण पावसकर : नवी मुंबईतील एम.आ.डी.सी. परिसरात हजारो टन डेब्रीज टाकण्यात आलेले आह असे उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. विकासकाने एम.आय.डी.सी.चा ना-हरकत दाखला सादर केल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेकडून सदर ठिकाणी वाहतूक करण्यास ना-हरकत दाखला देण्यात येतो.

...नंतर श्री. भोगले...

SGB/ D/ MMP/ 12:50

ता.प्र.क्र.5041.... श्री.किरण पावसकर.....

एमआयडीसीचे प्रमुख श्री.के.शिवाजी यांनी याबाबत मज्जाव केला आहे. प्रत्येक कंपनीच्या गेटसमोर मातीचे ढीग लागले आहेत. पावसाळ्यामध्ये कदाचित त्या मातीमुळे कंपनीमध्ये पाणी शिरुन काम थांबवावे लागण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राचा आणि मुंबईचा विकास व्हावयास पाहिजे असे माननीय मुख्यमंत्री दोन दिवसापूर्वी सभागृहात म्हणाले होते. मुंबईचा विकास होत असताना विकासकांना परवानगी दिली जाते त्या माध्यमातून लाखो टन डेब्रीज काढले जाते. हे डेब्रीज टाकण्यासाठी नवी मुंबईत जागा नाही. एमआयडीसीकडे जागा नाही. उत्तरात म्हटले आहे की, विनापरवानगी अनधिकृतरित्या डेब्रीज टाकताना पहिल्या वेळेस वाहन जप्त केल्यास 5000 रुपये दंड, दुसऱ्यांदा वाहन जप्त केल्यास 10000 रुपये दंड आणि तिसऱ्यांदा वाहन जप्त केल्यास संबंधित वाहनाचे नोंदणीकरण रद्द करण्यासाठी परिवहन विभागाला कळविण्यात येते. असे उत्तर शासनाकडून अपेक्षित नाही. मुंबईचा विकास करायला देत आहात. खड्डा झाल्यानंतर दुसरीकडे मातीचा ढीग होणार हे नैसर्गिक आहे. लाखो टन डेब्रीज टाकण्यासाठी शासनाने दुसऱ्या ठिकाणी व्यवस्था केली आहे का? केली नसल्यास नवी मुंबईमध्ये डेब्रीज टाकले जाते त्याबाबत फक्त कडक कारवाई करुन चालणार नाही. याठिकाणी दोन्ही उत्तरे विसंगत दिलेली आहेत. एका ठिकाणी शासन म्हणते की, ना हरकत दाखला दिला आहे आणि संबंधित अधिकारी मज्जाव करीत आहेत. नक्की शासनाची भूमिका काय आहे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्याला आमचा आक्षेप आहे. काल माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहात दम दिलेला आहे. या सदनामध्ये राज्यमंत्री दम देतात. अशा प्रकारचे वक्तव्य करतात. उभे राहून बोलतात. रेकॉर्डवर आलेले आहे. त्यांच्याकडून आणखी दम दिला जाण्याचा संभव आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्यास आमचा आक्षेप आहे. आपण या संदर्भात निर्देश दिलेले नाहीत.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काल माझ्या नजरेस ही बाब आणली आहे. खाली बसून बोलण्याची पध्दत आहे ती सर्वच सन्माननीय सदस्यांनी टाळली पाहिजे. सन्माननीय मंत्रीमहोदयांना मी सांगेन की, याठिकाणी उत्तर देत असताना शासनाचे प्रतिनिधी म्हणून आपण उत्तर देता, त्यामुळे आपल्या तोंडून एखादे चुकीचे वाक्य गेले तर ते चुकीचे आहे. कालचे आपले वाक्य तसे योग्य होते असे मला वाटत नाही.

..2..

ता.प्र.क्र.5041....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ते रेकॉर्डवर आहे. उभे राहून म्हणाले आहेत.

श्री.भास्कर जाधव : मी उत्तर देऊ का? काय करु?

**सभापती** : काल आपण जे उत्तर दिले ते थोडे चुकीचे होते.

श्री.भास्कर जाधव : माननीय सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर मी बोलतो. मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपल्याला जे पत्र दिले त्यातील दोन वाक्ये वाचून दाखवितो. त्यांनी आपल्याला उद्देशून पत्र दिले आहे. त्यात म्हटले आहे की, आज दिनांक 12 एप्रिल, 2010 रोजी माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या मुंबई येथील एका इमारतीच्या अनधिकृत बांधकामाबाबतची लक्षवेधी सूचना क्रमांक-3 संबंधी चर्चा सुरु असताना संबंधित विभागाचे मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी बसून काही कॉमेंट्स केल्या. म्हणजे मी खाली बसलो होतो. आणि नंतर उभे राहून डॉ.नीलम गोऱ्हे यांना तुम्ही माझ्या तोंडाला लागू नका, मी तोंड उघडले तर भारी पडेल असे म्हणालो. म्हणजे असे बसून मी बोलेन आणि उभे राहून पण मी बोलेन? तुमचे कालचे नैराश्य मी समजू शकतो. काल महापालिका निवडणुकांचा निकाल होता. तुम्ही इलेक्ट्रॉनिक चॅनेलवर असावयास पाहिजे होते. तुम्हाला ते जमले नाही म्हणून हा प्रसिध्दीचा स्टंट आहे.........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.दिवाकर रावते : आम्ही निवडून आलो सगळीकडे. यांना नैराश्य आले आहे. त्यांना दिलगीरी व्यक्त करावयास सांगा. दिलगीरी व्यक्त केली पाहिजे.

**सभापती** : काल माननीय मंत्रीमहोदयांकडून याठिकाणी ज्या पध्दतीचे भाष्य झाले, त्यातील शेवटचे भाष्य सदनातील सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत असेल, ते आपण कामकाजातून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर मी सन्माननीय सदस्यांना असे सांगितले आहे की, आपल्या जागेवर बसून बोलण्याची पध्दत टाळली पाहिजे. काही वेळेला आपला उद्देश कितीही चांगला असला तरी अर्थ वेगळा ठरु शकतो. त्यामुळे ते टाळले पाहिजे.

नंतर एल.1....

अग्रमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...... ता. प्र. क्र. 5041......

महोदय, मी आपल्या निर्णयाच्या बाहेर जाणार नाही. परंतु काल झालेले संभाषण जर कामकाजातून काढून टाकले तर दिलगिरी व्यक्त करण्याची गरज नाही, असे मला वाटते. मी काल काहीही चुकीचे वागलो नाही. तरी देखील आपला आदेश मानून मी दिलगिरी व्यक्त करतो........

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदय आपण दिलेला आदेश सुध्दा मानत नाहीत. आपण त्यांना सभागृहात दिलगिरी व्यक्त करण्याचे आदेश दिले असताना ते त्यावर कुरघोडी करुन आणि आपला आदेश बाजूला काढतात हे त्यांचे वागणे बरोबर नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, आपण सभागृहाचे नेतृत्वच करीत आहात. त्यामुळे आपली माफी मागणे काय आणि सभागृहाची माफी मागणे काय हे दोन्ही सारखेच आहे.

**सभापती** : ठीक आहे, मंत्री महोदयांनी तारांकित प्रश्न क्र. 5041 ला उत्तर द्यावे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितले की, एका ठिकाणी खड्डा पडला की स्वाभाविकच दुसऱ्या ठिकाणी तेथील डेब्रीज टाकले जाते. अशा प्रकारे येथील बरेच डेब्रीज नवी मुंबईत ज्या ठिकाणी गरज आहे तेथे टाकले जाते. पण नवी मुंबई भागातील एमआयडीसीमध्ये असे डेब्रीज टाकल्यामुळे या भागात खूप त्रास होतो. अशा प्रकारे डेब्रीज टाकत असताना ज्या एमआयडीसीमध्ये टाकले जाते त्यांची एनओसी घ्यावी लागते, जिल्हाधिकाऱ्यांची एनओसी घेतली जाते त्याचबरोबर ज्या खाजगी मालकाच्या जागेत असे डेब्रीज टाकायचे असते त्याची सुध्दा एनओसी घेतली जाते. विशेष करुन या एमआयडीसीमध्ये रिलायन्स कंपनीचा सेझ प्रकल्प सुरु आहे. त्यांनी अशा डेब्रीजची मागणी केली होती म्हणून त्यांच्या जागेत डेब्रीज टाकण्याचे काम सुरु होते. याच्या व्यतिरिक्त कोणी चुकीच्या पध्दतीने असे काम करीत असेल तर त्याला 5 हजार रुपये दंड आणि 7 दिवसांसाठी वाहतुकीचा परवाना सस्पेंड, दुसऱ्यांना पकडला गेला तर 10 हजार रुपये दंड आणि 15 दिवसांसाठी वाहतूक परवाना निलंबित केला जातो आणि तिसऱ्यांदा पकडला गेला अथवा त्याच गाडी मालकाने तोच गुन्हा तिसऱ्यांदा केल्यास संबंधित वाहनाचे नोंदणीकरण रद्द करण्यासाठी परिवहन विभागाला आम्ही कळवितो. तसेच वाशीला जाताना अशा प्रकारचे दोन टोल नाके लागातात त्या ठिकाणी परिवहन विभागाचे अधिकारी बसलेलेच असतात त्यांच्याकडून अशी प्रिकॉशन घेण्यात येते.

13-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5041........

श्री. विनोद तावडे : महोदय, डेब्रीजची वाहतूक हा विषय मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. यासंबंधीचा कायदा तसा जुनाच आहे. कारण मुंबईत ज्या पध्दतीने विकास होत आहे त्यामुळे शासनाला शास्त्रीय पध्दतीने या डेब्रीजची विल्ह्येवाटीसाठी नियोजित प्लॅन बनवावा लागेल. सुदैवाने टोल नाक्यावरुन जाताना डेब्रीज वाहून नेणारा टेम्पो लक्षात येऊ शकतो. परवा ठाणे खाडीत मॅनग्रोव्हज असलेल्या ठिकाणी डेब्रीज टाकत असताना जिल्हाधिकारी सुध्दा तेथे गेले होते. वरच्या आणि खालच्या अशा दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी जाऊन ते थांबविण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, यासंबंधी शास्त्रीय पध्दतीने उपाययोजना करण्यात येणार काय ? अन्यथा भविष्यात ठाणे शहर म्हणजे मुंबईचे डंपिंग ग्राऊंड झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून १५ दिवसात अशा प्रकारे उपाययोजना करण्याबाबतचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा व धोरणात्मक असा मुलभूत प्रश्न विचारला आहे. त्याच अनुषंगाने अशा प्रकारचे डंपिंग ग्राऊंड कायम स्वरुपी करण्यात यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतु ज्या ठिकाणी डेब्रीजची गरज असते अशा ठिकाणीच आपण हे डेब्रीज देत असतो. या डेब्रीजचा अन्य कोणालाही त्रास होऊ नये यासंबंधी जी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली त्या सूचनेचा निश्चितपणे आदर केला जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 5041......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी कायद्यात काय काय तरतूदी आहेत याची माहिती सांगितलेली आहे. परंतु आपण आतापर्यंत किती लोकांना 5 हजार, 10 हजार, 15 हजार रुपयांचा दंड केलेला आहे व त्यांच्याकडून किती वाहने जप्त करण्यात आलेली आहे याची माहिती द्यावी. यामध्ये फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे यासर्वांची आकडेवारी माननीय मंत्री महोदय देणार आहेत काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी जी आकडेवारी मागितलेली आहे ती आकडेवारी सध्या माझ्याकडे नसल्यामुळे ही सर्व आकडेवारी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. रमेश बागवे (औषधे प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादितचा सन 2001-2002,2002-2003, 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे अठ्ठाविसावा, एकोणतिसावा, तिसावा, एकतिसावा व बत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादितचा सन 2008-2009 चा 38 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "शासकीय आदिवसी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य, पिण्याच्या पाण्याची दुरवस्था, प्रसाधनगृह व स्नानगृहाची कमतरता, निकृष्ट दर्जाचे अन्न इत्यादी गैरसोयी असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी " सन 1981 मध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिका-यांना एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिका-यांप्रमाणे राजपत्रित दर्जा देण्यात येणे, तसेच मॅग्मो संघटनेच्या मागणीनुसार राज्यातील 35 जिल्हा परिषदांच्या वैद्यकीय अधिका-यांची सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यासंबंधी सन 2001 मध्ये निघालेल्या जीआर ची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील यांनी "दिनांक 20 फेब्रुवारी, 2010 पासून मुंबई महानगरपालिकेप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू होऊन सुध्दा मुंबईतील खाजगी प्राथमिक शिक्षकेतर कर्मचा-यांना सदर वेतन लागू न केल्याने त्यांच्या संघाने केलेले धरणे आंदोलन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "मौजे भाळावली, ता. राजापूर येथील एका मिळकतीच्या दाव्यासंदर्भात तेथील महात्मा गांधी तंटा मुक्त गाव समितीच्या सदस्यांनी अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपिकिशन बाजोरिया, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, किरण पावसकर, ॲड अनिल परब यांनी "अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत डबघाईला आलेली असतांनाही महापालिकेचे आयुक्त श्री. पूर्वे यांनी महानगरपालिकेची 1 कोटी 25 लाख इतकी रक्कम खाजगी बँकेत ठेवल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवानराव साळुंखे, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "राज्यात पदविकेच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकेत थेट द्वितीय वर्षात फक्त गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जात असतानाही स्वायत्त व बिगर स्वायत्त महाविद्यालयामध्ये समान परीक्षा पध्दती नसतांनाही समान गुणांवर थेट द्वितीय वर्षात प्रवेश दिला जात असल्याने विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदिश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी " राज्यात ज्या सुतगिरण्या व ऑईल मील कापूस बिया व रुई वापरुनप सुती धागा व तेल निर्मिती करतात त्यांच्याकडून वॅटची वसूली शासन करीत नसून ती स्थानिक व्यापा-यांकडून दिली जात असल्याने व्यापा-यांचे होत असलेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**

यानंतर माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कोयना धरणामुळे बाधित झालेल्या ज्या विस्तापितांचे रायगड जिल्ह्यात पुनर्वसन केले आहे त्यापैकी 100 हून अधिक कुटुंबांना पेण तालुक्यातील बाळगंगा धरण प्रकल्पामुळे पनुर्विस्थापनाला सामोरे जावे लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनूमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "26/11 च्या आतंकवादी हल्ल्यानंतर आवश्यक असलेली यंत्रसामुग्री तसेच जीवंत बॉम्ब निकामी करण्यासाठीची टीसीव्ही खरेदी करण्याबाबतची निविदा मंजूर करून घेऊनही सदर यंत्रसामुग्री ताब्यात घेण्यास पोलीस प्रशासनाकडून होत असलेला विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुमराम उपरकर, किरण पावसकर यांनी "कोकणात गेल्या पाच दिवसात वाढलेल्या उष्म्यामुळे आंबा व काजूगरावरील वॅट आकारणीची सवलत पूर्वीप्रमाणे मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूमुख जगवानी,विनोद तावडे,संजय केळकर,चंद्रकांत पाटील यांनी "मुंबईतील रॉयल वेस्टन इंडिया टर्फ क्लब या संस्थेला महालक्ष्मी रेसकोर्सची जागा भाडेपट्टयाने दिली असतानाही त्यांनी सदर जागा क्रीडा प्रकाराशिवाय वापरण्यास बंदी असतानाही गेलॉप्स या उपगारहगृहाला भाडेतत्त्वावर देऊन भाडे वसूल करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. ...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "जॉली मेकर नं.1 कफपरेड या बिल्डींगमधील लिफ्ट दिनांक 12.4.2010 रोजी सकाळी अचानकपणे 25 व्या मजल्यावरून कोठेही न थांबता सरळ खाली तळमजल्यावर आल्याने अपघाताच्या वेळी मोठा आवाज होऊन संपूर्ण बिल्डींग हादरल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...............

**सभापती** : आता नियम 93 ची निवेदन विचारात घेण्यात येतील. सर्वप्रथम अनुक्रमांक 8 वरील निवेदन घेण्यात येईल.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जीवनदायी योजनेतंर्गत कर्करोग,मेंदू विकार,किडनी विकार व हृदयरोग या आजारांच्या उपचारासाठी शासनाकडून देण्यात येत असलेली मदत

**मु.शी.**: जीवनदायी योजनेतंर्गत कर्करोग,मेंदू विकार,किडनी विकार व हृदयरोग या आजारांच्या उपचारासाठी शासनाकडून देण्यात येत असलेली मदत या बाबत डॉ.दीपक सावंत वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "जीवनदायी योजनेतंर्गत कर्करोग,मेंदू विकार,किडनी विकार व हृदयरोग या आजारांच्या उपचारासाठी शासनाकडून देण्यात येत असलेली मदत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा जीवनदायी योजनेचा प्रश्न आहे. शासनाच्या जीवनदायी योजने अंतर्गत कर्करोग, मेंदू विकार, किडनी विकास व हृदयरोग या चार आजारांच्या उपचारासाठी शासनाकडून दोन लाख रूपयांपर्यंत मदत देण्यात येते. त्यामुळे माझा मंत्रिमहोदयांना पहिला प्रश्न असा आहे की, मार्च 2010 अखेर पर्यंत या योजनेचा लाभ किती लोकांना मिळालेला आहे ? ज्यावेळी रूग्ण भरती होतात त्यावेळी त्यांच्याकडे तलाठ्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची मागणी केली जाते. आणीबाणीची परिस्थिती असल्यामुळे सगळी प्रमाणपत्र रूग्णांच्या नातेवाईकांकडे असतातच असे नाही. तसेच काही वेळा तर रूग्णातील सी.इ.ओ., सिव्हील सर्जन जागेवर नसतात. त्यामुळे नेमके कोणाला भेटायचे हे रूग्णांच्या नातेवाईकांना माहित नसते. तेव्हा रूग्णांना पटकन सेवा मिळण्याच्या दृष्टीने एक खिडकी योजना सुरू करण्यासंबंधी शासन निर्णय घेईल काय? तसेच रूग्णाकडे तलाठ्याचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असेल परंतु, रूग्णालयात भरती होताना ते आणले नसेल तर त्याला आठ दिवसामध्ये सादर करण्याची अनुमती शासन देईल काय ? असे जर केले तरच त्या रूग्णावर लगेच शस्त्रक्रिया होईल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन 2009-2010 या आर्थिक वर्षामध्ये किडनी विकार 41, हृदयविकार 5305, मेंदू विकार 161, कॅन्सरचे 2223 असे मिळून 7730 रूग्णांना फायदा झालेला आहे. शासनाने नवीन "राजीव गांधी आरोग्य श्री योजना" सुरू करीत असल्याची घोषणा केलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान..

सहा जिल्हयामध्ये पायलट बेसिसवर ही योजना प्रथम सुरु करण्यात येणार आहे.या योजनेअंतर्गत निकषानुसार ज्या रुग्णालयांची निवड करण्यात येणार आहे त्या ठिकाणी `फॅसिललीटेशन सेन्टर्स सुरु करण्यात येणार आहेत. सध्या ही संख्या 71 आहे परंतु 200 पर्यत ही संख्या आपल्याला न्यावयाची आहे. फॅसिलीटेशन सेन्टर्सवर हेल्थ कार्ड घेऊन पेशंट गेला की रुग्णालयामध्ये जागा आहे किंवा नाही की दुस-या रुग्णालयामध्ये त्याला जावयाचे आहे यासबंधीची माहिती त्याला तेथेच मिळणार आहे.त्याचबरोबर त्याच्याकडे फॅमिली हेल्थ कार्ड राहणार असल्यामुळे ब-याच सुविधा मिळणार आहे. याकरिता एक ट्रस्ट स्थापन करण्यात येणार असून त्या प्रस्तावाला आजच कॅबिनेटने मंजुरी दिलेली आहे.कॅबिनेटच्या मंजुरी नंतर ट्रस्ट स्थापन करण्यात आल्यानंतर इन्शुरन्स कंपनीची आणि रुग्णालयाची निवड करणे इत्यादी प्रक्रिया ट्रस्टच्या माध्यमातून केली जाईल.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, कॅबिनेटने मंजुरी दिली असल्याचे माननीय राज्य मंत्र्यांनी आताच सांगितले आहे परंतु त्याप्रमाणे सर्व व्यवस्था व्हावयाला अजून सहा महिने किंवा वर्षभराचा कालावधी लागू शकतो. त्यासाठी किती दिवस लागतील हे मला माहीत नाही. त्याचबरोबर या कामासाठी विमा कंपन्याबरोबर संपर्क साधावा लागणार आहे. तोपर्यत मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्या सूचना अंमलात आणणार आहात काय ? जीवनदायीचे पैसे मिळाले नाहीत म्हणून अनेक ठिकाणी ऑपरेशन करावयाची थांबली आहेत. जे.जे. पासून अनेक हॉस्पिटल्समध्ये ऑपरेशन करावयाचे थांबलेले आहेत. सन्माननीय मंत्री श्री सुरेश शेट्टी यांनी सांगितले होते की,एक महिन्याच्या आत हे पैसे देण्यात येतील. अधिवेशन सुरु होऊन आता एक महिना होऊन गेलेला आहे तेव्हा हे पैसे कधी पर्यत देण्यात येणार आहे आणि किती दिवसात ऑपरेशन व्हावयाला सुरुवात होईल ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सी.एफ.मधून 27 कोटी रुपये घेण्यात आलेले आहेत आणि 30 एप्रिल 2010 पर्यत सर्व प्रलंबित बिले देण्यात येतील.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील ताम्हणकोंड नदी वरील पुलाचे बांधकाम बंद पडणे .

**मु. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील ताम्हणकोंड नदीवरीलपुलाचे बांधकाम बंद पडणे. याबाबत सर्वश्री किरण पावसकर,परशुराम उपरकर, वि.प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किरण पावसकर,परशुराम उपकर यांनी " सिंधुदूर्ग जिल्हयातील ताम्हणकोड नदीवरील पुलाचे बांधकाम बंद पडणे."या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हाातील ताम्हणकोंड नदीवरील पुलाचे बांधकाम बंद पडल्यासबंधी मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्या संदर्भात मला माननीय मंत्र्यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. त्या ठिकाणी सातीवन आणि देवाचा व्हाळ असे दोन पूल असूनही ग्रामस्थांची खरी गरज असलेल्या नदीवर जंगली वासे टाकून ग्रामस्थांनी साकव तयार केलेले आहे. ज्या ठिकाणी खरोखर गरज आहे त्या ठिकाणी पूल बांधण्यात यावा यासाठी आंदोलन करण्यात आले होते. बेरडयाचा गाळू नाल्यावरील साकवाचे काम पश्चिम घाट विकास योजनेअंतर्गत मंजूर असून ते काम प्रगतीपथावर आहे असे निवेदनात म्हटलेले आहे. याकामाची निविदा केव्हा काढण्यात येणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिल्याप्रमाणे ताम्हण्कोंड नदीवरील एक साकव म्हाराटी वाडी जवळ असून त्याचे काम सुरु झाल्यानंतर तेथील गावच्या लोकांनी सांगितले की, येथे साकव बांधण्यात येऊ नये तर बेरडयाचा गाळू नाल्यावर साकव बांधण्यात यावा. त्यानुसार त्या ठिकाणी वेगळया पध्दतीने काम सुरु करण्यात आले होते.त्यानंतर सरपंचानी पुन्हा असे सागितले की म्हाराटी वाडीजवळसुध्दा साकव पाहिजे तेव्हा दोन्ही ठिकाणच्या साकव बांधण्याचे काम सुरु केले आहे..

श्री.परशुराम उपरकर : पश्चिम घाट विकास योजनेअंतर्गत या कामासाठी निधी उपलब्ध आहे काय आणि तो निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय

श्री.छगन भुजबळ : मे 2010 अखेरपर्यत दोन्ही साकवांची कामे पूर्ण् करण्याचे नियोजन आहे.

-----

**नियम 93 चे निवेदन क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आज सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे नियम 93 चे निवेदन क्रमांक 2 मी पुढे ढकलतो.

----

13-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O 4

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.भारवि 13.10

**पृ. शी.** म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु. शी.** : म्हाडा कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत श्री.कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील यांनी . "म्हाडा कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, म्हाडामधील दोन विभागात काम करणा-या कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू आहे. म्हाडाच्या एकत्रित स्थापनेनंतर जे कर्मचारी म्हाडामध्ये समाविष्ट झाले होते त्यांना मात्र पेन्शन योजना लागू नाही. हे कर्मचारी निवृत्त होऊन आता त्यांचे वय 80 ते 90 वर्षापर्यत असून त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांना पेन्शन योजना लागू करण्याच्या सदर्भात विधिमंडळात अनेकदा आश्वासने देण्यात आली होती तसेच . अनेकवेळा प्रस्ताव पाठविण्यात आले होते.. शासनाच्या वतीने देखील अनेकदा तसे सांगण्यात आले होते परंतु त्याबाबतीत नन्नाचा पाढा वाचण्यात येत आहे. आता निवेदनात असे सांगण्यात आले आहे की "नोव्हेंबर 2005 सालानंतर कोणालाही पेन्शन योजना लागू होणार नाही." मला असे सांगावयाचे आहे की , नोव्हेंबर 2005 च्या अगोदर 1982-1983 साली या कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करण्यासबंधीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता आणि त्यावेळी शासनाने त्याला संमती दिली होती, .मान्यता दिली होती तसेच आश्वासन दिले होते. त्यावेळच्या कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन कटिबध्द आहे अशा प्रकारचे आश्वासन देखील दिले होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

असे असतांना याठिकाणी "नाही" म्हणणे शासनाला शोभादायक नाही. या अधिवेशनामध्ये म्हाडाचे कर्मचारी हे शासनाचे अंगभूत कर्मचारी आहेत त्यांना आपण निवृत्ती वेतन योजना लागू करणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या गोष्टीमध्ये मी सुधारणा करु इच्छितो. यामध्ये दोन भाग आहेत. आपणा सर्वांना माहीत आहे की, म्हाडाच्या आस्थापनेवर महसूल खात्यामधून काही अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले. महसूल खाते हा शासनाचा एक भाग आहे, ते शासनाच्या पे रोलवर आहेत. त्यांना पेन्शन लागू करण्याबाबत त्यांच्या नेमणुकीच्या पत्रामध्ये तशाप्रकारची तरतूद करण्याचे काम केले आहे. त्यामुळे म्हाडाच्या आस्थापनेवर, डयुटीवर आलेल्या अधिकाऱ्यांना ही पेन्शन योजना लागू आहे. माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, अनेक वर्षापासून महामंडळाच्या लोकांचे म्हणणे आहे की, ही पेन्शन योजना लागू करावी. त्यामुळे या विभागाने सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारुन वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला. परंतु सद्यस्थितीत आर्थिक बोजा या विभागावर घेता येणार नाही या दृष्टीकोनातून वित्त विभागाने...

(अडथळा)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सद्य परिस्थिती तशी नाही. मंत्रिमहोदय सांगत असलेली गोष्ट गेल्या दहा वर्षापासून आम्ही ऐकत आहोत. म्हाडा याठिकाणी स्वत:च्या खर्चाने ...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, गृह निर्माण विभागामार्फत वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर वित्त विभागाने केवळ या महामंडळापुरता निर्णय घेता येणार नाही. आणि तसा निर्णय घेतला तर तो इतर सर्व महामंडळांना देखील लागू करावा लागेल असे सांगून त्यांनी तो प्रस्ताव अमान्य केला. तरीसुध्दा गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून उच्च न्यायालयाकडे काही लोकांनी प्रस्ताव घेऊन जाण्याचे काम केले आहे. त्यामुळे एक वर्षाच्या आत यासंबंधी निर्णय घ्यावा असे उच्च न्यायालयाने याबाबत आदेश दिले आहेत. त्यासाठी हा विभाग प्रयत्नशील आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, याप्रकरणी वित्त विभागाला नीट निर्देश देण्याची गरज आहे. जे महामंडळ स्वत:च्या पायावर पेन्शनसाठी सक्षमपणे आर्थिक बचत करीत उभे आहे. त्यामध्ये म्हाडा आहे, प्रदूषण नियंत्रण महामंडळ आहे. या महामंडळातील कर्मचाऱ्यांचे म्हणणे असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री.विनोद तावडे....

की, ज्याक्षणी हे महामंडळ तोटयात जाईल त्यावेळी तुम्ही पेन्शन देणे बंद करा. तशाप्रकारे ते कर्मचारी लिहून देण्यास तयार आहेत. असे असतांना आपले डिपार्टमेंट मान्य करते परंतु वित्त विभागाला यामध्ये अडचण येत असली तरी जे महामंडळ चांगले काम करीत आहे. ज्यांनी बचत केली आहे, ज्या महामंडळाने यासाठी लागणारी आवश्यक ती तरतूद केली आहे त्यांना आपण कां देत नाही? सभापती महोदय, या संदर्भात आपल्या दालनामध्ये माननीय वित्तमंत्र्यांना बोलाविण्याची गरज आहे. यामध्ये स्पेसिफिक म्हटले आहे की, दि.18.7.2009 रोजी उच्च न्यायालयाचे एक वर्षाच्या आत निर्णय घ्यावा असे सांगितले आहे. आता दोन महिने राहिले आहेत. आठ ते दहा महिने हे शासन झोपा काढीत होते, निर्णय घेत नव्हते. त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधीचा निर्णय वित्तमंत्र्यांकडून घोषित करुन घेणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे ही एक धोरणात्मक बाब आहे. आणि आपल्याला कल्पना आहे की, याबाबतीत काही तरी निर्णय हा घ्यावा लागणार आहे. म्हणून सर्व गोष्टींचा विचार करुन मंत्रिमंडळामध्ये यासंबंधी चर्चा करता येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, म्हाडाने पेन्शनसाठी काही रक्कम बाजूला काढून ठेवली आहे, ही गोष्ट खरी आहे काय? त्यामुळे म्हाडाला त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना लागू करण्यासाठी हे शासन परवानगी देणार काय? त्याबाबतचा प्रस्ताव आपण मंत्रिमंडळापुढे नेणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे याबाबतीत गृह निर्माण विभागाची तयारी असली तरी वित्त विभागाचे असे म्हणणे आहे की, एका महामंडळापुरता ही योजना लागू करता येणार नाही...

(अडथळा)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, यामुळे शासनावर आर्थिक भार पडत नाही...

श्री. सचिन अहिर : आणि म्हणून मी मघाशी सांगितल्याप्रमाणे गृह निर्माण विभागाची सकारात्मक भूमिका आहे. तरीसुध्दा सामूहिक जबाबदारी म्हणून हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे घेऊन जाण्याची आपली तयारी आहे.

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्री महोदय, सन्माननीय वित्तमंत्र्यांसह म्हाडाचे अधिकारी व आपणाबरोबर माझ्या दालनामध्ये या संदर्भात बैठक घेण्यात येईल. असे यानिमित्ताने मी सांगू इच्छितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अकोला महानगरपालिकेला एकात्मिक घरकूल आवास योजनेकरिता देण्यात आलेला निधी इतरत्र वळता करणे

**मु.शी.**: अकोला महानगरपालिकेला एकात्मिक घरकूल आवास योजनेकरिता देण्यात आलेला निधी इतरत्र वळता करणे याबाबत सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी यांनी "अकोला महानगरपालिकेला एकात्मिक घरकूल आवास योजनेकरिता देण्यात आलेला निधी इतरत्र वळता करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, "क" वर्ग महापालिकेमध्ये जे मुख्याधिकारी म्हणून काम करीत होते, अशा व्यक्तीची अकोला महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून नेमणूक केलेली आहे. मी तीन प्रश्न विचारले होते आणि त्यामध्ये दोन म्हाडाच्या संबंधात आणि एक प्रश्न हे नगरविकास विभागाशी संबंधित होते. दोन प्रश्नांच्या बाबतीत सांगावयाचे तर आयएचएसडीपी म्हणजे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेसाठी दिलेले 78 लाख रुपये संबंधितांनी दुसऱ्या योजनेमध्ये टाकून त्याचा वापर केला आहे.याबद्दल उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, संबंधितांनी चूक केलेली आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, एक टक्केच्या ऐवजी अडीच टक्के देऊन 35 लाख रुपये सर्व्हेअरला दिले. गोरगरिबांच्या झोपडपट्टीसाठी 25 लाख रुपयांचा खर्च झालेला आहे, परंतु 35 लाख रुपये देण्यात आलेले आहेत. यामध्ये देखील अनियमितता झालेली आहे. तिसरा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून तो नगरविकास विभागाशी निगडित आहे.सभापती महोदय, मी आपल्याला दालनामध्ये विनंती केली आहे की, दोन्ही विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत उत्तर द्यावे. 1 कोटी 25 लाख . . . .

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, सदरहू निवेदनावरील चर्चा आज प्रलंबित ठेवावयाची आहे काय ?

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, तसे होत असेल तर . . . .

**सभापती** : याठिकाणी नगरविकास आणि गृहनिर्माण या दोन्ही विभागांशी संबंधित असा हा विषय आहे . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे म्हणजे हा नगरविकास विभागाचा विषय आहे. त्यामुळे आपण हा विषय राखून ठेवावा आणि नगरविकास विभागाकडून उत्तर आल्यानंतर उद्या किंवा परवा चर्चेसाठी घ्यावा.

**सभापती** : ठीक आहे.

----

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंड, राजगौंड या जातीचे चुकीचे व बेकायदेशीर प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणे

**मु. शी.** : गौंड, राजगौंड या जातीचे चुकीचे व बेकायदेशीर प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी "गोंड, राजगौंड या जातीचे चुकीचे व बेकायदेशीर प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या अनुसचित जाती आणि अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम 2000 (2003 चा क्र.10) अन्वये गोंड, राजगोंड अशी सुधारणा करण्यात आली आहे. तरीही अजूनपर्यंत त्यांना तशा प्रकारची प्रमाणपत्रे मिळत नाहीत. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांचे मत काय आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण येथे निवेदन करावयास सांगितलेले आहे आणि सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला त्याबाबत सांगावयाचे तर गोंड, राजगोंड यांनी सर्टीफीकेट घेतल्यामुळे ते नोकरीमध्ये कायम झालेले आहेत आणि आम्ही तशा प्रकारचे सर्टीफीकेट देत आहोत म्हणूनच सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे. आता त्यांना जर शासनाने मान्यता दिली असेल तर सर्टीफीकेट न देण्याचे काही कारण नाही. त्यांनी घेतलेली सर्टीफीकेट बरोबर आहेत आणि आम्ही तशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हणजेच संबंधितांना नोकरीतून काढावे लागणार नाही ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्यांना नोकरीतून काढावे लागणार नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, अनुसूचित जमातीचे चुकीचे दाखले घेऊन काही लोकांना नोकऱ्या मिळाल्या.म्हणून 1995 च्या अगोदर ज्यांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत, त्यांना 1995 साली शासनाने जी.आर.काढून संरक्षण दिलेले आहे. तरी सुध्दा काही लोकांनी या जी.आर. चा आधार न घेता किंवा जी.आर.ची मदत न घेता काही सरकारी कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.तेव्हा शासनाने 1995 मध्ये काढलेला जी.आर. सध्या अस्तित्वात आहे काय ? लोकांना त्याचे संरक्षण मिळत आहे काय ? तो जी.आर.रद्द करण्यात आलेला आहे ? हे जाहीर करण्यात यावे. जर आजही तो जी.आर.अस्तित्वात असेल आणि त्याची अंमलबजावणी सुरु असेल तर मग ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे, त्यांना संरक्षण देणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, 1995 मध्ये अशा प्रकारचे संरक्षण दिलेले आहे. पण 1995 ते 2001 या दरम्यान सुध्दा सात ते साडेसात हजार लोकांनी अशा प्रकारची सर्टीफीकेट घेऊन ते नोकरीला लागलेले आहेत. त्यावर कारवाई सुरु होती. मध्यंतरी मंत्रिमंडळा- समोर हा विषय आला होता आणि यासाठी स्वतंत्र कमिटी नेमलेली असून, त्या कमिटीचा अहवाल

. . . .क्यु-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ 13:20

श्री.बबनराव पाचपुते . . . .

आल्यानंतर याबाबतीत काय करावयाचे याचा निर्णय होणार आहे. पण त्यादृष्टीने आता कोणालाही कमी केले जाणार नाही.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने माननीय सदस्य श्री. शेंडगे जी के सवाल के जबाब में कहा कि 1995 का जी.आर. अस्तित्व में है और उसके अन्तर्गत उसके पहले के किसी कर्मचारी पर कार्रवाई नहीं होगी. पिछले नागपुर के सत्र में महानगरपालिका के कुछ कर्मचारियों के खिलाफ सर्टिफिकेट जांच करके नौकरी से निकालने की बात थी, उस समय मंत्री महोदय ने जबाब दिया था कि उनको नौकरी से नहीं निकाला जाएगा. मंत्री महोदय ने कहा है कि 1995 से 2001 के बीच के मामले मंत्रिमंडल के सामने हैं और उसके लिए एक कमेटी बनाई है. मेरा कहना यह है कि 2001 से लेकर 2010 के बीच के मामलों के बारे में आप भर्ती करने के पहले उनके सारे सर्टिफिकेट की वैधता की जांच कर लें, लेकिन नौकरी में आने के पाँच, दस या बीस साल के बाद उनके सिर पर तलवार लटकाई जाती है, जिससे उन्हें बहुत तकलीफ होती है. इसलिए मेरा प्रश्न यह है कि क्या आप 2001 के बाद के कर्मचारियों को संरक्षण देंगे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापति महोदय, अभी ऐसा कोई प्रश्न हमारे सामने नहीं है. 1995 के पहले के कर्मचारियों को संरक्षण दिया गया है. 2001 के बाद में जो कर्मचारी नौकरी में आए हैं और जिनके पास वैध प्रमाण पत्र हैं, उनके लिए कोई समस्या नहीं है.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिनी तसेच नागरी सुविधा देण्यात न येणे

**मु. शी.** : कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिनी तसेच नागरी सुविधा देण्यात न येणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. प्रकाश सोळंके ( मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी " कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिनी तसेच नागरी सुविधा देण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कोयना प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात हा विषय आहे. गेली 54 वर्षे हे प्रकल्पग्रस्त वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये हाल सोसत आहेत. या ठिकाणी जे निवेदन दिलेले आहे त्या अनुषंगाने माझे स्पेसिफिक चार प्रश्न आहेत. या कोयना प्रकल्पग्रस्तांच्या विषयामध्ये निवेदनात असे म्हटले आहे की, 2007 मध्ये समिती स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल अजून आलेला नाही. तो अहवाल किती दिवसांमध्ये येणार ? दुसरा प्रश्न असा की, 1 हजार प्रकल्पग्रस्तांना अजून जमिनी मिळालेल्या नाहीत. त्यांची पुढची पिढी यासाठी झगडत आहे. 1 हजार लोकांना जमिनी मिळालेल्या नाहीत. कारण त्या ठिकाणी अतिक्रमणे आहेत, स्थानिक सहकार्य नाही तसेच इतर अनेक गोष्टी आहेत. कित्येक वर्षे या विषयामध्ये ते पाठपुरावा करीत आहेत. या जमिनी त्यांना किती दिवसात मिळणार ? तिसरा प्रश्न असा की, ठाणे जिल्ह्यातील 10 आणि रायगड जिल्ह्यातील 14 गावांना महसुली दर्जा मिळालेला नाही. अनेक वेळा पाठपुरावा करुन सुध्दा महसुली दर्जा मिळालेला नाही. त्यांना तो दर्जा कधी मिळणार ? चौथा प्रश्न असा की, या प्रकल्पग्रस्तांना नागरी सुविधा दिलेल्या आहेत आणि त्यासाठी एवढी तरतूद केलेली आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. परंतु आपण प्रत्यक्ष जाऊन पाहिले तर तशा प्रकारच्या नागरी सुविधा त्यांना मिळालेल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी आपण स्वत: येऊन त्याची कार्यवाही झाली आहे की, नाही यासंबंधामध्ये बैठक बोलविणार काय ? कारण आयुक्त स्तरावर, जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही होत नाही. त्यामुळे आपण स्वत: येऊन जिल्ह्यामध्ये त्या गावात नागरी सुविधांच्या संदर्भात कार्यवाही झाली आहे की नाही याबाबतीत बैठक बोलविणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदरहू कोयना प्रकल्पाचे काम 1954 सालामध्ये सुरु हाऊन 1961 साली पूर्ण झालेले आहे. महाराष्ट्र प्रकल्प विस्थापित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1976 अस्तित्वात येण्यापूवी्चा हा प्रकल्प आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी चार पाच प्रश्न विचारले. 2007 मध्ये आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती स्थापन झालेली आहे त्या समितीचा उद्देश एवढाच आहे की, जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यातील अनेक प्रकल्पग्रस्त सध्या उपलब्ध नाहीत किंवा अस्तित्वात नाही. त्यांच्या वारसांचा प्रश्न आहे. त्याची निश्चिती करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्त अस्तित्वात नाहीत असे माननीय मंत्रिमहोदय कसे काय म्हणत आहेत ? त्यांचे वारस असतील.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, काही प्रकल्पग्रस्त उपलब्ध नाहीत. त्यांचे वारस निश्चित करण्याचे काम ही समिती करीत आहे. बऱ्याच ठिकाणी माहिती उपलब्ध होत नाही. निश्चितपणे या समितीच्या माध्यमातून हा डेटाबेस तयार करण्याचे काम येत्या तीन महिन्यामध्ये पूर्ण केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी लोकांना जमिनी दिलेल्या नाहीत यासंदर्भात दुसरा प्रश्न विचारलेला आहे. याबाबत निवेदनामध्ये स्पेसिफिक सांगितलेले आहे की, जवळजवळ 7001.74 हेक्टर जमीन उपलब्ध आहे आणि त्याप्रमाणे ती सर्व लोकांना निश्चितपणे वाटप केली जाईल. महसुली दर्जाच्या संदर्भात जो आहे त्याबाबतीतील कार्यवाही आणि नागरी सुविधाच्या बाबतीत ज्या अडचणी राहिलेल्या आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, हा अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वीचा प्रकल्प असला तरी सुध्दा आपण जवळजवळ 24 कोटी 17 लाख रुपये इतका निधी नागरी सुविधांसाठी दिलेला आहे आणि सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे काही कामे अपूर्ण असतील, अजूनही या सुविधा त्या ठिकाणी दिल्या गेल्या नसतील तर निश्चितपणे त्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांची बैठक घेऊन जादा निधी सुध्दा दिला जाईल आणि हे अधिवेशन संपल्यानंतर बैठक घेतली जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रकल्पग्रस्तांना मदत करण्याच्या संदर्भात डिसेंबर, 2008 च्या अधिवेशनामध्ये आपल्या दालनात आपण पुढाकार घेऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ प्रथम श्री.बरवड 13:30

श्री.रामनाथ मोते.....

काही निर्देशही दिलेले होते. ठाणे जिल्हयातील 10 गावे आणि रायगड जिल्हयातील 14 गावांच्या पुनर्वसनाबाबत या निवेदनामध्ये काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून माझा स्पेसिपिक प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्हयातील जी 10 गावे आहेत त्या गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी मागील 3 वर्षामध्ये किती रक्कम देण्यात आली आणि ती रक्कम त्या गावांच्या विकासासाठी खर्च झाली आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : ठाणे जिल्हयातील 10 गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी 8 कोटी 97 लाख 17 हजार रुपये एवढया निधीचे वाटप करण्यात आले आहे. या रकमेतून कामे अपूर्ण राहिली असतील तर आणखी निधी खर्च करण्याची शासनाची तयारी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर ही समिती नेमण्यात आली होती. या प्रकल्पग्रस्तांची चर्चा उपस्थित केल्यानंतर ही समिती स्थापन करण्यात आली. रायगड जिल्हयातील कोयना पुनर्वसनासाठी ठरविलेले एक गाव 3 वेळा उठले. आपल्या मतदार संघाजवळ हे कोयना प्रकल्पग्रस्त आहेत. त्यामुळे कोयना प्रकल्पग्रस्तांचे दु:ख आमच्यापेक्षा आपल्याला अधिक माहीत आहे. हा प्रकल्प होऊन 50 वर्षे झालेली आहेत, परंतु शासन अजूनही या लोकांचे पुनर्वसन करु शकत नाही. ही बाब शासनाला भूषणावह आहे काय ? प्रकल्पग्रस्तांच्या वारसांची यादीच सापडत नाही असे मंत्री महोदय आता म्हणाले आहेत. पण या लोकांच्या 3 पिढया झाल्या आहेत, तरीही त्यांना पर्यायी जागा दिली जात नाही. या लोकांना दोन महिन्यात जागा देण्याची कार्यवाही शासन करील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : मी पहिल्यांदाही सांगितले आहे की, पुनर्वसन अधिनियम 1976 साली अस्तित्वात आला, त्यापूर्वीचा हा प्रकल्प आहे. पूर्वीच्या कायद्यानुसार पुनर्वसनासाठी जमिनी संपादित करावयाच्या होत्या. त्या त्यांना देण्यात आलेल्या आहेत. तरी सुध्दा या प्रकल्पग्रस्तांना अधिनियमातील तरतुदीनुसार नागरी सुविधा देण्यासाठी वेळोवेळी निधी दिलेला आहे. जमिनीच्या वाटपासाठी जमीन उपलब्ध आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांसाठी सहानुभूती आहे म्हणूनच शासन त्यांच्यासाठी निश्चित कार्यवाही करीत आहे. यापुढेही जे जे करणे आवश्यक आहे ते ते केले जाईल.

-----

2....



NTK/ KGS/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मानोरा (जि.वाशिम) या गावातील पाणी टंचाईकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने सरपंच व उपसरपंच यांनी आत्मदहनाचा प्रयत्न करणे

**मु. शी.** : मानोरा (जि.वाशिम) या गावातील पाणी टंचाईकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने सरपंच व उपसरपंच यांनी आत्मदहनाचा प्रयत्न करणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे( पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील यांनी "मानोरा (जि.वाशिम) या गावातील पाणी टंचाईकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने सरपंच व उपसरपंच यांनी आत्मदहनाचा प्रयत्न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दिनांक 31.3.2010 रोजी 21 हजार रुपयांची पाणी पट्टी कोणी भरली, ही रक्कम भरण्यापूर्वी सरपंच व उपसरपंच यांना आत्महत्या करण्याचा इशारा देण्याची वेळ का आली ? तेथील अधिका-यांनी कोणती उपाययोजना केली नाही ? सरपंचांना पोलिसांनी ताब्यात घेण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि बांधकाम विभागाने यापूर्वी बैठक घेतली असती तर ती गोष्ट संयुक्तिक झाली नसती का ?

श्री.रणजित कांबळे : दिनांक 28 मार्च रोजी उपसरपंच आणि सरपंच यांनी तहसीलदार यांना पत्र दिले होती. आमच्या गावामध्ये पाण्याची टंचाई आहे त्या अनुषंगाने 28 गावाची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आहे त्या योजनेतून पाणी द्यावे अशी मागणी केली होती. त्यांनी दि.28 रोजी निवेदन दिले होते. परंतु त्या पत्रात त्यांनी असेही नमूद केले होते की, 30 तारखेपर्यंत ही कार्यवाही केली नाही तर आत्मदहन केले जाईल. हे दोघे तहसीलदार कार्यालयात आल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. त्याठिकाणी एमजेपीचे कार्यकारी अभियंता आले होते, त्यांच्याबरोबर चर्चा झाली होती. दि.31 तारखेला ग्रामपंचायतीने पैसे भरावयाचे होते. ग्रामपंचायतीने पैसे भरल्यानंतर 2 एप्रिल रोजी पाणीपुरवठा सुरु झालेला आहे.

----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

**पृ. शी.** : राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागातील दुग्ध शाळा व प्रक्षेत्र प्रकल्प राबविण्यासाठी दुग्ध उत्पादक संस्थांसाठी निधी मंजूर होऊनही वर्ग न करणे

**मु. शी.** : राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागातील दुग्ध शाळा व प्रक्षेत्र प्रकल्प राबविण्यासाठी दुग्ध उत्पादक संस्थांसाठी निधी मंजूर होऊनही वर्ग न करणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.नितीन राऊत ( दुग्धव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी "राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागातील दुग्ध शाळा व प्रक्षेत्र प्रकल्प राबविण्यासाठी दुग्ध उत्पादक संस्थांसाठी निधी मंजूर होऊनही वर्ग न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या निधी अंतर्गत हा प्रकल्प घेतलेला आहे. राज्यातील एकूण 23 जिल्हयामध्ये इंटिग्रेटेड डेअरी फार्म पार्क योजना अंतर्गत हा निधी प्राप्त झालेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

प्रत्येक लाभार्थ्याला दोन गायी या प्रमाणे 100गायींचे वाटप करण्यात येणार आहे. सुमारे 50 लोकांची मिळून एक संस्था आहे. या योजनेसाठी निधी प्राप्त झालेला असून तो अद्याप पर्यन्त संस्थांपर्यन्त पोहोचलेला नाही. प्राप्त झालेला निधी व्यपगत होणार नाही, असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. नियोजन विभागाने सुचविल्याप्रमाणे कोणत्या आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेला आहे ? हा निधी संस्थांना लवकरात लवकर केव्हा पोहोचणार आहे.

डॉ. नितीन राऊत : नियोजन विभागामार्फत ज्यासूचना आल्या होत्या त्यामध्ये बदल करण्यात आलेला आहे. गायीची किंमत आधी 20 हजार रु. ठरविण्यात आलेली होती. त्याऐवजी ती 30 हजार रुपये सुचविण्यात आलेली आहे. शासनाचे अनुदान 75 ऐवजी 50 टक्के करण्यात आलेले आहे. मिल्किंग मशिन वरील संनियंत्रणाचा खर्च वगळण्यात आलेला आहे. मिल्किंग मशिनने दूध काढले तर रोजगार निर्मिती होत नाही. रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून हा आयटेम वगळण्यात आलेला आहे. आपण हा विचार केलेला आहे की 50 प्रकल्प राज्यात निर्माण झाले तर त्यामुळे किमान 500 लोकांना काम मिळू शकेल. प्रशासकीय अनुदान 1.34 लाखावरुन 1.16 लाख इतके कमी करण्यात आलेले आहे. प्रतिफार्म खर्च 47.13 लाखावरुन 43.20 लाख केलेले आहे. मराठवाडा विकास कार्यक्रम 2007 अंतर्गत राज्य शासनानाकडून राबवायच्या योजनेतील 4 संस्थांची राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अंतर्भूत केलेल्या आहेत.. त्यामुळे 46 संस्थां ऐवजी 50 संस्था झ ाालेल्या आहे. मराठवाडयातील 4 सस्थांसाठी रुपये 2 कोटी इतकी केलेली तरतूद प्रत्यार्पित केली असून त्यामुळे राज्य शासनाची 2 कोटीची बचत झालेली आहे.

श्री. रामदास कदम : ही केन्द्र शासनाची योजना आहे. या योजनेच्या संदर्भात मला शासनाला अशी सूचना करावयाची आहे की. या संस्था तालुका आणि जिल्हा संघांशी संलग्न असतात. केन्द्र शासनाच्या योजनांतर्गत महिला बचत गटांसाठी योजना दिली, काही मागासवर्गीयांना योजना दिली. दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी ही योजना आहे. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या कुटुंबीयांना देखील या योजनेचा लाभ मिळावा, समाजातील शेवटच्या माणसाला या योजनेचा लाभ मिळावा यासाठी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत : सहकारी तत्वावर प्राथमिक संस्थांच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यन्त लाभ पोहोचवून देण्याच्या योजना असतात. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितल्या प्रमाणे अलीकडच्या काळात ज्या प्रमाणे वैयक्तिक लाभार्थ्यांचा कार्यक्रम डेव्हलप होत आहे, महिला बचत गटाच्यामाध्यमातून सक्षमता आणली जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. राम पंडागळे : या संस्था ठराविक वर्गाच्या आणि ठरावित लोकांच्या आहेत. तळागाळापर्यन्त या संस्था पोहोचत नाहीत. दारिद्र रेषेखालील गरीब माणसाला ख-या अर्थाने या योजनेचा लाभ व्हावयास पाहिजे. तेव्हा दारिद्र्य रेषेखालील माणसाला या योजनेचा थेट लाभ देण्यात येईल काय ?

डॉ. नितीन राऊत : एनजीओ, महिला बचत गट अशा सर्व लोकांचा समावेश होऊ शकेल आणि खास करुन मागासवर्गीय संस्था चॅरिटेबल संस्था पुढे येत असतील तर त्याचा देखील निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. रमेश शेंडगे : या योजनेमध्ये गायीचा समावेश केला आहे. एका गायीची किंमत 20 हजार रुपया पेक्षा जास्त आहे. माझी विनंती आहे की, या योजनंतर्गत शेळीचा समावेश करण्यात येईल काय ? शेळी 2 ते 3 हजार रुपयाला मिळते. शेळी दूध देते. अनेक लाभार्थ्यांना त्याचा फायदा होऊ शकेल.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-9..... श्री.रमेश शेंडगे.....

दुसरा प्रश्न असा आहे की, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत 5 कोटी रुपये शेळी विकास महामंडळाला दिले, ती रक्कम महामंडळाकडे वर्ग झाली. परंतु शासनाने परवानगी न दिल्यामुळे 3-4 महिने उलटून गेले तरी त्या निधीचे वाटप करता येत नाही. एकीकडे महामंडळाला शासन एक रुपया देत नाही. केंद्राकडून 5 कोटी रुपये प्राप्त झाले. तो निधी वाटप करण्यास शासन परवानगी देत नाही. ही परवानगी त्वरित दिली जाईल काय? किती दिवसात परवानगी देणार आहात?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न हा वेगळा आहे. या संदर्भात त्यांनी एखाद्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून किंवा चर्चेच्या माध्यमातून शेळी व्यवसायाचा प्रश्न उपस्थित केला तर निश्चितपणे त्यासंबंधी आमच्या खात्याकडून नोंद घेतली जाईल आणि योग्य ते निर्देश त्यासंबंधी दिले जातील. दुसरा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. एकात्मिक डेअरी पार्क तयार करीत आहोत. त्या पार्कबाबत गाईचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु एखाद्याला म्हैस हवी असेल तर म्हशीचा पार्क तयार करुन देता येईल. अलिकडच्या काळात गाईऐवजी लोक म्हशीचे दूध प्रेफर करतात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अतिशय चांगला प्रकल्प आहे. दुग्ध विकासाच्या दृष्टीने मराठवाडा, विदर्भ आणि कोकणाला याचा फायदा होणार आहे. गाईऐवजी म्हशीचा विचार करणार आहात का?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मी यापूर्वीच उत्तर दिले आहे. तसा विचार करुन त्याच्या किंमतीविषयी सुध्दा निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कळणे मायनिंग प्रकल्प धारकांकडून अटी व शर्तींचे पालन न होणे

**मु. शी.** : कळणे मायनिंग प्रकल्प धारकांकडून अटी व शर्तींचे पालन न होणे याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "कळणे मायनिंग प्रकल्प धारकांकडून अटी व शर्तींचे पालन न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 13:40

निवेदन क्रमांक-10............

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कळणे येथील मायनिंगचा विषय खूप गाजला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जन सुनावणीमध्ये 100 टक्के विरोध करुनही या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने घातलेल्या अटींचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. पहिल्या अटीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मंडळाकडे जो अहवाल प्राप्त झाला आहे, त्या अहवालामध्ये काय नमूद केले आहे? जे मातीचे बंधारे बांधले आहेत, ते पावसाळ्यात वाहून जाऊन शेतामध्ये पाणी घुसणार नाही यादृष्टीने शासन काळजी घेणार आहे का? हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी मायनिंग परिसरात यंत्रणा बसविण्यात येणार आहे असे निवेदनात म्हटले आहे. या यंत्रणेद्वारे जी हवेची गुणवत्ता तपासली जाते त्या संदर्भातील अहवालाची प्रदूषण मंडळाकडून छाननी केली जाते का? खाण परिसरात 4000 झाडे लावली आहेत असे म्हटले आहे. मी स्वत: त्या भागातील सदस्य आहे. ही झाडे कोणत्या ठिकाणी लावण्यात आली आहेत हे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दाखवून द्यावे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून या परिसरात कोणतीही वृक्ष लागवड केली जात नाही. पाहणी करुन व्यवस्थित वृक्ष लागवड केली जाईल याची काळजी घेण्यात येईल काय? स्थगन प्रस्तावाच्या संदर्भात उत्तर देताना शासनाने म्हटले होते की, खनिज प्रकल्पाच्या कॅरिंग कॅपॅसिटीचा अभ्यास करावयास हवा. खाण मालकाने कॅरिंग कॅपॅसिटीचा अभ्यास केला आहे का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाने संबंधित कंपनीकडून कम्प्लायन्स रिपोर्ट मागविण्यासंबंधीचे काम केले आहे. त्या पध्दतीने त्यांनी कम्प्लायन्स रिपोर्ट 30.3.2010 रोजी सादर केला आहे. त्या अहवालाची प्रत मी सन्माननीय सदस्यांना हवी असेल तर देऊ शकतो. जेणेकरुन सन्माननीय सदस्यांना शंका असेल तर तिचे निरसन होईल. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, पर्यावरणाच्या संदर्भात आपण ज्या काही अटी घालतो त्या अटींची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. अंमलबजावणी होत नसेल तर त्या त्यावेळी नियमानुसार ज्या सूचना द्यावयाच्या असतील त्या सूचना देण्याचे काम शासनाकडून केले जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 4000 झाडे लावली नसतील तर ही बाब गंभीर आहे. शासनाकडे कम्प्लायन्स रिपोर्ट दिल्यानंतर त्यामध्ये 4000 झाडे लावल्याचा रिपोर्ट आलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे समजून पुन्हा एकदा त्याची पाहणी करण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांकडून करु. ते

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 13:40

निवेदन क्रमांक-10............ श्री.सचिन अहिर.....

योग्य पध्दतीने आढळले नाही तर योग्य ती कारवाई केली जाईल. कॅरिंग कॅपॅसिटीबाबत देखील आपण तशा सूचना त्यांना दिल्या आहेत. त्यांनी ते करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीकोनातून तूर्त कार्यवाही झाली अशी आमची माहिती आहे.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 13:45

श्री. किरण पावसकर : महोदय, कळणे येथील प्रकल्पाच्या बाबतीत जो विरोध स्थानिक लोक करीत आहेत त्यांना यापूर्वी शासनाने चुकीच्या पध्दतीने तुरुंगात डांबण्याचे प्रकार केले आहेत. मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात मी दाखवून देऊ शकतो की, शासनाने याप्रकरणी तात्पुरती स्थगिती दिली ती दि. 12.8.2009 आणि तीच स्थगिती दि. 21.8.2009 रोजीच उठविण्यात आली. यावरुन शासन किती कार्यतत्पर आहे हे दिसू येते. ठराविक दिवसांसाठी स्थगिती देऊन ती ताबडतोब उठविली जाते. तसेच दुसरा प्रकार म्हणजे अंतर्गत रस्ते व उघड्या जागेवर धूळ उडू नये म्हणून टँकरद्वारे पाणी शिंपडण्यात येते. खनिज वाहतूक करताना ते ताडपत्रीने झाकले जाते. असेही निवेदनात म्हटले आहे. परंतु गोवा तसेच कोकणात अशा प्रकारचे प्रकल्प चालले आहेत त्यांना जर भेट दिली तर आपल्या लक्षात येईल की, रात्रीच्या वेळेस आयवासारख्या 10 टायर्स असलेल्या गाड्या त्या रस्त्यावरुन जात असतात. अशा प्रकारे गावकऱ्यांचा विरोध डावलून व आऊट ऑफ वे जाऊन सभागृहात असत्य उत्तरे देऊन हा प्रकल्प पुढे रेटण्याचे काम शासन करीत आहे. या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी ज्यादोन तीन सूचना केल्या त्या अनुषंगाने कार्यवाही करावी. तसेच ज्या ट्रान्सपोर्टर्सचा त्रास नागरिकांनाहोत आहे त्यासंबंधीची ठोस उपाययोजना शासन करणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी मायनिंगबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबत घाईघाईने निर्णय घेतलेला नाही तर ज्यावेळी आपल्याला संघर्ष समितीने निवेदन देऊन तक्रार केली असता संबंधित एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांची मागणी होती म्हणून ही स्थगिती दिली आणि यातून काय मार्ग काढला पाहिजे अशीही चर्चा झाली व कंडिशनल स्वरुपात ही स्थगिती उठविण्यात आली. यामध्ये ठरल्यानुसार अंमलबजावणी करावी लागेल अशी कंडिशन त्यात घालण्यात आली होती. पहिली कंडिशन अशी होती की, याबाबतचे कम्प्लायन्स सहा महिन्याच्या आत झाला पाहिजे. तसेच मायनिंगच्या बाबतीत ही गोष्ट निश्चित आहे की, ज्यावेळेस रस्त्यावर अशा गोष्टी होत असतात त्यावेळेस प्रदुषणाचा विचार करुन ट्रकवरती ताडपत्री लावणे या सर्व गोष्टींबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच याबाबतची अमलबजावणी परिवहन विभागाच्या माध्यमातूनही होणे आवश्यक आहे तशा सूचना देखील त्या विभागामार्फत देण्यात येतील.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : आपण सूचना देत असतो परंतु त्यांची अंमलबजावणी होते काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मी सांगितल्याप्रमाणे सुचनांचे पालन केले नसेल तर संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात येईल.

----------

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे समाजकल्याण महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करणे

मु. शी. :महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे समाजकल्याण महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करणे यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे, कपिल पाटील, विक्रम काळे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर ): महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो :--

"केंद्र शासनाच्या दिनांक 31 डिसेंबर, 2008 च्या आदेशान्वये विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या (पे बँड) उच्च शिक्षण विभागाच्या दिनांक 12 ऑगस्ट, 2009 च्या आदेशान्वये राज्यात जशाच्या तशा लागू होणे, "सामाजिक न्याय विभागातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना सुध्दा या वेतनश्रेण्या लागू कराव्या अशी विनंती उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण मंत्री, सामाजिक न्याय मंत्री यांना करतील" असे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ व उच्च शिक्षण विभाग यांच्यात झालेल्या मतैक्याच्या दिनांक 26 ऑगस्ट,2009 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद 8 वर नमूद असणे, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) अध्यक्षांनी दिनांक 16 सप्टेंबर, 2009 रोजी वा त्या दरम्यान प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांना तसेच स्वतंत्रपणे नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (NUTA) च्या उपाध्यक्षांनी सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक 10 सप्टेंबर,2009 रोजी किंवा त्यादरम्यान निवेदने सादर ही बाब करुन लक्षात आणून देणे तरीदेखील याबाबत अद्याप कोणतीही कारवाई न होणे, परिणामी समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

-----

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी मुद्दाम सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, सभागृहात लक्षवेधी सूचना लावत असताना निश्चित मुद्दे आपण उपस्थित करीत असतो. त्या मुद्यांच्या अनुषंगाने शासनाकडून उत्तराची अपेक्षा असते. या अनुषंगाने आमच्या लक्षवेधी मध्ये या ठिकाणी 5 मुद्दे जे उपस्थित केले त्यातील एकाही मुद्याला उत्तर दिलेले नाही. दि. 31 डिसेंबर, 2008 च्या केंद्रशासनाच्या जी.आर. बाबत लक्षवेधी सूचनेत उल्लेख केला त्याला एका शब्दानेही उत्तर दिलेले नाही. तसेच 80 टक्के केंद्रशासन याबाबतीत मदत करणार आहे. समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोग लागू होण्याच्या बाबतीत या वर्गाला 80 टक्के मदत मिळते, त्याचेही उत्तर दिलले नाही. राज्यशासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभागामध्ये 12 ऑगस्ट 2009 रोजी शासन निर्णय काढला त्याचाही उल्लेख निवेदनात कुठेच केलेला नाही. काही सोशल वर्क कॉलेजेस हे उच्च शिक्षण विभागात आहेत आणि काही कॉलेजेस हे समाजकल्याण विभागाकडे आहे. उदा. मातृसेवा संघ इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क हे कॉलेज उच्च शिक्षण विभागाकडे आहे. तेथे जी.आर. निघाला पण समाजकार्य विभागात

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख....

याचा अजून जी.आर.निघालेलाच नसल्यामुळे सोशल वर्ककडे जी कॉलेजेस आहेत त्यांना त्यामुळे सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही. समाज कल्याण मंत्र्यांनी उच्च शिक्षण मंत्र्यांना पत्र दिले होते परंतु ते पत्र आम्हाला मिळालेले नाही असे यांनी निवेदनात म्हटले आहे. माननीय उच्च शिक्षणमंत्र्यांनी 1 एप्रिल,2007 रोजी या सभागृहात तारांकित प्रश्न क्रमांक 2598 ला उत्तर दिलेले आहे. त्यात त्यांनी म्हटले होते की, "मुद्दा क्रमांक 8 च्या अनुषंगाने माननीय सामाजिक न्याय मंत्री यांना पत्र पाठविले आहे". सभापती महोदय, या मुद्याच्या बाबतीत एकही मुद्याची माहिती आलेली नाही.जी आली ती चुकीची आहे. यासंदर्भात, The Maharashtra Government Rules of Business and Instructions issued thereunder " मध्ये चा नियम 54 असा आहे की, " (1) Where a question asked by a member of the Legislative Assembly or Legislative Council concerns Departments which are in charge of different Ministers it shall be answered by the Minister-in-charge of the Department to which the question is sent by the Secretary, Maharashtra Legislature Secretariat.

(2) Such Minister shall, before answering such question, consult Minister-in-charge of the other Departments concerned as to the reply to be given to those parts of the question which concern such departments." केंद्र शासनाने राज्याच्या चीफ सेक्रेटरीकडे 31 डिसेंबर 2008 चा जीआर पाठविला होता व राज्याच्या चीफ सेक्रेटरींनी संबंधित 5-6 डिपार्टमेंटला तसे कळविले. मंत्र्यांच्या नावाचा उल्लेख असला तरी अधिका-यांची सुध्दा जबाबदारी आहे. मंत्र्यांने प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये जाऊन एक एक कागद गोळा करावयाचा अशी अपेक्षा नाही. टेक्नीकली रिस्पॉन्सीबीलीटी मंत्र्यांची आहे. परंतु मंत्रालयात आलेला 31 डिसेंबर, 2008 चा केंद्राचा जी.आर. आलेला असून त्यामध्ये 80 टक्के मदत केंद्रशासन देणार आहे असे म्हटलेले आहे.जर मंत्रीमहोदय उत्तर देणार असतील तर मी दोनच प्रश्न विचारणार आहे नाही तर आपल्याला हा प्रश्न राखून ठेवावा अशी मी विनंती करीन.माझा पहिला प्रश्न असा आहे की, मंत्रीमहोदय उत्तर देतो म्हणतात परंतु महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय उच्च शिक्षण मंत्र्याची बैठक मुख्य सचिवांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दालनात 26 ऑगस्ट, 2009 रोजी झाली होती. या बैठकीत झालेल्या चर्चेअंती 10 मुद्यांवर मतैक्य झाले व त्या मुद्यांच्या इतिवृत्तावर उभय पक्षानी त्याच दिवशी स्वाक्षरी केली हे खरे आहे काय ?यासंदर्भात उच्च शिक्षण मंत्र्यांनी एका शब्दात उत्तर दिले आहे, "होय".1 एप्रिल, 2010 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 2598 ला त्यांनी 'होय ' असे उत्तर दिलेले आहे. तारांकित प्रश्न क्रमांक 2599 ला तुमच्या विभागाने 19 मार्च 2010 रोजी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. माननीय मंत्रीमहोदय उत्तर देणार असतील तर मी फक्त दोनच प्रश्न विचारणार आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, सभागृहाच्या कामकाजाकडे गलथानपणाने जे अधिकारी पाहतात त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, केंद्राकडून आपल्याला 80 टक्के मदत मिळते. काही महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाकडे आहेत त्यांचा सहाव्या वेतनाचा जी.आर.निघाला. नागपूर विद्यापीठातील मातृसेवा संघ इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क बाबतीत जी.आर.निघालेला आहे कारण ते उच्च शिक्षण विभागात आहेत. आता तुम्हाला त्या जी.आर.ची केवळ कॉपीच करावयाची आहे. त्या जी.आर.मध्ये तुम्हाला वेगळे असे काहीच करावयाचे नाही. समान लोकांना वेगवेगळी वागणूक घटनेतील कलम 14 प्रमाणे तुम्हाला देता येत नाही. त्यामुळे 15 दिवसाच्या आत यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला जाईल काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 31 डिसेंबर, 2008 रोजीचा जो केंद्रशासनाचा आदेश त्याला आम्ही अमान्य केलेलेच नाही. उच्चशिक्षण मंत्री आणि अधिका-यांसोबत जी बैठक झाली होती त्याची आम्हाला माहिती नाही एवढेच आम्ही म्हटलेले आहे. सहावा वेतन आयोग लागू करण्याचा सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न आहे. त्यामुळे सहावा वेतन आयोग लागू करण्याचे आम्ही मान्य केलेला आहे परंतु डायरेक्टरकडून जशी माहिती येईल तसा सहावा वेतन आयोग लागू केला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला एक सांगा तुमचे अधिकारी जर मुडद्यासारखे जागेवरुन हालतच नाही तर तुम्हाला माहिती कशी काय मिळेल ? तुम्हाला लक्षवेधीची पूर्व सूचना देण्यात आलेली असतांना सुध्दा अधिकारी जागेवरुन हलायलाच तयार नाहीत. 31 डिसेंबर 2008 चा केंद्राचा शासन निर्णय हा सा-या देशभरासाठी निघालेला आहे. त्या जी.आर.नुसार केंद्र शासन 80 टक्के मदत करणार आहे. 12 ऑगस्ट, 2009 रोजी आपल्या राज्याने शासन निर्णय काढला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासंदर्भात आता मंत्री महोदयांनी ही बाब सोशल वर्क विभागाला लागू करण्यासाठी शासन निर्णय काढावयाचा आहे. ही सर्व माहिती मंत्रालयात उपलब्ध आहे. अधिका-यांना थोडे धावायला सांगितले तर सर्व बरोबर होईल. अधिका-यांनी काम न करणे बरोबर नाही. नागरपूरमधील उच्च शिक्षण विभागांतर्गत सोशल वर्कच्या कॉलेजेसमध्ये हे लागू झालेले आहे. तुमच्या अधिपत्याखालील कॉलेजात लागू करावयाचे आहे. त्यामुळे 15 दिवसात जी.आर.काढण्यात काय हरकत आहे?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत जी.आर.काढला जाईल.

प्रा. बी.देशमुख : सभांपती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, एकाच प्रश्नाला एकाच आठवडयात वेगळी दोन दोन उत्तरे कशी काय येऊ शकतात ? या ठिकाणी जे अधिकारी आहेत त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

यानंतर श्री.भारवि.....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रकरणातील आम्ही माहिती घेतो. यामध्ये मालाफाईड असेल तर गोष्ट वेगळी आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पूर्ण मालाफाईड आहे. माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले नाही.

**उप सभापती** : मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. यामध्ये मी चौकशी करतो. त्यात मालाफाईड आढळून आले तर मी निश्चितपणे कारवाई करतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मालाफाईड काय आहे ते मी आपणास सांगतो. सभागृहाला एवढे कॅज्युअली घेऊन कसे काय चालेल ? मी आपले लक्ष 1 एप्रिल 2010 रोजीच्या ता.प्र.क्र.2598 कडे वेधू इच्छितो. लेखी प्रश्न असा विचारला होता की, "महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय उच्च शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक 26 ऑगस्ट 2009 रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या 10 मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले हे खरे आहे काय "? त्यास मा. उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. तर 19मार्च 2010 रोजी त्याच प्रश्नाला सामाजिक न्याय मंत्र्यांनी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. यापेक्षा आपल्याला आणखी काय मालाफाईड पाहिजे. म्हणून मी येथे एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देतो की, माननीय उच्च शिक्षण मंत्री यांनी मा. सामाजिक न्याय मंत्र्यांना पत्र दिले आहे, असे उत्तर सभागृहात दिलेले आहे. माझ्याजवळ त्याची प्रत आहे आणि आज निवेदनात म्हणतात की, "पत्र मिळालेले नाही". कशाला आपण प्रोटेक्ट करता अधिकाऱ्यांना ? त्यामुळे सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. सभागृहाला एवढे कॅज्युअली ट्रीट करू देऊ नका. शेवटी मी प्रश्न विचारतो. त्यास आपण उत्तर घ्यावे. नाही तर मग आम्ही बसतो. संबंधितांवर कारवाई करण्यास शासनाला काही अडचण आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, कागद आला नाही, बैठकीचा रिपोर्ट आला नाही तर आपल्याला कारवाई करता येणार नाही. मालाफाईड इन्टेन्शन असेल तर आम्ही निश्चितच कारवाई करू.

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अपंगांना विविध सुविधा पुरविण्यासाठी सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पात तुटपुंजी तरतूद करणे तसेच अपंग शिक्षकांना अनेक महिन्याचे वेतन न मिळणे

**मु. शी.** : अपंगांना विविध सुविधा पुरविण्यासाठी सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पात तुटपुंजी तरतूद करणे तसेच अपंग शिक्षकांना अनेक महिन्याचे वेतन न मिळणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे,सर्वश्री संजय दत्त,प्रतापसिंह मोहिते-पाटील,जैनुद्दीन जव्हेरी,चरणसिंग सप्रा, एस.क्यू.जमा,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात मुकबधीर, अंध, मतिमंद व गतिमंद अशा विविध प्रकारचे अपंग मोठ्या प्रमाणात आढळून येत असून या अपंगांना विविध सुविधा पुरविण्यासाठी सन २०१०-११ मधील अर्थसंकल्पात अतिशय तुटपुंजी तरतूद करण्यात आल्याचे माहे मार्च, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून येणे, त्यामुळे ज्या अपंग मुलामुलींना आपले मनोगत व्यक्त करता येत नाही, अशा अपंगांना देण्यात येणाऱ्या सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नसणे, तसेच त्यांच्या शिक्षणासाठी पुरेशी तरतूद नसणे, अपंगांना शिक्षण देणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अनेक महिन्यापासून मिळत नसणे, तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्याचे आढळून येणे, अपंग कल्याण मंडळासाठी अतिशय कमी तरतूद असल्याने अपंग कल्याण मंडळाच्या अनेक योजनांचा लाभ अपंग मुलामुलींना न मिळणे, परिणामी अपंग मुलामुलींच्या पालकांमध्ये निर्माण होत असलेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, सबब मूकबधीर, अंध, मतिमंद व गतिमंद मुलांना शैक्षणिक, सामजिक तसेच इतर सुविधा पुरविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, शासनाने अपंग कर्मचाऱ्यांसाठी दिनांक 18.8.2004 ला एक जी.आर.काढला आहे. या जी.आर.नुसार जवळ जवळ 3100 जुनी पदे अतिरिक्त ठरत आहेत. तेवढीच पदे नव्याने द्यावी लागणार आहेत. यासंबंधी शासनाने अद्यापि काहीच निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे संस्थाचालक आणि कर्मचाऱ्यांच्या खूपच अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याबाबत शासनाने त्वरित योग्य कारवाई करणे गरजेचे आहे. नवीन पदे निर्माण करताना वर्ग-4 च्या पदाकडे लक्ष दिले पाहिजे. वर्ग-4 मध्ये काम करणारे कर्मचारी हे खरोखरच सेवा करीत असतात. परंतु, या पदावर कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. सेवा देण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. तेव्हा कंत्राटी पद्धत रद्द करावी व कायम स्वरूपी पदे निर्माण करावित याबद्दल शासन काही विचार करणार आहे काय ? महाराष्ट्र राज्य अपंग वित्त विकास महामंडळाची स्थापना दिनांक 3.12.2002 रोजी झाली. या महामंडळाला 50 कोटी रूपये भागभांडवल मंजूर केले होते. गेल्या 8 वर्षामध्ये शासनाने या महामंडळाला आता पर्यंत रूपये 8.83 कोटी प्रत्यक्षात दिलेले आहेत. 41 कोटी रूपये अवितरित झालेले आहेत. ते देण्यासंबंधी शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिले दोन प्रश्न विचारले आहेत, त्यासंबंधातील कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यासंबंधीचे काम करू. वर्ग-4 च्या पदासाठी आपल्याला मुलाखती घ्याव्या लागतात. त्यातून आपल्याला प्रक्रिया पूर्ण करावी लागते. जेथे जागा रिक्त आहे तेथे पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही आम्ही त्वरित सुरू करू. येथे तरतुदीसंबंधी देखील येथे प्रश्न उपस्थित केला आहे. आपण 50 कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याचे काम केले आहे. हा विषय नॉन प्लॅनशी संबंधित आहे. निधी देण्याची इच्छा असताना सुद्धा तो आपल्याला देता येत नाही. त्यामुळे यासंबंधी मी आणि मंत्रिमहोदय एकत्र बसून धोरणात्मक निर्णय घेणार आहोत. जेणेकरून या महामंडळाला न्याय मिळेल.

यानंतर श्री सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, स्वयं रोजगार विभागामार्फत स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी ज्या योजना आहेत त्यांची अंमलबजावणी फक्त कागदावरच आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत किती लोकांना स्वयं रोजगारासाठी कर्ज दिले? मागील वर्षी किती रक्कमेचे कर्ज देण्यात आले? तसेच, अपंग व्यक्तिंसाठी 3 टक्के राखीव कोटा ठेवण्यात आला आहे. त्यामधून आतापर्यंत किती पदे भरली आहेत, किती पदे भरावयाची आहेत? आणि किती पदांचा अनुशेष आहे. ही पदे भरण्यासाठी आपण टाईम बाऊंड कार्यक्रम निश्चित केला आहे काय?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना सन 2002 मध्ये झाली. कर्जाच्या मागणीसाठी आतापर्यंत 16,555 अर्ज आले होते, त्यापैकी 6941 लोकांना कर्ज देण्यात आले. आणि प्रत्येकी रु.25,000/- प्रमाणे 1,024 लोकांना कर्ज देण्यात आले. अशाप्रकारे यामध्ये 45 कोटींचे वाटप महामंडळामार्फत करण्यात आले. अजून 18 कोटींचे प्रस्ताव पेंडींग आहेत. दुसरे असे की, मतिमंद, अपंगांसाठी नोकऱ्यांमध्ये 10,693 जागांकरिता आरक्षण होते.त्यापैकी 9,929 लोकांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. आता फक्त 1,434 लोकांना नोकऱ्या देणे शिल्लक राहिले आहे. याबाबत दोन महिन्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली असून दि.30 जून 2010 पूर्वी या जागा भरण्याचे त्यांनी आदेश दिले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अंध, मूक, बधीर, मतिमंद, अस्थिव्यंग या लोकांचे सर्व्हेक्षण केले जात नाही. त्यामुळे राज्यामध्ये त्यांची संख्या किती आहे हे समोर येत नाही. तेव्हा त्यांचे सर्व्हेक्षण करुन त्या प्रत्येकाला ओळखपत्र देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. जेणेकरुन नोकरीच्या वेळी प्रमाणपत्र सादर करण्याच्या कचाटयातून त्यांची सुटका करणे शक्य होईल. तसेच, अस्थिव्यंग असलेल्या मुलांना सर्वसामान्य शाळेमध्ये प्रवेश देतांना अनेक अडचणी येतात. त्यामधून शासन काय मार्ग काढणार आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, याबाबतचे सर्व्हेक्षण झालेले नाही. कारण आपल्याकडे कुटुंबामध्ये मतिमंद व्यक्ती असल्यास स्वत:हून सांगण्यासाठी पुढे येत नाही.त्यामुळे यामधील निश्चित अशी संख्या मिळत नाही. या देशामध्ये लाखो लोकांची संख्या असली तरी निश्चित आकडा प्राप्त होत नाही. शासन स्तरावर



श्री.सचिन अहिर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एनजीओ व हे काम करण्यासाठी ज्या संस्था पुढे येतील त्यांची एकत्रित बैठक घेऊन अशाप्रकारे सर्व्हे करण्याबाबत पूर्तता केली जाईल. दुसरे असे की, शाळेतील प्रवेशाबाबत माननीय सदस्यांनी सांगितले आहे. ज्या अनुदानित शाळा आहेत, त्याव्यतिरिक्त या क्षेत्रामध्ये मतिमंद मुलांना शिकविण्यासाठी जे शिक्षक तयार होतात त्यापैकी अर्धे शिक्षक इतर देशामध्ये जातात. त्यामुळे काही लोक या क्षेत्रामध्ये काम करीत असतात. आणि म्हणून याबाबत शिक्षण विभागाबरोबर चर्चा करुन अशाप्रकारच्या कोर्सेसना प्राधान्य देण्याचे काम केले जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, 21 शासकीय अपंगांच्या विशेष शाळा आहेत. तसेच, स्वयंसेवी संस्थामार्फत 627 शाळा व 83 कर्मशाळा चालविल्या जातात. माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात सन 2001 पासून आलेख तयार केला गेला आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागामध्ये शासकीय शाळा अधिक असाव्यात असे वाटत नाही काय? हे करीत असतांना अपंगाच्या बाबतीत मूळ प्रश्न असा आहे की, त्यांची शैक्षणिक हेळसांड होते. त्यामध्ये शिक्षण विभाग व समाज कल्याण विभाग या दोन्ही विभागांमध्ये समन्वय पाहिजे तो नीटपणे होत नाही. म्हणून शिक्षण विभागाला यामध्ये अधिक जबाबदारीने सहभागी करुन घेऊन याबाबत एकत्रित विचार करुन शाळांची संख्या वाढविता येईल काय? तसेच, मतिमंद झालेल्यांना वयाच्या उत्तरार्धामध्ये शिक्षण घेणे शक्य व्हावे यासाठी शासन त्यांच्याकरिता विशेष योजना करणार आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे. म्हणून मी आणि आमचे माननीय मंत्री महोदय असे दोघे मिळून हाच विचार करीत आहोत.आपण सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून शिक्षणाला चालना देत असलो तरी तशा प्रकारचे शिक्षण तज्ञ सध्या आपल्याकडे आहेत की नाही हा प्रश्न आहे.आपण 52 शाळा सुरु केलेल्या आहेत, त्यातील एक शाळा बंद आहे. 50 शाळा अनुदानित आहेत. पण आपण स्वत:हून चालविण्यापेक्षा काही एन.जी.ओ.पुढे येत असतील आणि त्यांना मदत करुन, त्यांच्यामागे खंबीरपणे राहून अशा प्रकारे शाळा सुरु करता येतील काय ? यादृष्टीकोनातून शासनाकडून सकारात्मक धोरण स्वीकारले जाईल. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे की, . . . .

श्री.हेमंत टकले (खाली बसून) : शासकीय शाळांच्या बाबतीत प्रश्न विचारला होता.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, त्याबाबतीत मी सांगितलेले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, अशा शाळांसाठी शिक्षक मिळत नाहीत आणि ही वस्तुस्थिती आहे. मोठया संख्येने शिक्षक ट्रेन्ड होतात आणि बाहेर जातात. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या विशेष शाळांना अनुदान नाही. त्यामुळे जेथे वेतनाची हमी नाही, तेथे शिक्षक मिळणे कठीण आहे. त्यामुळे याठिकाणी सांगण्यात आले की, शिक्षक मिळत नाहीत. पण वेतन मिळत नसल्याने, अनुदान मिळत नसल्याने शिक्षक मिळत नाहीत. त्यामुळे शिक्षकांचे बाहेर जाण्याचे प्रमाण वाढत आहे. म्हणून अशा सर्व शाळांना विशेष बाब म्हणून अनुदान देण्याच्या बाबतीत शासन व्यवस्था करील काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण तूर्त तरी अशा प्रकारचे कोणतेही धोरण स्वीकारलेले नाही. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, . . . .

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मग माननीय मंत्री महोदयांच्या भाषणाची गरज नव्हती. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शिक्षक मिळत नाहीत म्हणून व्यवस्था होत नाही. त्यावर शिक्षक का मिळत नाहीत ? असा प्रश्न विचारला असता, माननीय मंत्री महोदय अशा प्रकारचे आमचे कोणतेही धोरण नाही असे सांगत आहेत. आपण मला संरक्षण द्यावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, . . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, तुम्ही इतके ऑफेन्सिव्ह होता की, ....

. . . .झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** . . . .

तुम्ही माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकण्याचे साधे सौजन्य दाखवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, शिक्षक मिळत नाहीत, ते बाहेर जातात. म्हणून मी त्यांना प्रश्न विचारला की, यासाठी अनुदान का मिळत नाही ? तर त्याबाबत माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले की, सध्या अनुदान देण्याचे धोरण नाही. मग आता आणखी काय ? आम्ही माननीय मंत्री महोदयांचे भाषण ऐकण्यासाठी जमलो नाही. आम्ही माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकण्यासाठी जमलो आहोत आणि यासाठी हे सभागृह आहे.

**उपसभापती** : माननीय राज्यमंत्री महोदय उत्तर देत आहेत, ते ऐकावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. त्यांनी उलटे उत्तर दिले आहे की, अनुदान देण्याचे धोरण नाही.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये मी भाषण करीत नाही. मी सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देत होतो. पण माझे उत्तर पूर्ण व्हावयाच्या अगोदरच जर सन्माननीय सदस्य आपले भाषण सुरु करीत असतील तर ते योग्य होणार नाही असे मला वाटते. मघाशी मी सांगितल्याप्रमाणे तूर्त तरी अशा प्रकारचे कोणतेही धोरण नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सजेशन केल्यानंतर आम्ही शासनाच्या स्तरावर याचा विचार करु.

----

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ D/ MMP/ 14:05

**पृ. शी.** : धर्मदाय रुग्णालयांनी दारिद्र्यरेषेखालील रुग्णांसाठी मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : धर्मदाय रुग्णालयांनी दारिद्र्यरेषेखालील रुग्णांसाठी मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विधी व न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

""धर्मादाय रुग्णालयांवर असणाऱ्या शासकीय निर्बंधातून स्वत:ची सुटका करुन नफा कमावण्यासाठी मुंबई शहरातील २० टक्क्यांहून अधिक धर्मादाय रुग्णालयानी कंपनी कायदा २५ अंतर्गत नोंदणी करणे, परिणामी या रुग्णांलयातून गोरगरीब व दारिद्र्यरेषेखालील रुग्णांसाठी मोफत मिळणारी वैद्यकीय सेवा या पुढील काळात मिळणे दुर्लभ होणे, रुग्णालयाच्या एकूण आर्थिक उत्पन्नापैकी दोन टक्के भाग हा वंचित व दारिद्र्यरेषेखालील रुग्णांसाठी खर्च करावा लागत असून रु.२५ हजारा पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यासाठी मोफत वैद्यकीय सेवा व ५० हजारांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यासाठी सवलतीच्या दरामध्ये वैद्यकीय सेवा पुरविणे या रुग्णालयांना बंधनकारक असणे, तथापि बहुतेक वेळा सदरहू योजना रुग्णालयांनी जाहिर न करणे किंवा निधी संपुष्टात आल्याचे कारण देऊन वैद्यकीय सेवा देण्याचे नाकारणे अशा प्रकारच्या तक्रारी धर्मादाय आयुक्तांकडे करण्यात येणे, गरीबांना दर्जेदार वैद्यकिय सेवा नि:शुल्क पुरविण्याच्या मोबदल्यात या रुग्णालयांना जागा, वापरण्यात येणारी वीज, पाणी, परदेशातून आयात करण्यात येणारी वैद्यकीय सामुग्री या प्रत्येकावर लागणाऱ्या करातून शासनाकडून मोठ्या प्रमाणात सवलत देण्यात येणे, सदरहू रुग्णांलयातील गरीब रुग्ण निधीचा लाभ दारिद्र्यरेषेखालील रुग्णांनाच मिळावा असे स्पष्ट आदेश असताना त्याची अंमलबजावणी रुग्णालयात न करणे, कंपनी ॲक्ट २५ खाली रुग्णालयांची नोंदणी केल्यामुळे गरिबांना असलेल्या शासकीय आरोग्य योजनांचा लाभ न मिळणे, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .झेड4



**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .झेड-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, मला आपले संरक्षण पाहिजे.

**उपसभापती** : मी आपल्याला पूर्णपणे संरक्षण देत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण जर ही लक्षवेधी सूचना वाचली आणि त्याला देण्यात आलेले उत्तर पाहिले तर ते अतिशय बोथट असल्याचे दिसून येईल. महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईमध्ये एवढा मोठा प्रश्न असताना, राज्य शासनाकडून अशा प्रकारचे उत्तर यावे हे दुर्दैव आहे. याठिकाणी फक्त इतिहास दिलेला आहे आणि सध्याची स्थितीबाबत कोणत्याही प्रकारे माहिती दिलेली नाही. म्हणून मी आपल्या मार्फत या सदनाला सांगू इच्छितो की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या कलम 41 (क) (क) च्या नुसार राज्य शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, गरीब आणि निर्धन रुग्णांवर धर्मादाय रुग्णालयांकडून सवलतीच्या दराने आणि मोफत उपचार करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी त्यांची आर्थिक जी काही उलाढाल असेल त्यामधील दोन टक्के फंड देखील राखून ठेवण्यात येतो." माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण यावर निरीक्षण करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांची कमिटी नेमलेली आहे. त्यांनी प्रत्येक हॉस्पिटलमध्ये जाऊन निर्धन आणि दुर्बल घटकातील किती पेशंट आहेत आणि त्यांच्यासाठी दोन टक्के फंड वापरला जातो की नाही हे पहावे. पण माझा सुरुवातीलाच स्पष्ट आरोप आहे की, दुर्देवाने या दोघांची मिलीभगत आहे, ज्याला इंग्रजीमध्ये हॅण्डींग ग्लो" म्हणतात. धर्मादाय आयुक्तांचे लोक आणि हॉस्पिटलमधील ॲथॉरिटी यांच्यामध्ये संगनमताने हा सर्व व्यवहार होतो. त्यामुळे यातील खऱ्या गोष्टी बाहेर पडत नाहीत. माननीय मंत्री महोदयांकडून खूप अपेक्षा आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, याबाबतीत सर्व खोटी रेकॉर्ड तयार केली जातात. याबाबत आपण संपूर्णपणे छाननी करणार आहात काय ? आपण गेल्या एका वर्षातील रेकॉर्ड पहाणार आहात काय ? मी या विषयाच्या संबंधात गेल्या तीन दिवसापासून आयुक्तांच्या कार्यालयातून माहिती मागवित आहे की, आतापर्यंत एकंदर किती लोकांना ट्रिटमेंट दिली ? किती बिल झाले आहे ? वगैरे. त्यावेळी मला असे सांगण्यात आले की, आम्ही आपल्याला फॅक्सव्दारे माहिती पाठवितो. पण आजपर्यंत त्यांच्याकडून माहितीबाबतचा फॅक्स आलेला नाही.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, कंपनी ॲक्ट 25 च्या अंतर्गत या राज्य शासनाच्या जोखडातून मुक्त व्हावे म्हणून आता सर्व जुनी हॉस्पिटल्स् आणि नव्याने येणारी हॉस्पिटल्स् ही कंपनी ॲक्ट 25 च्या अंतर्गत नोंदणी करु इच्छितात अशी स्थिती आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

हा कंपनी ॲक्ट काय आहे ? या ॲक्टच्या कलम 25 मध्ये "Power to dispense with "Limited" in name of charitable or other company" असा उल्लेख आहे. मुंबईतील सगळ्यात मोठे हॉस्पिटल म्हणजे एशियन हार्ट फाऊंडेशन हे त्याचे उदाहरण आहे. एशियन हार्ट फाऊंडेशन हे कंपनी ॲक्ट अंतर्गत नोंदले गेले आहे आणि बाकीचे हॉस्पिटल्स त्या अंतर्गत नोंदले जात आहेत. दुसरा प्रश्न असा की, धर्मादाय ॲक्टच्या अंतर्गत जे हॉस्पिटल्स आहेत आणि जे कंपनी ॲक्ट अंतर्गत जाऊ इच्छितात त्यांना शासन अटकाव करणार काय ? तिसरा प्रश्न असा की, लिलावती आणि बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ठराविक जातीच्या रुग्णांनाच प्रवेश दिला जातो. त्यावर शासन निर्बंध आणणार काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अशा पध्दतीची सेवा रुग्णांना दिली जाते काय आणि त्याचा काही रेकॉर्ड आपल्याकडे आहे काय याबाबत जो प्रश्न विचारला त्याबाबत माझ्याकडे जी माहिती प्राप्त झालेली आहे त्याप्रमाणे साधारणपणे 1.9.2006 पासून 31.12.2009 पर्यंतची माहिती आहे. मी सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला सांगू इच्छितो की, आपण दोन प्रकारे उपचार करतो. एका बाजूला आपण निर्धन रुग्णांवर उपचार करतो आणि दुसऱ्या बाजूला जे दुर्बल घटकातील रुग्ण आहेत त्यांच्यावर उपचार करतो. अशा दोन प्रकारच्या रुग्णांना आपण मदत करतो. निर्धन रुग्णांवर 100 टक्के मोफत उपचार करतो आणि जे दुर्बल घटकातील रुग्ण आहेत त्यांच्यावर 50 टक्के सवलतीच्या दरामध्ये उपचार करतो. 1.9.2006 ते 31.12.2009 पर्यंत एकूण 152 कोटी 91 लाख 75 हजार 279 रुपयांची ट्रिटमेंट या दोन्ही घटनाकातील लोकांना देण्यात आली. यामध्ये एकंदर उपचार घेणारे रुग्ण 19 लाख 5 हजार 94 होते. म्हणजे निर्धन रुग्ण आणि दुर्बल घटकातील रुग्ण अशा दोन्ही प्रकारच्या 19 लाख 5 हजार 94 रुग्णांवर उपचार केले गेले. त्याचा ब्रेक अप देतो. परंतु यासंदर्भात एवढा खर्च करण्यात आलेला आहे. 1.9.2006 ते 31.12.2009 पर्यंतची ही माहिती आहे. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत रजिस्ट्रेशन होणारी धर्मादाय रुग्णालये आहेत आणि कंपनी ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन होणारी रुग्णालये आहेत. धर्मादाय रुग्णालये त्यातून दुसरीकडे जाऊ पाहात आहेत त्यांना रोखणार

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. भास्कर जाधव .....

काय असा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. निश्चितपणे त्यासंदर्भामध्ये त्यांना रोखण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अशा प्रकारे जी रुग्णालये रुग्णांना ॲडमिट करीत नाहीत, सेवा देत नाहीत त्याबाबतीत बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्टच्या कलम 41 (क) (क) मध्ये तीन महिन्यांपर्यंत शिक्षा आणि 20 हजार रुपये दंडाची तरतूद आहे. त्याचबरोबर त्यांच्या सोयीसुविधा कमी करण्याच्या संदर्भात सुध्दा तरतूद आहे. या कायद्यामध्ये जास्तीत जास्त कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर विचार चालू आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एका अतिशय गंभीर प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे खरे आहे की, हे सगळे हॉस्पिटल्स सरकारकडून सगळे फायदे घेतात आणि दुर्दैवाने अशा प्रकारचा रेकॉर्ड मेन्टेन करण्याचे काम करतात. माननीय मंत्रिमहोदयांनी जी आकडेवारी सांगितली ती कागदावर खरी वाटेल. ती आकडेवारी आपल्यालाही मानावयास पाहिजे आणि मलाही मानावयास पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

परंतु त्याच्यातील महत्वाची गोष्ट अशी आहे की, हे फॅब्रिकेटेड असे बनविले जाते. यामध्ये धर्मादाय आयुक्तांच्या कमिटीचे व रुग्णालयाचे संगनमत आहे. हे सर्व मॉनेटरिंग करण्यासाठी सरकार काय करणार आहे ? ही गोष्ट सरकारलाही मान्य आहे. परंतु मंत्री महोदय सरकारचे प्रतिनिधी असल्यामुळे ते मान्य करणार नाहीत. ही सर्व बनवाबनवीची कामे चालली आहेत. हे थांबविण्यासाठी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे ? कंपनी ॲक्टमधील तरतुदीचा आधार घेऊन त्याचे फायदे घेतले जात आहेत. त्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? एशियन हार्ट हॉस्पिटल यातून बाहेर पडलेले आहे. त्याप्रमाणे बाकीची रुग्णालये सुध्दा बाहेर पडतील. सरकारच्या जमिनी लाटायच्या आणि स्वत:वर काहीही बंधने घ्यावयाची नाहीत, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करावयाची. कंपनी ॲक्टमधील कलम 25 नुसार कोणती कारवाई करणार आहे, जेणे करुन ते त्याचा दुरुपयोग करणार नाहीत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अशाप्रकारची जी हॉस्पिटल्स आहेत ती 2005 च्या अधिनियमानुसार ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे वागत नसतील तर त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचे अधिकार किंवा कंट्रोल ठेवण्याचे काम चॅरिटी कमिशनर, जॉईन्ट कमिशनर, ॲडिशनल चॅरिटी कमिशनर यांच्याकडे आहे. परंतु ही बाब शासनाच्या लक्षात आलेली आहे की, या अधिनियमांची पुरेपूर अंमलबजावणी होत नाही. या हॉस्पिटल्सवर योग्य प्रकारे कंट्रोल ठेवला जात नाही. मध्यंतरी असा प्रश्न आला होता की, या हॉस्पिटल्समधून खाजगी रुग्णांची संख्या दाखविण्याचाही प्रयत्न केला जातो. यासाठी ही समिती असेल. त्या समितीमार्फत या हॉस्पिटल्समध्ये जास्तीत जास्त सुसूत्रता आणण्यासाठी आणि त्यांच्यावर कंट्रोल ठेवण्यासाठी विधी व न्याय खात्याचे मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली या खात्याचे मंत्री व राज्यमंत्री तसेच दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची मिळून एक समन्वय समिती नेमावी असा शासनाचा मनोदय आहे. या समितीला प्रत्येक 3 महिन्यांनी एक बैठक घेऊन आढावा घेता येईल. यामध्ये सुसूत्रता आणता येईल. कंपनी ॲक्ट 25 ला पळवाट काढली जाते. ती पळवाट सुध्दा बंद करण्यासाठी 1950 चे 41 (क) (क) मध्ये सुधारणा करुन कलम 66 व 67 नुसार पळवाट काढणा-यांना शिक्षा देण्याची तरतूद आहे त्यासंबंधी मूळ कायद्यात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.भास्कर जाधव....

सुधारणा करावी लागेल. मूळ कायद्यात सुधारणा केल्याशिवाय त्यांना शिक्षा देता येणार नाही. कंपनी ॲक्टनुसार जरी रजिस्ट्रेशन झाले असले आणि बीपीटी ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन झाले असले तरी पळवाटीसाठी असे रजिस्ट्रेशन न करता दोघांनाही नियम समान राहील असे बंधनकारक राहील असे मी सांगू इच्छितो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी एक समिती गठित करण्यात येईल असे सांगितले आहे. परंतु तीच समिती अस्तित्वात होती आणि त्या समितीच्या माध्यमातून आम्ही सर्वजण त्या हॉस्पिटल्सना भेटी देण्यासाठी गेलो होतो. परंतु त्याचा काहीही उपयोग होत नाही. म्हणून या समितीला सक्षम बनविले पाहिजे. मसंदचे प्रकरण त्यातून निर्माण झाले आहे. म्हणून या समितीला जादा अधिकार देणार आहात काय ? मंत्री महोदयांनी 2009 पर्यंतची आकडेवारी दिली आहे. जी बिले दाखविली जातात त्यातून फर्स्ट क्लासची बिले वजा केली जातात. गरिबांना फर्स्ट क्लासची सेवा दिली जात नाही. जनरल क्लासमध्येच ॲडमिट करतात. ती बिले मायनस करतात, त्यामुळे इंडिजंट फंडात 10 लाख रुपये असतील आणि त्यातून दहा ऑपरेशन्स होणार असतील तर त्याऐवजी पाचच ऑपरेशन होतात.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:20

(डॉ. दीपक सावंत...

दुसरे असे की, त्या रुग्णालयांचे जे कामगार असतात त्यांच्या नातेवाईकांची किंवा त्यांची स्वत:ची ऑपरेशन्स त्यामध्ये टाकली जातात. तेव्हा गेल्या 5 वर्षातील सर्व प्रकरणांची छाननी करुन आणि त्यांचा रिपोर्ट पाहून त्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : या संदर्भातील आकडेवारी दिलेली आहे. मागच्या वेळी झालेली चूक पुन्हा होऊ नये म्हणून आपण सुधारणा करीत आहोत. त्यामुळे पुन्हा मागे वळून पाहाण्याची आवश्यकता नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

डॉ. दीपक सावंत : संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे...

श्री. संजय केळकर : किती लोकांवर कारवाई केलेली आहे ?

श्री. दिवाकर रावते : सरकार कारवाई करत नाही म्हणून काळ सोकावतोय.

श्री. भाई जगताप : 10 टक्के बेडस् जीवनदायी योजनेमध्ये वर्ग करण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी मागील 5 वर्षातील प्रकरणांची छाननी करुन कारवाई करण्याबाबत विचारणा केली. मागील 5 वर्षापेक्षा सन 2008-2009 ते 2010 पर्यन्त ज्यांच्याकडून ज्या ज्या काही चुका झालेल्या आहेत त्याची चौकशी करण्यात येईल. जर कोणी जाणीवपूर्वक चुका केलेल्या असतील तर त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कोकणामध्ये सी-वर्ल्डची प्रतिकृती उभारण्याबाबत

**मु.शी.**: कोकणामध्ये सी-वर्ल्डची प्रतिकृती उभारण्याबाबत श्री. राजन तेली व श्री. भाई जगताप,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकणातील पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना समुद्रामधील जग कळावे यासाठी कोकणातल्या एका ठिकाणची निवड करुन त्याठिकाणी सी-वर्ल्डची प्रतिकृती उभारण्याचे सहा महिन्यापूर्वी शासनाकडून निश्चित करण्यात येऊनही या उपक्रमाचा तांत्रिक अहवाल अद्याप तयार करण्यात न आल्याने या प्रकल्पाचे भवितव्याबाबत प्रश्न निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१० मध्ये वा त्या दरम्यान आढळून येणे, तसेच रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग यापैंकी एका जिल्हयाची निवड करुन २०० एकर जागेवर सी-वर्ल्डची (कृत्रिम समुद्र) प्रतिकृती उभी करण्यासंदर्भात दिनांक २५ जून, २००९ रोजी ओरस येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन एका महिन्यांत त्यासंबंधी अध्यादेश काढण्यात येऊन या प्रकल्पास सुमारे १५० ते २०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असताना तांत्रिक उपक्रमासाठी आवश्यक असणारा तांत्रिक अहवाल दहा महिन्यांत तयार करण्याचे सांगण्यात येऊनही शासनाच्या दिरंगाईमुळे हा उपक्रम कागदावर राहणार की काय अशी शंका निर्माण होणे, सी-वर्ल्डच्या प्रकल्पास तात्काळ गती मिळाल्यास देशात असा उपक्रम राबवणारे जगात महाराष्ट्र पहिले राज्य ठरण्याची शक्यता निर्माण होणे, परंतु शासनाकडून हा प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात काहीच प्रयत्न करण्यात आले नसल्याचे आढळून येणे, या प्रकल्पामुळे सुमारे पाच हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणे तसेच सुमारे २० लाखाहून अधिक पर्यटक या कृत्रिम समुद्राला (सी वर्ल्ड) भेट देऊन आनंद घेऊ शकणे सबब, सी वर्ल्ड प्रकल्पावर गांभीर्यतेने विचार होऊन तो सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

==३==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:20

श्री. सचिन अहिर ( पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : कोकणाच्या दृष्टीने सी वर्ल्ड प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. शासनाने कोकणातील पर्यटनाकडे दुर्लक्ष केलेले आहे. माननीय मंत्री आणि राज्य मंत्री यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी पहिल्यांदा कोकणातील पर्यटन स्थळे पाहिलेली आहेत. आज विकसित तसेच अविकसित देशांनी या गोष्टीला प्राधान्य दिलेले आहे. महाराष्ट्राला 722 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. युरोपमध्ये अशा प्रकारचे जवळपास 150 प्रकल्प आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, दुबई या राष्ट्रांनी अशा प्रकल्पाकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन लाखो पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आशियाखंडातील एकमेव असा हा प्रकल्प कोकणामध्ये होत आहे. दिनांक 25.2.2009 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस येथील कॅबिनेट मिटींगमध्ये या सी-वर्ल्ड प्रकल्पासाठी दीड कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली. सहा महिन्यामध्ये प्रकल्पाचे काम सुरु होईल असे सांगण्यात आले. दरवर्षी 10 ते 15 लाख पर्यटक हा प्रकल्प पाहाण्यासाठी येतील. तसेच यामुळे मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील. हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. केन्द्राकडून 187 कोटी रुपये मिळालेले आहेत. गेल्या चार वर्षामध्ये फक्त 5 कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

....नंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ 14:25

लक्षवेधी सूचना क्र.4.... श्री.राजन तेली...

हे अधिकारी काही करीत नाहीत. आपल्या राज्यापेक्षा गुजराथ राज्याने मागणी केल्यानंतर केंद्र सरकारने 70 कोटी रुपये दिले. चालू वर्षीच्या बजेटमधून 1100 कोटी रुपये विविध राज्यांना देण्यात आले त्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा काहीही नाही. हा तांत्रिक अहवाल किती दिवसात पूर्ण केला जाईल? प्रत्यक्षात या प्रकल्पाच्या कामाला केव्हा सुरुवात होईल?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एका चांगल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. कोकणाला जवळजवळ 722 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे. तो विकसित करणे अत्यंत महत्वाचे आहे. हा विकास करीत असताना स्कूबा डायव्हिंग, स्नॉर्केलिंगचा प्रयत्न केला असून त्यादृष्टीने प्रशिक्षण केंद्र सुरु केले असून मोठया प्रमाणात पर्यटक त्या भागात येताना दिसतात. हजारो पर्यटक यावयास लागले आहेत. पर्यटनासाठी पोषक वातावरण असताना आणखी पर्यटनाच्या सोयी वाढविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे म्हणून दिनांक 24 जून, 2009 रोजी ओरस येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली, त्या बैठकीमध्ये सी वर्ल्ड प्रकल्प त्या भागात उभारुन रोजगार उपलब्ध करुन द्यायचा निर्णय झाला. त्यानंतर 28 जुलै, 2009 रोजी प्रकल्प सुसाध्यतेचा अभ्यास करावयास सांगितले असून त्याचा अहवाल आल्यानंतर अंतिम करार होईल. सुसाध्यता अहवाल तयार करुन सहा महिन्यात त्यांनी तो द्यायचा आहे. सहा महिन्यात अहवाल प्राप्त इ ााल्यानंतर पुढील सहा महिन्यात त्या प्रकल्पाचे काम सुरु होईल एवढे निश्चितपणे सांगू इच्छितो. हा रिपोर्ट आला नाही म्हणून आपण केंद्राकडे पैशाची मागणी केली नाही. रिपोर्ट आल्याबरोबर केंद्राकडून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील. केंद्राकडून निधी मिळाला नाही तर डीपीसीच्या माध्यमातून उभारणार आहोत.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, पर्यटनमंत्र्यांनी सुंदर उत्तर दिले आहे. कोकणाचा प्रतिनिधी म्हणून मी मनापासून त्यांचे आभार मानतो. केरळ, राजस्थान राज्याला भरपूर निधी मिळाला. 722 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे हे सांगून सांगून थकलो. सी वर्ल्ड प्रकल्प होणार आहे त्या प्रकल्पाची एकूण किंमत किती? सुमारे किती लोकांना या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगार मिळणार आहे? किती पर्यटक या प्रकल्पामुळे आकर्षित होणार आहेत?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4....

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, हा प्रकल्प तयार करीत असताना असे अपेक्षित केले आहे की, 100 ते 150 एकर जागेवर हा प्रकल्प तयार करायचा. प्रकल्पाची अंदाजित किंमत 50 कोटी रुपये गृहित धरली होती. आता ती किंमत 100 ते 150 कोटी रुपयांपर्यंत निश्चितपणे जाईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे 10 लाख पर्यटक येतील अशी अपेक्षा आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, पर्यटकांना आकर्षित करण्यासारखा प्रकल्प कोकणात येत आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. एकीकडे मासेमारी व्यवसाय बंद पडत आहे. या प्रकल्पामध्ये स्थानिक मच्छिमारांचे स्थान असणार आहे का? या प्रकल्पामध्ये त्यांना कसे अंतर्भूत करुन घेणार आहात?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, निश्चितपणे त्याठिकाणी सी वर्ल्ड प्रकल्प तयार करीत असताना मच्छिमार हे एक्सपर्ट असतात, त्यांच्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन जास्तीत जास्त मच्छिमारांना प्रकल्पामध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, केंद्र, राज्य आणि देशाच्या दृष्टीने हा प्रकल्प तुम्हा आम्हा सगळ्यांना अभिमान वाटावा असा आहे. मंत्रीमहोदयांनी अतिशय मुद्देसूद उत्तर दिले आहे. सहा महिन्यात सुसाध्यता अहवाल येईल, पुढील सहा महिन्यात प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होईल असे सांगितले आहे. प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी किती आणि स्थानिक नागरिकांना प्रकल्पाच्या सेवेत सामावून घेणार का?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे काम सुरु झाल्यानंतर कमी वेळेमध्ये म्हणजे दोन वर्षात प्रकल्प पूर्ण करावा असे अपेक्षित आहे. स्थानिक नागरिकांना प्राधान्य दिले जाईल. कारण स्कूबा डायव्हिंग आणि स्नॉर्केलिंगचे प्रशिक्षण देणे, पर्यटकांना मार्गदर्शन करणे यासाठी मच्छिमारांचा उपयोग होणार आहे. ते पोहण्यामध्ये एक्स्पर्ट असतात म्हणून त्यांचा प्राधान्याने समावेश केला जाईल.

-------------------

नंतर 2इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ D/ पूर्वी श्री. भोगले..... 14:30

पृ.शी. : मुलींचे घटते प्रमाण लक्षात घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील "लेक वाचवा" अभियान संपूर्ण राज्यात सुरु करणे

मु. शी. : मुलींचे घटते प्रमाण लक्षात घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील "लेक वाचवा" अभियान संपूर्ण राज्यात सुरु करणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी "लेक वाचवा" अभियानांतर्गत गर्भातील मुलींच्या हत्या टाळून मुलींचे प्रमाण वाढावे यासाठी सर्व सोनोग्राफी सेंटर्सची आपल्या कार्यालयात नोंदणी करुन घेणे व या सोनोग्राफी सेंटर्सना सायलेंट ऑब्झर्व्हर (एसआयओबी) हे उपकरण बसविण्याची योजना आखणे, परंतु सदर उपकरणामध्ये सोनोग्राफी मशीनवर केली जाणारी प्रत्येक गर्भजल चाचणी व तपासणी चित्रित होणे, हे उपकरण सिलबंद असल्याने यातील डाटा डिलिट करता न येणे, त्याची जोडणी जिल्हाधिकारी कार्यालयाशी (थेट) केल्याने तेथे नोंद होणे, यामुळे रुग्णांची (महिलांची) व डॉक्टर यांच्या व्यतिरिक्त इतरांना रुग्णांवर शरीराचे अवयव दिसणे, त्यामुळे रुग्ण व डॉक्टरांमध्ये अविश्वास व कायदेशीर कारवायांना सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण होणे, याची कायदेशीर जबाबदारी घ्यावी लागण्याची गरज, तसेच या मशिनची किंमत जादा असल्याने हे मशिन डॉक्टरांनीच घ्यावे, असे असले तरी याचा भूर्दंड रुग्णांनाच बसणार असल्याने याचा खर्च शासकीय निधीतून करण्याची मागणी डॉक्टरांकडून होणे व अनधिकृत सोनोग्राफी सेंटर्स मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्यावर कारवाई करुन नियंत्रण ठेवण्याची गरज असणे, डॉक्टरांमध्ये सदर प्रकरणी पसरलेला असंतोष व भितीचे वातावरण, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींचे प्रमाण दिवसेदिवस कमी होत चालले त्यामुळे कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांनी "लेक वाचवा" अभियानाअंतर्गत एक वेबसाईट विकसित केली. त्यादृष्टीने सायलेंट ऑब्जर्व्हर नावाचे सॉफ्टवेअर त्यांनी विकसित केले त्याबद्दल जिल्ह्यातील डॉक्टरांचे ऑब्जेक्शन होते परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सुचनेला दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. पण हा एक चांगला उपक्रम आहे आणि त्यामुळे कदाचित राज्यातील मुलींचे प्रमाण वाढेल. म्हणून अन्य जिल्ह्यांमध्ये सुध्दा हा उपक्रम शासन राबविणार आहे काय ? तसेच या सॉफ्टवेअरची किंमत जास्त आहे त्यासंबंधी एकत्रित विचार करुन जिल्ह्यांसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, एक गंभीर प्रश्न हाताळण्याचा चांगला प्रकल्प राबविण्यात आला असून तो खरोखरच परिणामकारक ठरेल आणि त्यामुळे शासनाने याची दखल घेऊन तशा सूचना दिलेल्या आहेत. संपूर्ण राज्यात हा पायलट प्रोजेक्ट राबविण्याबाबत विचार सुरु आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, खरोखरच या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांचे मला अभिनंदन करावयाचे आहे. मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांना भेटून याबाबत माहिती घेतली आहे. परंतु हे उपकरण बसविण्यासाठी जो निधी उभा करावा लागणार आहे तो शासनाने उभा करण्याची गरज आहे. कारण या यंत्राची किंमत जवळपास 50 लाखापर्यंत आहे म्हणून त्यासाठी शासनाने लवकरात लवकर तरतूद करावी जेणेकरुन हे उपकरण कार्यान्वित होईल. बऱ्याच वेळा असे चांगले अधिकारी एखादे काम सुरु करतात परंतु रुटीनमध्ये त्यांच्या बदल्या होतात. म्हणून या प्रश्नाचे सार्वत्रिकीकरण करीत असताना ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये हे अभियान लागू करणार आहात ते एकदम लागू करणार की टप्प्याटप्प्याने लागू करणार आहात ? कारण प्रश्न असा आहे की, यासंबंधीचे मॉनिटरिंग जर योग्य प्रकारे झाले नाही तर या प्रकल्पाचा आत्माच हरवून जाईल म्हणून अशा प्रकारची सक्ती करण्यापेक्षा ज्या ज्या जिल्हाधिकाऱ्यांची मनापासून तयारी असेल त्या त्या जिल्ह्यांमध्ये प्रथम हे अभियान सुरु करावे. यानुसार शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सूचना केली ती अत्यंत योग्य आहे. कारण जोपर्यंत सेन्स ऑफ बिलॉंगिंग होत नाही तोपर्यंत हे अभियान

....3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान..

परिणामकारक सुध्दा होऊ शकणार नाही. सध्याच्या परिस्थितीत हा पायलट प्रोजेक्ट म्हणून आपण सुरु केलेला आहे तो संपूर्ण राज्यात जोपर्यंत सुरु होणार नाही तोपर्यंत त्याचा फायदा सुध्दा होणार नाही. यासंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील चर्चा झाली होती. यासाठी एनआरएचएमच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्याबाबत विचार झाला आहे आणि भारत सरकारकडे मान्यतेसाठी हा पायलट प्रोजेक्ट पाठविलेला आहे. तसेच या प्रकल्पासाठी 10 लाखाची तरतूद डीपीडीसीमधून करण्याचे इरविले आहे परंतु सध्या आपण हा पायलट प्रोजेक्ट म्हणूनच विचार करीत आहोत, नंतर राज्याबाबतचा विचार करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : महोदय, ही योजना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी राबविलेली असून अतिशय चांगला उपक्रम आहे. परंतु या यंत्राची किंमत जास्त असल्याने खाजगी डॉक्टर्सना ते परवडणारे नाही. खाजगी डॉक्टर्सना याबाबतची सक्ती केलेली आहे काय ? तसेच ही योजना जर केंद्राची असेल तर त्यासाठी केंद्र आणि राज्यसरकार यांच्या सहकार्याने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विचार केला जाईल काय ?

श्रीमती फौजिया खान : महोदय, अजून हा प्रोजेक्ट पायलट स्वरुपातच आहे. नंतर यातील बारीकसारीक गोष्टींची तपासणी केली जाईल.

-------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विलेपार्ले येथील गोल्डन टोबॅको ही सिगारेट उत्पादक कंपनी बंद पडल्यामुळे 380 कामगार बेकार होणे

मु.शी. : विलेपार्ले येथील गोल्डन टोबॅको ही सिगारेट उत्पादक कंपनी बंद पडल्यामुळे 380 कामगार बेकार होणे यासंबंधी श्री. सुभाष भोईर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष भोईर (नामनियुक्त) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विलेपार्ले (पश्चिम) इर्ला येथील गोल्डन टोबॅको या सिगारेट उत्पादक कंपनीची विक्री केल्यामुळे सुमारे 380 कामगारांवर बेरोजगारीचे संकट ओढवणे, कामगारांच्या उपजीविकेवर परिणाम होणे, माहे एप्रिल,2010 पासुन स्वेच्छा निवृत्ती घेण्याची त्यांच्यावर सक्ती करण्यात येणे, नुकसान भरपाई म्हणून अल्प रक्कम देण्याचे आमिष दाखविण्यात येणे, कामगार महागाईमुळे त्रस्त असताना 380 कामगारांची कुटुंबे अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत असणे, सदरहू कामगार आत्मघातकी प्रसंगास बळी पडू नयेत यासाठी शासन स्तरावरुन करावयाची कार्यवाही व शासनाने केलेली उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका."

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्याअसल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

--------

यानंतरश्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, विलेपार्ले (पश्चिम) इर्ला येथील गोल्डन टोबॅको सिंगारेट कंपनीतील 380 कामगारांवर बेकारीचे संकट कोसळले आहे. या कामगारांवर आज उपासमारीची वेळ आलेली आहे. या कामगारांची माफक मागणी आहे की, मालक या कामगारांना प्रत्येकी 8 लक्ष रुपये व्हीआरएसच्या अगेन्स्ट देण्यास तयार आहे. परंतु या कामगारांनी कंपनीकडे मागणी केली आहे की, वेतन, भत्ते आणि कामगारांची सेवा अशी सर्वांची बेरीज मिळून प्रत्येकी 12 लक्ष रुपये कंपनीने कामगारांना द्यावयास पाहिजे. या प्रश्नामध्ये जर माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष घातले तर संबंधित कामगारांना 12 लक्ष रुपये मिळू शकतील. त्यामुळे शासनाने कंपनीच्या मालकाबरोबर चर्चा करुन या कंपनीतील कामगारांना 12 लक्ष रुपये मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विलेपार्ले (पश्चिम) इर्ला येथील गोल्डन टोबॅको सिंगारेट कंपनीत 352 कर्मचारी असून 40 अधिकारी आहेत. या ठिकाणी नियमित कामगार व कर्मचारी यांची नेतृत्वाखाली कामगार उत्कर्ष सभा ही मान्यताप्राप्त संघटना काम करते. या कपंनीने कामगारांना 15.3.2010 रोजी व्हीआरएस लागू केलेला आहे. 9 कर्मचारी सोडून 343 कामगारांनी व्हीआरएस घेतला आहे. या कंपनीने कर्मचा-यांना व्हीआरएस पोटी 26.57 कोटी रुपये अदा केलेले आहेत. या कंपनीतील 9 कर्मचा-यांनीच यास विरोध केला असून या 9 लोकांनी व्हीआरएस स्वीकारलेला नसल्यामुळे या कंपनीच्या बेलापूर येथील कंपनीत या 9 कामगारांना शिफ्ट केले जाणार आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कामगारांच्या दृष्टीने गंभीर असा प्रश्न आहे. या ठिकाणी जी आकडेवारी देण्यात आलेली आहे ती असत्य आहे. या कंपनीने ही जागा 600 कोटी रुपयांना विकलेली आहे. मिलसारखीच परिस्थिती या ठिकाणी आहे. या कामगारांना बेरोजगार करण्याचे कारण काय ? कामगारांना जर नियमाप्रमाणे 12 लाख रुपये मिळणार असेल तर त्यास विरोध करण्याचे कारण काय ? सरकारने जर या प्रश्नामध्ये लक्ष घातले तर चांगले होईल. या ठिकाणच्या कामगारावर अन्याय झालेला असल्यामुळेच ते कामगार आपल्याकडे आलेले आहेत. मुंबईतील अनेक कंपन्यामध्ये व्हीआरएस दिला जातो परंतु मी व्हीआरएसच्या विरोधात आहे. या

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

कंपनीने कामगारांपुढे व्हीआरएस सोडून दुसरा कोणताही पर्याय ठेवलेला नाही. या 9 कामगारांना ही कंपनी दुसरीकडे कशी काय शिफ्ट करु शकते ? या कामगारांनी माझ्याकडे यासंदर्भात तक्रार केलेली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, मालकाने आम्हाला 8 लक्ष रुपये देऊ केलेले आहे परंतु नियमानुसार इतर सर्व भत्ते ॲड केले तर आम्हाला 12 लक्ष रुपये प्रत्येकी मिळू शकतील. त्यामुळे या कामगारांना प्रत्येकी 12 लक्ष रुपये मिळवून देण्यामध्ये शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या कंपनीतील एकाही कामगाराने आमच्या विभागाकडे तक्रार केलेली नाही. आम्हाला दबावाने व्हीआरएस घ्यावा लागतो आहे किंवा कमी पैसे मिळालेले आहेत यासंदर्भात एकाही कामगाराने आमच्याकडे तक्रार केलेली नाही. फक्त 9 कामगारांनी व्हीआरएस घेण्यास असमर्थता दाखवलेली आहे. बाकीच्या सर्व कामगारांनी सहया करुन पैसे सुध्दा घेतलेले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी मी जबाबदारीने सांगत आहे की, या कंपनीतील कामगारांनी यासंदर्भात माझ्याकडे तक्रार केलेली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सुध्दा या ठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. या कंपनीतील एकाही कामगाराने आमच्या विभागाकडे तक्रार केलेली नाही.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, शासनाकडे कामगारांनी तक्रार केली तर आपण त्याची दखल घेऊन कामगारांना शासन न्याय देणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण न्याय देऊ. पण यात काय झाले आहे, कामगारांनी सह्या करून पैसे स्वीकारले आहेत. आमची कोणतीही तक्रार नाही असे लिहून दिलेले आहे. त्यांची मान्यता प्राप्त संघटना श्रमिक उत्कर्ष सभा आहे. त्यामुळे या प्रकरणातील सर्व कागदपत्र पाहून मग मॅनेजमेंट बरोबर चर्चा करावी लागेल. तथापि, एक तक्रार घेऊन चर्चा करता येऊ शकेल.

**उप सभापती** : कामगार मंत्री महोदयांनी स्पष्ट सांगितले आहे की, त्यांच्याकडे तक्रारी आल्या तर आपण त्यावर निश्चितपणे विचारविनिमय करू.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी हे ही सांगतो की, ते चेंज ऑफ युझर करणार असतील तर त्याला अजिबात एनओसी दिली जाणार नाही.

............

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. या विधान भवनाचे संरक्षण पोलीस करीत आहेत. पण ते पोलीस या विधान भवनाचे सरंक्षण न करता जुगार खेळण्याचे काम करीत आहे. मी माझ्या मोबाईलवरून फोटो काढून येथे आलेलो आहे. ते आपल्याकडे सुपूर्द करतो. मी स्वत: तेथे गेलो होतो. ही गंभीर बाब आहे. जुगार खेळताना पॅक झाला तर 200/- रूपये दर आहे, तर पॉईंटचा दर रूपये 5/- इतका आहे. सभापती महोदय, मी काही रमी खेळत नाही. या लोकांना चहापाणी आणि जेवण देण्यासाठी बाजूच्या पोलीस स्टेशनचा हवालदार येतो. तो एका गेम मागे 20 रूपये घेतो. तो दारू पिऊन टाईट आहे. मी आता जाऊन बघून आलो. आम्हाला भेटायला येणाऱ्या लोकांवर आपण बंदी घातली आहे. जनतेला बंदी केली. संरक्षण करण्यासाठी ज्यांना नेमले आहे, तेच एका गाडीमध्ये जुगार खेळत आहेत दारू पित आहेत. याचे मोबाईल फोटो माझ्याकडे आहेत, ते मी आपल्याकडे सुपूर्द करतो. ही गंभीर बाब आहे. आम्हाला मारून अतिरेकी कधी जातील हे आपल्याला देखील कळणार नाही. अतिरेक्यांपासून आम्हाला धोका आहे, म्हणून जनतेला येण्यासाठी आपण बंदी घातली आहे. येथे येताना आमची चार वेळा तपासणी करण्यात येते. आम्हाला सोबत पी.ए.आणण्यास देखील आपण अनुमती देत नाही. ज्यांना आमच्या रक्षणासाठी, संरक्षणासाठी नेमले आहे, तेच जुगार खेळत असतील तर त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? विधान भवनाच्या बाजूला पोलीस ठाणे आहे. त्यामुळे या प्रकरणी कारवाई झाली पाहिजे. जे संबंधित अधिकारी/कर्मचारी आहेत त्यांच्याविरूद्ध कारवाई झाली पाहिजे. विधान मंडळाच्या अंतर्गत बाबीमध्ये आम्ही बोलू शकत नाही. तो अधिकार आपला आहे. पण सभागृहाच्या बाहेर जे संरक्षण करीत आहेत, ते दिवसाढवळ्या दारू पिऊन जुगार खेळत असतील तर ते महाराष्ट्राला लांच्छनास्पद आहे, असे मला वाटते. म्हणून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी मी मागणी करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या क्षणाला सभागृहाचे कामकाज आपण तहकूब करावे. ऑन द स्पॉट आपण संबंधितांना पकडू या. आपण सर्वजण एकत्र जाऊ या. ही गंभीर बाब आहे. आता मुंगीसुद्धा विधान भवनात शिरत नाही. एवढा मोठा पहारा आहे. ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधान भवनाच्या बाहेर प्रकार घडला असेल तर शासन त्याची दखल घेईल. हाऊ वी कॅन गो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एका सदस्यांनी अतिशय गंभीर बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे क्लिपिंगसुद्धा आहेत. आजच म्हणजे पाच वाजेपर्यंत सर्व संबंधितांवर शासनाने कारवाई करावी अशी आमची मागणी आहे.

श्री.दिवाकर रावते. : सभापती महोदय, विधान भवनाची सुरक्षा ज्या प्रमुखाकडे दिलेली आहे, त्याच्यावर पहिल्यांदा कारवाई झाली पाहिजे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

यामध्ये ए.सी.पी., डी.सी.पी. किंवा सी.पी. जे कुणी असतील त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करुन कारवाई झाली पाहिजे. केवळ यामध्ये थातूरमातूर हवालदारांना निलंबित केले तर त्याला अर्थ उरणार नाही. आणि म्हणून या विधान भवनच्या सिक्युरिटीचा एवढा बागुलबुवा केला जात आहे. या ठिकाणी अतिरेकी कधी घुसतील हे सांगता येत नाही. म्हणून या प्रकरणाचे गांभीर्य आपण लक्षात घेऊन ताबडतोब कारवाई केली पाहिजे. त्याकरिता हे सभागृहामध्ये आपण तात्काळ तहकूब करुन आपल्या दालनामध्ये माननीय सदस्यांकडील फोटो पाहिल्यानंतर आपली शहानिशा होईल. केवळ त्यांच्या मोबाईलमध्ये फोटो आहेत म्हणून नव्हेतर आपण प्रत्यक्ष त्याठिकाणी जाऊन पंचनामा करावा. त्याकरिता आपण दहा मिनिटांकरिता हे सभागृह तहकूब करावे. त्याठिकाणी आपले प्रधान सचिव श्री. कळसे व इतर संबंधित अधिकाऱ्यांना आपण बोलवावे. जे कुणी सिक्युरिटीचे इनचार्ज असतील त्यांना आपण बोलवावे.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो प्रकार सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला आहे तो निश्चितपणे गंभीर आहे. त्या संदर्भात माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीवर शासनाने कारवाई करावयाची आहे. त्यामुळे त्याकरिता तात्काळ हे सभागृह तहकूब करण्याची आवश्यकता नाही. त्या संदर्भात माननीय गृहमंत्री किंवा माननीय गृह राज्यमंत्री यांना या सभागृहामध्ये पाचारण करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये मोबाईलमधील फोटो पाहिल्यानंतर शासनाला सभागृहामध्ये निवेदन करता येईल, नाहीतर करता येणार नाही.

**उपसभापती** : याची गंभीरपणे नोंद घेतली आहे. माननीय गृहमंत्री किंवा माननीय राज्यमंत्री यांना ताबडतोब पाचारण करावे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू ठेवावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये समुपदेशकांची नेमणूक करणे

मु.शी.: पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये समुपदेशकांची नेमणूक करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"एखाद्या महिलेवर बलात्कार झाला म्हणजे तिच्या शरीराला इजा होतात, तशाच जखमा तिच्या मनाला होत असतात. त्याकरिता तिला या धक्क्यातून सावरण्याकरिता समुपदेशनाची गरज असते. शिवाय त्यांच्या पालकांचे, नातेवाईकांचेही कौन्सिलिंग होणे आवश्यक असते. बलात्कार पिडीत महिलांना कमीतकमी तीन महिने समुपदेशनाची आवश्यकता असते. परंतु पुणे शहर तसेच जिल्हयात बलात्कार पिडीत महिला ससूनमध्ये तपासणीसाठी येतात पण, त्यांच्या समुपदेशनासाठी हॉस्पिटलमध्ये कौन्सिलर्सच नसल्याने डॉक्टरच ही भूमिका बजावीत आहेत. पुणे शहरात ससून सर्वोपचार रुग्णालयात समुपदेशकांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे अनेक अडचणी येत असतात. याकरिता ससून व यशवंतराव चव्हाण रुग्णालयात बलात्कार पिडीत महिलांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात यावा. महिला संघटनांना पिडीत महिलांची विचारपूस करण्यासाठी भेटायचे असेल तर याबाबत पोलिसांचे सहकार्य मिळावे. हॉस्पिटलमध्ये महिला कॉन्स्टेबलची नेमणूक व्हावी, कारण पिडीत महिलेसोबत येणाऱ्या महिला कॉन्स्टेबलला रुग्णालयाची माहिती नसल्याने तपासण्याकरिता विनाकारणच तिला प्रत्येक विभागात फिरत बसावे लागते. तपासणी झाल्यानंतर पिडित महिलेला ससूनच्याच सायकिॲट्री विभागात कौन्सिलिंगला पाठविण्याची प्रथा होती. परंतु आता पोलिसांच्या सांगण्यावरुन तपासणीनंतर एका दिवसात संबंधित महिलेला सोडून देण्यात येते. याबाबत ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, पुणे जिल्हयामध्ये ससून हॉस्पिटलच्या ठिकाणी बहुतेक करुन न्याय वैद्यक स्वरुपाच्या केसेस नेल्या जातात. त्याठिकाणी समुपदेशकांची पदे रिक्त आहेत. "ससूनमध्ये कौन्सिलरच नाही, बलात्कारित महिलांची होतेय फरफट" या शीर्षकाखाली एका वर्तमानपत्रामध्ये डॉ. सांबरे यांनी माहिती प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये किमान तीन महिने संबंधित महिलेचे कौन्सिलिंग करणे गरजेचे असते असे म्हटले आहे. परंतु सर्वच रुग्णालयामध्ये विशेषत: महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये समुपदेशकांची पदे रिक्त आहेत. त्याकरिता त्या रुग्णालयांमध्ये समुपदेशकांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे या रुग्णालयांमध्ये महिला कॉस्टेबलची सुध्दा नेमणूक करण्यात यावी. पिडित महिलेसोबत असणाऱ्या महिला कॉस्टेबलला हॉस्पिटलची संपूर्ण माहिती नसल्यामुळे अनेक वेळा परत परत यावे लागते. त्यामध्ये सुध्दा बदल झाला पाहिजे. त्याचप्रमाणे मुंबईच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये सुसाईड प्रिव्हेंशन सेंटरचे काम डॉ. शुभांगी पारकर करतात. त्यांनी काही मार्गदर्शक तत्वे तयार करुन त्याबाबतच्या सूचना कौन्सिलरना दिल्या पाहिजेत. आणि संबंधित महिलेला एका दिवसात सोडून देण्याऐवजी त्यांचे किमान तीन महिने तरी समुपदेशन केले पाहिजे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आदिवासी भागात 1 लाख लोकसंख्येच्या मागे केवळ तीन प्राथमिक आरोग्य केंद्र असणे

मु.शी.: आदिवासी भागात 1 लाख लोकसंख्येच्या मागे केवळ तीन प्राथमिक आरोग्य केंद्र असणे याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाचीसूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील 91.8 % आदिवासी जनता दारिद्रय रेषेखालील जीवन जगत असून अर्भक मृत्यूचे प्रमाण 71.6 % आहे. आदिवासी भागात 1 लाख लोकसंख्येच्या मागे केवळ तीनच प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. शासनाने गतवर्षी आदिवासींसाठी रु.2369 कोटींची तरतूद केल्यापैकी रु.762 कोटी अद्यापही खर्च केलेला नाही. व केलेला खर्चही अनाठायी म्हणजे आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना झोपायला जागा नसतांना मच्छरदाणी वाटप, वीज पुरवठा नसतांना संगणक देणे, आदिवासी मुलांसाठी घेतलेल्या सायकली नाशिक येथे धूळ खात पडलेल्या असणे, तसेच आश्रमशाळांसाठी पुरविण्यात आलेल्या विद्युत जनित्रांची माहिती भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालात स्पष्ट करण्यात आलेली आहे. आदिवासींसाठी केलेली तरतूद खर्च करण्यास सचिव पातळीवरच उदासीनता असल्याने कोटयावधी रुपयांची तरतूद करुनही आज आदिवासी विकासापासून वंचित आहे. याची चौकशी होऊन आदिवासींना न्याय मिळावा म्हणून सदरची बाब विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे."

----

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:50

**पृ. शी.** : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थीनी करिता कर्ज वाटप योजना राबविणे

**मु. शी.** : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थीनी करिता कर्ज वाटप योजना राबविणे याबाबत ॲड.उषा दराडे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाअंतर्गत राज्यातील नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थीनीनां कर्ज वाटप योजना, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी मार्फत जिल्हयाजिल्ह्यात राबविण्यात येणे, सदर योजनेसाठी दि.03-11-2009 रोजीच्या जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी बीड यांच्या कार्यकारी समितीचा ठराव क्र.2 अन्वये जिल्ह्यातील नर्सिंग कॉलेजेसच्या एकूण विद्यार्थीनीपैकी प्रत्येक कॉलेजच्या फक्त 3 किंवा 4 विद्यार्थीनींना कर्ज मंजूर करणे, शासनाचा जी.आर.हा सर्व विद्यार्थींना कर्ज देण्याच्या बाबतीत असताना सर्वांना कर्ज न देता फक्त 3 ते 4 विद्यार्थीनींना देणे, त्यामुळे विद्यार्थीनींमध्ये पसरलेला असंतोष व त्यावर शासनाने करावयाची ताबडतोबीची उपाययोजना." धन्यवाद.

-----

. . . .2आय-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील सायन धारावी भागात एप्रिल 2010 मध्ये मोकळ्या गटार लाईनमध्ये ग्रेनाईट सापडणे

**मु. शी.** : मुंबईतील सायन धारावी भागात एप्रिल 2010 मध्ये मोकळया गटार लाईनमध्ये ग्रेनाईट सापडणे याबाबत श्रीमती अलका देसाई वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्मा□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"मुंबईतील सायन धारावी भागात एप्रिल 2010 च्या पहिल्या आठवड्यात दोन वेळा मोकळ्या गटार लाईनमध्ये ग्रेनाईट सापडणे, दोन महिन्यापूर्वीही असे ग्रेनाईट आढळून येणे, मुंबई शहरातील काही भागात तसेच मुंबई उपनगरात मोकळ्या गटार लाईनचा फायदा गुंड प्रवृत्तीची माणसे घेत असून शहरातील अतिरेकी संघटनेचा वाढता प्रभाव लक्षात घेता उक्त बाब ही अत्यंत महत्वाची असून सभागृहास निदर्शनास यावी यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. धन्यवाद.

-----

. . . .2 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**पृ.शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक

उभारणे

**मु.शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, भारतरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी आघाडी शासनाने संयुक्त जाहिरनाम्यात आश्वासित केल्याप्रमाणे "चैत्यभूमी विकास प्राधिकरण" स्थापन करण्यात आलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी चैत्यभूमी परिसरात इंदू मिलची भारत सरकारच्या मालकीची जमीन उपलब्ध करुन देण्याचे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी कबूल केलेले आहे. परंतु याबाबतची आजतागायत कार्यपूर्तता झालेली नाही. तरी याबाबत राज्य शासनाने राज्यातील प्रमुख दलित नेते, विधीमंडळातील निवडक दलित आमदार यांना घेऊन प्रत्यक्षात मा.पंतप्रधानांची भेट घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली या जमिनीचा त्वरित ताबा घेऊन आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम कालबध्द आणि जलदगतीने त्वरित पूर्ण करावे म्हणून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या बाबीकडे विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. धन्यवाद.

----

. . . .2 आय-4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



**पू. शी.** : दि.20 मार्च हा जागतिक चिमणी वाचवा दिन म्हणून जाहीर करण्यात येणे

**मु. शी.** : दि.20 मार्च हा जागतिक चिमणी वाचवा दिन म्हणून जाहीर करण्यात येणे याबाबत श्री.विक्रम काळे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे(औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दि.20 मार्च हा इंटरनॅशनल सेव्ह स्पॅरो डे अर्थात जागतिक चिमणी वाचवा दिन म्हणून जाहीर करण्यात आला असून चिमणी ही पर्यावरणाच्या एका घटकापैकीच आहे. पृथ्वीतलावरील प्रत्येक प्राणी आपापल्या परीने पर्यावरणात योगदान देत असतो, त्यापैकी कुठलाही एखादा घटक जर कमी पडला तर त्याचा परिणाम प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पर्यावरणावरही दिसून येतो. नेमकी हीच काळजी पर्यावरणप्रेमी व तज्ज्ञांना पडल्याने त्यांनी दि.20 मार्च हा दिवस चिमणी वाचवा दिन म्हणून जाहीर केला आहे. वाढत्या मोबाईलची संख्या, खाजगी एफएम वाहिन्या, बिनतारी संदेश सेवा, खाजगी डिशेस आदी मुळे वातावरणात मोठया प्रमाणावर सिग्नल्स् पसरलेले असतात. अशा प्रकारच्या घातक सिंग्नल्समुळे चिमणी या पक्षावर प्रतिकूल परिणाम म्हणून त्यांचा वंशच धोक्यात आलेला आहे. पूर्वी घराघरात दिसणारी चिमणीआता शहरांमधून लुप्त होत चालली असून ती आता केवळ ग्रामीण भागातच अस्तित्व टिकवून आहे.अशीच परिस्थिती पुढे काय राहिली व ग्रामीण भागातही सिग्नलचे जाळे पसरत गेले तर एक दिवस चिमणी नामशेष होण्याचा धोका उत्पन्न होईल. त्यामुळे प्रत्येक सुज्ञ पर्यावरण प्रेमी व नागरिकांनी केवळ दि.20 मार्चलाच चिमणी वाचविण्या पेक्षा कायम चिमण्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणे ही आता पर्यावरणाची गरज बनली आहे. पूर्वी चिमणी ही लहान मुलांच्या जीवनातील बालपणाचा अविभाज्य अंग होती. चिऊ-काऊ या शब्दांवर बालपण तरंगत असावयाचे, पूर्वीच्या काळी माता आपल्या मुलाला घास भरवत असताना म्हणावयाची की, चिऊ चिऊ ये रे ये, चारा खा, पाणी पिऊन भूर्रदिशी उडून जा. आता मात्र चिऊच धोक्यात आली आहे. त्यामुळे लवकरच तिच्य संवर्धनासाठी केवळ चिऊच्या गोष्टीच उरतील. जर खरच चिऊ

. . . .2 आय-5



श्री.विक्रम काळे . . . .

टिकवावयाची असेल तर याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे करीत आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

----

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील पोलीस दलासाठी आंध्र प्रदेश राज्याप्रमाणे उपक्रम राबविण्याची आवश्यकता

**मु. शी.** : राज्यातील पोलीस दलासाठी आंध्र प्रदेश राज्याप्रमाणे उपक्रम राबविण्याची आवश्यकता याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील महत्वाच्या व निकडीच्या बाबीसंदर्भात विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"देशातील नक्षलवादी चळवळीने उग्र रुप धारण केलेले असून आपल्या राज्यातही पोलीस दल अतिशय सक्षमपणे त्याचा मुकाबला करीत आहेत. आपल्या शेजारील आंध्र प्रदेश या राज्यात शासनाने पोलीस दलासाठी चांगले उपक्रम हाती घेतले असून त्याचे परिणाम चांगले दिसून आले आहेत. आंध्र प्रदेश राज्यात शासनाने या चळवळीतील गरीब सामान्य व आदिवासींचे पुनर्वसन व रोजगार यावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे आपल्या राज्यातही त्याप्रमाणे उपक्रम हाती घेण्याची नितांत आवश्यकता, जेणेकरुन नक्षलवादी चळवळीला वेळीच लगाम घातला येऊ शकेल, याबाबत शासनाने करावयाची कारवाई."

सभापती महोदय या ठिकाणी मला एक गोष्ट नमूद करावयाची आहे की, आंध्र प्रदेशमधील गृह खात्याने त्यांच्या अखत्यारित असलेल्या 1 लाख 21 हजार 343 पोलिसांचा रुपये 65.69 कोटी रुपयांचा विमा उतरविलेला आहे. अशा प्रकारची योजना आपल्या शासनाने घ्यावी अशी मी विनंती या निमित्ताने करीत आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KGS/ MMP/

**पृ. शी.** : वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक.

L.A. BILL NO. XXIX OF 2010.

(A BILL TO PROVIDE FOR THE PREVENTION OF VIOLENCE AGAINST MEDICARE SERVICE PERSONS AND PREVENTION OF DAMAGE OR LOSS OF PROPERTY OF MEDICARE SERVICE INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

( विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न पुन: प्रस्तुत करण्यात आला )

**उपसभापती** : आता या विधेयकावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचे भाषण अपूर्ण होते. आता त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, वैद्यकीय व्यवसायामधील सेवा आणि त्यामध्ये असणाऱ्या व्यक्तींबाबत हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्याच्या संदर्भामध्ये आणि ज्यांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होते त्याला प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्यासंबंधीच्या विधेयकावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. वैद्यकीय व्यवसायाबद्दल सातत्याने हल्ले होत असल्यामुळे आणि गेल्या काही दिवसांमध्ये त्यावर सातत्याने चर्चा चालू होती की, पेशन्ट्सना ज्यावेळी न्याय मिळत नाही त्यावेळी वेगवेगळ्या कारणाने डॉक्टर्सवर, परिचारिकांवर त्याचा राग काढत असतात. परंतु प्रत्येक प्रश्नाला दोन बाजू असतात किंबहुना या प्रश्नाला तर अनेक बाजू आहेत. वैद्यकीय व्यवसायामध्ये गेल्या काही वर्षात ज्या पध्दतीचे बदल झालेले आहेत, त्यामध्ये फॅमिली फिजिशियन, वर्षानुवर्षे ज्या डॉक्टरकडे जाता येईल आणि रुग्णांसाठी काय सोयीचे आहे ते पाहून त्याचबरोबर काय निदान आहे याचा विचार करुन त्यानंतर योग्य ती उपचाराची पध्दत स्वीकारणे याच्याखेरीज फार मोठ्या प्रमाणात या व्यवसायाचे व्यापारीकरण झालेले दिसते. या व्यापारीकरणामध्ये छोट्या दवाखान्यांमध्ये काम करणारे डॉक्टर्स त्याचबरोबर वेगवेगळ्या पध्दतीने

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KGS/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे ...

जी अनेक इस्पितळे उभी राहिलेली आहेत त्या इस्पितळांमध्ये आलेल्या रुग्णांना अनेक वेळेला अतिशय विपरित अनुभव आलेले दिसतात. त्याच्यामध्ये सुरक्षेच्या बद्दलचेही अनेक गंभीर प्रश्न अनेक इस्पितळांमध्ये उभे राहतात. या ठिकाणी मी लक्ष वेधू इच्छिते की, हॉस्पिटलमध्ये लहान बालकांची किंवा अर्भकांची चोरी होणे हे प्रकार देखील वारंवार नागपूर असो, मुंबई असो, संभाजी नगर असो अशा अनेक शहरांमध्ये घडलेले दिसत आहेत. अशा वेळेला लोकांनी प्रक्षुब्ध होणे आणि सुरक्षेच्या संदर्भात अनेक प्रश्न तयार होणे हे स्वाभाविक आहे असे मला वाटते. याचा अर्थ डॉक्टर्सवर होणाऱ्या हल्ल्यांचे मी कोठेही समर्थन करणार नाही. परंतु ज्यावेळेला कोठल्याही उपचार पध्दतीच्या संदर्भामध्ये लोकांना समाधानकारक असे उत्तर मिळत नाही, त्यावर काय करणे योग्य होते याबाबत उत्तर मिळत नाही त्यावेळेला लोक अशा पध्दतीने कायदा हातामध्ये घेतात हे देखील यामधील कटू वाटले तरी सत्य आहे. दुसरा भाग असा आहे की, बऱ्याच ठिकाणी डॉक्टरांनी स्वत:चे एक रींग तयार केलेली दिसते. आवश्यकता नसताना परत परत उपचारांसाठी पाठविणे त्याचबरोबर न भरुन येणारे नुकसान होणे अशा पध्दतीच्या घटना देखील घडतांना दिसत आहेत. त्याखेरीज या सगळ्या व्यापारीकरणाचा फटका अनेक वेळा रुग्णांना बसतो आणि नको त्या शस्त्रक्रिया केल्या जातात. या शस्त्रक्रियांमधून देखील त्या रुग्नांना त्यांचे अवयव गमविण्यासारखी परिस्थिती आलेली दिसते. अशा वेळेला रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक प्रक्षुब्ध होऊन डॉक्टर्सवर हल्ला करण्यासाठी प्रवृत्त झालेले दिसतात.

मला आणखी एक सांगावयास पाहिजे की, बहुतेक वेळेला ज्या ठिकाणी डॉक्टर्सकडून किंवा हॉस्पिटल्समध्ये स्वाभाविकपणे रुग्णांकडून सही घेतली जाते आणि असे म्हटले जाते की, संपूर्णपणे जबाबदारी रुग्णांवर असणार आहे. आपण या कायद्यामध्ये असे सुचविले आहे की, यामध्ये एक प्राधिकरण असेल आणि त्या प्राधिकरणामध्ये कायदा विभाग, वैद्यकीय विभाग, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रातील एक याप्रमाणे तज्ज्ञांचे मिळून असलेले हे प्राधिकरण असेल. परंतु आपण हा कायदा करीत असताना लोकांना त्या प्राधिकरणामार्फत किती वेळात न्याय मिळणार ? त्याचप्रमाणे आजाराची काय परिस्थिती आहे हे जर बघितले तर अनेक वेळेला असे दिसते की, त्याबाबतीत लवकर निर्णय झाला नाही तर मधला जो काळ जातो त्या काळात रुग्णाचे कायम स्वरुपी नुकसान झालेले असते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. बरवड 15:00

(डॉ. नीलम गो-हे...

तिसरा भाग असा आहे की अनेक वेळेला विविध कारणानी हॉस्पिटलचे वर्तन अगदी अमानुषपणाचे दिसून येते. या संदर्भात विचार केला तर रुग्णांना त्याबाबतीत त्यांचे म्हणणे कुठेही मांडता येत नाही अशी परिस्थिती आहे. या ठिकाणी मला दोन मुद्यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे आणि विशेषत: ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील स्त्रियांच्या संदर्भात सांगायचे तर नैसर्गिकरित्या बाळंतपण होण्याची शक्यता असली तरी मोठ्या प्रमाणावर सिझरिंन, शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याची अनेक कारणे असतीलही. परंतु स्वत: डॉक्टर समुदाय याबाबतीत किती सजग आहे, किती जाणीवपूर्वक प्रयत्न करतात याचा विचार करण्याची गरज आहे. गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रिया ह्या सर्रासपणे केल्या जातात असे दिसून येते. हजारो शस्त्रक्रिया ह्या कारण नसताना केल्या जातात. अनेक वैद्यकीय संस्थांमधून ही बाब पुढे आलेली आहे. हृदयाच्या शस्त्रक्रिया देखील अशाच पध्दतीने केल्या जातात. रुग्णांना चुकीचे मार्गदर्शन झालेले असते. अशा वेळी रुग्णांनी कोठे जायचे हा प्रश्न समोर उभा राहतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये दिलेल्या माहितीवरुन या विधेयकाची वाटचाल पुढे मागे पुढे मागे होत आहे असे दिसते. उद्देश व कारणे यांच्या परिच्छेद 6मध्ये असे म्हटलेले आहे की, "दिनांक 8 डिसेंबर 2009 रोजी सन 2009चे विधान परिषद विधेयक क्रमांक 10 महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते आणि दिनांक 21 डिसेंबर 2009 रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेकडून ते संमत करण्यात आले होते. उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेकडे विचारार्थ पारेषित करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभेची दिनांक 23 डिसेंबर 2009 रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे ते संमत होऊ शकले नाही. दिनांक 9 नोव्हेबर 2009 रोजी महाराष्ट्र विधानसभा पुन्हा भरविण्यात आली आणि दिनांक 11 नोव्हेंबर 2009 रोजी महाराष्ट्र विधानपरिषद पुन्हा भरविण्यात आली." एकाच वर्षात दोन वेळा सभागृहाचे सत्र कसे काय भरविण्यात आले ? पुढे असे म्हटलेले आहे की, "दिनांक 11 नोव्हेंबर 2009 पासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झ ाल्यानंतर, म्हणजेच दिनांक 22 डिसेंबर 2009 नंतर अंमलात असण्याचे बंद झाले होते." हा जो तारखांचा घोळ झालेला आहे त्यासंदर्भात मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना देखील विचारणा केली. माझी स्मृती जागरुक आहे. एका वर्षात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

दोन अधिवेशने झालेली मला आठवत नाहीत. हा जो तारखांचा घोळ झालेला आहे त्याबाबतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. ऑर्डिनन्स काढल्यानंतर त्याचे आपण कायद्यात रुपांतर करतो. पण रुग्णांनी त्यांचे म्हणणे कुठे मांडायचे हे त्यांना समजेनासे झालेले आहे. परिणामी हिंसक आंदोलने होतात, नासधूस केली जाते. मग हा कायदा करीत असताना त्यादृष्टीने आपली वाटचाल वेगाने होत आहे काय असे प्रश्नचिन्ह समोर उभे रहाते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 29, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणा-या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक आणलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित केले ते अगदी बरोबर आहेत. या सभागृहामध्ये 2008साली अशा प्रकारचे विधेयक मांडण्यात आले होते. त्यानंतर आता 9 एप्रिल 2010 रोजी हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. ही दोन वेगवेगळी विधेयके आपल्या समोर आहेत. सभापती महोदय, हे विधेयक आणण्याची खरोखर गरज होती काय, असा प्रश्न मी सभागृहाला विचारु इच्छितो. आपण सन 2008मध्ये विधेयक आणून पोलीस अधिनियम 1951मध्ये काही सुधारणा केल्या. 18 डिसेंबर 2008 रोजी ते विधेयक सभागृहाने संमत केले. त्या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, 1951 मुंबई अधिनियम क्र.22च्या कलम 51ची सुधारणा - "जेव्हा एखाद्या बेकायदेशीर जमावाने आपले समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे कोणत्याही मालमत्तेची हानी किंवा तिचे नुकसान झाले असेल किंवा जेव्हा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना मृत्यू आला असेल किंवा जबर दुखापत झाली असेल तेव्हा न्यायदंडाधिका-याच्या आदेशाद्वारे..."

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

अशांत क्षेत्र, बेकायदेशीर जमाव अशा प्रकारचे हे बिल आहे. या कायद्यामध्ये तरतूद केली आहे की, एखाद्या बेकायदेशीर जमावाच्या माध्यमातून सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे नुकसान केले असेल तर त्या संदर्भात नुकसान भरपाई देण्यासंबंधीच्या तरतुदी विद्यमान कायद्यामध्ये केलेल्या आहेत. हे बिल माझ्याकडे आहे. या बिलामध्ये ही तरतूद आहे तरी देखील नवीन अशाप्रकारचे बिल आणण्याचे प्रयोजन काय? हे बिल 2008 चे असून 18 डिसेंबर, 2008 रोजी संमत झाले आहे. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 22 मध्ये सुधारणा केलेली आहे.

सभापती महोदय, या बिलामध्ये आणि आधीच्या बिलामध्ये फारसा फरक नाही. एवढेच म्हटले आहे की, वैद्यकीय सेवा आणि वैद्यकीय सेवा क्षेत्रात काम करणारे लोक. एखादी कम्युनिटी ही समाजाची गरज आहे. अशा कम्युनिटीला वेगळेपणाची वागणूक का देता? असा माझा प्रश्न आहे. मेडिकल प्रोफेशन हे नोबल प्रोफेशन मानले जाते. या व्यवसायाकडे पूर्वी फार आदराने पाहिले जायचे. दुर्दैवाने दोन्ही बाजूच्या घटकांकडून आज सातत्याने चुका होत आहेत. त्यामुळे डॉक्टरांबद्दल पेशंटच्या मनामध्ये आकस आहे आणि पेशंटबद्दल डॉक्टरांच्या मनामध्ये आर्थिक कारणासाठी आकस आहे अशा प्रकारचे द्वंद सुरु आहे. या भावनांचा उद्रेक होतो. इंडियन पिनल कोड च्या कलम 152 देखील म्हटले आहे की, "Assaulting or obstructing public servant when suppressing riot, etc." कलम 152 मध्ये हे सगळे नमूद केले आहे. कलम 153 मध्ये म्हटले आहे की, " Whoever malignantly, or wantonly, by doing anything which is illegal, gives provocation to any person intending or knowing it to be likely that such provocation will cause the offence of rioting to be committed, shall, if the offence of rioting be committed in consequence of such provocation.......". त्यामध्ये पनिशमेंटची तरतूद आहे. असे सगळे असताना नव्या कायद्याची गरज काय? कायद्यामध्ये सगळी तरतूद होती. मध्यंतरीच्या काळात डॉक्टरांवर हल्ले झाले. मेडिकल प्रोफेशनमधील लोक एकत्र आले. सातत्याने तीन हल्ले झाले. पहिला हल्ला मालाडमधील गायनाकॉलॉजीस्ट डॉक्टरांवर झाला. त्यांच्या जावयाला, मुलीला मारले. कोणत्या पक्षाने काय काय केले याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पूर्वी फॅमिली डॉक्टर म्हणजे फॅमिलीचा सदस्य अशा प्रकारची भावना होती. डॉक्टर हा फॅमिलीच्या फार जवळ असायचा.

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 15:05

डॉ.दीपक सावंत.....

घरातील लग्न, मुंज, बाळंतपण, सोयरीक जुळवायची झाली तरी 15-20 वर्षापूर्वीच्या काळात फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घेतला जायचा. मृत्यूपत्र तयार करावयाचे झाले तरी फॅमिली डॉक्टरला बोलावले जायचे. डॉक्टर, मला असे असे करायचे आहे, म्हणून विटनेस या नात्याने मृत्यूपत्रावर डॉक्टरची सही घेतली जायची. मग हा दुरावा अचानक का तयार झाला? डॉक्टर फॅमिलीला विसरले की, फॅमिली डॉक्टर ही संज्ञा विसरली? आपल्याला या खोलामध्ये जायला पाहिजे. या बिलामुळे डॉक्टर आणि पेशंट यांच्या नात्यामध्ये दुरावा निर्माण होणार आहे असे माझे स्पष्ट मत आहे. हे बिल सर्वंकष नाही. हे बिल या समाजाच्या एका घटकाची काळजी घेणारे आहे. दुसऱ्या घटकाची काळजी घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना शिवसेनेच्या माध्यमातून पत्र दिले होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांना आम्ही पत्र दिले होते. त्यानंतर शासनाने प्राधिकरण आणले.

नंतर 2एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

कारण या विधेयकामध्ये प्राधिकरण म्हटलेले नाही पण सन 2010 च्या विधेयकात मात्र नावाला प्राधिकरण केलेले आहे. शिवसेनेने याबाबतीत माननीय विलासराव देशमुख यांना सांगितले होते की, कायद्यामध्ये सुचविण्यात आलेल्या तरतुदीनुसार डॉक्टरांवर हल्ला करण्यावर जरब बसविण्यासाठी ही तरतूद आहे पण डॉक्टरांच्या हातून गुन्हा घडला तर त्यांच्यावर जरब बसविण्याच्या बाबतीत मात्र या कायद्यात कुठलीही तरतूद नाही. म्हणून कायदा हा कधीही बॅलन्स असला पाहिजे. अशा प्रकारे दोन्ही बाजूंचा गोष्टीचा जसा विचार करतो त्याप्रमाणे डॉक्टरांनाही संरक्षण दिले पाहिजे आणि डॉक्टरांकडून पेशंटलाही संरक्षण मिळाले पाहिजे. कारण ज्यावेळी आपण ग्राहक मंचासमोर जातो त्यावेळेस लक्षात येते की, अशा प्रकारच्या केसेस 10-10 वर्षापूर्वी दाखल केलेल्या असतात परंतु त्या प्रलंबितच असतात, त्यांच्या बाबतीतील निर्णय होत नसल्याने कदाचित पेशंट मरुन सुध्दा जातो पण त्याला ट्रिटमेंट मिळत नाही. गेल्या चार-पाच वर्षात असे डॉक्टरांवर हल्ले होण्याचे प्रमाण का वाढले याचाही विचार होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे एक स्त्री ही दुसऱ्या स्त्रीची शत्रू असते त्याप्रमाणे एक डॉक्टर सुध्दा दुसऱ्या डॉक्टरचा शत्रू असतो. कारण एखाद्या व्यक्तिने ऑपरेशन केले अथवा सेकंड ओपिनियनबाबत सल्ला दिला असता दुसरा डॉक्टर त्याबाबत नेहमीच कॉमेन्टस करीत असतात, क्रिटीसाईज करीत असतो. तो म्हणतो अमुक ट्रिटमेंट केली म्हणून हे झाले आणि अशी ट्रिटमेंट झाली असती तर हे झाले नसते. अशा प्रकारे एका पेशंटच्या पोटात पेन सुरु झाले म्हणून डॉक्टरकडे गेला असता अगोदर ऑपरेशन केल्यानंतर कापसाचा बोळा राहून गेला होता असे आढळून आले. तो दुसऱ्या डॉक्टरकडे आल्यानंतर वास्तविक त्या डॉक्टरने तो बोळा चुपचाप काढून टाकला असता तरी कोणाला समजले नसते, सिस्टरला सुध्दा समजले नसते परंतु दुसऱ्या डॉक्टरवर कुरघोडी करण्याच्या उद्देशाने त्याने तो बोळा काढला आणि माझ्याकडे पेशंट आला पाहिजे म्हणून त्याच पेशंटकडे तो बोळा दिला आणि त्या डॉक्टरला दाखवायला सांगितले. अशा प्रकारे सेटलमेंट ज्यावेळेस येते तेव्हा हे रिलेशन स्पॉईल होतात. त्या डॉक्टरने पेशंटला कबूल केले होते की, 20 हजार नुकसान भरपाई देतो आणि ती रक्कम मिळाली नाही म्हणून तो पेशंट दुसऱ्या डॉक्टरकडे गेला आणि तो मॉप काढून त्याच्या अगोदरच्या डॉक्टरांना दाखविला. तशी परिस्थिती वकीलांच्या बाबतीत नसते. कोणताही

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..........

वकील दुसऱ्या वकीलाच्या बाबतीत वाईट बोलत नाही पण डॉक्टर मात्र दुसऱ्या डॉक्टरच्या बाबतीत कॉमेन्टस करतात.

कायद्यामध्ये ज्याप्रमाणे दोन्ही बाजूंचा विचार होणे आवश्यक असते त्यानुसार या विधेयकात दुरुस्ती करण्यात आली असती तर काही वाटले नसते परंतु तशी तरतूद यामध्ये नाही. तरी देखील शासनाला अशी दुरुस्ती करण्याची गरज का वाटली हे जाणून घेणे आवश्यक आहे. अभिमत विद्यापीठातून करोडो रुपये खर्च करुन डॉक्टरची डिग्री घेतलेले डॉक्टर बाहेर पडतात आणि ती वसुली करण्याच्या दृष्टीने असे प्रकार करीत असतात. दुसरे म्हणजे एखादा पेशंट मरतो तेव्हा डॉक्टरच जबाबदार असतो. व्ही.एन.देसाई रुग्णालयात एकदा पेशंटचा मृत्यू झाला होता तेव्हा एका इंटर्नमध्ये शिकत असलेल्या डॉक्टरलाच मारहाण करण्यात आली होती. सुदैवाने हा इंटर्नमध्ये शिकत असलेला मुलगा माझ्या मुलाचाच मित्र होता. वास्तविक पेशंटला ऑक्सिजन लावायचा होता आणि सिलेंडरमधील ऑक्सिजन संपलेला होता त्यामुळे तो पेशंट मेला आणि सगळा राग मात्र इंटर्नमधील डॉक्टरवर काढला अशा गोष्टी सुध्दा लक्षात घेतल्या पाहिजेत. अशा वेळेस तेथील एस्टॅब्लिशमेंटमधील त्रुटी असतील किंवा त्या इन्स्टीटयुशनमधील काही उणिवा असतील त्या सुध्दा लक्षात घेतल्या पाहिजेत. दुसरे महत्वाचे म्हणजे कम्युनिकेशन गॅप हे सुध्दा काही वेळेस घडते...

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

एका पेशंटच्या छातीत दुखत होते त्यामुळे त्या पेशंटच्या नातेवाईकांने त्या पेशंटला डॉक्टरकडे नेले त्यावेळी त्या डॉक्टरने पेशंटच्या नातेवाइकाला सांगितले, तुम्ही मूर्ख आहात काय? तुम्ही पेशंटला चालवत आणल्यामुळे त्यांना हार्ट अटॅक आलेला आहे. दुर्दैवाने हा पेशंट काही तासातच मृत्यू पावला. हा पेशंट मोठया नेत्याचा नातेवाईक होता त्यामुळे पेशंट मृत झालेला आहे हे सांगण्यास सुध्दा डॉक्टरला एक तास लागला. ज्या क्षणी डॉक्टरने सांगितले की, पेशंट मेला आहे त्याच वेळेस नातेवाइकाने डॉक्टरच्या कानफटात वाजवली. डॉक्टर आणि पेशंट यामध्ये सुरुवातीसच जो सुसंवाद साधावयास पाहिजे होता तो न साधल्यामुळे डॉक्टरला मार खावा लागला. ज्यावेळेस डॉक्टरकडून पेशंट सोबत अशा प्रकारची भाषा वापरली जाते त्यावेळेस पेशंट इरिटेड होतो. पेशंट सायकॉलॉजीकल खूप अपसेट असतो. 38-40 वर्षाचा माणूस जेव्हा आपल्या समोर मरतो आणि डॉक्टर जर योग्य प्रकारे पेशंटच्या नातेवाइकांशी वर्तणूक करीत नसतील तर ते योग्य नाही. समुपदेशनाची जशी गरज आपल्याला असते तशीच गरज खरे म्हणजे डॉक्टरांना असते. इमर्जन्सीमध्ये पेशंट बरोबर किंवा पेशंटच्या नातेवाईकांबरोबर कशा प्रकारे बोलले पाहिजे यासाठी डॉक्टरांना सुध्दा समुपेदशनाची गरज आहे. दुर्दैवाने हे कोणत्याही करीकुलममध्ये नाही. पेशंटच्या नातेवाईकाना उध्दट उत्तरे दिली जात असल्यामुळे अशी घटना झाल्यानंतर पेशंटच्या नातेवाइकाचा राग शिगेला पोहचतो व त्यातूनच ख-या अर्थाने डॉक्टरांना मारले जाते किंवा हॉस्पिटलची मोडतोड केली जाते. मोडतोड का होते तर हॉस्पिटलमध्ये जी काही ठराविक इक्वीपमेंट पाहिजे ती इक्वीपमेंट नसतात, व्हँटीलेटर चालू नसतो किंवा ऑक्सीजनचा सिलेंडर खाली असतो अशा गोष्टीमुळे हॉस्पिटलची मोडतोड होते. पेशंट आणि डॉक्टरमधील कम्युनिकेशन गॅप कमी करावयाचा असेल तर अशा प्रकारचे कायदे या ठिकाणी आणण्यापेक्षा एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात डॉक्टरने पेशंटशी कसे बोलावे यासंदर्भातील माहिती देण्याची आवश्यकता आहे.

कुठल्याही आस्थापनामध्ये रिसेप्शन डेस्कला महत्व असते. परंतु तुमच्याकडे आलेल्या पेशंटला पहिल्यांदा डॉक्टर काय सांगतो "एवढे पैसे भरा तरच पेशंटला ॲडमिट केले जाईल नाही तर ॲडमिट केले जाणार नाही". तेव्हा ते लोक आपल्या सारख्यांना फोन लावतात व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

आपणही डॉक्टरांना सांगतो की, आता पेशंटजवळ पैसे नाही, हे पैसे उद्या तुम्हाला मिळतील. ही गोष्ट बरोबर आहे की, हॉस्पिटलचा एस्टॅब्लिशमेंटवर मोठया प्रमाणात खर्च होत असतो. पेंशट गेल्यानंतर कोणी पैसे देण्यास तयार होत नाही ही वस्तुस्थिती असली तरी मेडीकल प्रोफेशनल मधील लोक हे धंदा करण्यास बसले नसून ते सेवा देण्यासाठी बसले आहेत. सेवा अधिक धंदा असे समीकरण अगोदर होते परंतु आता हे समीकरण धंदा अधिक सेवा असे झाल्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आज हिंसक कृत्यात वाढ का झाली आहे? आज काल लोकांची सहनशक्ती कमी झाल्यामुळे हिंसक कृत्यात वाढ झालेली आहे. डॉक्टर आणि पेशंट यांच्यामध्ये ग्राहक आणि सेवा देणारा हेच रिलेशन राहिलेले आहे. पूर्वीची जी संज्ञा होती ती आता राहिलेली नाही. WHO ने डॉक्टरांसाठी काही नियम शिथील केलेले आहेत. एखाद्या पेशंटच्या पोटात कापसाचा गोळा राहिला,मॉप राहिला तर डॉक्टरला शिक्षा होत नाही डॉक्टरांना यामधून माफ करण्यात आलेले आहे. कॅटरॅकच्या ऑपरेशनमध्ये एखाद्या रुग्णाचा डोळा गेला तरी डॉक्टरांना माफ आहे. खरे म्हणजे याचा फायदा डॉक्टरांनी सुध्दा घेऊ नये. या विधेयकाच्या कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, "कलम 3 च्या तरतुदींचे उल्लंघन करुन हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशा कोणत्याही अपराध्यास, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल आणि 3 वर्षे कालावधीच्या कारावासाची आणि 50 हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देण्यात येईल." हा जीआर 2008 मध्ये आला होता. आजपर्यंत आपण किती लोकांना पकडले आहे? यामध्ये किती लोकांना याअंतर्गत शिक्षा झालेली आहे? हा अपराध दखलपात्र आणि अजामीनपात्र असणार आहे. एखाद्या डॉक्टरकडून त्याच्या चुकीमुळे जर पेशंट मेला तर त्याच्यावर सुध्दा तशाच प्रकारची शिक्षा होणे अत्यंत आवश्यक आहे. खरे म्हणजे दोन्ही बाजूने यासंदर्भात विचार करावयास पाहिजे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आपण असे म्हटले आहे की, वैद्यकीय निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य अनुतोष मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना साह्य देण्यासाठी राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्राकरिता प्राधिकरणाची स्थापना करील. हे प्राधिकरण काय असेल. या प्राधिकरणाला काय आधिकार आहेत? याचा कालबद्ध निर्णय लागणार आहे काय? आपण काय नमूद केले आहे, असे प्राधिकरण वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मिळून बनलेले असेल. ही सगळी माणसे एकत्र येणे शक्य आहे काय ? काही तरी बनवायचे म्हणून बनवायचे आणि डोळ्याला पाणी लावायचे असे काही करू नका. जर आपल्याला ग्राहकाला न्याय द्यायचा असेल तर जरूर द्यावा. पण आज ग्राहक मंचाकडे देखील हजारो केसेस प्रलंबित पडलेल्या आहेत. याचा मंत्रिमहोयांनी आढावा घ्यावा. तसेच किती लोकांच्या केसेस मार्गी लावल्या व प्रलंबित आहेत याची देखील माहिती घ्यावी. तसेच किती लोकांना अनुतोष मिळाला आहे याची देखील माहिती घ्यावी. माझ्या माहितीप्रमाणे एकालाही अनुतोष मिळालेला नाही. म्हणूनच हे विधेयक एक दिशा आहे असे मी म्हणत आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, हे जे प्राधिकरण आपण बनविले आहे, ते सक्षम करावे. त्यामध्ये सुधारणा करा. यात सुधारणा केल्यामुळे डॉक्टरला सुद्धा जरब बसेल की, मी हलगर्जीपणा करता कामा नये. केला तर त्याची शिक्षा मला मिळेल. पेशंटने हल्ला केला तर त्याची शिक्षा त्याला मिळेल. त्यामुळेच मी सांगतो आहे की, हे बिल सर्वंकष नाही. यामध्ये अनेक त्रुटी आहेत. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हे बिल संयुक्त समितीसमोर पाठवावे. त्यामध्ये यावर विचार करावा. या सभागृहात अनेक विद्वान सदस्य आहेत. त्यांना या समितीमध्ये घ्यावे व त्यांचे मत आपण नोंदवून घ्यावे. येथे डॉक्टर म्हणून मी माझे मत मांडले आहे. येथे ॲड.गुरूनाथ कुलकर्णी आहेत. त्यांना कायद्यानुसार काय वाटते हे देखील विचारात घेतले पाहिजे. मला एक प्रश्न येथे विचारावयाचे आहे. पत्रकारांवर हल्ले होतात म्हणून त्यांच्यासाठी वेगळा कायदा करणार आहात काय ? शिक्षकांवर हल्ले होतात, प्राचार्यांच्या तोंडाला काळे फासले जाते, त्यांच्यासाठी वेगळे बिल करणार आहात काय ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

वॉर्ड ऑफिसर, अभियंते, यांच्यावर हल्ले होतात. त्यांच्यासाठी वेगळे बिल करणार आहात काय ? अशी किती बिले आपण आणणार आहात ? कायदा हा सर्वांसाठी एकच असला पाहिजे. सर्वंकष कायदा बनवला पाहिजे. एका कम्युनिटीला खूश करण्यासाठी असे काही करू नका. जसा डॉक्टर हा समाजाची गरज आहे, तसा शिक्षकही समाजाची गरज आहे, ॲडव्होकेट देखील समाजाची गरज आहे. त्यामुळे हे बिल शासनाने परत घ्यावे ते संयुक्त समितीकडे पाठवावे आणि आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. यात अनेक गोष्टी ह्या एक दिशा मार्गासारख्या आहेत. त्यामध्ये आपण बदल करून पुन्हा नवीन बिल आणावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

...............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा व्यक्तीबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने वि.स.वि.क्रमांक 29 आणले आहे, त्यावर थोडक्यात बोलण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे विधेयकावर विस्तृतपणे बोलले आहेत. खरे म्हणजे हे बिल अर्धवट आहे. हे बिल एकतर्फी आहे. 2008-2009 साली मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. खाजगी रूग्णालयातील डॉक्टरांवर हल्ले झाले, कर्मचाऱ्यांवर हल्ले झाले, शासकीय रूग्णालयातील डॉक्टरांवर हल्ले झाले, सिव्हील हॉस्पिटलमधील सिव्हील सर्जनवर हल्ले झाले. मोठ्या प्रमाणावर हल्ले झाल्यामुळे मागणी पुढे आली की, डॉक्टरांना, वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांना कुठे तरी संरक्षण मिळाले पाहिजे. ती मंडळी भयभीत आहेत. वेगवेगळ्या प्रकारे त्यांचे ब्लॅकमेलींग केले जात आहे. त्यामुळे अशा प्रकारचे बिल आणले जाईल असे त्यावेळी मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. त्या अनुषंगाने हे बिल आलेले आहे. या बिलाच्या माध्यमातून आपण डॉक्टरांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पूर्वी वैद्यकीय क्षेत्रासंबंधी विश्वासाची आणि श्रद्धेची भावना होती.

यानंतर श्री गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

पूर्वी डॉक्टर्स आणि पेशंटस यांचे वेगळे नाते होते.डॉक्टर्स जे काही सांगतील ती पूर्व दिशा अशा प्रकारची पेशंटसची मानसिकता होती. डॉक्टर्सने जे काही सागितले आहे ते बरोबर आहे असे पूर्वी पेशंटसना वाटावयाचे. परंतु आताच्या काळात ही श्रध्दा आणि विश्वास संपलेला आहे.त्यामुळे निरनिराळया ठिकाणी डॉक्टर्सवर हल्ले झाले आहेत. काही ठिकाणी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे देखील हल्ले करण्यात आले असतील परंतु काही वेळा रुग्णांच्या नातेवाईकांनी देखील ब्लॅक मेलीग करण्यास सुरुवात केली होती.पेशंटचे हॉस्पिटलचे बिल भरता येत नाही म्हणून हल्ला केला गेला किंवा बिल भरता येत नाही म्हणून काही तरी खुसपट काढले गेले एखाद्या वेळी जर पेशंट दगावला गेला तर त्याचे हॉस्पिटलचे बिल भरता येत नाही म्हणून ती जबाबदारी डॉक्टरांवर टाकण्याचे प्रकारसुध्दा घडले आहेत. एखादा पेशंट जर सिरिअस असेल तर काही ठिकाणच्या खाजगी हॉस्पिटल्स मधील डॉक्टर्स पेशंटसना दाखल करुन घेण्यास सुध्दा तयार होत नाहीत..एखादा पेशंट जर सिरिअस असेल तर त्याला आपल्या हॉस्पिटलमध्ये दाखल करुन घेऊ नये असे त्यांना वाटत असते. त्याचबरोबर एखाद्या मोठया व्यक्तिचा नातेवाईक असेल तर त्या पेशंटलासुध्दा दाखल करुन घेण्यास डॉक्टर्स तयार होत नाही. एखाद्या वेळी हा पेशंट जर दगावाला तर आपल्याला मारहाण होईल असे डॉक्टर्सना वाटते.त्यामुळे डॉक्टरांमध्ये एक प्रकारची भितीचे वातावरण निर्माण झाले होते.अजूनही काही डॉक्टर्स चांगल्या प्रकारची सेवा देतात.त्यामुळे त्यांनी रुग्णांमध्ये चांगल्या प्रकारचा विश्वास निर्माण केलेला आहे.त्यामुळे पेशंटसची श्रध्दा त्या डॉक्टरांवर आहे.परंतु काही हॉस्पिटल्सनी आणि डॉक्टर्सनी कट प्रॅक्टीस सुरु केलेली आहे. ज्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा मोठा आजार झालेला नसतांनासुध्दा त्याला हा आजार झालेला आहे असे सांगून विविध प्रकारच्या तपासण्या करावयास सांगितले जाते व निरनिराळया तज्ज्ञ डॉक्टर्सकडे पाठविले जाते व त्यातून कट प्रॅक्टीस केली जाते.त्यामुळे एका बाजूला डॉक्टराना या विधेयकाच्या माध्यमातून संरक्षण दिलेले आहे. रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांवर हल्ला केला तर 50 हजार रुपयांचा दंड आणि 3 वर्षाची शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.त्याचबरोबर हॉस्पिटलचे जर नुकसान झालेले असेल तर त्या नुकसानीच्या दुप्पट रक्कम ज्याने नुकसान केले असेल त्याच्याकडून नुकसान भरपाई वसूल करण्यासबंधीची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे) 2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

पेशंटवर अन्याय झाला असेल तर त्यासाठी प्राधिकरण नेमण्यात आलेले आहे. परंतु हे प्राधिकरण अतिशय कुचकामी आहे. केवळ समाधान देण्याकरता हे प्राधिकरण नेमण्यात आलेले आहे असे या विधेयकातील प्राधिकरणाची भाषा पाहिल्यानंतर दिसून येते. या विधेयकात असे म्हटलेले आहे की, " एखाद्या डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्याची गा-हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य तो अनुतोष मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना सहाय्य व सल्ला देण्यासाठी वैद्यकीय, कायदा ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रातील प्रत्येकी एक या प्रमाणे तज्ज्ञांचे मिळून बनलेले प्राधिकरण देखील प्रस्तावित केले होते." अशा प्रकारच्या प्राधिकरणाची नेमणूक करण्यात येत असल्याची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे तेव्हा केवळ गा-हाणी ऐकण्याचे हे केन्द्र राहणार आहे काय ? काही वेळा डॉक्टरांच्या हातून देखील रुग्णावर अन्याय होत असतो तेव्हा या रुग्णांने कोणाकडे तक्रार करावयाची ? या विधेयकात "अनुतोष" हा शब्द वापरण्यात आला आहे तेव्हा अनुतोष या शब्दाचा अर्थच समजत नाही. अनुतोष मिळणे म्हण्ंजे काय आहे ? त्याचबरोबर "समुचित मंच "असा देखील शब्द या विधेयकात वापर करण्यात आला आहे. मंच हा शब्द वापरला की सगळीकडे गडबड सुरु होते. त्यातून रुग्णांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळणार नाही म्हणून त्याला अधिकार दिला पाहिजे तसेच त्याला सक्षम केले पाहिजे. सामाजिक क्षेत्रात मंच हा शब्द वापरणे ठीक आहे.परंतु या विधेयकात प्राधिकरण आणि मंच अशा प्रकारचे शब्द वापरले आहेत त्यामध्ये काहीही दम नाही. त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत त्यामुळे रुग्णांना कोणत्याही प्रकारे न्याय मिळणार नाही. एका बाजूला वैद्यकीय सेवा देणा-या डॉक्टरांना ज्या प्रमाणे न्याय देण्याचा प्रयत्न या विधेयकाव्दारे करण्यात येत आहे त्या प्रमाण्ं रुग्णांना देखी्ल न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनती आहे की हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे त्याचबरोबर या प्राधिकरणात सुधारणा करावी आणि त्यानंतर हे विधेयक सभागृहासमोर आणावे . एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------- नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, विधानसभेमध्ये संमत होऊन या सभागृहामध्ये चर्चेकरिता आलेले सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 29 - महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा-व्यक्तींबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यात आले आहे.

या विधेयकाचे मी स्वागत करीत असतांना या विधेयकामागील पार्श्वभूमी, या विधेयकाची "उद्देश व कारणे" वाचल्यानंतर स्पष्ट होईल. यामध्ये या विधेयकाबाबत संपूर्ण स्पष्टीकरण देण्यात आले आहे. "काही रुग्ण, त्यांचे नातवाईक आणि काळजीवाहू व्यक्ती यांच्याकडून, वैद्यकीय सेवेतील व्यक्तींना इजा पोहोचविणाऱ्या किंवा त्यांच्या जीवाला धोका पोहचविणाऱ्या हल्ल्यांमध्ये आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेस हानी पोहचविण्यामध्ये किंवा नुकसानी करण्यामध्ये झपाटयाने वाढ झाली होती. त्यामुळे अशा वेळी अशा सेवांमध्ये मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे अखिल भारतीय वैद्यकीय संघ आणि इतर अनेक राज्यस्तरीय संघांकडून अशा घटना वारंवार घडण्यापासून रोखण्याची जोरदार मागणी होत होती. राज्यामध्ये अशा घटना वारंवार घडण्यास प्रभावीपणे आळा घालण्यासाठी आणि वैद्यकीय सेवेतील व्यक्तींचे आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेचे संरक्षण व जतन करण्यासाठी एक विशेष कायदा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटले. वैद्यकीय सेवा-व्यक्तींच्या विरोधात हिंसाचार करणाऱ्या, किंवा वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणाऱ्या अपराध्यांना, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा आणि तसेच पन्नास हजार रुपयापर्यंत असू शकेल इतका दंड देखील करण्याचे प्रस्तावित केले होते. वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची केलेली हानी किंवा नुकसान यासाठी, केलेली हानी किंवा नुकसान यांच्या दुप्पट रकमेइतकी नुकसानभरपाई वसूल करण्याचे देखील प्रस्तावित केले होते. वैद्यकीय निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य अनुतोष मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना साह्य व सल्ला देण्यासाठी वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रांतील प्रत्येकी एक याप्रमाणे तज्ज्ञांचे मिळून बनलेले प्राधिकरण स्थापण्याचे देखील प्रस्तावित केले होते"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी.....

सभापती महोदय, या विधेयकाची पार्श्वभूमी पाहिली तर हल्लीच्या काळात वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर्सवर, हॉस्पिटलवर हल्ले होत असल्याचे आपणास दिसते. त्या हल्ल्यामध्ये मोठया प्रमाणात मालमत्तेची हानी होते. डॉक्टर्सवर होणाऱ्या हल्ल्यापासून शासनाने बोध घेऊन समाजातील या प्रवृत्तीचा बिमोड करण्याची भूमिका या विधेयकामध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. या संदर्भात माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मांडलेल्या भूमिकेचे मी समर्थन करतो. त्यांनी आपली भूमिका मांडीत असतांना असे सांगितले की, अशाप्रकारे एखाद्या डॉक्टरवर काही लोकांकडून हल्ले होत असतील, त्यामध्ये त्याच्या मालमत्तेचे नुकसान केले जात असेल तर समाजानेच त्याला संरक्षण दिले पाहिजे, त्याला सरकारने संरक्षण दिले पाहिजे, त्याला पोलीस यंत्रणेने संरक्षण दिले पाहिजे. परंतु मला याठिकाणी सांगावेसे वाटते की, एका हाताने टाळी वाजत नाही. यामागील समाजातील विदारक दृश्य तुम्हाला आम्हाला पहावास मिळते हे आपल्याला नाकारता येणार नाही.आणि मग माझ्या मनामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की, याच व्यवसायासाठी अशाप्रकारचा स्वतंत्र कायदा कां आणला आहे? या राज्यामध्ये निरनिराळे व्यावसायिक आहेत. त्यांच्यावरही हल्ले होत आहेत. त्यामध्ये वकिलांवर हल्ले होत आहेत, त्यांच्याकरिता आपण स्वतंत्र तरतूद केलेली नाही. इंजिनिअर व आर्किटेक्ट यांच्यावर हल्ले होत आहेत. हे देखील समाजामध्ये स्वतंत्रपणे व्यवसाय करीत आहेत. आणि व्यवसाय करीत असतांना त्यांचा दैनंदिन निरनिराळया व्यावसायिक लोकांबरोबर संबंध येत असतो. अशावेळी त्यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्याला प्रतिकार करण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद केली आहे काय? हे विधेयक आणण्यासाठी मेडिकल कौन्सिलकडून मागणी करण्यात आली असेल, किंवा राज्यातील वैद्यकीय व्यावसायिक संस्थांनी मागणी केली म्हणून आपण हे विधेयक आणले,

( अपूर्ण - यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी . . . ..

हे अत्यंत चांगले काम केले आहे, अत्यंत स्तुत्य काम केलेले आहे. डॉक्टर व्यावसायिकांना संरक्षण दिले पाहिजे. पण काही डॉक्टर्स्‌मुळे आता या व्यवसायामध्ये संपूर्णपणे कॉम्पीटीशन सुरु झालेली आहे. विशेषत: आज डॉक्टरांमध्येही कॉम्पीटीशन आहे, प्रोफेशनमध्ये कॉम्पीटीशन आहे. आज जर तुम्ही पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये गेलात तर तेथे जाईपर्यंत आपल्याला असे वाटत असते की, तेथे गेल्यानंतर चांगली औषधे दिली जातील. परंतु तेथे चार-पाच दिवस उपचार घेतल्यानंतर जेव्हा आपल्यासमोर बिल येते, तेव्हा डोळे पांढरे होतात. मध्यंतरी मी सुध्दा दोन-तीन वेळा बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतो. एकदा तर जवळजवळ 22 दिवस तेथे ॲडमिट होतो. त्यावेळी माझ यावर इलाज करणारे जे ज्युनिअर डॉक्टर होते, त्यांनी औषधोपचार करण्यासाठी सुई लावली होती. परंतु तेथे सूज आल्यामुळे मी त्या डॉक्टरला सांगितले की, परत येथे सुई लावू नको, तर दुसऱ्या हाताला लावली तरी चालेल. पण त्याने माझे न ऐकता त्याच बाजूला पुन्हा सुई लावली. पहिल्यांदा सुई लावल्यावर हात सुजला होता, परंतु आता दुसरी सुई लावल्यावर परत सूज आली आणि त्यामध्ये पस् झाला. तो पस् काढण्यासाठी दोन वेळा ऑपरेशन करावे लागले. ऑपरेशन झ ााल्यानंतर 25 ते 30 इंजेक्शनचा कोर्स करावा लागला. अशा प्रकारे डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे माझा हात काही प्रमाणात अधू झाला आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. तेव्हा बॉम्बे हॉस्पिटलसारख्या ठिकाणी अशा प्रकारची ट्रिटमेंट मिळत असेल तर ते योग्य नाही. लिलावती किंवा जी मोठी हॉस्पिटल्स् आहेत तेथे चांगल्या प्रकारचे उपचार मिळतात असा विचार करुन आपण तेथे भरमसाठ लाखो रुपयांची फी भरतो. परंतु जर या हॉस्पिटल्स्‌मधून अशा प्रकारची ट्रिटमेंट मिळणार असेल तर कायद्यात तदतूद केली पाहिजे आणि अशा डॉक्टरांच्या बाबतीत तक्रार करावयाची असेल किंवा कारवाई करावयाची असेल तर या बिलाच्या अंतर्गत त्यासंबंधीच अधिकार नमूद केले पाहिजेत.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी भूमिका मांडलेली आहे, त्याचे मी जरुर समर्थन करीत आहे. डॉक्टरांवर हल्ले होतात,या विधेयकातील कलम 3 व 4 मध्ये हिंसाचाराच्या बाबतीत व्याख्या दिलेली आहे.पान 3 वर असे म्हटलेले आहे की,"निम-वैद्यकीय आरोग्यसेवक"याचा अर्थ वैद्यकीय सेवा देणाऱ्या वैद्यकीय सेवा-व्यक्तीस सहाय्य करणारी व्यक्ती असा आहे."पुढे असे म्हटलेले आहे की,"मालमत्ता" याचा अर्थ कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या

. . . .2 आर-2

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी . . ..

किंवा वैद्यकीय सेवा संस्थेच्या मालकीची असलेली किंवा त्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेली, कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा वैद्यकीय साधनसामग्री किंवा वैद्यकीय यंत्रसामग्री असा आहे." याठिकाणी "हिंसाचाराचे" देखील डेफीनेशन दिलेले आहे. यामध्ये असे म्हटलेले आहे की, "हिंसाचार" याचा अर्थ, ज्या कृत्यामुळे वैद्यकीय-सेवा-संस्थेतील कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या जिवीतास कोणतीही इजा,,क्षती किंवा धोका पोहोचेल किंवा पोहोचू शकेल किंवा अशी व्यक्ती आपले कर्तव्य बजावीत असताना जिला धाकदपटशा करण्यात येईल, अडवण्यात येईल किंवा तिच्या कामात अडथळा आणण्यात येईल किंवा एखाद्या वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेला हानी किंवा नुकसान पोहोचेल किंवा पोहोचू शकेल असे कृत्य, असा आहे." तसेच पुढे "3" मध्ये असे म्हटलेले आहे की, "वैद्यकीय सेवा-व्यक्तीविरुध्दच्या कोणत्याही हिंसाचाराच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करण्याच्या कृत्यास प्रतिबंध करण्यात येईल."

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

कलम 4 मध्ये महत्वाची तरतूद केलेली आहे. यामध्ये आपण पोलिसांना ब्लँकेट अधिकार दिलेले आहेत. कोणीही टेलिफोन करुन सांगणार की, हा माणूस आला होता तर त्याची खातरजमा करुन कारवाई होऊ शकते. याबाबत आपण यामध्ये तरतूद केलेली आहे. त्यासाठी शिक्षा किती आहे ? त्यांनी खातरजमा करणे हा प्रश्न वेगळा आहे परंतु अशा प्रकारची तक्रार पोलीस स्टेशनला केली तर त्यासंदर्भात पोलिसांना कलम 4 अन्वये अधिकार दिलेला आहे. कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, "जो, कलम 3 च्या तरतुदीचे उल्लंघन करुन हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशा कोणत्याही अपराध्यास, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या करावासाची आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल." हिंसाचाराची जी व्याख्या केलेली आहे त्यामध्ये समजा एखादा डॉक्टर आणि एखादा रुग्ण यांच्यामध्ये चर्चा झाली, अल्टरेशन झाले किंवा वादावादी झाली आणि त्यातून काही अप्रिय गोष्ट घडली तर ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवू शकतात आणि या कलमाच्या अंतर्गत पोलीस त्यांना पकडू शकतात. आता आपण हा गुन्हा अदखलपात्र न ठेवता तो दखलपात्र केलेला आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये पोलीस अधिकाऱ्याला त्याची दखल घ्यावीच लागणार आहे. तशी तरतूद या कलमामध्ये केलेली आहे. या तरतुदीच्या संदर्भात शासनाने जी भूमिका घेतलेली आहे ती वाईट आहे असे मी म्हणणार नाही. परंतु यासंदर्भात दुसरी पर्यायी व्यवस्था काय आहे ? उद्या जर एखाद्या रुग्णाची डॉक्टरच्या विरोधात तक्रार असेल तर त्यासंदर्भात त्यांना या बिलामध्ये काहीही रिलीफ दिलेला नाही. यामध्ये आपण प्राधिकरण तयार करण्याबाबत सांगितले आहे. प्राधिकरण काढून आपण नेमके काय करणार आहात ? उद्या जर एखाद्या माणसाची डॉक्टरकडून फसवणूक झाली किंवा चुकीचे उपचार झाले आणि त्याचा वाईट परिणाम झाला तर त्यासंदर्भात त्याला जो रिलीफ पाहिजे असेल तर त्या अनुषंगाने त्याने कोणाकडे जावे ? आपण प्राधिकरणाची भूमिका यामध्ये स्पष्ट केली आहे पण प्राधिकरणाचे अधिकार डिफाईन्ड केलेले नाहीत. शासनाने या प्राधिकरणाचे अधिकार डिफाईन्ड करावेत. आपण या ठिकाणी परिपूर्ण बिल आणावयास पाहिजे. विधानसभा सभागृहाने हे बिल मंजूर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

केलेले असले तरी या सभागृहामध्ये या बिलाच्या संदर्भात चर्चा होत असताना आपण खातरजमा करावी. आपण जे प्राधिकरण करणार आहोत त्याला सुध्दा चांगल्या प्रकारची नोबल आयडेंटीटी असली पाहिजे. त्याला व्यापक स्वरुप दिले पाहिजे. पेशन्टची तक्रार असेल तर त्याने कोणाचा आधार घ्यावा हे स्पष्ट व्हावयास पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये याबाबत स्पष्टता करतील अशी मी अशा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपण मला या बिलावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या बिलाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. परंतु या बिलाचे समर्थन करीत असताना मला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, डॉक्टरकडे जाणारी व्यक्ती केवळ हौस म्हणून जात नाही तर त्याची मजबुरी असते, काही तरी रोग झालेला असतो आणि तो बरा होण्यासाठी लोक डॉक्टरकडे जातात. डॉक्टरांवर हल्ले होतात हे खरे आहे तसेच त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे हेही खरे आहे परंतु त्याचबरोबर हे बिल मंजूर करीत असताना जे रुग्ण आहेत किंवा त्यांचे जे नातेवाईक आहेत त्यांना सुध्दा संरक्षण मिळाले पाहिजे. अशी भावना मी या ठिकाणी व्यक्त करतो त्याला अनेक कारणे आहेत. एक तर हल्ली कट-प्रॅम्टीस नावाचा प्रकार महाराष्ट्रभर सर्व ठिकाणी पहावयास मिळतो. विनाकारण तपासण्या करावयास लावावयाच्या आणि यासंदर्भात संबंधित डॉक्टरांची टोळी असते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील....

एका डॉक्टरने त्या पेशंटला दुस-या डॉक्टरकडे पाठवावयाचे आणि त्यातून कमिशन घ्यावयाचे, अशाप्रकारची कट प्रॅक्टीस देखील सुरु आहे. एखाद्या पेशंटच्या वैद्यकीय तपासण्या किती कराव्यात याला सुध्दा मर्यादा असतात. यासंबंधी वैद्यकीय तज्ज्ञानुसार कमिटी करुन त्यांचा सल्ला घेऊन या विधेयकात त्याचा अंतर्भाव झाला पाहिजे. सभापती महोदय, वैद्यकीय उपचारासाठी बिले देखील भरमसाठ आकारली जातात. एखाद्या रोगावर इलाज केला असेल तर त्याचे बिल किती आकारले पाहिजे हे ठरविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील पेशंटला त्याची काही माहिती नसते. डॉक्टरांनी सांगितल्यानंतर ते बिल दिले पाहिजे आणि नाईलाजास्तव द्यावे लागते. म्हणून निरनिराळया रोगासाठी किंवा आजारावरील उपचारासाठी ठराविक रक्कम किंवा त्याचे प्रमाण निश्चित करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, अनेक ठिकाणी असे पहावयास मिळते की, एखादा पेशंट मरण पावल्यास, त्याच्या नातेवाईकांनी रुग्णालयाचे बिल दिल्याशिवाय त्यांच्या ताब्यात मृतदेह दिला जात नाही. 2-2, 3-3 दिवस मृतदेह तसाच पडून राहतो. मृताचे नातेवाईक हॉस्पिटलच्या बाहेर आक्रोश करीत असतात, परंतु डॉक्टरांना किंवा त्या रुग्णालयाच्या व्यवस्थापनाला दया येत नाही. त्यामुळे शेवटचा पर्याय म्हणून ते नातेवाईक सोनेनाणे विकून पैसे भरतात, त्यानंतर मृतदेह ताब्यात दिला जातो. अनेक प्रकार अनेकदा घडतात. खेडयापाडयात एखादा डॉक्टर नावाजलेला असेल तर त्याच्याकडे नंबर लावण्यासाठी पैसे द्यावे लागतात. हे प्रकार सुरु आहेत.

सभापती महोदय, ज्याप्रमाणे डॉक्टरांना संरक्षण दिले जात आहे त्याप्रमाणे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे एखादा पेशंट दगावल्यास जो कायदा डॉक्टरांसाठी लागू केलेला आहे, जी शिक्षा पेशंटच्या नातेवाईकांसाठी लागू केली जात आहे ती शिक्षा व दंड डॉक्टरांना सुध्दा लागू केला पाहिजे, अशी सूचना मी यानिमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक रोगावरील औषधोपचारासाठी ठराविक बिल आकारण्याची तरतूद करणे आवश्यक आहे, त्याशिवाय हे विधेयक संमत करु नये. मी जी सूचना केली आहे त्याचा विचार करुनच हे विधेयक मंजूर करावे. माझ्या सूचनांचा शासनाने विचार केला नाही तर गोरगरीब जनतेवर अन्याय होणार आहे, अशी सूचना करुन या विधेयकाला अनुमोदन देऊन माझे दोन शब्द संपवितो.

------

2....

NTK/ KGS/ ST/

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहासमोर असलेल्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जर आपण विचारले की, कोणते औषध उत्तम आहे, तर त्याचे उत्तर 'नो मेडिसीन इज गुड मेडिसीन ' असे द्यावे लागेल. रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर दुर्दैवी घटना घडल्यास त्या रुग्णाच्या नातेवाईकांकडून हिंसात्मक कृत्ये केली जातात. त्याला प्रतिबंध करण्यासाठी हे विधेयक चर्चेला आलेले आहे. परंतु रुग्णाचे नातेवाईक हिंसा का करतात त्याचा विचार केला पाहिजे. प्रत्येक व्यवसायाचा कोड ऑफ कंडक्ट असतो. त्या कोड ऑफ कंडक्टनुसार मेडिकल कौन्सिलचे जे कोणी अध्यक्ष असतील मग राज्य पातळीवर असो की केंद्र शासनाच्या पातळीवर असो ते सुध्दा यासंबंधी निर्णय घेऊ शकतात. डॉक्टरांनी हलगर्जीपणा केला असेल तर ते त्यांचे सदस्यत्व रद्द कमी करणे, ताकीद देणे अशाप्रकारची कारवाई करु शकतात. परंतु या बाबी न झाल्यामुळे शासनाला हे विधेयक आणण्याची गरज भासली आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, अनेक वेळा शासकीय रुग्णालयामध्ये जागा शिल्लक असते. तेथे डॉक्टर्स असतात, परंतु त्यांच्याकडे अधिक काम असते, अशावेळी रुग्णाच्या नातेवाईकाला असे वाटत असते की, माझ्या रुग्णाला डॉक्टरांनी लवकर तपासले पाहिजे. परंतु तसे घडले नाही तर डॉक्टरवर हल्ला केला जातो हे तितकेसे योग्य वाटत नाही. डॉक्टरांनी सुध्दा हा व्यवसाय आहे असे समजून काम केले पाहिजे आणि रुग्णांनी अडीअडचणी समजून घेतल्या तर अशाप्रकारच्या कायद्याची गरज भासणार नाही. अलिकडे मुंबई, पुण्यामध्ये घटना घडल्या असतील, परंतु ग्रामीण भागामध्ये अशाप्रकारच्या घटना घडत नाहीत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी....

त्याचे कारण असे की, डॉक्टरांना रुग्ण देव मानतो. ही भावना आता संपत चालली आहे. देवानंतर दुसरा माणूस कोण ? तर डॉक्टर, कारण तो जीव वाचवतो. 15-20 वर्षापूर्वी डॉक्टरांना जो मानसन्मान होता, प्रतिष्ठा होती ती आता कमी झालेली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या विधेयकातील 3 कलमे महत्वाची आहेत. विधेयकाच्या कलम 3मध्ये असे म्हटलेले आहे की, वैद्यकीय सेवा-व्यक्ती विरुध्दच्या कोणत्याही हिंसाचाराच्या किंवा वैद्यकीय सेवा-संस्थेच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करण्याच्या कृत्यास प्रतिबंध करण्यात येईल. कलम 4 मध्ये शास्ती दिलेली आहे. कलम 4मध्ये असे म्हटलेले आहे की, "हिंसाचाराचे कोणतेही कृत्ये करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशा कोणत्याही अपराध्यास, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या करावासाची आणि पन्नास हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल." या बाबतीत कारावास नाही तर दंडाची शिक्षा होऊ शकेल. तेव्हा ही जी शास्ती सुचविलेली आहे त्याबाबतीत तीन वर्षाचा कारावास किंवा पन्नास हजार रुपयापर्यन्त दंड अशी तरतूद असावयास पाहिजे. या तरतुदीमध्ये "आणि" या शब्दाऐवजी "किंवा" असा शब्द पाहिजे. हे विधेयक आणताना त्या सोबत शासनाने प्राधिकारणाच्या कामाची कार्यकक्षा दिली असती तर जास्त योग्य झाले असते. शासनाने हे जे विधेयक आणलेले आहे त्या विधेयकाच्या माध्यमातून रुग्णावंर किंवा त्याच्या नातेवाईकांवर अन्याय होणार नाही याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010चे वि.स.वि.क्रमांक 29 महाराष्ट्र वैद्याकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण हा जो कायदा करायला निघालो आहोत त्या कायद्याच्या संदर्भात मला असे म्हणावेसे वाटते की, हा कायदा उथळ आणि अदूरदृष्टीने करण्यात येत आहे. हे विधेयक संमत झाले तर त्याचे प्रचंड दुष्परिणाम होणार आहेत. एका अर्थाने डॉक्टरांना आपली मनमानी करण्याची संधी मिळेल. आताच त्यांची मनमानी कमी आहे अशातला भाग नाही. त्यांच्या मनमानीच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी भाष्य केलेले आहे. डॉक्टरांचे बेजबाबदारपणाचे वर्तन सर्रास पहावयास मिळते, पैसा कमावणे हीच त्याची प्रवृत्ती बनलेली आहे. आता डायग्नोसिस बाय चेकिंग ही पध्दत सुरु झालेली आहे. डॉक्टरांकडे रुग्ण गेला की त्याला रक्त तपासण्यास सांगितले जाते, लघवी तपासण्यास सांगितले जाते, एक्स-रे काढण्यास सांगितला जातो, सोनोग्राफी करण्यास सांगितले जाते. प्रत्येक ठिकाणी हजार-दोन हजार रुपये रुग्णला मोजावे लागतात. साधा आजार असेल तर रुग्णाचे 5-10 हजार रुपये खर्च होतात. डॉक्टरांची उपचार पध्दती प्रचंड महाग झालेली आहे. रुग्णाला ऑपरेशन करायचे असेल तर त्यासाठी लाख, दोन लाखा रुपये खर्च येतो. रुग्णाला रिलिफ मिळत आहे की नाही याची कोणती काळजी घेतली जात नाही, त्याच्या जीवाची पर्वा केली जात नाही. जीवनदान देणारे डॉक्टर जीव घेणारे बनत आहेत, अशा प्रकारचे चित्र आज आपल्याला पहावयास मिळत आहे. या विधेयकामध्ये "ज्या कृत्यामुळे वैद्यकीय सेवा-संस्थेतील कोणत्याही वैद्यकीय सेवा-व्यक्तीच्या जीवितास कोणतीही इजा, क्षती किंवा धोका पोहोचेल किंवा पोहोचू शकेल."...अशी हिंसाचार या शब्दाची व्याख्या केलेली आहे. मी हिंसाचाराचे समर्थन करीत नाही. परंतु या विधेयकाच्या संदर्भात मी अशी सूचना करु इच्छितो की, जे जे कायदे करण्यात येतात त्यास हे कायदे मंडळ जबाबदार असते. आपण करीत असलेला कायदा चिरंतन असला पाहिजे. स्थलकाल परत्वे तो कायदा म्हणून असला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे......

कायद्यामध्ये सापेक्षता असेल तर मग याचा अन्वयार्थ लावणे, इंटरप्रिटेशन ऑफ लॉ वेगळया पध्दतीने केला जातो. अस्तित्वात असलेल्या कायद्याचा अन्वयार्थ चुकीच्या पध्दतीने लावल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याचा चुकीचा अर्थ वकील मंडळी लावतात. त्याचे दुष्परिणाम तुम्ही आम्ही सगळयांनी अनुभवले आहेत. त्याची दखल घेऊन मी एवढेच म्हणेन की, याठिकाणी रुग्ण हा एका अर्थाने कस्टमर आहे. कस्टमर हा मार्केटचा किंग आहे हे लक्षात घेऊन रुग्णाला सेवा देणारा डॉक्टर आहे. डॉक्टर सेवा देतो. सेवा देणाऱ्याने ती कशी दिली पाहिजे, किती फी घेतली पाहिजे याचा लॉजिकली अभ्यास केला पाहिजे. सेवा घेणारा जो आहे त्याच्यावर अन्याय होतो असे त्याला वाटले तर गाऱ्हाणे मांडण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, ज्याप्रमाणे शिक्षण खात्याकडून होणाऱ्या अन्यायाबद्दल ट्रायब्यूनल निर्माण केले, एकमेकाच्या हक्काचा भंग झाला असेल तर गाऱ्हाणे मांडण्याची संधी दिली आहे, सहकार क्षेत्रात काही घडले तर सहकारी कोर्ट निर्माण केली, दाद मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. कामगारांवर अन्याय झाला तर कामगार कायद्यानुसार कामगार न्यायालयात दाद मागता येते. बाल न्यायालये निर्माण करुन तक्रार मांडण्याची तरतूद केली आहे. कायद्याऐवजी कोड ऑफ कण्डक्ट निर्धारित केले जावे. नियमावली केली जावी. त्याचबरोबर या पध्दतीच्या ग्राहकांसाठी स्वतंत्र मेडिकल कोर्ट निर्माण करावे आणि त्यांना आपले म्हणणे मांडण्याची, बचाव करण्याची सुविधा दिली जावी अशी मी सूचना करतो. शासनाने घाईघाईने आणलेले हे विधेयक मंजूर न करता मागे घ्यावे आणि सुधारित विधेयक सादर करुन मेडिकल कोर्टची सुविधा उपलब्ध करुन त्याचा सर्वांना लाभ घेता येईल अशी तरतूद करावी एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---------

(नंतर हिंदी भाषण श्री.शर्मा यांचेकडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, हमारे सीनियर सदस्य डॉ. दीपक सावंत और लीगल एक्सपर्ट श्री. गुरुनाथ कुलकर्णी जी ने बहुत अच्छी तरह से इस बिल के ऊपर अपने विचार रखे हैं. मुझे ऐसा लगता है कि पिछले दिनों वॅन्डलिज्म की कुछ ऐसी घटनाएं हुईं, 10-20 लोगों ने हॉस्पिटल में जाकर हिंसा की, तोड़फोड़ की, इससे पब्लिक प्रॉपर्टी का नुकसान हो रहा है, किसी प्राईवेट आदमी की प्रॉपर्टी का नुकसान हो रहा है तो उसको रिकवर करने का अधिकार चाहिए, इस बॅक-ग्राउन्ड के ऊपर शासन ने कहा था कि इसको रोकने के लिए स्पेशल लॉ लाएंगे. मेरा कहना है कि यह अधिकार तो पहले से कानून में है तथा और भी कानून बनाए जा सकते हैं. हमारे माननीय सदस्य ने कहा कि इस बारे में पहले से ही 17 फरबरी 2010 से ऑर्डिनेंस लागू है. मेरा मानना है कि अगर थोड़ा समय देकर इस बिल को 2-3 एंगल से स्टडी किया जाए तो इसमें कुछ खराबी नहीं होगी, कोई बहुत बड़ा नुकसान नहीं होगा. यह बात ठीक है कि नोबल प्रोफेसन का ह्यूमिलिएशन हो तो यह अच्छा नहीं है, उनका संरक्षण होना चाहिए. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने बताया कि अगर कहीं पर हिंसा होती है तो उसको रोकने के लिए आई.पी.सी. और बॉम्बे पुलिस एक्ट मे प्रोवीजन है. यह कॉग्निजेबल ऑफेंस या नॉन-कॉग्निजेबल आफेंस है, इस बारे में लीगल एक्सपर्ट ज्यादा अच्छी तरह से बता सकते हैं.

सभापति महोदय, क्लॉज 3 में लिखा है "Any act of violence against a Medicare Service Person or damage or loss to the property in a Medicare Service Institution, shall be prohibited." Mr. Chairman, Sir, I would like to bring to your notice that the act of violence is prohibited under many Laws, such as, Indian Penal Code, Bombay Police Act, etc.

सभापति महोदय, क्लॉज नं. 4,5 और 6 में दंड का प्रावधान किया गया है. पूरे विश्व में फास्ट ट्रॅक जजमेंट का ट्रेंड है. हमारे यहां एक कहावत है "जस्टिस डिलेज इज जस्टिस डिनाइड", इसलिए पूरे विश्व में फास्ट ट्रॅक कोर्ट आ रहे हैं और डिसीजन जल्दी हो रहे हैं. पूरे विश्व में सब से ज्यादा कानून हमारे देश में हैं.

. . . भाषण जारी, नंतर देवदत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ....

चाहे लेबर से संबंधित हो या किसी और विषय से संबंधित हो. मेरी जानकारी के अनुसार सबसे ज्यादा लेजिस्लेशन भारत में हैं तथा भारत के सभी राज्यों में हैं. और इन कानूनों का सबसे ज्यादा उल्लंघन भी हमारे देश में ही होता है. उसका कारण यही है कि हमारे कानून कम्पलीट नहीं बनते, सेल्फ सफिशियंट नहीं बनते हैं. साथ ही इन कानूनों के अंतर्गत इन्वेस्टीगेशन का प्रोसेस, ट्रायल का प्रोसेस तथा एक्शन का प्रोसेस बहुत लंबा होता है. यहां पर क्लाज 4 में लिखा हुआ है कि संबंधित लोगों को तीन साल तक की सजा और 15 हजार रुपए तक जुर्माना हो सकता है. और दूसरी क्लाज में लिखा है कि जितनी कीमत की प्रॉपर्टी डॅमेज होगी उससे डबल कीमत उन लोगों से रिकवर की जा सकती है जिन लोगों ने प्रॉपर्टी डॅमेज की है. मेरा कहना है कि जिनको पॉलिटिकल कारणों की वजह से या दूसरे किसी कारण से वायलेंस करनी है, गुंडागर्दी करनी है उनको इस कानून के जरिए रोक पाना मुश्किल है.

यहां पर माननीय सदस्य श्री गुरुनाथ कुलकर्णी साहब ने कहा, डॉ. सावंत साहब ने भी कहा और माननीय सदस्य श्री गुजराथी साहब ने भी कहा कि डाक्टरों के खिलाफ या किसी मेडिकल इन्स्टीटयुशन के खिलाफ या पॅरा मेडिकल स्टाफ के खिलाफ यदि कोई वायलेंस होती है तो यह कानून उनको प्रोटेक्शन देगा. लेकिन ऑथिरिटी की जो अल्टरनेट व्यवस्था की है उस बारे में यहां पर डिटेल में कुछ नहीं बताया है. यहां पर माननीय सदस्य श्री गुजराथी साहब ने कहा कि इस ऑथिरिटी को ज्युडिशल पावर क्या होगी ? यदि कहीं पर कोई वायलेंस की घटना हुई तो क्या इस ऑथिरिटी को इस तरह की कोई पावर है कि वह संबंधित लोगों को बुला सके, उनको एक्जॉमिन कर सकें. यदि यह कानून कमीशन एक्ट के अंतर्गत बनता है तो उनको सम्मन करने की पावर हो सकती है. अन्यथा इस ऑथिरिटी की बात कोई नहीं सुनेगा और उनके पास कोई नहीं आएगा. जो पेशंट एग्रीव्ड है या उसके परिवार के लोग एग्रीव्ड हैं, तो ऐसी स्थिति में उसका कुछ इमीडिएट सोल्युशन यदि नहीं निकलेगा तो इस कानून का कोई फायदा नहीं होगा. यह एक तरह से खानापूर्ति ही होगी ताकि मेडिकल प्रोफेशन के लोगों को लगे कि उनको खास इम्पोर्टेंश दी गयी है. हमारे एक साथी ने यहां पर बहुत सारे प्रोफेशन का जिक्र किया कि डाक्टर्स हैं, टीचर्स हैं, एडवोकेट तथा पत्रकार हैं या दूसरे ऐसे ग्रुप हैं जिनके खिलाफ ....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ....

वायलेंस होने की संभावना रहती है और उनके खिलाफ वायलेंस होता भी है. इसलिए अलग अलग ग्रुप के लिए यदि हम कानून बनाएंगे तो हमारा जो इंडियन पिनल कोड है या महाराष्ट्र पुलिस एक्ट से संबंधित जो प्रोवीजन हैं वे डायल्युट होंगी. इसलिए मेरा विचार है कि इस कानून के बारे में पुनर्विचार होना चाहिए. और यदि एक कांप्रिहेंसिव एक्ट बन सकता है तो अच्छा होगा. गुंडागर्दी और वायलेंस के खिलाफ एक परिपूर्ण कायदा यहां पर बनाया जाना चाहिए.

सभापति महोदय, यदि हमारे मंत्री महोदय चाहते हैं कि यह बिल यहां पर पास होना चाहिए तो मैं इसके विरोध में नहीं हूं. लेकिन इसको अच्छी तरह से बनाने के लिए पुनर्विचार होना चाहिए तभी यह कानून अच्छा कानून बन सकेगा. यह बात यहां पर हमारे दूसरे माननीय सदस्यों ने भी कही है कि हमारे समाज में गुंडागर्दी की जो प्रवृत्ति बढ रही है उसको रोकने के लिए और समाज के सभी वर्गों को प्रोटेक्शन देने के लिए एक परिपूर्ण कायदा बनाया जाना चाहिए. जो व्यक्ति सरकारी कर्मचारी नहीं है, जो लोग प्राइवेट सेक्टर में हैं और वे चाहे किसी भी प्रोफेशन में क्यों न हो उनको प्रोटेक्शन देने के लिए और किसी भी तरह की वायलेंस और गुंडागर्दी को रोकने के लिए हर तरह से परिपूर्ण जनरल लॉ बनाया जाना चाहिए, ऐसा मेरा सुझाव है.

माननीय सभापति जी, आपने मुझे बोलने का समय दिया इसलिए आपको भी बहुत बहुत धन्यवाद.

-0-

( इसके बाद श्री पी. खर्चे ) ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, सन 2010 चे विधानसभा विधेयक क्र. 29-महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा व व्यक्तिबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधयेक सभागृहात आलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या सभागृहात अशाच प्रकारच्या चर्चा यापूर्वी अनेक वेळा झालेल्या आहेत. डॉक्टरांवर होणारे हल्ले यासंबंधी अनेक आयुधांच्या माध्यमातून चर्चाही झाल्या आहेत. त्या अनुषंगाने दि. 17 फेब्रवारी, 2010 रोजी शासनाने या वैद्यकीय सेवा संस्थांच्या बाबतीतील हा अध्यादेश जाहीर केला आहे आणि त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठीच हे विधेयक आलेले आहे. विधेयकात वैद्यकीय सेवा-संस्थांचा जो अर्थ सांगितलेला आहे त्या बाबतीत कोणतेही खाजगी रुग्णालय असा शब्दप्रयोग केलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

खाजगी रुग्णालय किंवा खाजगी कोणतीही संस्था असेल व त्यांची जर हानी झाली तर त्यांच्या नुकसानभरपाईच्या संदर्भात या विधेयकात काही कलमे सादर करण्यात आलेली आहेत. परंतु शासकीय रुग्णालये किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या नुकसानभरपाईचा अंतर्भाव या विधेयकात आहे किंवा नाही हे स्पष्ट होत नाही. ग्रामीण भागात काही डॉक्टर एमबीबीएस नाहीत परंतु ते फार वर्षापासून प्रॅक्टीस करतात, 10-10,20-20 वर्षापासून प्रॅक्टीस करतात त्यांच्यावर लोक विश्वास ठेवत असतात. आज डॉक्टरांचे रोगाच्या बाबतीत स्पेशलायझेशन झालेले आहे. आज प्रत्येक अवयवाचा डॉक्टर वेगळा आहे. आज जसा नाक, कान, घसा यांचे डॉक्टर वेगवेगळ आहेत त्याच पध्दतीने उद्या डाव्या नाकपुडीचा वेगळा डॉक्टर होईल, उजव्या नाकपुडीचा वेगळा डॉक्टर होईल. स्पेशलायझेशन होणे हे काही थांबणार नाही. विज्ञानाच्या युगात हे घडतच राहणार आहे. पूर्वीच्या काळी आपल्याला सर्दी झाली, डोक दुखले, जखम झाली, बोट मोडले तरी आपण आपल्या फॅमिली डॉक्टरांकडे जात होतो दसु-या डॉक्टरांकडे रुग्ण जात नसे. पूर्वीच्या काळी डॉक्टरांवर एक प्रकारचा विश्वास ठेवला जात असे. आपल्याला काही झाले तरी आपण प्रथम फॅमिली डॉक्टरकडे जात होतो व फॅमिली डॉक्टरने दुसरा डॉक्टर रेफर केला तरच आपण दुस-या डॉक्टरांकडे जात होतो. काही वर्षापूर्वी डॉक्टरांवर अशा प्रकारचे हल्ले होत नव्हते. डॉक्टरांवरील हल्ल्यामध्ये का वाढ होत आहे याचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. डॉक्टरांकडे जो रुग्ण जातो त्या रुग्णाला कसे कापता येईल यादृष्टीनेच डॉक्टर रुग्णाकडे बघत असतो. कसाई जसे कापतो तसेच डॉक्टर सुध्दा पेशंटला कसाई समजून पैशाच्या दृष्टीने कापत असतो. डॉक्टरकडे जाणा-या पेशंटला सर्दी झालेली असली तरी डॉक्टर त्याला अनेक प्रकारच्या तपासण्या करावयास लावतो. युरीन तपासा, ब्लड तपासा, सोनाग्राफी करा अशा अनेक चाचण्यांची सुविधा त्या डॉक्टरकडे नसली तरी तो डॉक्टर त्याच्या मित्राच्या लॅबमध्ये किंवा सोनोग्राफी सेंटरमध्ये किंवा एक्सरे सेंटरमध्ये पाठवित असतो. डॉक्टरांच्या बरोबर त्यांच्या मित्राचाही व्यवसाय चालेल या दृष्टिकोनातून डॉक्टर पेशंटशी वागत असतो. आपण हॉटेलमध्ये गेल्यानंतर किंवा हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर आपण बील किती होईल हे कधीही पाहत नाही, किंवा बिलाची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

विचारणा करीत नाही. कारण आपण हॉस्पिटलच्या बिलावर किंवा हॉटेलच्या बिलावर विश्वास ठेवत असतो. त्यांच्याकडून जे काही बिल येते त्यावर विश्वास ठेवून आपण बिल भरत असतो. या विधेयकाच्या कलम 4 मध्ये म्हटले आहे की, "जो कलम 3 च्या तरतुदीचे उल्लंघन करुन हिंसाचाराचे कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा ते करण्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी इेईल अशा कोणत्याही अपराध्यास तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल."

सभापती महोदय, आपल्या अनुभव आला आहे की, दवाखान्यात जेवढे पेशंट जातात ते सर्वच्या सर्व सुखरुप बाहेर येतात असे काही नाही. वय जास्त असेल किंवा गंभीर आजार असेल व त्यात पेशंटचा मृत्यू झाला तर पेशंटच्या नातेवाइकाची कोणत्याही प्रकारे तक्रार नसते. परंतु एखाद्या रुग्णावर लाखो रुपये जेव्हा खर्च होतो तेव्हा पेशंटच्या नातेवाइकाची भावना असते की, आपला पेशंट सुखरुप बाहेर येईल. अशा प्रकारची अपेक्षा पेशंटच्या नातेवाइकाने ठेवणे गैर आहे असे मला वाटत नाही. लाखो रुपये खर्च झाल्यानंतर डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पेशंट दगावला अशी भावना जेव्हा पेशंटच्या नातेवाइकाची होते तेव्हाच अशा प्रकारचा उद्रेक होतो. अशा घटना आता सातत्याने घडत आहेत. पेशंटचा मृत्यू झाला तर एवढे एवढे पैसे भरल्याशिवाय तुम्हाला बॉडी मिळणार नाही अशा जाचक अटी घातल्या जातात तेव्हाच अशा प्रकारचे हिंसक कृत्य घडत असतात.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

पन्नास हजार रूपयांचा दंड आणि तीन वर्षाचा कारावास अशी तरतूद विधेयकात ठेवण्यात आली आहे. याचा पुनर्विचार झाला पाहिजे. यातून काही तरी विपरित घडू शकते. डॉक्टरांच्या माध्यमातून याचा दुरूपयोग होऊ शकतो. डॉक्टरांच्या साधनसामुग्रीची किंमत 20 हजार, 25 हजार नसेल ती साधनसामुग्री रूग्णाच्या नातेवाईकांनी मोडली असे सांगून त्यांच्याकडून भरपाई घेतील. असे उद्या कदाचित होऊ शकते. अमुक एवढ्या रकमेचे नुकसान झाले आहे, हे पाहण्यासाठी आपल्याकडे कोणती यंत्रण आहे. याचा उल्लेख येथे दिलेला नाही. या विधेयकातील तरतुदी डॉक्टरांच्या हिताच्या दृष्टीने करण्यात आलेल्या आहेत. डॉक्टरांच्या दवाखान्यात गोरगरीब माणूस देखील जातो. तेव्हा त्याच्या हिताची काळजी देखील शासनाने केली पाहिजे. त्यामुळे या विधेयकामध्ये सुधारणा आणणे आवश्यक आहे,अशी विनंती मी करतो. धन्यवाद..

......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, डॉक्टरांवर हिंसक हल्ले करण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे त्यास प्रतिबंध करण्यासाठी येथे विधेयक आणले आहे. त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांना पूर्वी लोक देव मानायचे. डॉक्टरांविषयी समाजामध्ये फार मोठा आदर होता. तो सध्याच्या काळात कमी होत आहे, हे जरी खरे असले तरी डॉक्टर हा काही देव नाही. डॉक्टर सर्व आजारांची ट्रीटमेंट देत असताना काही आजार असे असतात की, डॉक्टर त्या आजाराच्या उपचारासंबंधी खात्री देऊ शकत नाही. हमी देऊ शकत नाही. उदा.अपघात झालेला रूग्ण असेल किंवा हृदयविकाराचा रूग्ण असेल व तो अचानकपणे दगावला, त्याचा डॉक्टरांशी काहीही संबंध नसतो, पण त्याचा दोष डॉक्टरांना देण्यात येतो. यावेळी रूग्णांच्या नातेवाईकांच्या भावना प्रक्षुब्ध झालेल्या असतात. त्यातून मोठ्या प्रमाणावर हिंसक घटना घडतात. अशा घटना अनेक घटना नजिकच्या काळात घडलेल्या आहेत. त्यामुळे डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी हे जे विधेयक येथे मांडण्यात आले आहे त्याला मी पूर्णपणे पाठिंबा देत आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये प्रत्येक डॉक्टरने अनेक चांगल्या सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यामुळेच तालुक्याच्या ठिकाणी चांगल्या प्रकारची रूग्णालये सुरू झालेली आहेत. प्रगत राष्ट्रामध्ये असाव्यात अशा सुविधा महाराष्ट्रात निर्माण केलेल्या आहेत. मला माहिती आहे की, प्रत्येक व्यवसायाला काळी बाजू असते. या ही व्यवसायामध्ये चुकीच्या पद्धतीने वागणारे लोक आहेत. प्रत्येक व्यवसायासंबंधी आपण चर्चा करायला लागलो तर कमी अधिक प्रमाणात असेच चित्र आपल्याला पहायला मिळेल. चांगल्या पद्धतीने वैद्यकीय सेवा देत असताना अचानकपणे रूग्ण दगावतो तेव्हा वेगळी भावना नातेवाईकांमध्ये निर्माण होते. खरे म्हणजे यात डॉक्टराचा खऱ्या अर्थाने काहीही दोष नसतो. अशा वेळी डॉक्टरला लक्ष्य केले जाते आणि अतिशय हिंसक प्रकार केला जातो. असे प्रकार रोखण्यासाठी हे जे विधेयक आणले आहे, त्याचे मी स्वागत करतो, या विधेयकाला समर्थन देतो. धन्यवाद.

.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आत्मविश्वास गमावलेला माणूस असतो त्याप्रमाणे आत्मविश्वास गमावलेले हे सरकार आहे. आपल्याकडे असलेले सामर्थ्य वापरण्यासंबंधीची हतबलता या सरकारमध्ये निर्माण झालेली आहे. म्हणूनच त्यांनी हे विधेयक आणलेले आहे. मी अत्यंत जाणीवपूर्वक हे विधान एवढ्याकरिता करतो आहे की, मघाशी या सदनामध्ये आमच्या सन्माननीय सदस्यांनी बुवाबाजीसंबंधी प्रश्न विचारला होता. या सदनामध्ये मंत्रिमहोदयांनी पूर्णपणे उत्तर दिले की, कुठल्या बुवाने फसविल्यानंतर कुठले कलम लागते. कुठल्या बुवाने काय केले की, कुठले कलम लागते. संपत्तीच्या शोधासाठी कुठले कलम लागते. भारतीय दंड संहिता या देशाच्या घटने नुसार बनविण्यात आली आहे. आपला मुंबई पोलीस कायदा सक्षम आहे...

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते.....

तो एवढा सक्षम आहे की, कोणत्याही स्तरावरील कोणतीही गुंडगिरी , गुन्हेगारी या कक्षेत आणून त्यांना सजा देण्याचे पूर्ण सामर्थ त्याच्यामध्ये आहे. परतु आत्मविश्वास गमावलेल्यांना हे सामर्थ्य त्यामध्ये सापडत नाही. घटनेने निर्माण झालेल्या कायद्यात आमच्यामध्ये कोठे कमतरता निर्माण झालेली आहे की काय असे भीतीदायक वातावरण दडपणाखाली निर्माण होत असते. माननीय मंत्री महोदयांनी आता हे विधेयक आणले आहे. म्हणजे नेमके काय केले आहे ? या विधेयकावर ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत ती मते मी ऐकली आहेत.सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर असे म्हणाले की, हे विधेयक डॉक्टरांचे आहे. मी त्यांना असे म्हणालो की हे विधेयक डॉक्टरांचे नसून डॉक्टरांसाठी आणलेले आहे. तेव्हा डॉक्टरांसाठी हे विधयेक आणलेले आहे असे म्हटल्यानंतरसुध्दा हे सर्व डॉक्टर एका बाजूला राहिले. हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांना मारहाण करण्याचे व हॉस्पिटलची नासधूस करण्याचे जे काही प्रकार घडतात त्यावर निर्बध आणण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे म्हणून हे विधेयक डॉक्टरांचे नसून डॉक्टरांसाठी आणलेले आहे.वास्तविक पाहता डॉक्टरांचेच विधेयक असावयास पाहिजे होते.असे आतापर्यत अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात सांगितल्याचे मी ऐकले आहे.

सभापती महोदय,सर्व सान्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानतर मी आपल्याला एक उदहारण या ठिकाणी देतो. सन्माननीय गृह मंत्री श्री आर आर पाटील यांनी इ टी.व्ही.वर एका बातमीत असे सागितले होते की, " या महाराष्ट्रात लोकांना लुटतात, दरोडे घालणारे मी समजू शकतो कारण ते गुन्हेगार असतात ,लुटारु मी समजू शकतो कारण तेसुध्दा बदमाष असतात चो-या व पाकीटमार करणारे मी समजू शकतो परंतु या महाराष्ट्रात सुटाबुटात वावरणारे असेही लुटारु निर्माण झालेले आहेत.............

श्री.बबनराव पाचपुते (बसून): व्हाईट कॉलरवाले ..

श्री.आर.आर.पाटील : त्यांनी व्हाईट कॉलर हा शब्द वापरला नाही. ते अशा प्रकारे इंग्रजी शब्द वापरत नाहीत. त्यांच्याकडे ग्राम विकास विभाग होता त्यामुळे ते नेहमी आपले गावंढळपणा सांभाळतात. संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान त्यांनी राबविले होते त्यामुळे ते ख-या अर्थाने संत गाडगे बाबा झाले होते. त्यांच्यावर अशा प्रकारचा परिणाम झाला असल्यामुळे त्यांच्याकडून हे खाते





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते.....

काढून घेण्यात आले होते. मी याला गाडील, त्याला गाडील अशा प्रकारे ते सतत गाडत असतात म्हणून ते संत गाडगेबाबा आहेत.

श्री.बबनराव पाचपुते (बसून): त्यांच्यावर संत गाडगेबाबांचा पगडा आहे.

श्री.दिवाकर रावते : तुम्ही त्यांचे प्रतिस्पर्धी झाला आहात हे मला परवाच्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री सुरेश नवले यांच्याकडून कळले होते.गावा गावात जाऊन कीर्तन करणारे कोणी तरी प्रतिस्पर्धी ह.भ.प. निर्माण झाले आहेत असे त्यांनी मला सांगितले .

सभापती महोदय, सुटाबुटातील लोकांनी या महाराष्ट्राला 762 कोटी रुपयांनी लुटले अशा प्रकारे श्री आर आर पाटील यांनी स्टेटमेन्ट आकडयासहित केले होते .या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहेत ते लुटारुंच्या टोळीला संरक्षण देणारे विधेयक आहे अशा प्रकारे अधिकृतपणे मी या विधेयकाचे विश्लेषण करीत आहे. माझ्या घरातसुध्दा दोन डॉक्टर्स आहेत तरी सुध्दा मी अत्यंत जबाबदारीने तसे विश्लेषण करीत आहे.

सभापती महोदय, कै. मोहन नाईक नावाचे एक नगरसेवक होते त्यांचे निधन 15- 20 वर्षापूर्वी झाले होते. पाच - सहा वेळा ते नगरसवेक म्हणून निवडून आले होते. त्यावेळी शिवसेनेकडे विधानसभेतील आमदारपद नव्हते .त्यावेळी आम्हाला नगरसेवक पद मोठे आणि महापौर पद हे सर्वोच्च वाटावयाचे.आजारी पडल्यानंतर शिवसैनिकांनी मोठया हौसेने त्यांना हिंदूजा हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते.परंतु दुर्दैवाने त्याचे दु:खद निधन झाले परंतु तीन दिवस त्यांचे शव हॉस्पिटलने त्यांच्या कुटुबियांच्या ताब्यात दिले नव्हते. आम्ही सर्वानी वर्गणी काढून त्या हॉस्पिटलचे पैसे भरले आणि त्यानंतर शव ताब्यात दिले होते. त्या दिवसापासून हिंदुजा हॉस्पिटलवर माझा खूप राग आहे. सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी या विधेयकामधील काही कलमे वाचत होते तेव्हा ते मी ऐकत होतो ती कलमे वाचल्यानंतर त्यातील शब्दांची ते चिकित्सा करतील असे मला वाटले होते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट झाली की, या सभागृहामध्ये प्रत्येक माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणामध्ये डॉक्टर्सच्या लुटारुपणाची व्यथा आपण मांडीत होता. परंतु आपण ट्रेझरी बेंचच्या बाजूला बसले असल्यामुळे आपण या विधेयकाला मनापासून समर्थन दिलेले नाही. एकाही माननीय सदस्यांनी मनापासून समर्थन दिलेले नाही हे या विधेयकाचे सर्वात मोठे दुर्दैव आहे. आणि म्हणून ही परिस्थिती काय आहे ते आपण पहा? या विधेयकातील कायदेशीर बाबींकडे मी नंतर येणारच आहे. हे विधेयक मांडण्याचा मंत्रिमहोदयांना नैतिक अधिकार काय आहे? हे मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगावे.

अंधेरी येथील एक डॉक्टर मुनीर शेख यांच्याविरुध्द वर्सोवा पोलीस स्टेशनमध्ये जवळ जवळ हजाराच्यावर लोकांच्या अधिकृतपणे तक्रारी आहेत. एवढया मोठया प्रमाणावर जनतेचा रोष असतांना देखील डॉ. मुनीर शेख यांना अटक कां होत नाही? पोलिसांनी सांगितले की, डॉ. मुनीर शेख हे फरारी आहेत. या सभागृहामध्ये मंत्री पोपटासारखे बोलतात, ते थोडेच त्याला शोधायला जातात. या डॉ. मुनीर शेखचे प्रकरण या विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आल्यानंतर तत्कालीन माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, डॉ.मुनीर शेख हे फरारी आहेत= त्यामुळे त्यांना आपण पकडू शकत नाही. म्हणून मी सुरुवातीला म्हटले की, हे विधेयक मांडण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार आहे काय? याचे उत्तर आपणाला याठिकाणी द्यावे लागेल. दिनांक 27 फेब्रुवारी 2010 रोजी कॉंग्रेसचे आमदार माननीय श्री. बलदेव खोसा यांनी जुहू येथील इस्कॉनमध्ये डॉ. मुनीर शेख यांचा सत्कार केला. त्यावेळी हे अधिवेशन सुरु होते. या सभागृहामध्ये डॉ. मुनीर शेख फरारी आहे, असे सांगितले जाते. ज्या डॉक्टरच्या विरुध्द हजारावर लोकांनी फसवणुकीच्या तक्रारी केल्या आहेत, आणि जो पोलिसांना सापडत नाही, वर्सोवा पोलीस स्टेशनलाही सापडत नाही. असे असतांना विधानसभेचे आमदार माननीय श्री. बलदेव खोसा डॉ. मुनीर शेख हा बदमाश आहे म्हणून त्याचा सत्कार करीत नाहीत तर त्याची कारणे वेगळी आहेत. त्या डॉ. मुनीर शेखवर 10 कोटींची लुबाडणूक केल्याचा आरोप आहे. असा डॉक्टर तुम्हाला सापडत नाही. त्याला तुमच्या व्यासपीठावर नेऊन सन्मानित करता. तरमग हे विधेयक याठिकाणी आणण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार आहे काय? असा माझा तुम्हाला सवाल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, दुसरा विषय असा की, एखाद्या डॉक्टरला हाणामारी झाल्यानंतर, एवढी मोठी तोडफोड झाल्यानंतर त्याला फ्रॅक्चर झाले, किंवा त्याला आय.सी.यू. मध्ये दाखल करावे लागले असे कधी झाले आहे काय? माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी भावनिक प्रक्षोभ होतो. रागाच्या भरामध्ये ते लोक डॉक्टरच्या अंगावर धाऊन जातात. परंतु डॉक्टरला मारल्याचे उदाहरण नाही. त्याठिकाणी काचा फोडतात, खुर्च्या आपटतात. याठिकाणी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे शिवसैनिक आहेत. ते याठिकाणी जनतेचे प्रतिनिधी म्हणून आहेत. म्हणून याठिकाणी डॉक्टर्सच्या विरोधात मी माझे म्हणणे मांडीत आहे, अशातला भाग नाही. याठिकाणी सर्व डॉक्टर्स एकत्र आले आणि त्यांनी स्वत:चे संरक्षण करण्यासाठी सरकारवर दबाव आणला. आणि हे सरकार त्या दबावाला कसे बळी पडले? महाराष्ट्रामध्ये तोडफोड झाल्याची खूप उदाहरणे आहेत. त्यामध्ये सर्व पक्षांचे लोक सहभागी आहेत. त्यामध्ये एखाद्या पक्षाने हे कृत्य केले नाही, किंवा त्यांचा तो धंदा आहे अशातला भाग नाही. आपण किती डॉक्टर्सची तोडफोड केली, किती डॉक्टर्सना फ्रॅक्चर झाले व त्यांना आय.सी.यू. मध्ये न्यावे लागले याचे एक तरी उदाहरण दाखवा.

(यानंतर सौ रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

अहो, अशी अनेक माणसे आहेत की,जी डॉक्टरचे बिल पाहिल्यानंतर कोसळून खाली पडतात.परंतु असे झाल्यानंतर एखाद्या डॉक्टरचे ब्लड प्रेशर वाढले आहे, टेंन्शन वाढले आहे, असे होत नाही. कारण त्यांचा कलिजा मजबूत असतो. कारण त्यांना लुटावयाचेच असते. सध्या आरोग्य विमा आहे, माननीय मंत्री महोदयांनी हा विषय गंभीरपणे ऐकावा.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : मी आपले भाषण बारकाईने ऐकत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण हे विधेयक कोणाच्या संरक्षणासाठी आणलेले आहे? आरोग्य विमा म्हणजे जो पेशंट आहे, त्याला एक सुरक्षा आहे की, त्याच्याकडे आर्थिक पाठबळ नसेल आणि अशा वेळी त्याने विम्याचे हप्ते भरले तर त्याला काही लाखापर्यंत मदत मिळू शकते. पण सध्या आरोग्य विम्यामध्ये काय होते? जर माझे बिल एक लाख रुपये झाले असेल तर ते दोन लाख, तीन लाख रुपयांचे बिल तयार केले जाते आणि मग संबंधित विमा कंपनीशी सेटींग केले जाते की, दहा टक्के तुझे आणि बाकीचे माझे.अशा पध्दतीने विम्याच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांचा पैसा घेतला जातो.कारण ते पैसे कोणाच्याच खिशातून डायरेक्ट जात नसतात आणि त्याबाबत कोणाला कळतही नाही.पेशंटचे म्हणणे असते की,मी हॉस्पिटलमधून धडधाकटपणे बाहेर पडलो.माझे हप्ते विमा कंपनी भरेल आणि परत हप्ता सुरु राहील.अशा माध्यमातून सर्वसामान्य माणसांचा पैसा उकळणारी एक टोळी निर्माण झालेली आहे. मला एक गोष्ट कळत नाही, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी एक सुंदर मुद्दा मांडलेला आहे कि "क्या जरुरत है? ऐसी कौन सी जरुरत है उनको संरक्षण देने की "आता या विधेयकाची गरज नाही.माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक ताबडतोब मागे घ्यावे.याची गरज नाही.दंगाधोपा आटोक्यात आणावयाचा आहे ना? व्हायलन्स् कमी करावयाचा आहे ना? मग शासनाने चार दिवसा-पूर्वी सुरक्षा मंडळाच्या संबंधातील विधेयक मंजूर केलेच आहे आणि त्यामध्ये हॉस्पिटल्स्चा देखील समावेश आहे आणि त्यानुसार त्यांना देखील शासन सुरक्षा रक्षक पुरविणार आहे. त्याप्रमाणे तेथे सुरक्षा रक्षक नेमावेत. हॉस्पिटलमध्ये व्हायलंट झालेल्या माणसाला पकडण्याचा ज्याला अधिकार आहे, असा सुरक्षा रक्षक शासनाने निर्माण केलेला आहे आणि अगदी पुढील कोणताही प्रसंग उद्भवण्यापूर्वी तो सुरक्षा रक्षक त्या माणसाला ताब्यात घेऊन जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये घेऊन जाईल. अशा वेळी तेथील डॉक्टरांवरही चार्ज लावण्यात यावा, त्यांना देखील पैसे भरु देत. तुम्हाला तेथे पाहिजे तेवढे सुरक्षा

. . . .3 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

रक्षक पुरविता येतील. मग तेथे तोडफोड देखील होणार नाही याठिकाणी या विधेयकाची काय गरज आहे? कोणताही माणूस एकाएकी उठून तोडफोड करीत नाही. अगोदर तो चिडतो, बोंबाबोंब करतो, आरडाओरड करतो आणि मग जेव्हा त्याचा राग लिमिटच्या बाहेर जातो, तेव्हा तोडफोडीच्या, मारण्याच्या घटना घडतात. पण तोपर्यंत सुरक्षा रक्षक त्याला बाहेर घेऊन जाऊ शकतो.सभापती महोदय, शासनाने महाराष्ट्रामध्ये चार दिवसापूर्वी सुरक्षा मंडळाच्या बाबतीत व्यवस्था केलेली आहे. मग ही व्यवस्था केलेली असताना सुध्दा, याठिकाणी शासन अशा प्रकारचे विधेयक आणते, या विधेयकामध्ये शासनाने एक व्याख्या दिलेली आहे.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, यामध्ये वैद्यकीय विद्यार्थ्यांची व्याख्या का दिलेली आहे हे मला कळले नाही.

डॉ.दीपक सावंत(खाली बसून) : तेथे ईन्टर्नशीपचे विद्यार्थी असतात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, परंतु हे विद्यार्थी छोट्या-छोट्या हॉस्पिटलमध्ये जाऊन काम करीत नाहीत, तर ते जनरल हॉस्पिटलमध्ये करतात. विधेयकातील "(च)" मध्ये "अपराधी"याची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये म्हटलेले आहे की, "अपराधी" याचा अर्थ,"जी व्यक्ती एकतर स्वत: किंवा व्यक्तींच्या गटाचा किंवा संघटनेचा एक सदस्य किंवा नेता या नात्याने, या अधिनियमाखालील हिंसाचाराचे कृत्य करील, ते करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल,अशी कोणतीही व्यक्ती," असा आहे; आणि मला माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्याकडून काही अपेक्षा होती. मला त्यांच्या प्रॅंटीसबाबत माहिती नाही. I dont know, whether you are Criminal Lawyer or Civil Lawyer. तुम्ही कोणती प्रॅक्टीस करता किंवा तुमचे कोणत्या विषया-मध्ये जास्त स्किल्ड आहे हे मला माहिती नाही. पण तुम्ही वकील आहात आणि आमच्या या सभागृहाचे ॲडव्होकेट जनरल आहात.

(सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा खाली बसून बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य लॉयर म्हणत आहेत की लायर म्हणत आहे मला नीट ऐकावयास येत नाही. "अपराधी" याचा अर्थ, सभापती महोदय, हे सर्वांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. यामध्ये "जी व्यक्ती एक तर स्वत:,व्यक्तीच्या गटाचा म्हणजे 5-10 जण नातेवाईक आहेत किंवा संघटनेचा एक सदस्य, किंवा नेता या नात्याने, या अधिनियमाखालील हिंसाचाराचे कृत्य करील, ते करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशी कोणतीही व्यक्ती,"असा आहे; माननीय मंत्री महोदय, हे यामध्ये कशासाठी घातलेले आहे?

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

जो आपला पेशन्ट घेऊन जातो तो संघटनेचा सदस्य म्हणून जातो काय ? यामध्ये असा उल्लेख केला आहे की, "संघटनेचा सदस्य किंवा नेता या नात्याने या अधिनियमाखाली हिंसाचाराचे कृत्य करील, ते करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास अपप्रेरणा किंवा चिथावणी देईल अशी कोणतीही व्यक्ती" हे अत्यंत गंभीर वाक्य आहे. यातील दोन शब्द अत्यंत गंभीर आहेत. एखाद्या नेत्याला जर लटकवावयाचे म्हटले आणि त्यानी सांगितले, नाव घेतले तर आपण त्याला चिथावणीखोर म्हणून ताब्यात घेणार. जाबजबाब वगैरे झाल्यानंतर तो सुटेल हा नंतरचा भाग झाला. एखाद्या पेशन्ट्शी माझा संबंध नाही पण माझा कार्यकर्ता म्हणून त्याच्या पेशन्टला जर मी हॉस्पिटलमध्ये जाऊन भेटून आलो आणि डॉक्टरला सांगितले की, पेशन्टकडे नीट लक्ष द्या आणि नंतर त्याने जर तक्रार केली आणि मी फोन करुन सांगितले की, मी आपल्याला सांगितल होते तरी आपण ही आमच्या पेशन्टकडे लक्ष का देत नाही, तुम्हाला मी सांगितले होते ना ? अशा प्रकारचे चार शब्द त्या ठिकाणी रेकॉर्डला पुरे आहेत. त्याच्यानंतर जर काही घडले तर डॉक्टर सांगणार की, श्री. रावते साहेब आले होते. मला सांगून गेले, त्यानंतर फोनवर त्यांनी मला दम दिला आणि त्यांच्या चिथावणीतूनच हे सगळे घडले. यामध्ये घातलेला हा शब्द किती गंभीर आहे. आपण हा शब्द कसा टाकला ? घडलेल्या तत्कालीन घटनेला प्रतिबंध निर्माण करण्याकरिता या विधेयकात अशी तरतूद केली असावी असे मला वाटले होते. पण हे तसे नाही. यामध्ये आपल्या विधी खात्याचे कोणी विव्दान असतील त्यांनी 'कॉन्स्पिरसी' हा शब्द बरोबर यामध्ये आणलेला आहे. कलम 120 मध्ये हा शब्द आहे. तो कशासाठी आणला ? या गोष्टीत आपण कोणत्या थरापर्यंत जाणार ? ही नैतिकता ज्यावेळी मिळते त्यावेळी मी विधी खात्याला विचारतो. त्याबाबत पुढे आम्ही मांडणार आहोत. यापूर्वी डॉ. शेख यांच्याबद्दल मांडले होते त्यासंदर्भात आपल्याला काही सुचले नाही काय ? आज हे घडेल पण या व्यतिरिक्त त्या बाजूला जी नैतिकता आहे ती सांभाळणार काय ? हे तुम्हाला कळले नाही. यामध्ये 'अपप्रेरणेने आणि चिथावणी देईल अशी कोणतीही व्यक्ती' असा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, तुम्ही आम्ही आपल्या कार्यकर्त्याच्या, आपल्या ओळखीच्या पेशन्टला भेटायला जावयाचे नाही आणि गेलो तरी मूकपणे जावयाचे, कसा आहेस असे विचारावयाचे आणि बाहेर गार्डनमध्ये यावयाचे. डॉक्टरशी चर्चा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. दिवाकर रावते ....

करावयाची नाही. कारण या कलमामध्ये तशी तरतूद केली आहे. हे आपण काय केले आहे ? एक बांधिलकी असते, एक दबाव असतो. समाजामध्ये लोकप्रतिनिधींवर सुध्दा एकप्रकारचा दबाव असतो की, आपण थोडे लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, आपल्यालाही अनुभव आहे तसेच या सदनामध्ये बसलेल्या प्रत्येक सदस्याला हा अनुभव आहे. कोणत्याही हॉस्पिटलमध्ये आपल्या परिचयाचा माणूस ॲडमिट झाला की तो आपल्याला फोन करतो आणि सांगतो की, साहेब, जरा फोन करुन सांगाल का ? ज्याचे थोडे समाजामध्ये स्थान आहे त्याला तो भेटून सांगतो की, साहेब जरा फोनकरुन सांगाल का ? रोज किमान सात ते आठ लोक तरी आपणा सर्वांना भेटत असतात आणि सांगतात की, साहेब, जरा डॉक्टरला फोन करा. आपण जर त्याला सांगितले की, डॉक्टर असे करीत नाही, डॉक्टर नेहमी प्रत्येक पेशन्टला त्यांच्याकडे जी काही असेल ती सोय देतात तरी ते म्हणतात की, साहेब तुम्ही फोन करा. सहा दिवसांपूर्वी मला एक फोन करावा लागला. ग्रामीण भागातील एक रुग्ण आमच्याकडे हॉस्पिटलमध्ये आणला आहे. कॉट नव्हती म्हणून त्याला दोन कॉटच्या मध्ये ठेवले होते. त्याची रीड तुटली त्यामध्ये पू झाला होता तो पू काढावयाचा होता. पंधरा दिवस झाले तरी डॉक्टरला पू काढण्यासाठी वेळ मिळाला नाही. तो सांगतो की,साहेब माझा पू काढावयास सांगा आणि मला या दुखण्यातून सोडवा. केवळ रीड मधला पू काढावयाचा आहे, अर्ध्या पाऊण तासाचे काम आहे असे असताना पंधरा दिवस एक माणूस त्या ठिकाणी ॲडमिट आहे पण डाक्टरला पू काढण्यासाठी वेळ नाही. अशा वेळेला जर दोन शब्द कमीजास्त बोललो तर आपण या कायद्याच्या कचाट्यात येतो.

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी बॉम्बे हॉस्पिटलच्या बाबतीत सांगितले. आमचे दुर्दैव असे आहे की, बॉम्बेचे मुंबई होऊन सुध्दा त्या हॉस्पिटलला आम्हाला मुंबई हॉस्पिटल असे म्हणता येत नाही. कारण या लेच्यापेच्या सरकारमध्ये अजून तो बदल करण्याची हिंमत झालेली नाही. आपल्याला बॉम्बे हॉस्पिटलला सुध्दा दम देता येत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ही जी सर्व हॉस्पिटल्स आहेत त्यासंबंधी मंत्री महोदयांकडून नीट उत्तरही आले नाही. ती हॉस्पिटल्स आता खाजगी कंपन्यांमध्ये रुपांतरित होऊ पहात आहेत. त्यांची मस्ती उतरविण्याचे सामर्थ्य शासन दाखवित नाही म्हणून ते मस्ती करीत आहेत. बॉम्बेचे आता मुंबई झालेले आहे त्यामुळे बॉम्बे हॉस्पिटलचे नाव मुंबई हॉस्पिटल करावे अन्यथा, तुमचे रजिस्ट्रेशन रद्द केले जाईल असे सांगितले पाहिजे. परंतु तसे होत नाही. त्यामुळे आम्ही वाट पाहतो. मग आम्ही दगडफेक करावयाची, मग तोडफोड करणा-यांना पकडायचे, मार मार मारायचे आणि हौस भागवून घ्यावयाची. (अडथळा) माननीय मंत्री महोदय हे आमच्या विचाराबरोबर आहेत, परंतु सरकारमध्ये असल्यामुळे तुम्ही हतबल आहात. तुम्ही मनाने आमच्या बरोबर आहात, परंतु सरकारमध्ये असल्यामुळे हतबल आहात हे दुर्दैव आहे. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, हे विधेयक संयुक्त समितीकडे गेले पाहिजे. (अडथळा) सभापती महोदय, अपप्रेरणा किंवा चिथावणी असे शब्द यामध्ये वापरलेले आहेत. (अडथळा) विधेयकावर रात्रभर बोलत राहिलो तर समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बसावे लागेल....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे विधेयक सभागृहासमोर मांडल्यानंतर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी यासंबंधीच्या भावना मांडल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते या विधेयकातील एकेका कलमाचा, पोटकलमातील प्रत्येक शब्दाचा अर्थ उलगडून सांगत आहेत. ज्या उद्देशाने हे विधेयक आणण्यात आले आहे त्यामुळे एका घटकाला न्याय देत असताना दुस-या बाजूच्या घटकावर अन्याय होईल की काय अशी साधार भीती वाटते. मी हे विधेयक मागे घेत नाही, परंतु सभागृहाची परवानगी असेल तर या विधेयकासंबंधी अधिक विचार करण्यासाठी शासनाला संधी द्यावी, थोडासा अवधी द्यावा, सभागृहाचा असा कल असेल तर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण अपूर्ण आहे असे समजावे आणि हे विधेयक येथेच थांबवावे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक आता अशा पायरीवर उभे आहे की, या विधेयकाला विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून उपसूचना मांडल्या नाहीत अथवा सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडूनही सुरुवातीला उपसूचना सुचविली गेली नाही. आता आपण या विधेयकाला उपसूचना मांडल्या तर हे विधेयक पुन्हा विधानसभेकडे जावे लागेल. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, एक कालमर्यादा ठरवावी. दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची संयुक्त समिती गठित करावी. शासनाने विथ् कंडिशन हे विधेयक पुढील अधिवेशनामध्ये पुन्हा आणावे. हा एकच मार्ग शिल्लक राहिला आहे. त्याठिकाणी सरकारला या विधेयकाला उपसूचना समाविष्ट करता येतील. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे त्याला पर्याय दिला आहे, परंतु अधिकार दिलेला नाही. या विधेयकामध्ये जे वित्तीय ज्ञापन जोडलेले आहे त्यासंबंधी उपसूचना मांडून ते अधिक सक्षम करता येईल. तो अधिकार त्या समितीला राहील. यासाठी संयुक्त समिती नेमावी आणि त्या समितीकडे हे विधेयक पाठवावे आणि पुढील अधिवेशनामध्ये ते आणावे. या समितीच्या 4-5 बैठका घेऊन सर्वसमावेशक विधेयक पुन्हा सभागृहासमोर आणले तर चांगले होईल.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या विधेयकातील एका कलमामध्ये शिक्षेची तरतूद केलेली आहे. त्यात 3 वर्षे कारावास आणि 50 हजार रुपयांचा दंड अशी तरतूद केली आहे. तसे करता येत नाही. माझे असे म्हणणे आहे की, ब-याच कायद्यात जास्तीत जास्त 3 वर्ष आणि कमीत कमी 6 महिन्याची तरतूद असते. त्यामुळे या विधेयकाची ग्रॅव्हिटी मोठया प्रमाणात दिसून येते. ही बाब सुध्दा लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्रीमहोदय श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, आपण सूचना मागवून विधेयक संमत करा. या विधेयकाच्या अनुषंगाने जे प्राधिकारण आपण नेमत आहात ते सक्षम कसे होईल याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, जो दखलपात्र गुन्हा आहे त्याचे रिपिटीशन होत आहे. कारण अशा प्रकारचा कायदा आधीच अस्तित्वात आहे. तेव्हा त्यासंदर्भात देखील शासनाने विचार करावा.

श्री. दिवाकर रावते : या विधेयकाच्या संदर्भात जास्त किस न पाडता. काही सूचना करु इच्छितो. त्या रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. "मालमत्ता" या शब्दाची व्याख्या कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा वैद्यकीय साधनसामग्री किंवा वैद्यकीय यंत्रसामग्री, अशी केलेली आहे. यासंबंधी मी बोलणार होतो. ही व्याख्या अतिशय त्रोटक आहे. हिंसाचाराच्या संदर्भात या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी मत मांडलेले आहे. हिंसाचाराची व्याख्या करताना त्यामध्ये धाकदपटशाचा समावेश केलेला आहे. मी कुणाला धमकी दिली तर तो हिंसाचार होईल काय ? एखाद्याच्या कानफाटात मारली तर तो अदखपात्र गुन्हा होतो. त्याचा देखील यामध्ये समावेश केलेला आहे. मालमत्तेची हानी म्हणजे काय यासंबंधीची व्याख्या बनवावी लाग्ेल. अशा अनेक बाबी आहेत. शासन चांगला निर्णय घेत आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो. तेव्हा सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी जी मते मांडली ती विचारात घेता दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती नेमून हे विधेयक पुनश्च सभागृहापुढे आणता येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, 2008मध्ये विधेयक क्रमांक 57 पास झालेले आहे. त्यामध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, "एखाद्या बेकायदेशीर जमावाने आपले समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे कोणत्याही मालमत्तेची हानी किंवा तिचे नुकसान झाले असेल किंवा जेव्हा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना मृत्यू आला आला असेल किंवा जबर दुखापत झाली असेल तेव्हा जिल्हादंडाधिका-याच्या आदेशाद्वारे.." हे विधेयक कोर्टामध्ये असून त्यावर अजून निर्णय यावयाचा आहे. हे विधेयक पास केले असले तरी पैशाच्या वसुली संदर्भात किंवा शिक्षा कोणी द्यावयाची यासंदर्भात संदिग्धता आहे. जोपर्यन्त माणसावरचे आरोप सिध्द होत नाहीत तोपर्यन्त तो दोषी ठरत नाही. जिल्हाधिका-याने काय करायचे, तहसीलदाराने काय करायचे याबाबतीत कोणतीही स्पष्टता नाही. सहार कॉण्टिनेण्टल प्रकरणामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

चुकीचे आदेश देण्यात आले. त्यामुळे हायकोर्टाने जिल्हाधिका-यांवर ताशेरे मारलेले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन या विधेयकामध्ये पुन्हा चुका होणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच अन्य कायद्यामध्ये केलेल्या तरतुदींचा देखील अभ्यास व्हावयास पाहिजे. 3 वर्षे कारावास आणि 50 हजार रुपये दंड वसूल करायचा आहे. तेव्हा या विधेयकान्वये कायद्यात केलेली तरतूद आणि 2008मध्ये विधेयक क्रमांक 57 अन्वये कायद्यात केलेली तरतूद ह्या दोन्ही तरतुदी कॉण्ट्रॅडिक्ट होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी सभागृहाचा कौल मागितला. हे विधेयक थांबवावे अशा प्रकारच्या सभागृहाच्या भावना आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, या विधेयकाच्या संदर्भात उद्या घोषणा करावी लागेल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

ज्यावेळी हे बिल सिलेक्ट समितीकडे पाठवून पुढील अधिवेशनाच्या आत अहवाल सादर करताना या बिलासंबंधी ज्या महत्वाच्या सूचना समोर येतील त्यांचा अंतर्भाव करुन सुधारित विधेयक सभागृहासमोर आणता येईल. त्यामुळे वि.स.वि.क्रमांक-29 संयुक्त समितीकडे पाठविण्यास परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : आपण तसा प्रस्ताव सादर करावा.

श्री.जयंत पाटील : संयुक्त समितीकडे बिल पाठवावयाचे असेल तर दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची नावे घ्यावी लागतील.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : तसा प्रस्ताव आणावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, आपण काय करीत आहोत? एखादी विशिष्ट घटना काही ठिकाणी घडली की त्यासाठी वेगळा कायदा, एखादा पुतळा तोडल्यानंतर राष्ट्राचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. कायदा आणतो आणि तो मागे घेतो. एका बाजूला समाजातील एका घटकासाठी वेगळा कायदा. माझ्यासारख्या सदस्याला शंका आहे. मूळ घटना आहे. आयपीसी कायद्यामध्ये या सगळ्या तरतुदी आहेत की नाही? मग प्रत्येक विशिष्ट घटकाला वेगळा कायदा. याठिकाणी तज्ज्ञ मंडळी बसली आहेत. ज्येष्ठ माननीय मंत्री श्री.जयंत पाटील बसले आहेत. मंत्रिमंडळामध्ये याचा साकल्याने विचार करावा. एखादी विशिष्ट घटना घडली की, नवीन कायदा. किती कायदे करणार? ज्येष्ठ सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी बसले आहेत. या संदर्भात विचार केला पाहिजे. माझ्या मनात शंका आहे. असे आपण का करतो?

डॉ.दीपक सावंत : तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी हे प्रपोजल पुढे आणले होते.

श्री.उल्हास पवार : कोणी आणले याला महत्व देण्यापेक्षा माझ्या मनात शंका आहे म्हणून सांगितले.

श्री.दिवाकर रावते : मी या बिलावर बोलत असताना ऑन लेग होतो. ही चर्चा थांबविण्यात आली. हे विधेयक मागे घेता येणार नाही. संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठविण्याचा प्रस्ताव आणावा लागेल. उद्या हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मंत्रीमहोदय मांडतील. या बिलावरील चर्चा आता स्थगित झाली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : विधेयकावरील चर्चा स्थगित झाली आहे. संयुक्त समितीकडे विधेयक पाठविण्याचा प्रस्ताव उद्या आणण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : मूल्यवर्धित कराबाबतचे विधेयक चर्चेला घेण्यात यावे.

श्री.दिवाकर रावते : संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.जयंत पाटील : मी विधेयक मांडतो. चर्चेला सुरुवात करावी, तोपर्यंत वित्तमंत्री उपस्थित होतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कोणीही मंत्री उठतात, कोणतेही बिल मांडतात. माननीय राज्यपालांना आम्ही निवेदन दिले आहे. खालच्या सभागृहामध्ये कृषि मंत्री अनुपस्थित असताना उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी गोंधळामध्ये बिल मांडले. त्यांचा काही संबंध नव्हता. वित्तराज्यमंत्री श्री.वडेट्टीवार यांना सभागृहात येण्याबाबत कळविण्यात आले आहे. ते सभागृहात येईपर्यंत पुढील कामकाज घेण्यात यावे.

---------

(नंतर हिंदी श्री.देवदत्त...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सय्यद जमा : माननीय सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ इन्फॉर्मेशन है. मैं इस विषय को सदन में सुबह उठाने वाला था. लेकिन उस समय पूरी जानकारी न होने की वजह से मैं उस समय इस विषय को नहीं उठा पाया. कल माननीय बाबा साहब आंबेडकर की जयंती है इसलिए कल सदन की छुट्टी होने की वजह से मैं इस विषय पर कल भी नहीं बोल पाऊंगा इसलिए इस समय मैं यह मुद्दा उठाना चाहता हूं. मेरा कहना है कि आज के पेपर में एक बहुत ही सेन्सिटिव न्यूज आयी है. उस में लिखा है कि कर्नाटक सरकार बेलगाम को सेकेंड केपीटल का दर्जा देने का विचार कर रही है. मेरा महाराष्ट्र सरकार से निवेदन है कि वह इस विषय पर कर्नाटक सरकार से तथा भारत सरकार से चर्चा करे और कहे कि यह मामला सुप्रीम कोर्ट में सब ज्युडिश है इसलिए बेलगाम का या किसी भी विवादित स्थान का स्टेटस अभी चेंज नहीं होना चाहिए. बेलगाम को सेकेंड केपीटल का दर्जा देने का मतलब इन्डायरेक्टली हमारे महाराष्ट्र का डिवेल्युएशन है. कुछ दिन पहले हमारे सदन में महाराष्ट्र कर्नाटक बार्डर विवाद पर चर्चा हुई थी और पूरे हाऊस ने इस बारे में अपनी भावना यहां पर व्यक्त की थी. इसलिए हमारा कहना है कि महाराष्ट्र सरकार द्वारा अपनी भावना सख्ती के साथ कर्नाटक सरकार को बतानी चाहिए. और कहना चाहिए कि यह मेटर सुप्रीम कोर्ट में सब ज्युडिश होने की वजह से किसी भी विवादित स्थान का स्टेटस चेंज नहीं किया जाना चाहिए. किसी भी तरह का दूसरा इफेक्ट उस विवादित स्थान पर नहीं होना चाहिए. मैं उम्मीद करता हूं कि माननीय मंत्री महोदय, इस बारे में कुछ बताएंगे.

श्री जयंत पाटील : नोंद घेतली आहे. योग्य ती कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXXII OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002)

श्री. विजय वड्डेटीवार (वित्त राज्य मंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्र. 32 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मी आपल्या अनुमतीने मांडतो.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मला विधेयकाची प्रत दिलेली आहे. पृ.क्र.3 वर अनुसूची जोडलेली आहे असे म्हटले आहे परंतु अनुसूचीच दिलेली नाही.

श्री. विजय वडेट्टीवार : माननीय मंत्री महोदयांनी मला हे विधेयक फक्त मांडण्यास सांगितलेले आहे. त्यावरील उत्तर मंत्री महोदयच देणार आहेत. या विधेयकावर चर्चा करावयाची असेल तर ती सुरु करावी. मंत्री महोदय सभागृहात येणारच आहेत.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदय मलाही म्हणाले होते की, मी सध्या सभगृहात अपरिहार्य कारणास्तव येऊ शकत नाही. मी त्यांना म्हणालो होतो की, माननीय राज्यमंत्र्यांना पाठविले तरी चालेल, ते विधेयक मांडतील. माझी अशी सूचना आहे की, अशा प्रकारे अडचण असेल तर प्रथम नियम 260 अन्वये जो प्रस्ताव कामकाज पत्रिकेवर दाखविलेला आहे तो सध्या चर्चेला घ्यावा आणि मंत्री महोदय उपस्थित झाल्यानंतर तेव्हा लगेच हे विधेयक आपण घेऊन टाकू.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : ठीक आहे, आपण आता प्रस्ताव चर्चेला घेऊ.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील विविध भागात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई

**मु.शी.**: राज्यातील विविध भागात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई या विषयावर ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री अरुण गुजराथी, हेमंत टकले, डॉ. वसंत पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, संजय दत्त, राजन तेली, प्रा. सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री राम पंडागळे, दिलीपराव सोनवणे,वि.प.स. यांचा प्रस्ताव

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :--

"राज्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई, राज्यातील 20 हजार 240 गावामध्ये पाणी टंचाई निर्माण होणे, यात पुणे विभागात 664 गावे नाशिक विभागात 2041 गावे, औरंगाबाद विभागात 3474 गावे, अमरावती विभागात 7241 गावे, नागपूर विभागात 6818 गावात पाणी टंचाईची परिस्थिती जाहिर करण्यात येणे, पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी जिल्हे तसेच ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात निर्माण झालेली पाणी टंचाई, राज्यात शासकीय व खाजगी मिळून 422 टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणे, गत वर्षी पेक्षा या वर्षी पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण होणे, पाणी मिळविण्यासाठी नागरिकांना विशेषत: महिलांना वणवण भटकावे लागत असून मुंबईत सुध्दा मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला नागरीकांना सामोरे जावे लागणे, मुंबई शहरासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या तलावातून जलवाहिन्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु आता या जलवाहिन्या फुटण्याच्या घटनात होत असलेली वाढ, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून मुंबईतील बऱ्याच जलवाहिन्या फुटण्याच्या घटनात होत असलेली वाढ, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून मुंबईतील बऱ्याच जलवाहिन्या फुटून बरेचसे पाणी वाहून जाणे, या जलवाहिन्या 100 वर्षापूर्वीच्या असणे, जलवाहिन्याजवळ झोपडपट्टी वेगाने वाढत असून पाणीचोरी, पाण्याची होत असलेली गळती यामुळे सुध्दा बरेचसे पाणी वाहून जाणे, जलवाहिन्या फुटण्यामागे टँकर लॉबीचा हात असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, पाणी टंचाईला आळा घालण्यासाठी तसेच राज्यातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ् कुलकर्णी .....

सभापती महोदय, सभागृहामध्ये राज्यात निर्माण झालेल्या पाण्याच्या टंचाईमुळे सामान्य लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी सामना करावा लागतो आहे, पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. पाणी मिळवण्यासाठी जनतेला खटाटोप करावा लागत आहे. या राज्यातील निरनिराळ्या जिल्हयांमध्ये, तालुक्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. पाण्याच्या टंचाईच्या संदर्भातील महत्वाच्या प्रश्नावर मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्याच्या संदर्भात किंवा मुंबई शहर आणि परिसरात पाण्याची तीव्र टंचाई आहे. मुंबईमध्ये पाण्याची चोरी किंवा पाईपलाईन फुटण्याच्या घटनांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्यामुळे सामान्य जनतेला पाण्यासाठी तोंड द्यावे लागत आहे व यामध्ये शासनाचा पैसा वाचावा याबाबतीतील वर्तमानपत्रातील काही कात्रणे माझ्या हातात आहेत. आज राज्यातील 20 हजार गावात पाण्याची टंचाई आहे. 20,240 गावांमध्ये पाण्याची टंचाई असल्याची माहिती माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक राव चव्हाण यांनीच दिलेली आहे. त्यांनी पुढे अशीही माहिती दिली आहे की, राज्यातील 36,338 खरीप गावे आहेत त्या गावांपैकी ज्या गांवाची आणेवारी 50 पैशांपेक्षा कमी आहे ती गावे टंचाईच्या परिस्थितीत घ्यावीत असाही विचार त्यांनी बोलून दाखविला आहे. त्यामुळे या माहितीच्या आधारे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, या गावांना सरकारने दिलेल्या सोयी आणि सवलती यापुढे कायम राहणार आहेत. त्यामुळे या गावात टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील सहा विभागात टंचाई किती आहे हे देखील मी आपणास सांगू इच्छितो. पुणे विभागात 664 गावे टंचाईग्रस्त आहेत. नाशिक विभागात 2041 गावे, औरंगाबाद विभागात 3474 गावे, अमरावती विभागात 7241 गावे, नागपूर विभागामध्ये 6818 गावे टंचाईग्रस्त आहेत. या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. कोकण विभागात केवळ 2 गावांमध्ये टंचाई परिस्थिती निर्माण झाली असल्याचे सरकारने घोषित केले आहे. राज्यात विदर्भ आणि मराठवाडा येथे सर्वाधिक टंचाई असलेली गावे आहेत. या दोन विभागात तब्बल 17533 गावात टंचाई जाहीर करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातील 380, सातारा जिल्ह्यातील 284, नाशिक जिल्ह्यातील 1364, धुळे जिल्ह्यातील 187, नंदूरबार जिल्ह्यातील 46, जळगाव जिल्ह्यातील 9, नगर जिल्ह्यातील 435, अमरावती जिल्ह्यातील 1981, अकोला जिल्ह्यातील 998, यवतमाळ जिल्ह्यातील 2050, बुलढाणा जिल्ह्यातील 1499, वाशिम जिल्ह्यातील 793, नागपूर जिल्ह्यातील 1103, वर्धा जिल्ह्यातील 1216, भंडारा जिल्ह्यातील 706, गोंदिया जिल्ह्यातील 925, चंद्रपूर जिल्ह्यातील 1402, गडचिरोली जिल्ह्यातील 1466, नांदेड जिल्ह्यातील 1563, परभणी जिल्ह्यातील 140, उस्मानाबाद जिल्ह्यातील 355, हिंगोली जिल्ह्यातील 257, लातूर जिल्ह्यातील 827 आणि बीड जिल्ह्यातील 320 अशा प्रकारे संपूर्ण गावांचा समावेश आहे.

सभापती महोदय, एप्रिल महिना संपायला अजून 15 दिवस आहेत. मे आणि जून हे दोन महिने अजून जायचे आहेत. या अडीच महिन्यामध्ये आपणा सर्वांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. यासाठी शासनाने कशा पद्धतीने तयारी केलेली आहे, या संपूर्ण परिस्थितीचा शासन कशा प्रकारे मुकाबला करणार आहे, हे आम्ही जाणून घेऊ इच्छितो. म्हणून सदर चर्चा या प्रस्तावाच्या माध्यमातून आम्ही उपस्थित केलेली आहे.

यंदाचे वर्ष सुवर्ण महोत्सवी आहे. 50 वर्षाचा महाराष्ट्राचा कालखंड पाहिला तर आपण मोठी झेप घेतली आहे, भरारी घेतली आहे, ही वस्तुस्थिती नाकरता येणार नाही. निरनिराळ्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्राने मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे. त्यामुळेच आज ग्रामीण भागाचा चेहरा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी ....

देखील बदलला आहे. असे असताना सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होऊन बसला आहे. कोट्यवधी रूपये पिण्याच्या पाण्याच्या योजनेवर खर्च करून सुद्धा दुर्दैवाने राज्यातील जिल्ह्यामध्ये पाणी टंचाई आहे. आज राज्यातील अनेक जिल्ह्यातील लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. त्याचे विदारक चित्र मी प्रस्तावाच्या निमित्ताने मांडू इच्छितो.

सभापती महोदय, ही चर्चा उपस्थित करीत असताना कोकणातील प्रश्न वेगळे असतील, मराठवाडा,विदर्भ,उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र यांचे प्रश्न वेगळे आहेत. गेल्या वर्षी अतिवृष्टी झाली असली तरी अनेक भागात पर्जन्यवृष्टी पुरेशा प्रमाणात झालेली नाही. त्यामुळे आपल्याला पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. येत्या दीड-दोन महिन्यामध्ये शासन यंत्रणा कशा पद्धतीने काम करणार आहे, सामान्य लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती व्यवस्था करणार आहे ? यासंबंधातील संपूर्ण माहिती या निमित्ताने सभागृहाला आणि महाराष्ट्रातील जनतेला समजली पाहिजे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.भारवि 17.05

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी .......

म्हणून पाणी टंचाईच्या संदर्भातील सत्ताधारी पक्षाच्या वतीने अत्यंत महत्वाची चर्चा उपस्थित करण्यात येत आहे.सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नांदेड जिल्हयामध्येसुध्दा पाण्याची टंचाई आहे आणि तेथे सर्वात अधिक टॅकरव्दारे पाणीपुरवठा केला जात आहे.विदर्भामध्ये पाणी टंचाई मोठया प्रमाणावर जाणवत आहे. त्याचबरोबर मराठवाडयामध्ये देखील पाणी टंचाई जाणवत आहे.वर्धा जिल्हयात कमी पर्जन्यमानामुळे पाणी टंचाईच्या समस्येला लोकांना सामारे जावे लागत आहे. त्याचबरोबर मुरबाड तालुक्यात 36 गावांच्या घशाला कोरड पडली असून राज्यात पाणी पुरवठा करण्यासाठी 422 टॅकर्स वापरात आहेत अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या आहे. दिनांक 29.3.2010 रोजीची ही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे त्याला आता पंधरा ते वीस दिवस होऊन गेलेले आहेत त्यामुळे 422 टॅकर्सच्या संख्येमध्ये काही प्रमाणात वाढ झालेली असेल तेव्हा जिल्हा निहाय ज्या ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे त्या त्या ठिकाणी कशा प्रकारे शासन नियोजन करणार आहे यासबंधीची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी दिली पाहिजे.

सभापती महोदय, राज्यामध्ये पाण्याच्या विविध योजनांसाठी हजारो कोटी रुपये आतापर्यंत खर्च करण्यात आलेले आहेत. ज्या ठिकाणी पाण्याचे स्त्रोत नाहीत त्या ठिकाणी देखील पाण्याच्या योजना सुरु करण्यात आल्या आहेत.ज्याठिकाणी पाणी नाही तरी सुध्दा त्या ठिकाणी पाईपची खरेदी करण्यात आलेली आहे अशी स्थिती देखील राज्याच्या निरनिराळया भागात आपल्याला पहावयास मिळेल.

सभापती महोदय, कोकणामध्ये 200 ते 250 इंच पाऊस पडत असतो. चेरापुजीनंतर सर्वात जास्त पाऊस उत्तर आणि दक्षिण कोकणामध्ये पडत असतो . राज्यामध्ये जो पाऊस पडतो त्यातील 40 टक्के पाऊस कोकणामध्ये पडतो परंतु महाराष्ट्रातील सिंचन क्षमतेचा विचार केला तर कोकणातील सिंचन क्षमता फक्त सात टक्के एवढीच आहे.अशा प्रकारचे चित्र दुर्देवाने आम्हाला पहावयास मिळते. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडून सुध्दा पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नाही व अनेक ठिकाणी टॅकर्स लावावे लागतात. राज्याच्या इतर भागाच्या तुलनेने कोकणामध्ये फारशी पाण्याची टंचाई कदाचित नसेल परंतु वस्तुस्थिती अशी आहे की कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडून सुध्दा पाण्याचे नियोजन व्यवस्थितपणे करु शकलो नाही. ही वस्तुस्थिती

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी .......

कोणालाही नाकारता येणार नाही. पाण्याच्या संदर्भात विविध योजना राबविल्या जात असतांना सुध्दा त्याचे मूल्यमापन चांगल्या प्रकारे करु शकलो नाही असे मला सांगावयाचे आहे. पाणी पुरवठा करणा-या योजना विभागाच्या वतीने चांगल्या प्रकारे राबविल्या जातील या दृष्टीने प्रयत्न केले जात नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी योजना आहे परंतु पाणी नाही तर काही ठिकाणी पाणी आहे परंतु पाण्याचा पुरवठा करणारी यंत्रणा नादुरुस्त आहे अशीही स्थिती आहे. या स्थितीचा मुकाबला राज्यात कशा प्रकारे करण्यात येणार ओ या संदर्भात राज्यातील जनतेला माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील जनतेला पाण्याच्या टंचाईशी सामना करावा लागत आहे.राज्यामध्ये जी काही धरणे आहेत त्या धरणातील पाणी साठा दिवसेदिवस कमी कमी होत चालला आहे. असे चित्र् आपल्याला पहावयास मिळत आहे. गेल्या काही वर्षात आपल्याला असे दिसून येत आहे की, शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी ज्या ठिकाणी धरणे बांधण्यात आली होती त्या धरणातील पाणी मोठया प्रमाण्ांवर पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जात आहे.ज्या धरणातील पाण्याचा वापर शेतीसाठी करावयास पाहिजे होता परंतु आज त्या धरणातील पाण्याचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी केला जात आहे आणि शेतीला कमीत कमी पाणी दिले जात आहे.मराठवाडा विदर्भमध्ये जी काही धरणे आहेत त्या धरणात अधिक पाणी साठा व्हावा यासाठी .........

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

जर त्या तलावातील गाळ उपसला नसेल तर तो काढण्यासाठी सुध्दा स्वतंत्र व्यवस्था केली गेली पाहिजे. त्यामुळे या धरणांमध्ये पाण्याचा साठा मुबलक प्रमाणामध्ये होईल. आज शहरीकरण झपाटयाने वाढत आहे, लोकांची पाण्याची मागणी वाढलेली आहे. त्या अनुषंगाने धरणामध्ये मुबलक पाणी साठा करुन लोकांची गरज भागविली पाहिजे. त्याचप्रमाणे या उपलब्ध होणाऱ्या पाणी साठयामधून ग्रामीण भागातील लोकांना सुध्दा पिण्यासाठी पाणी दिले गेले पाहिजे. त्यादृष्टीने आपण कार्यक्रम तयार केला पाहिजे अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र पाहिले तर ग्रामीण भागांबरोबर मुंबई शहरासारख्या अन्य मोठया शहरांमध्ये सुध्दा पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर स्वरुपाचे झाले आहेत. त्याबाबतीत आपल्याला नवी मुंबईचा अपवाद करता येईल. कालच महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. विशेषकरुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल हाती आले. त्या निकालाचे आपण विश्लेषण केले तर जवळ जवळ 10 ते 15 वर्षे या महानगरपालिकेने पाण्याच्या बाबतीत अत्यंत चांगल्या प्रकारे नियोजन केले आहे. प्रामुख्याने तेथील लोकांचा पाण्याचा प्रश्न हातामध्ये घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने त्यासाठी स्वतंत्र असे धरण बांधले. आणि त्या पाणी साठयामधून शहरातील लोकांना 24 तास पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे 24तास पाणी देणारे असे जर कोणते शहर असेल तर त्यामध्ये नवी मुंबई शहराचा उल्लेख करावा लागेल. आज मुंबई शहराप्रमाणे अन्य महानगरपालिकांच्या ठिकाणी सुध्दा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. राज्यात जवळ जवळ 227 नगरपरिषदा आहेत. त्याच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर शहरीकरण होत आहे. त्यामुळे त्याठिकाणी पाण्याचा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे त्या संदर्भात शासनाने आपली भूमिका जाहीर केली पाहिजे. तेथील लोकांना पाण्याचा जो त्रास सहन करावा लागतो त्यासाठी आपण कोणती उपाय योजना केली आहे हे याठिकाणी समजले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईला पुरविण्यात येणारे पाणी हे जवळ जवळ 200 कि.मी. अंतरावरुन येते. त्यासाठी नाशिक व ईगतपूरी या भागाप्रमाणेच ठाणे जिल्हयामध्ये देखील धरणे बांधण्यात आली आहेत. या सर्व धरणांमधून मुंबई शहरामध्ये पाणी येते. ज्या गावांमध्ये ही धरणे बांधण्यात आली आहेत त्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध होत नाही. तेथील लोकांना पिण्यासाठी सुध्दा या जलाशयामधून पाणी दिले जात नाही. अशाप्रकारे ठाणे, मुंबई व अन्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये या धरणामधून पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. परंतु गेल्या दोन-चार महिन्यापासून मुंबईमध्ये पाईप फुटण्याचे जे प्रकार घडत आहेत ते आपण पहात आहोत. मुंबईला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन ही 100 वर्षांची जुनी झाली असल्यामुळे ती ठिकठिकाणी फुटते. त्यामधून लाखो लिटर पाणी वाया जाते, पाण्याचा अपव्यय होत आहे. म्हणजेच एकीकडे लोकांना प्यायला पाणी मिळत नाही तर दुसरीकडे मुबलक प्रमाणात पाणी वाहून जात आहे. अनेक ठिकाणी पाईपलाईनच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे पाण्याचा अपव्यय होत आहे. हे चित्र या मुंबई शहरामध्ये तुम्हा-आम्हाला पहावयास मिळत आहे. त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे? शासनाने ही पाईपलाईन दुरुस्त करण्यासाठी महानगरपालिकेला अधिक अनुदान देणे आवश्यक आहे, या कामासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. असे जर झाले तर ही पाईपलाईन आपल्याला दुरुस्त करता येईल. त्यामुळे वेळोवेळी पाईपलाईन फुटून पाणी वाया जात आहे ते वाया जाणारे पाणी आपण या शहरातील लोकांना देऊ शकतो. आज मोठया प्रमाणावर या शहरातील जनतेला पाण्याचा सामना करावा लागत आहे तो करावा लागणार नाही. हे चित्र महाराष्ट्रामध्ये देखील असून या पाणी टंचाईला आपण कशापध्दतीने सामोरे जाणार आहोत या संदर्भातील शासनाची भूमिका समजली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:15

ॲड.नाथ कुलकर्णी . . . .

यासंदर्भात शासनाने भूमिका मांडावी म्हणून आज हा प्रस्ताव सदनासमोर मांडण्यात आलेला आहे. माझी अशी अपेक्षा आहे की, आज राज्यामध्ये, शहरांमध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे, त्यासंदर्भात कोणत्या प्रकारचे नियोजन केले आहे किंवा करण्यात येणार आहे याबाबतीत खुलासा करावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि सदरहू ठराव मांडण्यासाठी मला संधी दिली, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

. . . .3 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XXXII OF 2010**

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.)

श्री.सुनील तटकरे (वित्त मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 32 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 32 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र मुल्य कर अधिनियम 2002 च्या कलम 9 (1) नुसार अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार आहे. या विधेयकाव्दारे कलम 9 (1) मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर विधेयक क्र.5 मध्ये पूर्णपणे नमूद केले आहे. त्यानुसार कलम 1 ते 8 मध्ये काहीही सुधारणा प्रस्तावित नाही. कलम 9 (2) मध्ये सुधारणा प्रस्तावित नाही. कलम (10) मध्ये सुधारणा प्रस्तावित नाही. फक्त कलम 9 (1) मध्येच सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशभर समान कर प्रणाली लागू करावी या उद्देशाने मुल्यवर्धित कर प्रणाली ही व्यवस्था 2005 पासून अंमलात आणण्यात आली आणि आपल्या असे लक्षात येईल की, 2005 मध्ये जेव्हा विक्री कर कायद्यानुसार कर वसूल करण्यात येत होता, त्यावेळेला या निमित्ताने संपूर्ण राज्यभरामध्ये 22,464 कोटी रुपयांचे उत्पन्न किंवा कर वसुली होत होती. 2004 मध्ये 20,494 कोटी रुपयांची वसूली झाली. 2005-2006 मध्ये 22,464 कोटी रुपयांची वसूली झाली. 2006-2007 मध्ये सुध्दा मोठया प्रमाणात वाढ होऊन जवळपास 27,594 कोटी रुपयांचा महसूल या कराच्या माध्यमातून राज्याला मिळाला आहे. 2007-2008मध्ये सुध्दा महसुलामध्ये वाढ झाली आणि 31,214 कोटी रुपयांची वसूली या कराच्या माध्यमातून राज्य शासनाला उपलब्ध झाली. 2008-2009 मध्ये देखील वसुलीचे प्रमाण वाढले आणि 34,307 कोटी रुपये इतकी वसुली

. . . .3 एल-3



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

झाली आहे. याठिकाणी मला सांगितले पाहिजे की, 2009 ते 2010 या आर्थिक वर्षात 36,450 कोटी रुपयांची विक्रमी वसुली या कर प्रणालीच्या माध्यमातून झालेली आहे. खरेतर गेली दोन-तीन वर्षे संपूर्ण जगाममध्ये जागतिक मंदीचे वातावरण होते. त्यामुळे संपूर्ण देशामध्ये आणि राज्यामध्ये सुध्दा आर्थिक मंदीचे सावट निर्माण होईल की काय ? अशी शंका होती. 2009-2010 या वर्षाचा अर्थसंकल्प मांडत असताना, विक्री कराच्या माध्यमातून अपेक्षित असलेले उत्पन्न हे 33,893 कोटी रुपयांचे होते. पण प्रत्यक्षात विक्री कराच्या माध्यमातून 36,450 कोटी रुपयांची विक्रमी वसुली झ ाली आहे. यावेळी जगातील विकसित असलेल्या देशांमध्ये सुध्दा मंदीचे सावट निर्माण झाले होते. त्या-त्या देशातील आथिर्क व्यवस्था डबघाईस आली होती. अशा वेळी या देशाचे माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी घेतलेल्या काही निणर्यांमुळे भारतीय आर्थिक व्यवस्था देखील या निमित्ताने एका मजबूत पायावर उभी राहिली. महाराष्ट्र हे सुध्दा अत्यंत प्रगत आणि विकसित झालेले राज्य आहे. ज्या राज्याने आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना गेल्या 50 वषार्मध्ये विविध क्षेत्रामध्ये सर्व जनतेच्या, सर्व नेत्यांच्या, सर्व राजकीय पक्षांच्या माध्यमातून नेत्रदीपक प्रगती केल्याचे पहावयास मिळत आहे. मग ते कृषी क्षेत्रातील उत्पादन असेल, कृषी उत्पादनावर प्रक्रिया करुन जोडधंदे सुरु करण्याच्या बाबतीत असेल, तसेच या राज्याने वेळोवेळी औद्योगिक धोरण उत्तमप्रकारे राबविले आहे आणि केवळ मुंबई, ठाणे किंवा पुणे या परिसरामध्येच नव्हेतर राज्यातील मागासलेल्या भागामध्ये सुध्दा औद्योगिक वसाहती व्हाव्यात, तेथे उद्योगधंदे जावेत.

यानंतर श्री.बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

त्या निमित्ताने ग्रामीण रोजगाराच्या बाबतीत सुध्दा न्याय मिळावा अशा पध्दतीचे एक उद्योगपूरक धोरण या राज्याने सातत्याने स्वीकारले. त्या माध्यमातून सुध्दा राज्याचा सर्वांगीण विकास होत असताना त्या त्या भागातील बेरोजगारांना रोजगाराची चांगली संधी त्या निमित्ताने मिळू शकेल. शेवटी राज्य प्रगतिपथावर जात असताना देशभरामध्ये जी एक करप्रणाली स्वीकारली गेली आणि त्या स्वीकारलेल्या करप्रणालीच्या माध्यमातून आज आपण पाहिले तर उत्पन्नामध्ये वाढ झालेली पहावयास मिळते. परवा ज्यावेळी आपल्या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रश्न विचारला होता की, मूल्यवर्धित कर कायद्याच्या अंतर्गत किती प्रमाणात नोंदणी झाली ? 2004-05 मध्ये जवळपास 50,050 नोंदणी झाली होती पण 2005-06 मध्ये जवळपास 88,000 च्या आसपास नोंदणी झाली. 2006-07 मध्ये हे प्रमाण 63,000 पर्यंत वाढले. 2007-08 मध्ये 49,925 इतकी नोंदणी झाली आणि 2008-09 मध्ये 51,430 इतकी नोंदणी आपल्या विभागामार्फत झाली. अनेक वेळेला हे सर्व प्रश्न उपस्थित होत असताना त्या निमित्ताने काही मुद्दे उपस्थित केले गेले. शेवटी कलम 9(1) मध्ये अशा पध्दतीची सुधारणा करीत असताना त्याची आवश्यकता नेमकी काय होती ? देशातील जवळपास 21 पैकी 16 राज्यांनी अशा पध्दतीची सुधारणा त्यांच्या राज्यामध्ये केलेली आहे. आपल्या राज्यामध्ये विक्रीकर 4 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर नेल्यानंतर महागाईवर नियंत्रण करण्याच्या दृष्टीने शासन काही उपाययोजना करण्याच्या ऐवजी करवाढ करीत आहे अशा पध्दतीची भावना या निमित्ताने निर्माण होण्याचा प्रश्न होता. पण अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये ही गोष्ट आम्ही नमूद केली की, अन्नधान्याच्या कोणत्याही गोष्टीवर आम्ही हा कर वाढविलेला नाही. ज्या काही सवलती मूल्यवर्धित करप्रणाली लागू केल्यापासून होत्या त्याही सुरु ठेवण्यात आल्या. साखरेच्या बाबतीत देशातील अन्य राज्यांमध्ये सुध्दा व्हॅट लावला जातो. साखरेचे उत्पादन करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र एक महत्वाचे राज्य गणले जाते. मधल्या काळामध्ये महागाई मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यावेळी माननीय पंतप्रधान महोदयांच्या अध्यक्षतेखाली देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाली. आदरणीय श्री. शरद पवार साहेब सुध्दा देशाचे कृषी मंत्री म्हणून त्या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी साखरेवरचा व्हॅट कमी करावा अशा प्रकारची सूचना केंद्र सरकारने केली. परंतु ती

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. सुनील तटकरे ....

सूचना आपल्या राज्याकरिता नव्हती. कारण आपल्या राज्यामध्ये आपण साखरेवर व्हॅट घेतच नाही. उत्तर प्रदेश सारखे राज्य जे महाराष्ट्राच्या बरोबरीने सारखेच्या उत्पादनामध्ये वाटचाल करीत आहे त्या राज्यामध्ये असलेला व्हॅट रद्द करावा किंवा ज्या ज्या राज्यामध्ये ऊसाचे उत्पादन, साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते आणि जी राज्ये साखरेवर व्हॅट लावतात त्या राज्यांना उद्देशून तशा पध्दतीचे आवाहन त्या परिषदेमध्ये माननीय पंतप्रधानांनी केले होते.

अन्नधान्याच्या बाबतीत सुध्दा या सर्व गोष्टी नियंत्रित करण्याच्या दृष्टीकोनातून आपण कोणत्याही पध्दतीची वाढ प्रस्तावित केलेली नाही. याबाबतीत मी सांगितले की, ही वाढ अगोदरच झ ाालेली आहे. काही वेळा असा प्रश्न विचारला जातो की, आपण अधिक करणार की नाही ? परंतु ज्यावेळी हे राज्य विकसित राज्य आहे असे आपण म्हणतो त्यावेळी सर्व क्षेत्रामध्ये या राज्याने मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली आहे त्यामुळे शेजारच्या राज्यातील कर आपल्यापेक्षा कमी राहणार नाहीत किंबहुना आपले कर त्यांच्यापेक्षा जास्त होणार नाहीत, या कारणासाठी कोणताही उद्योग आपल्या राज्यातून पलीकडे स्थलांतरित होणार नाही, कोणताही व्यवसाय स्थलांतरित होणार नाही याची खबरदारी नेहमी राज्य घेत असते. शेवटी ही जी काही वाढ आपण केली त्यासंदर्भात शक्तीप्रदान समितीने सुध्दा 4 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून 22 जानेवारीला जी काही बैठक झाली त्यामध्ये त्यांनी मान्यता दिलेली आहे. हे सर्व करीत असताना परताव्यासंबंधी सुध्दा काही वेळा मुद्दे उपस्थित होतात. मी सांगितले की, याची सबंध अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून या राज्याने घेतलेला पुढाकार हा देशामधील पहिल्या पध्दतीचा पुढाकार आहे आणि व्यवस्थित कर संकलित करण्याच्या दृष्टीकोनातून, व्यापाऱ्यांना माहिती देण्याच्या दृष्टीकोनातून सुलभ व्हावे अशा पध्दतीची कार्यप्रणाली स्वीकारलेली आहे. परताव्याच्या संदर्भात काही वेळा काही प्रश्न जरुर निर्माण झाले. पण आज या विधेयकाच्या निमित्ताने मी एवढेच सांगतो की, खरेदी विक्री व्यवहाराची संगणकप्रणालीने जलदगतीने पडताळणी, क्रॉस चेक होऊ न शकल्याने काही वेळेला घोटाळा जरुर झाला पण त्याही बाबतीत सखोल चौकशी करुन कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा सरकारने निश्चितपणे पावले उचललेली आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

परंतु आता संगणकीकृत ऑडिट फॉर्म सोबत खरेदी विक्री व्यवहाराची माहिती सुध्दा घेण्यात येत आहे. संगणकाद्वारे जलद गतीने त्याची क्रॉस चेक करण्याची सुरुवात होत आहे. त्यामुळे यासंदर्भात जे घोटाळे झालेले आहेत त्यावर पूर्णपणे नियंत्रण आणणे शक्य होईल. व्हॅटचा कायदा अंमलात आला त्यावेळी मुंबई विक्रीकर कायदा, कार्यकंत्राट कायदा, वस्तू वापर कायदा, मोटार स्पिरीट कायदा हे सर्व कायदे व्हॅट अंतर्गत समाविष्ट झाले. हे जे कायदे आपल्या राज्यात होते, ते कायदे व्हॅट कायद्यात मर्ज झाले, मूल्यवर्धित प्रणाली राज्यात सुरु केली. राज्यात ही करप्रणाली सुरु झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने कशाप्रकारे करात वाढ होत गेली त्याचा मी उल्लेख केला आहे. या विधेयकाद्वारे मी सुधारणा सुचविली आहे, सुधारणा करण्याचा सरकारला अधिकार आहेच. ही सुधारणा सभागृहामार्फत मंजूर करणार आहोत. हे विधेयक मंजूर करण्यात यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो. धन्यवाद.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी हे विधेयक मांडले असते आणि आम्ही मम म्हटले असते तर या विधेयकातील रसभरीत वर्णन व कंगोरे आपल्याला ऐकावयास मिळाले असते काय ? कधी कधी सभागृहाच्या माध्यमातून आपल्या ज्ञानात भर पडत असते. आपल्या सरकारमधील आधुनिक मंत्र्यांना पारंगत करण्याचे कौशल्य मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांमध्ये निर्माण केले नाही. त्यांना अधिकार देऊ नका, परंतु सभागृहामध्ये त्यांना बोलू देण्याची तयारी तरी दाखवावी. हे यानिमित्ताने आम्हाला कळले.

सभापती महोदय, या विधेयकाबरोबर अनुसूची जोडलेली आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु आम्हाला ही अनुसूची मिळालेली नाही. या विधेयकाबरोबर ती सूची असणे भाग होते. आम्ही सगळया बाबतीत हट्ट धरला की, तो सगळयांना अडवणुकीचा भाग वाटतो. एखादा कायदा सभागृहासमोर येतो त्यावेळी तो परिपूर्ण असावयास पाहिजे. त्यावेळी सदस्यांना योग्य भाष्य करता येते. आम्ही येथे टीका करण्यासाठी उभे रहात नाही. परंतु येणा-या कायद्याचा परिणाम कोणावर कसा होईल याची आम्ही नेहमी काळजी घेत असतो.

सभापती महोदय, व्हॅट कायदा अंधारात मंजूर करण्यात आला. या सभागृहाच्या प्रथा, परंपरांना काळीमा फासून तो कायदा लागू झाला. त्यावेळी श्री.जयंत पाटील हे अर्थमंत्री होते. सभागृहाचा शेवटचा दिवस होता, रात्रीचे 10.45 वाजले होते. सभागृह संपणार होते. केवळ जन गण मन म्हणावयाचे शिल्लक राहिले होते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाची बैठक इतक्या उशिरापर्यंत कधीच चाललेली नाही. परंतु तेवढया वेळेपर्यंत ते चालविण्यात आले. कारण व्हॅटचा कायदा कोणत्याही परिस्थिती मंजूर करुन घ्यावयाचा होता. अधिवेशनाचा शेवटचा दिवस असताना ते बिल मांडण्यात आले. मला आठवते की, सभागृहासमोरील सर्व कामकाज संपले होते, आता केवळ जन गण मन म्हणावयाचे आहे. माननीय सभापतींनी बैठक स्थगित करण्याचा कागद हातात घेतला होता. परंतु त्यांनी तो कागद पटकन खाली ठेवून सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित केली. सभागृहाची बैठक स्थगित करण्याचे कारण आम्हाला कळले नाही, आम्ही दंगामस्ती केली नव्हती, गोंधळ घातला नव्हता, परंतु या आसनावरुन सभागृहाला असे सौजन्य पहिल्यांदाच मिळाले. काही कारण नसताना, कोणीही मागणी केलेली नसताना सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी तहकूब केली होती. रात्रीचे 10.45 वाजले असताना खालच्या सभागृहात व्हॅटचे विधेयक मंजूर झाल्यानंतर माननीय अर्थमंत्री पळत पळत या सभागृहात आले आणि त्यांनी ते विधेयक मांडले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

त्यानंतर थातूरमातूर भाष्य होऊन तो कायदा मंजूर करुन घेतला. अशा प्रकारे अंधारातून पळवाटेने आलेला हा कायदा आहे. माझे संदर्भ चुकत असतील तर त्याबाबतीत माननीय मंत्री महोदय नक्कीच सुधारणा करु शकतात. परंतु मला हे पक्के आठवते की, काही कारण नसताना त्यावेळी सभागृह तहकूब झाले होते. लोकांवर करवाढ करण्याची तुमची हौस होती. ती हौस तुम्ही पूर्ण करुन घेतलीत. आता माननीय मंत्री महोदयांनी जी आकडेवारी आमच्यापुढे दिली ती सर्वसाधारण अशा प्रकारची आकडेवारी असते. 2004-05 हे तुमचे पहिले वर्ष होते त्यामुळे 3494 इतके उत्पन्न मिळाले. त्यावेळी अंदाज नव्हता, मांडणी नव्हती, त्यासंर्भतील विशिष्ट पध्दत नव्हती. परंतु मी सांगू शकेन की, त्यावेळी अर्थ खात्यातील अधिकारी कसोटीला उतरले होते. त्यांचे कर्तृत्व चांगले होते. आपल्याकडे व्हॅटच्या संदर्भातील कार्यप्रणालीची पकड पटकन बसली. त्यामुळे तुम्हाला 2005-2006 यावर्षात 22464 कोटीचे उत्पन्न दिसले. त्या व्हॅटच्या कायद्यामध्ये अशी एक तरतूद आहे आणि ती तरतूद पहिल्यांदा आम्हाला सांगायला पाहिजे होती. हा व्हॅटचा कायदा लागू केल्या नंतर पहिली तीन वर्षे तुमच्या उत्पन्नातील तफावत केन्द्र सरकार भरुन देईल, अशा प्रकारची तरतूद होती. पण महाराष्ट्र हे असे राज्य आहे की केन्द्रावर काही भार पडेल अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी राज्याने घेतली. त्यासंबंधीची आकडेवारी दिली असती तर उत्पन्नामध्ये किती घट आली हे समजू शकले असते. परंतु तसे झालेच नाही. पुढची आकडवारी ही 10 टक्क्याच्या वाढीची आहे. कारण त्याच्या पुढील वर्षी 22 हजारचे 27 हजार झाले., 27 हजारचे 31 हजार झाले, 31 हजारचे 34 हजार झाले. म्हणजे कोणत्याही करप्रणालीमध्ये 10 टक्के वाढ आपण अपेक्षित धरली होती त्याप्रमाणे ती झालेली आहे. आमच्या राज्यात 2004मध्ये व्हॅट लागू झाला आणि आम्ही एकदम 36 हजार कोटी मिळवायला लागलो असे म्हणणे हा फुशारकीचा भाग झाला. व्यापार उदीम कसा चालतो हे मंत्री महोदयांनी सांगितले असते तर बरे झाले असते.

माननीय मंत्री महोदयांनी मंदीचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, आर्थिक मंदी असताना त्यावर मात करुन राज्याने आपला कर जमविला. आपण सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजांवर व्हॅट लावल्यामुळे त्यापासून उत्पन्न हे मिळणारच आहे. कारण आपल्याकडे लोकसंख्या देखील अफाट आहे. त्यामुळे आवश्यक त्या गोष्टी घेतल्या जातात आणि बेरीज होऊन पैसे मिळत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

जातात. त्यामुळे आपल्याकडे मंदी वगैरे हा विषय नसतो. जगणे हे आलेच, त्यामुळे खाणेही आलेच, कपडालत्ता आलाच. फक्त ऐषाराम आम्ही घेत नाही. शासनाने 5वा वेतन आयोग लागू केला, 6वा वेतन आयोग लागू केला. त्यामुळे लोकांकडे गडगंज पैसा झालेला आहे. पैसा कसा खर्च करायचा याची चिंता लोकांना असते. सर्व मॉल, सोन्या-चांदीची दुकाने ग्राहकांनी भरलेली असतात. महाराष्ट्रातील हे एक आश्चर्य आहे. सोन्याचे भाव वाढत असताना देखील मुंबईतील सोन्याची दुकाने ग्राहकांनी भरलेली असल्याची दृष्ये दिसतात. दर महिन्याचा सोनेविक्रीचा आलेख हा चढत्या क्रमानेच आहे. त्यातूनही राज्याला कमी व्हॅट मिळत नाही. सोन्या-चांदीची प्रचंड विक्री असणा-या महाराष्ट्रातील हि-याचा बाजार निघून गेलेला आहे. हे श्रीमंताचे सरकार आहे असे मी म्हणतो. कारण हे सरकार हेअरन पीनवरील व्हॅट कमी करते. या हेअरपीनबाबत मी माहिती घेतली अच्चभ्रू लोक ज्या हेअरपीन वापरतात त्यांची किंमत 200 रुपयापासून लाख दीड लाख रुपयापर्यंन्त असते. त्यावरील कर सरकारने कमी केला. गोरगरीब मात्र जत्रेमध्ये चार आण्याची पीन घेतात. ठीक आहे. तो सरकारचा अर्थसंकल्पातील भाग आहे.

नोंदणीची संख्या घटत आलेली आहे. त्यासंबंधीची आकडेवारी दिलेली आहे. परंतु मी अर्थतज्ज्ञ नसल्यामुळे त्यातील गणित माझ्या लक्षात आले नाही. नोंदणी कमी होत आली. तरी राज्यातील प्रत्येक गोष्टीवर आता व्हॅट लावलेला आहे. केन्द्राने कायदा केला म्हणून राज्यालाही तो करावा लागला. माननीय मंत्री महोदयांनी येथे कौतुकाने सांगितले की, आम्ही साखरेवर व्हॅट लावलेला नाही, इतर राज्यांनी तो लावलेला आहे. परंतु साखर हीच एकमेव जीवनावश्यक वस्तू आहे अशातला भाग नाही. सभापती महोदय, महसूली विभागानुसार उत्पन्न मांडले असते ...

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तर त्याच्या बदल्यात जो वॅट जमा होतो तो कोणत्या विभागातून कशाप्रकारे जमा होतो याचे मार्गदर्शन मिळाले असते. मुंबई महसूल वेगळा आहे. कोकण महसूल वेगळा आहे असे माझा समज आहे. मराठवाडा महसूल वेगळा, नाशिक महसूल वेगळा, अमरावती महसूल वेगळा आणि नागपूर महसूल वेगळा आहे. या संदर्भातील ब्रेकप दिला असता तर लक्षात आले असते. सर्वात जास्त मूल्यवर्धित कर कोणत्या विभागातून जमा होतो आणि कमीत कमी कोणत्या विभागातून जमा होतो. त्या भागातील व्यापारउदीमावर काय परिणाम झाला याचे मार्गदर्शन झाले असते. तुम्ही एवढे सगळे कर रद्द केले आणि एक नवीन कर आणला. या महाराष्ट्रातील व्यापारउदीम संपन्नता कशी चालते याचे मार्गदर्शन झाले असते. विभागवार आकडेवारी मिळू शकली नाही. अर्थसंकल्पीय प्रकाशनातील आकडेवारीची जुळवाजुळव करणे किचकट काम असते. त्याऐवजी खात्याने ती विभागवर दिली तर भाष्य करणे सोपे जाते. प्रगत भाग कोणता, अप्रगत भाग कोणता, व्यापाराच्या दृष्टीने उपयुक्त भाग कोणता, जनसामान्यांकडून या करप्रणालीमध्ये राज्याला किती वाटा मिळतो याचे मार्गदर्शन झाले असते.

सभापती महोदय, पेट्रोल व डिझेलचे कसे आहे पहा. पेट्रोलचा वॅटमध्ये समावेश आहे. डिझेलचा समावेश आहे. देशाच्या तुलनेत मुंबईत पेट्रोलचे दर सर्वात जास्त आहेत. मुंबईच्या बाहेर पेट्रोलचे दर कमी आहेत. सगळे ट्रान्सपोर्ट व ट्रॅव्हलिंगचा व्यवसाय करणारे मुंबईत पेट्रोल भरायला मागत नाहीत. मुंबईच्या बाहेरुन मुंबईत येत असताना वाहनाची टाकी फूल करुन येतात. शेजारच्या राज्यात पेट्रोल स्वस्त असल्यामुळे महाराष्ट्र क्रॉस झाल्यानंतर पेट्रोल भरावे लागेल एवढी टाकी फूल करुन घेतात आणि पुढच्या राज्यात जाऊन पुन्हा पेट्रोल भरतात. परंतु महाराष्ट्रात पेट्रोल भरायला ते तयार नसतात. कर प्रणाली वाढल्यामुळे कर जास्त मिळतो. परंतु काही ठिकाणी माफक कर ठेवल्यामुळे सुध्दा उत्पन्नात भर पडते. प्रचलित कर प्रणालीमुळे सर्वसामान्यांच्या दृष्टीने रोजगार किती वाढला हे महत्वाचे आहे. या कर प्रणालीमध्ये कर कमी होत असताना रोजगार वाढला पाहिजे. महागाई वाढते त्याबरोबर रोजगार देखील वाढतो ही सर्वसाधारण अर्थशास्त्रातील पध्दत आहे. आपल्याकडे महागाई वाढली, त्याप्रमाणात रोजगार वाढला का? हा प्रश्न निर्माण होतो. रोजगार त्या प्रमाणात वाढला नाही. शासनाने या कर प्रणालीच्या माध्यमातून आणखी एक वाईट काम केलेले आहे. मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये घर

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ KGS/ 17:35

श्री.दिवाकर रावते.....

खरेदी महाग का केली? एवढया वस्तूंवर वॅट लावत असताना 0.5 टक्के, 1 टक्का नाही, अर्धा टक्का कर साखरेवर लावला तर गडगंज पैसा तिजोरीमध्ये जमा होईल. लोकांना ते जाणवणार नाही. शासनाने मुंबईमध्ये नवीन कर प्रणाली आणून सर्वसामान्यांची वाट लावली आहे. या कर प्रणालीमुळे काय होणार आहे याचे मार्गदर्शन मी सभागृहात केले होते. आता मुंबईमध्ये सर्वांना जो कर भरावा लागणार आहे त्यामध्ये बदल केला गेला आहे. पूर्वी रेटेबल व्हॅल्यूवर कर आकारला जात होतो. आता भांडवली मूल्यावर कर आकारला जाणार आहे. रेटेबल व्हॅल्यूऐवजी कॅपिटल व्हॅल्यूनुसार कर आकारणी होताना जून्या लोकांना तो दुप्पट न आकारता जास्तीत जास्त 40 टक्के वाढ करण्याची कायद्यामध्ये तरतूद केली आहे. अत्यंत हुशारीने हे चालले आहे. या कर प्रणालीमुळे मुंबईतील माणूस बेघर होणार अशी परिस्थिती आहे. हा कायदा जबरदस्तीने याठिकाणी मंजूर करुन घेण्यात आला. अद्याप त्या कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली नाही. नियम बनवायला 7-8 महिने लागतील. तोपर्यंत जून्या पध्दतीने कर आकारणी होणार आहे. अर्थसंकल्पामध्ये जून्या रेटेबल व्हॅल्यूमध्ये वाढ केल्यामुळे सर्वांचा कर वाढतो. भांडवली मूल्यावर कर लागू होईल त्यावेळी त्यात 40 टक्के वाढ होईल. आज एक रुपया कर आहे, तो दीड रुपया होईल आणि त्यापुढे त्यात 40 टक्के वाढ होईल. अशा प्रकारे धराच्या कर प्रणालीमध्ये वाढ होत असताना घर खरेदीवर 1 टक्का वॅट लावण्यात आला आहे. कशासाठी हा कर लावला? स्टॅम्प ड्युटी वाढविली. रेडी रेकनरचे दर वाढविले. घर खरेदीवरचा कर 10 हजार रुपयांऐवजी 12 हजार केला, 5 हजार ऐवजी 6 हजार केला.

नंतर 3क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

15 हजाराचा 17 हजार केला, अशा प्रकारे किंमती वाढल्या आणि जुन्या 15 हजाराच्या किमतीनुसार 10 लाखाचे घर असेल तर त्यावर आपण 1 टक्का मूल्यवर्धित कर बसविला असता पण रेडिरेक्नरच्या बदलत्या किंमतीनुसार ज्या किंमती वाढल्या त्यात या 10 लाखाची किंमत 13 लाख झालेली असेल आणि त्यावर पुन्हा आपण मूल्यवर्धित कर घेणार, अशा प्रकारे चारही बाजूंनी कर बसविण्याचा प्रकार गंभीर आहे. हा सामान्य माणसाच्या मानेवर सुरी फिरविण्याचा प्रकार म्हटला तरी चालेल. सांगलीमध्ये बेदाण्यावर व्हॅट लावला म्हणून व्यापाऱ्यांनी आपले गोडावून्स बंद ठेवले होते, उत्पादन बंद केले होते आणि जोपर्यंत बेदाण्यावरील कर कमी करीत नाही तोपर्यंत ते उत्पादन सुरु करणार नाही तसेच गाडावूनमधील माल विक्री करणार नाही असे त्यांनी ठरविले होते. परंतु माननीय मंत्री महोदयांनी अशी घटना झाली नसल्याचे सांगितले, परंतु ही चार दिवसापूर्वीची बातमी आहे. ही बातमी मंत्री महोदयांना मी आणून देऊ शकतो. परंतु हा कर कमी केला त्याबद्दल मी काहीच म्हणणार नाही. असाच विचार इतर बाबतीत देखील केला पाहिजे. कारण कोकणात काजुच्या बोंडांवर प्रक्रिया करणाऱ्या अनेक कारखान्यांमधून गोरगरीब महिलांना रोजगार मिळतो. या व्यापाऱ्यांनी सुध्दा हे काम थांबविणार म्हणून सांगितले आहे. माझी विनंती आहे की, बेदाण्याच्या व्यापाऱ्यांनी आपले उत्पादन थांबविले म्हणून शासनाने व्हॅटसंबंधीचा निर्णय घेतला परंतु तोच विचार काजुच्या बाबतीत घेतला तर असंख्य गरिबांना रोजगार मिळू शकतो म्हणून मंत्री महोदयांनी काजुवरील व्हॅट कमी करावा अशी मी विनंती करणार आहे. या विधेयकाला अनुसूची असती तर मला अधिक बोलता आले असते पण अनुसूची नसल्याने मी जास्त चिकित्सा करणार नाही तर काजुच्या व्यापाऱ्यांना या करातून सूट मिळावी एवढीच विनंती करीन. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी जास्त उत्तर दिले नाही तरी चालेल, विभागवार महसूल किती गोळा होणार आहे यासंबंधीची माहिती पटलावर ठेवली तरी चालेल परंतु कोकणवासियांना आपल्या मंत्र्यांबद्दल जो अभिमान वाटतो त्यांनी हा निर्णय घ्यावा. कारण कोकणच्या मंत्र्यांनी उर्जा मंत्री असताना राज्य लोडशेडिंग मुक्त करणार अशी घोषणा केली होती आणि त्यानुसार त्यांनी रायगड जिल्हा लोड शेडिंग मुक्त केला तसाच आनंद या निमित्ताने सुध्दा कोकणवासियांना द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

...2...

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : महोदय, विधानसभा विधेयक क्र. 32-महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक सभागृहात चर्चेसाठी आलेले आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, ज्यावेळेस राज्यात व्हॅट लागू करण्यात आला होता तेव्हा मोठ्या प्रमाणात विरोध झाला की आम्हाला राज्यात मूल्यवर्धित कर नको. पण देशातील सर्वच राज्यांनी तो स्वीकारलेला असल्यामुळे आपल्याला तो निर्णय घ्यावा लागला. यापुढील काळात संपूर्ण देशात 1 एप्रिल, 2010 पासून जीएसटी, सर्व देशातील वस्तुंवर सारखा कर असा कायदा येणार म्हणून वाट पाहत होतो. पण अद्याप जीएसटी आलेला नाही, कदाचित पुढील वर्षी येईल. केंद्रशासनाच्या माध्यमातून हा जीएसटी कायदा येणार आहे. आज हे विधेयक फक्त या कायद्यातील कलम 9 (1) हे रद्द करावे म्हणून सभागृहासमोर आलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

सभापती महोदय, कलम 9(1) नुसार आपल्याला जर दर कमी जास्त करावयाचे असतील तर त्यासंदर्भातील मुदत फक्त दोन वर्षासाठी होती. दिनांक 31 मार्च, 2007 नंतर व्हॅटचे दर कमी जास्त करण्याचा सरकारचा अधिकार संपलेला होता. परंतु सरकारने हे कलमच रद्द करुन टाकले आणि 18 फेब्रुवारी रोजी यासंदर्भात वटहुकूम काढला. बजेट अधिवेशन सुरु होण्याच्या एक महिना अगोदर आपण हा वटहुकूम काढला होता. वटहुकूम का काढला, त्याची गरज होती,नव्हती यासंदर्भात मी काही बोलणार नाही. राज्यशासनाचा खर्च वाढत चालला,शेतक-यांसाठी कर्जमाफी झ ाली त्यामध्ये 500-600 कोटी रुपये राज्य शासनाचे गेले, सहाव्या वेतन आयोगाचा आर्थिक भार राज्य सरकारला सहन करावा लागला. म्हणून आपण कलम 9(1) रद्द केले आणि व्हॅटचे दर 4 टक्क्याचे 5 टक्के केले काही ठिकाणी आपण 12.5 टक्क्यापर्यंत वाढ केली. मी माननीय वित्तमंत्रीमहोदयांचे अभिनंदन यासाठी करतो की, आपण प्रथम कर वाढवून घेतले नंतर असंतोष होणार नाही म्हणून आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणात सांगितले की, गहू, तांदूळ, पीठ, मसाले याच्यावरचे एक्झम्शन अजून एक वर्ष सुरु राहील. गरिबांना लागणा-या वस्तूंवरील एक्झम्शन एक वर्ष वाढवून दिले त्यामुळे मी आपले अभिनंदन करतो. आपण व्हॅटचे दर वाढवल्यामुळे आपल्याला 800 ते 1000 कोटीचे उत्पन्न मिळणार आहे. या राज्यात ज्यावेळी विक्रीकर सुरु झाला त्यावेळी भारतातील अनेक देशात हा कर नव्हता. उत्तर प्रदेश सारख्या सर्वात मोठया राज्यात सुध्दा विक्री कर नव्हता परंतु महाराष्ट्र शासनाने विक्री कर सुरु केल्यानंतर उत्तरप्रदेश राज्याने 10-15 वर्षानी विक्री कर सुरु केला. उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करणे आणि विकासासाठी तो निधी उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे व त्यामुळेच आपण हे काम केलेले आहे.

मी आपल्याला अजून एक विनंती करणार आहे. परवा या सभागृहात काजूच्या संदर्भात चर्चा झाली होती. माननीय मंत्री महोदय आपण सुध्दा काजू पिकविणा-या परिसरातील आहात. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात 4-5 टक्क्यापर्यंत काही वस्तुंचे दर जास्त असतील हे मी समजू शकतो परंतु 12.5 टक्के कर लावणे बरोबर होणार नाही. या वाढलेल्या करामुळे येथील व्यापार किंवा उद्योग बाहेर जाण्याचा संभव असेल तर त्यासंदर्भात आपण विचार करावा ही विनंती

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

करण्यासाठी मी उभा आहे. आता नवीन एसईझेड, नवीन टेक्सटाईल पार्क, नवीन क्लस्टर येत आहे. तुम्हाला असे वाटत असेल की, या या ठिकाणी उद्योग चांगल्या प्रकारे चालेल त्या ठिकाणी आपण 5 वर्षाचा व्हॅट माफ करुन द्या. परंतु त्या उद्योगातून 10-5 हजार लोकांना रोजगार मिळाला पाहिजे, राज्याचे उत्पादन वाढले पाहिजे, राज्याचे उत्पन्न वाढले पाहिजे अशा प्रकारची अट टाकून आपण पुढे गेलो तर महाराष्ट्र आज डायरेक्ट फॉरेन इनव्हेस्टमेंटमध्ये चवथ्या क्रमांकावर आहे तो पहिला क्रमांकावर आणण्याची प्राथमिक जबाबदारी माननीय मंत्री महोदय आपण वित्त खात्याचे मंत्री असल्यामुळे प्रथम आपल्यावर येते, उद्योग खात्यावर येते. सरकारची ही सर्व जबाबदारी असल्यामुळे ज्या माध्यमातून आपल्याकडील व्यापार वाढेल, उद्योग वाढेल यासंदर्भातील कररचना करणे अत्यंत महत्वाचे आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी गोरगरीबांच्या वस्तूंवर एक वर्षाचे एक्झम्शन दिल्यामुळे महागाई वाढली नाही त्यामुळे मी माननीय वित्त मंत्र्यांनी अभिनंदन करतो. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी वृध्दीदराच्या संदर्भात मागे उत्तर दिले होते. 2006,2007,2008,2009,2010 मध्ये 1000 रुपयांने व्हॅट कमी झाला आहे परंतु त्यांनी आपल्याला आकडे दिले व्हॅट वाढला परंतु वृध्दीदर कमी झाला. याचे जर आपण ॲनालिसीस केले तर महाराष्ट्रात मंदीची झळ कधीच नव्हती. महाराष्ट्रात कोणत्याही वस्तूचे दर कमी झालेले नव्हते.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी....

व्हॅटचा वृद्धीदर कमी झालेला आहे. त्याकडे आपण लक्ष घातले तर पुढच्या कालावधीमध्ये व्हॅटचे उत्पन्न कमी होणार नाही. यासंबंधी आपले प्रयत्न झाले पाहिजेत. आपले राज्य हे प्रगतीशील, पुरोगामी राज्य आहे. उद्योगक्षेत्रात पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. हे राज्य असेच रहावे. या दृष्टीकोनातून व्हॅटचे जे दर आहेत, ते आपण निश्चित करावेत. पुन:श्च एकदा आपण गहू,तांदूळ, मीठ,डाळी, मसाले यांवर एक वर्षासाठी सूट दिल्याबद्दल आपले अभिनंदन. धन्यवाद.

...............

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 32 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, 2010 चर्चेसाठी आले आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सर्वप्रथम मी या बिलाचे स्वागत करतो. हे बिल आणल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. एकच गोष्ट मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यायची आहे. कोकणात काजूचे पीक येते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगली जिल्ह्यातील बेदाणा या पिकाला 12.5 टक्के व्हॅट लावला होता, तो 4.5 टक्के शासन करणार आहे, अशी चर्चा असल्याचे सांगितले. यामुळे व्यापारी खूष आहेत. सदर निर्णय झाला असा त्यांचा समज आहे. आम्ही यापूर्वी देखील सन्माननीय वित्त मंत्री यांना विनंती केली आहे की, काजूवर 12.5 टक्के व्हॅट लावण्याचा प्रयत्न शासनाच्या मार्फत केला जात आहे, तो अत्यंत अन्यायकारक आहे. याचे कारण असे की, ज्यावेळी या राज्यात प्रथमच व्हॅट लावण्यात आला, त्यावेळी देखील काजूवर 12.5टक्के व्हॅट लावण्याचा प्रयत्न शासनामार्फत केला होता. त्यावेळी आम्ही शासनाला दाखवून दिले होते की, कुठल्याही परिस्थितीमध्ये टॅक्स आपण वाढवू नका. कारण बाजूच्या राज्यांमध्ये 4.5 टक्के व्हॅट काजूवर लावला जातो. उद्या जर काजूवर 12.5 टक्के व्याज लावला तर कोकणातील संपूर्ण काजू बी गोवा,कर्नाटक,केरळ पर्यंत जाईल. त्यामुळे येथील काजू व्यवसाय संपूर्ण बंद होईल. फलोत्पादनाच्या माध्यमातून काजू पिकाला चालना मिळाली आहे. कोकणात काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. कोकणातील शेतकरी काजूची लागवड मोठ्या प्रमाणात करीत आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना इन्सेन्टीव्ह देण्याऐवजी 12.5 टक्के व्हॅट लावणार असाल तर ते योग्य होणार नाही. आता 4.5 टक्के कर आहे तो तसाच ठेवावा अशी मी विनंती करतो आणि या विधेयकाचे मी समर्थन करतो. धन्यवाद.

...............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, व्हॅट आणताना सर्व प्रकारचे टॅक्स संपुष्टात येतील असे म्हटले होते. मंत्रिमहोदयांनी उल्लेख केला की, वर्क्स टॅक्स या निमित्ताने संपुष्टात आला. माझ्या माहितीप्रमाणे 1984 साली प्राफेशनल टॅक्स सुरू झाला. हा एका विशिष्ट कारणासाठी काही वर्षांपुरता होता. तो आजतागायत सुरू आहे. उलट दरवर्षी नवनवीन क्षेत्र त्यामध्ये जोडली जात आहेत. तेव्हा याचा देखील विचार केला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून शासनाला दरवर्षी काही शे कोटी रूपये मिळतात. नेमकी आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे मी असा उल्लेख मुद्दामहून केला आहे. श्री.अरूण गुजराथी म्हणाले की, मंदीची झळ महाराष्ट्रात नव्हती. परंतु, मंदीचा फटका अजूनही व्यापाऱ्यांना जाणवत आहे. त्यामुळे अनेकांचा 2-3 वर्षांचा व्हॅट अनियमित आहे. मला असे वाटते की, तो सुद्धा हजार कोटी होईल. सरकार अधूनमधून व्यापाऱ्यांना टॅक्स भरण्यासाठी एन्करेज करते. यासाठी व्याज माफ करण्यात येते, पेनल्टी माफ करण्यात येते. यातून सुद्धा व्यापाऱ्यांकडून हजारो कोटी रूपये आपल्याला मिळतील. जकात पूर्ण माफ होईल असा निर्णय झाला होता.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/ ST/ MMP/ प्रथम श्री.भारवि 17.55

श्री.चंद्रकात पाटील ..

व्हॅट कर लागू करीत असतांना ऑक्ट्राय पूर्णपणे् माफ होईल अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला होता. आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,पूर्वी 22 हजार कोटी रुपये सेल्स टॅक्सचे उत्पन्न असतांना आता 36 हजार कोटी रुपये झाले आहे म्हणजेच राज्याचे उत्पन्न 14 हजार कोटी रुपयांनी वाढले आहे. ड वर्गाच्या महानगरपालिकेचा जकात कर रद्द केला तर त्यांना फक्त 850 कोटी रुपये द्यावे लागणार आहेत एवढया रकमेसाठी राज्यातील सर्व व्यापारी अस्वस्थ आहेत तेव्हा त्याबाबतीत सुध्दा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ( वित्त मंत्री ) सभापती महोदय, मी मांडलेल्या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते,श्री.अरुण गुजराथी, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी,श्री.चंद्रकांत पाटील यांनी आपले विचार मांडलेले आहेत.त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा मी अत्यंत आभारी आहे. गेल्या पाच सात वर्षापासून अनेक वेळा वेगवेगळी विधेयके, चर्चा, प्रश्न इत्यादीच्या अनुषंगाने त्यांनी त्यांची भूमिका सातत्याने मांडली आहे याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे या विषयावरसुध्दा त्यांनी मोकळेपणाने विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी सागितले की, पाच सहा वर्षापूर्वी जेव्हा यासबंधीचे विधेयक सभागृहात मांडले होते तेव्हा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी ते रात्री उशिरा मांडण्यात आले होते . कदाचित त्यांचे म्हणणे खरेही असू शकेल परंतु मूल्यावर्धित कर प्रणाली लागू करण्यासबंधीचा निर्ण्य एका दिवसात घेण्यात आला नाही. देशभरामध्ये कित्येक वर्षे मूल्यवर्धित करासबंधीची चर्चा चालू होती .मूल्यवर्धित कराशी निगडीत असलेले जे संबंधित होते त्यांच्याशी वेगवेगळया फोरमच्या माध्यमातून चर्चा केली गेली विविध राज्यातील अर्थमंत्र्यांची एक शक्ती प्रदत्त समिती त्यावेळी नेमण्यात आली होती. जीएसटीच्या संदर्भात पश्चिम बंगालचे अर्थमंत्री श्री. असिमदास गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आता समिती नेमण्यात आली होती आणि त्यावेळी देखील त्यांच्याच अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती नेमण्यात आली आहे. मूल्यवर्धित कराच्या संदर्भात विविध माध्यमातून चर्चा केल्यानंतरच निर्णय घेण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की,ते जे काही बोलले आहेत त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी शासनाचे अभिनंदन करीत असतांना सांगितले आहे की अन्नधान्याशी निगडीत असलेल्या वस्तूंवर शासनाने कोणत्याही प्रकारचा कर वाढविलेला नाही. माझ्या ऐवजी सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी खुलासा केल्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा एकदा अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, अन्नधान्याशी निगडीत वस्तूंवर कर लावलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी असा मुद्दा मांडला की, उद्योगधंद्याना चालना देण्यासाठी काही प्रकल्प राज्यात यावेत यासाठी राज्य सरकारने काही सूट द्यावी . ज्यावेळी मी हे विधेयक मांडले होते त्यावेळी सुरुवातीलाच या राज्याचे उद्योग

2...



VTG/ D/ KGS/ ST/ MMP/ प्रथम श्री.भारवि 17.55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धोरण कशा प्रकारचे आहे हे सांगितले होते. मेगा प्रकल्प राज्यात येत असतांना औद्योगिक धोरणसुध्दा त्यावेळी स्पष्ट करण्यात आले होते. राज्यामध्ये जे वेगवेगळे प्रकल्प आलेले आहेत त्यांना जे परतावे द्यावयाचे आहेत ते परतावे सुध्दा देण्यात आलेले आहेत. त्यामुळे राज्यात मोठया प्रमाणावर उद्योग येऊ शकले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी घर बांधणीच्या बाबतीत उल्लेख केला आहे. आतापर्यंत त्यांच्यासाठी जी कर प्रणाली लागू करण्यात आली होती त्यामध्ये एक प्रकारचा सुटसुटीत पणा यावेळी आणला असून हा कर एक टक्क्यावर आणला आहे. ज्यावेळी अशा प्रकारचा कर आकारण्यात आला होता त्यावेळी उच्च न्यायालयामध्ये संबंधित व्यक्ती गेल्या होत्या त्यावेळी न्यायालयानेसुध्दा त्याला स्थगिती दिली होती. त्यामुळे राज्याला अपेक्षित असलेले उत्पन्न मिळण्याऐवजी घराच्या किंमती खरोखर वाढू शकतात काय अशा प्रकारची भावना घर घेणा-यांच्या आणि व्यावसायिकांच्या मनामध्ये निर्माण झाली होती. त्यामुळे सोपी आणि सुटसुटीत योजना सुरु करण्याचे याच वर्षापासून सुरु करण्याचे जाहीर करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी बेदाण्याच्या संदर्भात एक मुद्दा मांडला होता. त्याबाबतीत मी खुलासा करु इच्छितो की,अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये इतर कर चार टक्क्यांवरुन साडेबारा टक्क्यावर नेण्याचे धोरण स्वीकारले होते त्यावेळी बेदाण्यांवरील कर पाच टक्केच राहील हे मी अर्थसंकल्पाच्या भाषणातच सांगितले होते. बेदाण्यांवरील कर शुन्यावर आणावा अशी सांगली किंवा त्या परिसरातील शेतक-यांची ,या व्यवसायाशी निगडीत असलेल्या घटकांची , व्यापा-यांची मागणी आहे परंतु हा कर साडेबारा टक्के करण्या ऐवजी 5 टक्केच ठेवला होता. परंतु हा कर आणखी कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतलेला नाही.

सभापती महोदय,काजूच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले ती वस्तुस्थिती खरी आहे. ज्यावेळी मूल्यवर्धित कर प्रणाली लागू झाली होती त्यावेळी हा कर साडेबारा टक्के होता त्यावेळी तत्कालीन वित्त मंत्र्यांनी आपल्या सर्वाबरोबर चर्चा करुन हा कर चार टक्क्यांवर आणला होता . आतासुध्दा या संदर्भात कोकणातील व त्या परिसरातील सर्व लोकप्रतिनिधींची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बैठक गुरुवारी घेण्यात येणार आहे आणि त्या बैठकीत योग्य ती चर्चा् करुन अधिवेशन संपण्या पूर्वी कोकणातील काजू उत्पादक शेतक-यांसाठी आणि प्रक्रिया करणाऱ्यांसाठी निर्णय घेण्यात येईल. कोकणातील काजू उत्पादक शेतक-यांना कशा प्रकारे न्याय मिळू शकेल याचा निर्णय निश्चितपणे घेण्यात येईल एवढेंच आश्वासन मी या निमित्ताने सभागृहाला देऊ इच्छितो.

नतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

. शेवटी राज्य म्हटल्यानंतर त्यामध्ये अडचणी येत असतात. परंतु हा व्यवसाय करीत असतांना किंवा काजू उत्पादक शेतकरी आहेत. त्यांच्या बाबतीत शेजारच्या राज्यातील कर आणि आपल्या राज्यातील कर यामध्ये निश्चितपणे कमी तफावत आहे. हे करीत असतांना त्याचा फायदा अन्य राज्यातील व्यापारी कशापध्दतीने घेऊ शकतील याबाबतच्या शक्या-शक्यतेचा विचार करण्यासाठी मी मुदत मागून घेतली आहे. आणि म्हणून दिनांक 23 एप्रिल रोजी हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत निश्चितपणे निर्णय होईल. सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये मांडलेल्या मुद्यांबाबत मी खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागूक एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील विविध भागात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई

**मु.शी.**: राज्यातील विविध भागात निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई या विषयावर सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, अरुण गुजराथी, हेमंत टकले, डॉ. वसंत पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, संजय दत्त, राजन तेली, प्रा. सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री राम पंडागळे, दिलीपराव सोनवणे,वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे चालू...)

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जगामध्ये जितके जमिनीचे क्षेत्र आहे, त्याच्या 5 टक्के जमीन भारतात आहे. जगात जितकी पाण्याची उपलब्धता आहे, तिच्या 3 टक्के पाणी भारतात आहे. जगात जितकी लोकसंख्या आहे, तिच्या 15 टक्के लोकसंख्या भारतात आहे. आपण पाणी आणि जमीन यांचा विचार केला तर भारताची लोकसंख्या आणि उपलब्ध असलेले पाणी हे जगापेक्षा आपल्याकडे फार कमी आहे. आपण महाराष्ट्राचा विचार केलातर देशाची जितकी लोकसंख्या आहे, तिच्या 12 टक्के लोकसंख्या महाराष्ट्राची आहे. या देशात जितके पाणी उपलब्ध आहे त्याच्या 5 टक्के किंवा 6 टक्के पाणी महाराष्ट्रात उपलब्ध आहे. महाराष्ट्रापेक्षा बिहार, उत्तर प्रदेश, पूर्व उत्तर प्रदेश, हरयाणा, हिमाचल प्रदेश अशा इतर राज्यामध्ये "पाणी टंचाई" हा शब्द अस्तित्वात नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये गेल्या 15 ते 20 वर्षापासून प्रत्येक वर्षीच्या अधिवेशनामध्ये "पाणी टंचाई" हा विषय चर्चेला येतो. म्हणून पाण्याच्या प्रश्नाकडे जास्त गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. पिकांची पेरणी करावी लागते. ज्वारीचा एक दाणा टाकला तर कणसाला 300 दाणे येतात. त्यासाठी आपल्याला परिश्रम करावे लागते. पाण्याची पेरणी करण्याची आवश्यकता नाही. निसर्गच पाण्याची पेरणी करतो. आपल्याला पाणी मोफत मिळते आपण त्याची साठवणूक करुन त्याचे संवर्धन करणे हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आजपर्यंत आपण पैशाच्या माध्यमातून पंचवार्षिक योजना केली. त्याप्रमाणे आपल्याला आता पाण्याची पंचवार्षिक योजना करावी लागेल. यापुढील पाच वर्षाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ D/ MMP/

श्री. अरुण गुजराथी...

पाण्याची योजना काय आहे? आज महाराष्ट्रात पहिला महत्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो पाण्याच्या टंचाईचा आहे. हिंदीमध्ये कोणकोणत्या गोष्टींना प्राधान्य आहे ? "भुखिया, दुखिया आणि सुखिया" त्याअगोदर आपल्याला "प्यासा" हा शब्द टाकावा लागेल. आणि म्हणून माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. आज ग्रामीण भागातील परिस्थिती पहा. माणसे लग्न मांडवात बसलेले असतील,आणि कुणी तरी सांगितले की, नळाला पाणी आले तर लोक मांडवातून उठून निघून जातात. लग्नाच्या मुहूर्तापेक्षा नळाला पाणी आले आहे, आपल्याला पाणी मिळणार आहे याचा आनंद लोकांना जास्त आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

गावामध्ये एखादी एस.टी.आल्यानंतर जर प्रवास करण्यासाठी तेथे ग्रामस्थ उभे राहिले असतील आणि जर नळाला पाणी आले आहे असे जर कोणी सांगितले तर लोक एस.टी.मध्ये जाण्याचे सोडून लोक पाणी भरण्यासाठी जातात. माननीय मंत्री महोदय सर्वच गावांमध्ये ही परिस्थिती आहे अशातला भाग नाही. पण आपणच म्हटले आहे की, 20 गावांमध्ये पाण्याची टंचाई आहे आणि ही संख्या लहान नाही. अशा वेळी जल-जागृती निर्माण करणे हे देखील आपले अत्यंत महत्वाचे काम आहे. पाण्याचे रि-सायकलींग करणे अत्यंत गरजेचे आहे.आंघोळीचे पाणी कपडे धुण्यासाठी वापरावे किंवा ते पाणी कार किंवा इतर व्हेईकल धुण्यासाठी वापरावे.सदरचे पाणी नंतर भांडी धुण्यासाठी वापरावे. त्यानंतर जे पाणी राहील ते झाडांना वगैरे द्यावयाचे असेल तर द्यावे. आपण जेव्हा तातडीची पाणी पुरवठा योजना करीत असताना,आपण विहीर खोदणे,विहिरीतील गाळ काढणे, खाजगी विहिरींचे अधिग्रहण अशी कामे करतो.तसेच आपण बोअरवेल खोदून तात्पुरती पाणी पुरवठा योजना करतो, ती फायर फायटींगसारखी व्यवस्था आहे. प्रत्येक गावामध्ये पिण्याच्या पाण्याची योजना ही नदीवर, धरणावर आधारित असली पाहिजे. कुठे लहान नाला असेल तर त्यावर आधारित असली पाहिजे. पण शक्यतो बोअर वेल वर पिण्याच्या पाण्याची योजना असू नये. मात्र ज्याठिकाणी जवळपास अंतरावर पाण्याची सोय उपलब्ध नसेल तर आपण तरी काय करणार? पण राज्यातील पाण्याची योजना, जिल्हास्तरीय पाण्याची योजना, तालुका स्तरीय पाण्याची योजना आणि यानंतर पाच-सहा गावे मिळून योजना करावयाची असेल तर करावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदय आपण जळगाव जिल्ह्याचे पालक मंत्री होता. आपल्याला जळगाव जिल्ह्यातील एकेक गाव माहिती आहे. दहा वर्षापासूनची पाच-सहा गावांसाठी असलेली लासूर पाणी पुरवठा योजना अजूनही मूर्त स्वरुपाला येत नाही. मी आपल्याला विनंती करतो की, आपण याबाबतीत लक्ष घालावे आणि कुठेतरी एखादी समिती बोलावून तेथे आमच्या अधिकाऱ्यांना बोलवावयाचे असेल तर तसेही करता येईल.

सभापती महोदय, मी पुढे असे सांगतो की, शहरी व ग्रामीण मध्ये फार मोठे अंतर आहे. 40 लिटरपेक्षा कमी पाणीपुरवठा होणारी गावे आहेत आणि आपण शहरांमध्ये दरडोई 200 ते 250 लिटर पाणी देत आहोत. ग्रामीण भागातील पाणी शहरी भागामध्ये जात आहे. शहरी भागातील पाण्याची गरज ही ग्रामीण भागापेक्षा निश्चितपणे जास्त आहे. पण जर तुम्ही ग्रामीण भागाला 40लि.

. . . .3 व्ही-2

श्री.अरुण गुजराथी . . . .

देखील पाणी देत नसाल आणि एखाद्या शहराला 240 लि.पाणी देत असाल तर त्याचा आपण निश्चितपणे एक आढावा घ्यावा. आज जे पाणी उपलब्ध आहे, त्याचा वापर कसा होतो ? तर उद्योगासाठी 15 टक्के, शेतीसाठी 75 टक्के, नागरी विभागासाठी साधारणत: 4 टक्के, दैनंदिन वापरासाठी 5 टक्के आणि जलक्रिडा म्हणजेच स्विमिंग टँक वगैरे काही असेल तर त्यासाठी 1 टक्के, म्हणजे आपण साधारणत: चार ते पाच टक्के पाणी पिण्यासाठी वापरतो. 2009-2010 या वर्षासाठी आपण 1050 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केलेली असून ऑक्टोबर 2009 पर्यंत फक्त 421 कोटी रुपये खर्च झालेला आहे आणि ही आकडेवारी "महाराष्ट्राची आर्थिक पहाणी" या पुस्तकातील आहे. जर 1050 कोटी रुपयांची तरतूद केली असेल तर मार्चपर्यंत किती खर्च झ ालेला आहे याची आकडेवारी आता माझ्याकडे नाही. पण माननीय मंत्री महोदय, तुमच्या खात्याला मिळणारा पैसा परत जाणार नाही याची दखल घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, आपण नागरी विभागातील विविध तातडीच्या पाणी पुरवठा योजनांवर 9 नोव्हेंबर पर्यंत 441 कोटी रुपये खर्च केले आहेत. हाच खर्च 2008-2009 मध्ये 967 कोटी रुपये इतका झाला होता. जशी ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, त्याचप्रमाणे शहरी भागामध्ये देखील आहे. शिवकालीन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाण्याच्या स्त्रोताचे मजबुतीकरण करणे, छतावरील पाण्याची साठवणूक करणे, पावसाचे पाणी साठविण्यासाठी डोंगराळ भागामध्ये तलाव निर्माण करणे आणि यासाठी आपण मागील वर्षी 135 कोटी रुपये खर्च केले आहेत त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

कारण ही योजना फार जुनी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासूनची ही योजना आहे. त्यातील काही बाबी आपण स्वीकारलेल्या आहेत. नंतर भारत निर्माण योजना आली. ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधा व मूलभूत सुविधा मजबूत करणे हा भारत निर्माण योजनेच्या संदर्भातील कार्यक्रम आहे. या योजनेचा पहिला टप्पा 2005-06 ते 2008-09 असा होता. दुसरा टप्पा 2009-2010 ते 2011-2012 असा आहे. म्हणजे आता दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झालेली आहे. ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत आपण काम केलेले आहे. त्यामध्ये आपण सुविधा नसलेल्या 17,738 वस्त्या आणि ज्या ठिकाणी दुबार हाताळण्याचा कार्यक्रम घ्यावयाचा आहे अशा 11,579 वस्त्यांचा समावेश केलेला आहे. पाण्याच्या गुणवत्तेच्या बाबतीत सुध्दा भारत निर्माण योजनेमध्ये फार महत्व आहे. पाणी देणे हा एक भाग आहे पण गुणवत्तेचे पाणी देणे, पिण्यासाठी योग्य असे पाणी देणे हा दुसरा भाग आहे.

राज्य शासनाने मध्यंतरी रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या संदर्भात असे म्हटले होते की, ज्या नवीन सोसायट्या येत आहेत, ज्या टाऊनशिप येत आहेत त्यांना हा कायदा सक्तीचा करणार. मला वाटते की, हा कायदा करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे पुढे पाण्याची आपोआप साठवणूक होणार आहे. हा कायदा करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने विचार करावा. नोव्हेंबर, 2009 पर्यंत राज्यात एकूण रेन वॉटर हार्वेस्टिंगची 6969 कामे झाली. त्यामध्ये कोकणात 870, नाशिक विभागात 199, पुणे विभागात 833, औरंगाबाद विभागात 1650 अमरावती विभागात 1566, नागपूर विभागात 1851 कामे झाली. पुढे असे म्हटले आहे की, बीड, नाशिक, वर्धा जिल्ह्यात एकही रेन हार्वेस्टिंगचे काम झालेले नाही. ज्या जिल्ह्यामध्ये रेन हार्वेस्टिंग झालेले नाही त्या जिल्ह्यामध्ये जागृती निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. मी कोकण विभागाचे अभिनंदन करीन. कोकण विभागात फक्त दोन गावांमध्ये पाणीटंचाई आहे अशा पध्दतीची माहिती मिळालेली आहे पण विदर्भ, मराठवाडा या दोन भागामध्ये 17 हजार गावांमध्ये पाण्याची टंचाई आहे. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, विदर्भ आणि मराठवाड्याच्या पाणीटंचाईच्या दृष्टीकोनातून जादा लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. काही वेळेला आपण टँकरने पाणीपुरवठा करतो. टँकर मिळत नाही. टँकर मिळाला तर एक टायर पंक्चर असतो. पंक्चर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

काढला तर ड्रायव्हर नसतो. ड्रायव्हर असला तर त्या ठिकाणी विजेची सुविधा नसते. चार चार तास टँकर त्या ठिकाणी उभा राहतो. टँकरने पाणी देणे हे योग्य नाही. टॅंकरने किंवा बैलगाडीने पाणी देणे हा शेवटचा मार्ग आहे. पण किती वर्षे आपण टँकरने पाणी देणार याचे देखील नियोजन करावे आणि एक वर्ष असे सांगावे की, त्या वर्षानंतर महाराष्ट्रात बैलगाडीने किंवा टँकरने पाणीपुरवठा होणार नाही. टँकरने मिळालेले पाणी पिण्यास योग्य नसते. आपण आतापर्यंत म्हणतो की, न सुटलेला प्रश्न म्हणजे पाण्ी प्रश्न. याचा जर आपण वियार केला तर यामध्ये शासनाला निश्चितपणे यश मिळेल.

सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास 1845 साली मुंबईमध्ये पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन्स टाकल्या गेल्या. हे आयलँड सिटीच्या संदर्भात बरोबर आहे. बेटामध्ये ब्रिटीशांच्या राज्यात पाईपलाईन्स टाकल्या पण आता मार्च महिन्यात पंधरा वेळा जलवाहिनी फुटली. म्हणजे एका महिन्यात पंधरा वेळा जलवाहिनी फुटली. एक माहिती अशी आलेली आहे की, माटुंगा तुळशी पाईप रोड मॅग्नेट मॉलसमोर रस्त्याखाली पाण्याची पाईपलाईन फोडली आणि त्याचा उपयोग टॅक्सी धुण्यासाठी होतो. हे महापालिकेचे काम आहे. फक्त आपल्या माहितीसाठी मी हे सांगत आहे. त्यामध्ये 10 व्यक्तींना पकडले आणि 1200 रुपये दंड केला. या शहरामध्ये पाण्याची गळती 750 दशलक्ष लीटर पेक्षा जास्त आहे अशी माहिती उपलब्ध आहे. ही माहिती खरी आहे की, असत्य आहे हे माहीत नाही. कारण ही वृत्तपत्रातील माहिती आहे. पण पुढे असे म्हटले गेले आहे की, नागपूरला किंवा पुण्याला एका दिवसात जितके पाणी लागते तितके पाणी मुंबईत एका दिवसात वाया जाते. हे जर सत्य असेल तर महापालिकेसोबत बसून याचा विचार करावा लागेल. मी माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांचे देखील या ठिकाणी अभिनंदन करतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

मुंबईच्या पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी बैठक बोलविली होती, त्या बैठकीला अधिका-यांना बोलविले होते, महापौरांना बोलविले होते. एका शहराची जबाबदारी एकटया महानगरपालिकेवर टाकून चालणार नाही, त्यामध्ये शासनाचा सहभाग असावयास पाहिजे. या शहरातील सव्वा कोटी लोकांना ते समजले पाहिजे. त्यांचा प्रश्न समजून घेतला पाहिजे, या भावनेतून ती बैठक घेतली होती. माझी अशी माहिती आहे की, 2012 मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून एक नवीन धरण पूर्ण होणार आहे. त्या धरणातून मुंबईला 450 द.ल.घ.मी.पाणी मिळणार आहे. हे योग्य आहे, परंतु 750 द.ल.घ.मी.इतक्या पाण्याची गळती होते ती थांबविणेही महत्वाचे आहे. यावर्षी सुरुवातीला पाऊस आला नव्हता, त्यामुळे मुंबईत कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यासाठी 12 कोटी रुपये खर्च झाले. परंतु त्या त्या तलावाच्या साठवण क्षमतेमध्ये पाण्याची किती पातळी वाढली हे मला माहीत नाही. पण पाण्यासाठी कृत्रिम पाऊस पाडावा लागतो ही बाब सर्वांच्या दृष्टीने व राज्याच्या दृष्टीने महत्वाची आहे. कंत्राटदार काय करतात ते माहीत नाही, परंतु ज्यांना काम दिले जाते त्यांनी टाकलेली पाण्याची लाईन पुढील 5 वर्षे फुटणार नाही यासाठी कायदा केला पाहिजे.

सभापती महोदय, पेप्सी, कोकाकोला ही कंपनी भूगर्भातून पाहिजे तेवढे पाणी घेत आहे, त्यासाठी त्यांना 5 रुपये युनिट किंवा 3 रुपये युनिट इतका खर्च येतो आणि ही कंपनी 12 रुपये लिटर याप्रमाणे विक्री करते, तो त्यांचा धंदा आहे, त्यावर मी अधिक बोलणार नाही. पण या कंपन्यांनी बोअरवेलमधून पाणी घेण्यासाठी शासनाची परवानगी घेतली पाहिजे, घेतली जात नसेल तर तशी कायद्यात तरतूद केली पाहिजे. माझी अशी माहिती आहे की, वाडा तालुक्यामध्ये देशातील सर्वात मोठा कोकाकोलाचा प्रकल्प आहे. त्या तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. हया सर्व बाबी तपासल्या तर हा प्रश्न सुटू शकेल असे मला वाटते. मी ज्या सूचना केल्या आहेत त्याच्या माध्यमातून राज्यातील जनतेला पाणीपुरवठा करणे कसे सुलभ होईल यासंबंधीचे नियोजन करावे अशी मी आपल्याला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये राज्यातील तीव्र पाणी टंचाईबाबत प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर संक्षिप्तपणे माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये इंग्रज सरकारने 1845 साली पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या टाकल्या त्याला 2010 साली 165 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे या जलवाहिन्या जीर्ण झालेल्या आहेत, कमकुवत झालेल्या आहेत. त्यावेळच्या जलवाहिन्यांचा आकार होता तो आता कमी झाल्यामुळे वारंवार गळतीचे प्रकार होत आहेत. 1960 साली विहार धरण बांधले. तानसा, वैतरणा या धरणांतून मुंबईला पाणीपुरवठा केला जातो. मी लहान असताना परळला रहात होतो. तेथे पोयबावडीला मोठी विहिर होती. त्याठिकाणी मोठमोठया घोडागाडया येत होत्या. त्या विहिरीवर दिवसभर पाणी मिळत होते. परंतु आज मुंबईतील अनेक विहिरी बुजविण्यात आल्या आहेत. बेस्टच्या गाडया धुण्यासाठी, टॅक्सी धुण्यासाठी, बांधकाम व्यवसायासाठी लागणारे लाखो लिटर पाणी या जलवाहिन्यांमधून येते. परंतु या जलवाहिन्या फुटल्यानंतर आपण आंदोलन करतो. पक्षीय आंदोलने होतात. काही लोकप्रतिनिधी त्यात सहभागी होतात. विशिष्ट वर्ग, टॅंकर लॉबी ती आंदोलने फोडण्याचा प्रयत्न करीत असते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

त्याचीही कारणमिमांसा आपण शोधली पाहिजे. पाणी हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मी आमदार झाल्यापासून जास्तीत जास्ती निधी हा विहिरीसाठी दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी म्हणाले की, कोकणामध्ये पाण्याची टंचाई नाही. कोकणामध्ये पाण्याची टंचाई आहे. परंतु कोकणामध्ये विहिरीसाठी कमीत कमी खर्च येतो. मराठवाड्यात विहिरीसाठी जास्त खर्च येतो. विहिरीसाठी जास्तीत जास्त निधी शासनाने दिला पाहिजे. मुंबई शहरामध्ये पूर्वी जशा विहिरी होत्या तशा प्रकारच्या विहिरी कोकणामध्ये झाल्या पाहिजेत. कोकणामध्ये पाऊस भरपूर पडतो. परंतु ते पाणी अडवले जात नाही. कोकणामध्ये प्रचंड मोठा असा धामापूर तलाव आहे. या तलावामध्ये 400 ते 500 गावांना पुरेल इतका जलसाठा आहे. मी 50 कोटीचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन दिला. त्याचा पहिला हप्ता माननीय जलसंपदा मंत्र्यांनी दिलेला आहे. मी सन्माननीय राज्यमंत्री श्री. रणजित कांबळे यांच्याशी देखील मिटींग लावली.

सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे शिवकालीन पाट होते ते बुजलेले आहेत. त्यामधील गाळा काढून पाण्याचे स्त्रोत वाढविले पाहिजेत. पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या सर्व योजना शासनाने राबविल्या पाहिजेत. मी यावर जास्त बोलणार नाही. शासनाने राष्ट्रीय पेयजल योजना आणलेली आहे. अधिकारी काही ऐकत नाहीत. ते अंदाजपत्रकांना मान्यता देत नाहीत. पाण्याच्या संदर्भातील कोणतीही योजना असली की त्या योजनेला त्वरित मंजुरी मिळाली पाहिजे अशा प्रकारचे शासनाचे धोरण असले पाहिजे. तसेच पाण्याच्या योजनांसाठी त्वरित निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. वित्तमंत्री हे कोकणातील असल्यामुळे या वर्षी कोकणाला पाण्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळालेला आहे. सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या योजना होत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी जास्तीत जास्त निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी राज्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाई, जलवाहिन्या फुटण्याच्या घटना, जलवाहिन्या फुटण्यामागे टँकर लॉबीचा हात असल्याचा संशय, पाण्याच्या बाबतीत नियोजनाचा असलेला अभाव या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या पाणी टंचाईच्या प्रश्नावर अनेक सन्माननीय सदस्यांची अभ्यासपूर्ण भाषणे झालेली आहेत. प्रत्येक योजनांवर बोलण्याआधी मी शासनाला आठवण करु देऊ इच्छिते की, कोणतीही संस्कृती ही पाण्याभोवती वसत आलेली आहे. नद्यांची जी खोरी आहेत त्या खो-यांच्या संदर्भात अतिशय मूलगामी काम महाराष्ट्रामध्ये झालेले आहे. माननीय मंत्री महोदयांना कल्पना आहे की, याच अधिवेशनामध्ये नव्हे तर अनेक अधिवेशनामध्ये मी पहात आहे. आपण महाराष्ट्राचे जलधोरण राहुरी येथे जाहीर केले. हे जलधोरण जाहीर झाल्यानंतर माझ्या माहिती प्रमाणे विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये ते धोरण एकदाही अधिकृतरित्या मांडले गेले नाही. त्यावर चर्चा झाली नाही. आपण अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले. माधवराव चितळे यांच्या सारखे तज्ज्ञ, पाणी परिषदा या सर्वांची मते विचारात घेऊन महाराष्ट्राचे जल धोरण जाहीर केले. या बाबतीत मी अनेक तज्ज्ञांशी बोलले आहे. 2004मध्ये हे धोरण जाहीर केल्यानंतर दर तीन वर्षांनी जल विषयक धोरणाचा आढावा सरकार घेईल असे सरकारने मान्य केले होते. सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 11 नद्यांची खोरी आहेत. त्या खो-यामध्ये कोणकोणत्या जल योजना राबविल्या पाहिजेत या संदर्भातील एक मोठा आराखडा शासनाला प्राप्त झाला. तो तयार करण्यामध्ये माधवराव चितळे यांच्या सारख्या तज्ज्ञांचा सहभाग आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

म्हणून मला प्रश्न निर्माण करावयाचा आहे. विधानसभा असो, विधानपरिषद असो, टँकर लॉबी, जलवाहिन्या फुटणे, एक एक योजना, उजनीचे पाणी एवढ्यापुरती चर्चा मर्यादित राहणार का? आपण 2004 मधील धोरण 2007 मध्ये तपासणे गरजेचे होते. आपण जल नियामक आयोगाने दिलेल्या सूचनांची किती अंमलबजावणी केली? 2010 मध्ये आपण आहोत म्हटल्यावर पुन्हा तीन वर्षानी आढावा घेणे गरजेचे आहे. या धोरणामध्ये काय बदल केले पाहिजेत? जीवन प्राधिकरणाचे पैसे थकित आहेत अशी माझी माहिती आहे. 2010 मध्ये एक संधी आहे की, या सगळ्या उपाययोजना तातडीने करण्यासोबत महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये राज्य शासनाचे जल धोरण नक्की काय आहे हे जाहीर करण्यात यावे. शेतीच्या पाण्याची सोय महत्वाची आहे. पिण्याच्या पाण्याची सोय महत्वाची आहे. श्री.मनोहर जोशी या राज्याचे मुख्यमंत्री असताना राज्य शासनाने श्वेतपत्रिका काढली होती. त्यानंतर राज्य शासनाने सातत्याने जल विषयक धोरण आखले. जे धोरण आखले ते तुम्ही विधीमंडळात मांडले नाही तर आमदारांची परिस्थिती हे भेळपुरीच्या दुकानात गेल्यासारखी झाली आहे असे चित्र निर्माण होईल. भेळपुरीच्या दुकानात एकदा शेव, एकदा चटणी, एकदा लिंबू, एकदा कुरमुरे एकत्र करुन ज्याप्रमाणे भेळ तयार केली जाते तसा प्रकार सुरु आहे. त्या पलिकडे जाऊन भाजी भाकरी तयार होते त्याचा विचार झाला पाहिजे. जल धोरणात पुढची दिशा ठरते. त्याबद्दल गांभीर्य किती? कोणाला विश्वासात घेतले नाही. तुमचा हेतू वाईट आहे की चांगला यामध्ये मला जायचे नाही. परंतु पुढच्या काळात जल नियामक आयोगाने वेगवेगळ्या खोऱ्यांच्या संदर्भात अभ्यास केला, संभाजीनगरच्या वाल्मी संस्थेमध्ये तो अहवाल उपलब्ध आहे त्याबद्दल आमदारांशी सुसंवाद साधण्यात आला नाही. अनेक छोटे छोटे मुद्दे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी एक मुद्दा मांडला. अनेक योजना प्रलंबित आहेत. मुंबईतील पाणी टंचाईच्या संदर्भात देखील काही धरणांच्या बाबतीत आपण चर्चा करतो. कोणकोणते मुद्दे श्री.माधव चितळे यांच्या समितीने सुचविले, त्यानुसार मध्य वैतरणा धरणाचे काम 2011 पर्यंत, काळू धरणाचे काम 2015 पर्यंत, गारगई धरणाचे काम 2021 पर्यंत पूर्ण व्हायचे आहे आणि शाही धरणाच्या संदर्भात काय होणार आहे हे कोणालाच माहित नाही. अडचण असेल. मला सुचवावयाचे आहे की, आपल्या आराखड्यामध्ये का विलंब होतो? त्यातून काय मार्ग काढणार अशी मुलगामी चर्चा झाली तर आमदारांचे सहकार्य चांगल्याप्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

मिळेल आणि पाणी विषय आहे हा विषय पक्ष निरपेक्ष पातळीवर राज्याचा अग्रक्रमाचा विषय म्हणून राबविला पाहिजे. याठिकाणी मला सांगितले पाहिजे की, खोऱ्यांच्या संदर्भात बोलत असताना एका बाजूला जल नियोजनामध्ये आपण कमी पडतो. जल नियोजनाबाबत सगळ्या आमदारांना सहभागी करुन घेत नाही. त्याचबरोबर एका बाजूला वाळू उपसा होत आहे. वाळू उपसाबद्दल नगर जिल्हयामध्ये हल्ला करण्यापर्यंतची वेळ आली. ठिकाठिकाणी सरकारी यंत्रणा कोलमडते अशी परिस्थिती आहे. दुसऱ्या बाजूला जलसंधारणाबाबत उपाययोजना करीत असताना त्यात बायो डायव्हर्सिटीचा काय परिणाम होतो त्याचा खूप अभ्यास झाला. त्या विषयापर्यंत आपण पोहोचलो नाही. महाराष्ट्राचे जल धोरण विधीमंडळाच्या बाहेर जाहीर केले. ते विधीमंडळामध्ये चर्चेला यावे. त्यातील महत्वाच्या मुद्यांना आमचा विरोध असण्याचे कारण नाही. त्या त्या जिल्हयांमध्ये काम चालू आहे. ते धोरण अपडेट करीत असताना सर्व आमदारांना सहभागी करुन त्या त्या भागातील प्रत्येक नदीच्या खोऱ्याबद्दल ज्या सूचना आहेत, त्याबाबत कुठपर्यंत पोहोचलो? कोणती अशक्य आहे? कोणती ताबडतोब शक्य आहे त्याची सविस्तर माहिती राज्यासमोर यावी. दुसरी मागणी......

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. परंतु मी माहितीसाठी सांगू इच्छितो की, वॉटर रेग्युलेटरी ॲक्ट इरिगेशन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आहे. या विभागाशी संबंधित नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हाच मुद्दा अतिशय महत्वाचा असून मंत्रीमहोदयांनी स्पष्ट केले ते चांगले झाले. पिण्याच्या पाण्याच्या आणि शेतीचे पाणी याचा एकत्रितपणे विचार केला पाहिजे, समन्वयाने विचार केला पाहिजे. तो केला नाही तर एका हाताला औषध लावले आणि दुसऱ्या हातातून रक्त का वाहते याचा विचार केल्यासारखे होईल असे मला वाटते.

नंतर 4ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.........

आणि म्हणून अशा ज्या चर्चा आपण करतो आणि त्यासंबंधीचे प्रस्ताव समोर येत असताना ग्रामविकास विभागाच्या बरोबरीने जलसंपदा विभागावर सुध्दा चर्चा होणे आवश्यक आहे. मुळात शासनाच्या योजना का अपुऱ्या राहतात, त्यांना निधी कमी का पडतो, कुठला निधी लॅप्स होतो, कुठल्या नदीचे पात्र दिलते, कोणत्या धरणाचे दरवाजे बंद झालेले आहेत तसेच कोणत्या धरणाचे दरवाजे चोरीला गेले आहेत हे सर्व मुद्दे आणि पाणीपुरवठा या सर्व गोष्टींवरती राज्यसरकारची अंतर्गत चर्चा होत असेल तर आनंदाची गोष्ट आहे. पण तसे होताना मला तरी दिसत नाही, हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. विभाग जरी वेगवेगळे असले तरी धोरण मात्र एकाच दिशेने असले पाहिजे म्हणून जलसंपदा विभाग जरी असला तरी मी सांगू इच्छिते की, ज्या सूचना आम्ही मांडल्या त्या जलसंपदा विभागापर्यंत आम्ही पोहचवू पण माननीय मंत्री महोदय म्हणाले की, पाणी टंचाईच्या संदर्भात राज्यात चार विभागांच्या बैठका त्यांनी आतापर्यंत घेतल्या आहेत, दोनच विभाग शिल्लक राहिले आहेत. त्यात पुणे विभागाची बैठक झालेली नाही अशी माझी माहिती आहे. अशा बैठका होत असतील त्यापूर्वी कागदपत्रे वगैरे सर्व माहिती पोहचविली पाहिजे इकडे मला मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे.

माझी दुसरी सूचना आहे की, जन जागृतीच्या संदर्भात आपण शहरात तसेच ग्रामीण भागात ज्याप्रमाणे विचार करतो तो विषय खरा नगरविकास विभागाशी संबंधित आहे. कारण पाण्याचे रेन वॉटर हॉर्वेस्टिंगशी या विभागाचा संबंध येतो म्हणून अशी जनजागृती करीत असताना त्यासाठी केंद्रशासनाकडून निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

तिसरा मुद्दा असा आहे की, रोजगार हमी योजनेअंतर्गत आपण जी कामे करतो त्यात अर्धवट कामे बरीच राहतात त्यामुळे लक्षावधी रुपयांचा निधी खर्च होतो आणि काही ना काही कारणास्तव अशा योजना पूर्ण होत नाही. माझ्या माहितीप्रमाणे कोटयवधी रुपयांचा निधी अशा प्रकारे पाण्यात वाहून गेला आहे. म्हणून जी अर्धवट कामे आहेत ती पूर्ण करुन कशा पध्दतीने या योजना पूर्ण होतील म्हणून अशा प्रकारे वेगवेगळा व स्वतंत्र विचार न करता तसेच एक-एक योजनेचा विचार न करता संपूर्ण राज्याचे चित्र आणि त्याचा आराखडा यासंबंधी व्यापक विचार करावा तरच त्याची अमलबजावणी होईल, अन्यथा "नेमेचि येतो पावसाळा" प्रमाणे अमलबजावणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

होत नाही आणि पाऊस लवकर आला तर पीके खराब होतात, नागपूर अधिवेशनात सिंचनावर चर्चा करतो आणि पुन्हा मार्च एप्रिलमध्ये अर्थसंकल्पिय अधिवेशनात पिण्याच्या पाण्याची टंचाई म्हणून चर्चा करीत राहतो. अशा प्रकारे छोटा दृष्टीकोन ठेवून काम करणे उपयोगाचे नाही, अजून तपशीलात जायला हवे अशी विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

-----

**( सभापतीस्थानी माननीय ॲड. अनिल परब )**

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : महोदय, आदरणीय श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चेसाठी आणलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देत असताना काही गोष्टी मला बोलणे आवश्यक आहे. तो म्हणजे यावर्षी अपुरा पाऊस पडला आणि या अपुऱ्या पावसामुळे महाराष्ट्र राज्यात सर्व ठिकाणी पाणी टंचाई उद्‌भवली आहे. वातावरणात सारखा होणारा बदल आणि अवेळी पडणारा पाऊस या सर्व गोष्टींचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर मुख्यत्वेकरुन झालेला आहे असे दिसून येते. ग्रामीण भागातील आमच्या भगिनींना पाणी मिळत नाही म्हणून डोक्यावर हंडे घेऊन दीड-दोन मैल चाजलत जाऊन पाण्यासाठी आपला वेळ घालवित असतात. त्याचबरोब अशुध्द स्वरुपाच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने कावीळ, टायफाईड सारखे आजार देखील उद्‌भवतात. राज्यात आजही 20240 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. या सर्वांचे संकलन केले तर .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

आपल्याला असे दिसून येईल की, पूर्वी खेडयामध्ये आपण विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरत होतो. या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचा शेतीच्या पाण्याशी फारसा संबंध नाही. आज हा प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातच आहे. विहिरीच्या पाण्यानंतर आपण बोअरवेलच्या पाण्याचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी करु लागलो व नंतर आपण नळाच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी करु लागलो. यानंतर या प्रगतिशील महाराष्ट्रात मोठ मोठया शहरांची वाढ होऊ लागली. जसा मुंबईला पाणी पुरवठा करणे गरजेचे आहे तसा तो पुणे, नाशिक, ठाणे आणि इतर शहरांना देखील करणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य संपूर्ण राज्यात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देऊ लागले. महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षात टँकरने किंवा बैलगाडीने पाणी पुरवठा करणे हे महाराष्ट्र राज्यला शोभणारे नाही. खरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र हा टँकर मुक्त झाला पाहिजे. आमच्या भगिनींना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. मी मुंबई शहरात राहते परंतु मी कोकणची कन्या आहे. कोणी काय धोरण ठरवावीत, कोणी काय घोषणा कराव्यात हा विषय वेगळा आहे.

आज मुंबई शहरात मोठया प्रमाणात झोपडया वाढत आहेत. 1994-95 पासून मुंबई शहराचे ख-या अर्थाने औद्योगीकरण थांबले, मिल बंद झाल्या, कारखाने बंद झाले आणि त्या जागेवर मॉल आले, मोठ मोठया मल्टी स्टोरेज इमारती तयार झाल्या. खरे म्हणजे ही या मुंबई शहराची प्रगती आहे. मुंबई शहर हे एका बेटावर वसलेले आहे हे आपण विसरता कामा नये. या बेटावर लागणा-या सर्व वस्तू आपल्याला बाहेरुन आणाव्या लागतात. पिण्याचे पाणी सुध्दा आपल्याला ठाणे जिल्हयातून, नाशिक जिल्हयातून आणावे लागत असते. जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. पिण्याचे पाणी झोपडपट्टीमध्ये राहणा-यांना उपलब्ध करुन देण्याची जशी सरकारची जबाबदारी आहे तशीच जबाबदारी मल्टीस्टोरेज बिल्डींग मध्ये राहणा-या माणसाला सुध्दा पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी या शासनाचीच आहे. श्रीमंत असो वा गरीब असो प्रत्येकाला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही या शासनाची आहे. तीन महिन्याचे मुंबई शहरातील पिण्याच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

पाण्याचे चित्र पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, मुंबईमध्ये एमएमआरडीएची कामे सुरु आहेत, रस्ते बनवण्याचे काम सुरु आहे तर तिस-या बाजूला रेती टाकून त्यावर लाद्या लावण्याचे काम सुरु आहे. आज मुंबईमध्ये मोठया प्रमाणात पिण्याच्या पाईपलाईन्स फुटण्याच्या घटना घडत आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी 100 वर्षापूर्वी ज्या पाईपलाईन्स टाकण्यात आल्या होत्या त्याच पाईप लाईन्सने आज आपल्याला पाणी पुरवठा होतो आहे. या पाईपलाईन्स जुन्या असल्यामुळे आता या पाईपलाईन्स मधून पाणी पुरवठा करणे शक्य होणार नाही असे बोलले जाते परंतु मुंबई महानगरपालिका ही संपूर्ण देशातील पहिल्या क्रमांकाची महानगरपालिका आहे. ती आपली जबाबदारी निश्चितपणे पार पाडेल असे वाटते.

सभापती महोदय, गुढी पाडवा हा हिंदुलोकांचा मोठा सन आहे. पाडव्याच्या दिवशी मुंबईतील किती तरी लोकांना पाण्याअभावी सण साजरा करावा लागला. या दिवशी देवाला नैवेद्य दाखविण्यासाठी सुध्दा लोकांना पाणी मिळाले नव्हते. त्यामुळे या कारणाच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. यामागे टँकर लॉबीवाले आहेत काय ? पाणी देणारी गँग आहे काय ? यामध्ये मोठ मोठे ठेकेदार आहेत काय ? हे देखील बघणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पाईपलाईन्स फुटण्याचे प्रकार शासनाने त्वरित थांबविण्याची आवश्यकता आहे त्याचे कारण असे आहे की, मुंबई शहर हे वेगळया धर्तीचे शहर आहे. पाईप लाईन्स फुटण्याच्या घटना मुंबई शहराला परवडणा-या नाहीत असे मला नम्रतापूर्वक येथे सांगावयाचे आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

यामध्ये आपण वेगळे काही तरी काम करावे आणि या शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा, असे मला सुचवावयाचे आहे. या सर्व कामामध्ये केंद्र शासनाचा किती निधी उपलब्ध होत आहे, हे देखील महत्त्वाचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील या कामासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तरच हा प्रश्न चांगल्या प्रकारे सुटेल, असे मला सुचवावयाचे आहे. आपण मला माझे विचार मांडण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपली आभारी आहे.

.........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात सिंधुदुर्गाचा उल्लेख केला. सिंधुदुर्गामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो. पण पावसाचे सर्व पाणी वाहून जाते. पावसाचे पडलेले पाणी वाहून जात असल्यामुळे एप्रिल-मे महिन्यामध्येच फार मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई जाणवते. पावसाच्या पाण्याचे नियमन आपण कधीही केलेले नाही. पडणाऱ्या पावसाचे नियोजन करण्याच्या दृष्टीने, साठविण्याच्या दृष्टीने आपण कधीही शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास केला नाही. म्हणून मी आपल्या मार्फत जल आयोगाला सांगू इच्छितो की, सिंधुदुर्गातील पाणी साठवले तर या महाराष्ट्रामध्ये कधीच पाणी टंचाई भासणार नाही. निदान रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याला टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ येणार नाही.

दुसरे असे की, कोकणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अस्तित्त्वात आहे. अनेक गावांमध्ये पाहिले तर दिसून येते की, कुठे टाक्या आहेत, तर कुठे नाही. गावागावातून देण्यात आलेल्या पाईल लाईनला गळती लागलेली आहे. जीवन प्राधिकरण येऊन फारशी वर्षे झालेली नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे 5-7 वर्षे झालेली आहेत. कोकणातील भौगोलिक रचना पाहता, आद्रता पाहता पाईप लाईन गंजू लागल्या आहेत. त्यामुळे पाण्याची गळती सुरू झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून कोकणात नळपाणी पुरवठा योजना अस्तित्त्वात आली. त्याला कुठे तरी गळती लागली आहे. मजिप्राच्या अधिकाऱ्यांना फोन करून सांगा की, माझ्या गावामध्ये पाणी नाही आहे, पाण्याची समस्या आहे. ते आपल्याला कधीच कॉलबॅक करणार नाही किंवा त्यांचा माणूस येऊन काही मेजर प्रॉब्लेम आहे काय हे देखील बघणार नाही. त्यामुळे कोकणातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पुन्हा एकदा उजळणी महाराष्ट्र शासनाने घेणे आवश्यक आहे, असे मला वाटते. तेथे असलेले जल अभियंता, उप अभियंता हे कोणीच काम करीत नाही. आपण मे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

महिन्यामध्ये गावी गेलात तर आपल्याला पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवेल. काही गावात पाणी आहे, तर काही गावात पाणीच नाही. आज कोकणातील विहिरी कोरड्या पडल्या आहेत. कोकणातील लोकांना पाऊस पडे पर्यंत पाणी पुरवठा करण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

यानंतरचा प्रश्न हा मुंबईतील पाण्याच्या गळतीचा आहे. मुंबईतील पाणी गळती विषयी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी आपले मत मांडले आहे. मुंबईत पूर्वी देखील पाईप लाईन फुटत होत्या. परंतु, गेल्या सहा महिन्यात जास्त प्रमाणात पाईप लाईन फुटण्याचे कारण काय आहे ? यावर शासनाने शास्त्रीय अभ्यास केला असेल तर तसे सांगावे. ज्या पद्धतीने पाईप लाईन्स फुटत आहेत, त्यावेळी हा मॅन मेड क्रायसिस आहे काय ? असे वाटते. आपल्या सर्व पाईप लाईन्स ह्या झोपडपट्टीतून जात आहेत. अनेकदा वर्तमानपत्रातून पाण्याची कारंजी उडत असल्याची छायाचित्रे पहायला मिळतात. त्यात मुले आंघोळ करीत आहेत असे दिसते. आता मुंबईमध्ये पाण्याची टंचाई भासत आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

त्यामुळे पाण्याची पाईप लाईन फुटून पाण्याचे फवारे उडतात हे आपल्याला अपेक्षित नाही. मुंबईला पाणी पुरवठा करणा-या जल वाहिन्या ब्रिटीश कालीन आहेत, त्या 100 वर्षापूर्वीच्या आहेत हे खरे आहे. या जलवाहिन्यातून मोठया प्रमाणावर पाण्याची गळती होत असते हे देखील खरे आहे.परतु उन्हाळयाच्या दिवसात आणि या वर्षी पाऊस कमी पडलेला असतांना या गोष्टी का घडतात याचे कोडे मला अजूनही उलगडत नाही. माननीय मंत्री महोदयांकडे या संदर्भात काही अधिक माहिती असेल तर त्यांनी ती माहिती सांगावी. परंतु जे कोणी असे कृत्य करीत असेल ती टॅकर लॉबी असो वा अन्य कोणी असो त्याच्या विरुध्द कडक कारवाई केली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.सभापती महोदय, पाण्याच्या संदर्भात सातत्याने टॅकर लॉबी सबंधीची चर्चा होत असतांना पाणी माफीया कोण आहेत असा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित होत असतो. पाणी माफीयांना अटकाव करण्यासाठी दुर्देवाने कोणताही कायदा नाही. पाणी चोरी केल्याबद्दल पाणी माफीयांना शिक्षा करण्यासाठी आज कोणताही कायदा अस्तित्वात नाही अशी माझी माहिती आहे. तेव्हा असा जर कायदा नसेल तर नवीन समस्या , ग्लोबल वॉर्मिग , पर्यावरणातील बदल, पाण्याची समस्या इत्यादी बाबी विचारात घेतल्या पाहिजेत असे मला सांगावयाचे आहे. दिवसेंदिवस पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढणार आहे.अवेळी पडणारा पाऊस आणि पावसाळयात न पडणारा पाऊस या सर्व गोष्टीचा जर आपण विचार केला तर पुढच्या काळात पाणी माफीयासाठी कठोर कायदा करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. पाणी टंचाईमध्ये जर टॅकर्स लॉबीचा हात असेल तर टॅकर्स चालविणारे किती कंत्राटदार आहेत आणि ते पाणी कोठून घेतात हे शोधून काढले पाहिजे.

सभापती महोदय, मिनरल वॉटरसाठी मोठया प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो तेव्हा या कंपन्या कोणत्या ठिकाणाहून पाणी घेतात हे देखील शोधून काढले पाहिजे. या कंपन्याचे पाणी साठे कोणते आहेत, ते कोठून पाणी घेतात याचा विचार केला पाहिजे. अनेक कंपन्या मिनरल वॉटर म्हणून पाणी विकत असतात एक लिटर पाणी 13 ते 25 रुपयास विकतात, थिएटरमध्ये हेच पाणी 40 रुपयास आणि फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये हेच पाणी 80 रुपयास विकातात अशा प्रकारे अव्वाच्या सव्वा भावाने या कंपन्या पाणी विकत असतात . लोकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन विविध कंपन्या पाण्याचा व्यापार करीत आहेत त्याला आळा घालणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, कोणत्या व्यक्तिने कोण्ंत्या दराने पाणी विकावे यासंदर्भात आपल्याकडे कायद्यात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आज रस्त्यावर व्यवसाय करणारे घरगुती पाईप लाईनमधून पाणी घेतात आणि आपले धंदे करतात व स्वतःच्चे पोट भरतात. अशाप्रकारे पाण्याचा अपव्यय केला जातो.पाणी हा विषय संवेदनशील आहे आपल्या संस्कृतीप्रमाणे पाणी मिळणार नाही असे आपण म्हणू शकत नाही परंतु आज दुर्देवाने या विषयावर चर्चा करण्याची वेळ सभागृहामध्ये आलेली आहे.

सभापती महोदय, मानखुर्दच्या झोपडपट्टीमध्ये सर्वात जास्त अनधिकृत पाण्याची कनेक्शन्स दिली गेली आहेत हे आपणा सर्वांना माहिती आहे.परंतु आपण त्याकडे डोळेझाक करतो. पाणी हा विषय संवेदनशील असून पाणी ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे म्हणूनच आपण त्याकडे डोळेझाक करतो.सभागृहाला माझी अशी विनंती आहे की, येणा-या पंधरा जुलै पर्यत पाणी मिळेल असे सन्माननीय नगर विकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी मध्यंतरी प्रश्नाला उत्तर देत असतांना सभागृहाला सागितले होते तरी सुध्दा धरणामध्ये पाण्याचा जो डेड स्टॉक आहे त्याचे मूल्यमापन करण्याची गरज आहे. मुबईकराना पाणी कधी आणि कोठपर्यत देऊ शकतो हे आपल्याला माहीत असे पाहिजे. त्याचबरोबर या काळात बिल्डर लॉबी विविध प्रकारचे बांधकाम करण्यासाठी पाण्याचा वापर करीत असते त्यावर बंधन घालणे आवश्यक आहे . असे करणे थोडे अवघड आहे याची मला कल्पना आहे. बिल्डर्सकडून टॅकरव्दारा पाणी वापरले जाते तसेच कनेक्शन घेऊन पाणी वापरले जाते तेव्हा त्यावर बंधन घातले गेले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.त्याचबरोबर पुढच्या वर्षी लवकर पाऊस पडो आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यापासून महाराष्ट्र आणि मुंबई वाचो अशी प्रार्थना करुन माझे दोन शब्द सपवितो. जय हिंद ,जय महाराष्ट्र.

------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य सन्माननीय श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हे विचार व्यक्त करीत असतांना पाण्याच्या ज्वलंत प्रश्नावर मी या सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. या राज्यामध्ये गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्यामुळे यावर्षी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. कधी नव्हे इतक्या 20 हजार गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झ ााली आहे. पावसाळयात देखील लोकांना पाण्यासाठी वण वण फिरावे लागत होते. ग्रामीण भागामध्ये गुरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर्षी पाऊस देखील अवेळी पडतो, अवकाळी पडतो, दर महिन्याला कधी ना कधी तरी पडतो. हा अवेळी पडणारा पाऊस नुकसानकारक ठरतो. त्यामुळे पूर येतो, महापूर येतो. आणि या जमिनीवर पडलेले पाणी वाहून जाते. अशाप्रकारे या निसर्गाचे वेळापत्रक बदलले आहे. इतक्या मोठया प्रमाणात अतिवृष्टी होऊन देखील पाण्याची टंचाई या राज्यामध्ये कायमच राहिलेली आहे. गेल्यावर्षी राज्यातील अनेक खेडेगावामध्ये देखील पावसाळयात पाण्याच्या टंचाईचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याठिकाणी लोकांना पाण्यासाठी वण वण फिरावे लागत होते. दर दीड ते दोन महिन्यांनी टंचाईग्रस्त गावांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. त्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करुन देखील आपण पाण्याचे व्यवस्थित नियोजन करु शकलो नाही. आपण राज्यामध्ये पाण्याच्या अनेक योजना तयार केल्या. राज्यामध्ये शेतीसाठी, सिंचनासाठी धरणे बांधली. परंतु त्या धरणांतील पाण्याचा वापर आज पिण्यासाठी करावा लागत आहे. त्यामुळे त्या धरणामध्ये आज अतिशय कमी प्रमाणात पाण्याचा साठा शिल्लक राहिला आहे. त्यादृष्टीने आपण कसा मुकाबला करणार आहोत? या संदर्भात स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात शासनाने काही निर्णय घेण्याची आता वेळ आली आहे. याठिकाणी आदरणीय नामदार प्रा. लक्ष्मणराव ढोबळे साहेबांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी दोन महिन्यापूर्वीच पाण्याच्या नियोजनाला सुरुवात केली आहे. त्यासाठी त्यांनी चारही महसूली विभागामध्ये बैठका घेतल्या आहेत. आमच्या विभागामध्ये लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून पाण्याचा प्रश्न कसा सोडविता येईल, आणि जिल्हयासाठी जल धोरण कसे आखता येईल, यासाठी कोणती उपाय योजना करता येईल? याबाबत त्यांनी अतिशय चांगले मार्गदर्शन केले. परंतु तरीदेखील प्रत्येक माणसापर्यंत या गोष्टी पोहोचल्या आहेत काय? हा खरा प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे....

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये ज्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे त्याचप्रमाणे मुंबईसारख्या शहरामध्ये देखील पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. या समस्येला तोंड देण्याकरिता मुंबई महानगरपालिकेला पाणी कपातीचे धोरण आखावे लागत आहे. मुंबई शहराला तलावामधून, जलवाहिन्यांव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. त्या जलवाहिन्या आज जीर्ण झालेल्या असल्यामुळे ठिकठिकाणी फुटून त्यामधून लाखो लिटर पाणी वाहून जात आहे. त्यामुळे देखील मुंबईतील लोकांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. त्याचप्रमाणे पाण्याची चोरी देखील होत आहे. याला जबाबदार कोण आहे? अशापध्दतीने लोकांची कुचंबणा करण्यासाठी कोण जबाबदार आहे? हे आपल्याला पहावे लागेल. त्यासाठी शासनाला आपली भूमिका ठरवावी लागेल. यामध्ये पाणी पुरवठा करणारे अधिकारी आणि टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणारी टॅंकर लॉबी यांच्या संगनमताने कृत्रिम पाणी टंचाई निर्माण केली जात आहे. ती जाणुनबुजून निर्माण केली जात आहे की काय? अशाप्रकारच्या अनेक शंका-कुशंका निर्माण होत आहेत. त्यावर मात करण्यासाठी शासनाने मुबलक पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्याकरिता कमी-अधिक प्रमाणात जल नियोजन करावे लागेल. पाण्याची उपलब्धता करुन देण्याकरिता निश्चितपणे दोन प्रकारचे विचार आपल्याला करावे लागतील. चालू वर्षातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे. तसे केले तर आपल्याला कायम स्वरुपी पाणी टंचाईवर मात करता येईल. तशाप्रकारची उपाय योजना आपण केली पाहिजे. जलसंवधर्नाच्या माध्यमातून, पुर्नभरणाच्या माध्यमातून, नद्या जोड प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्याला कायम स्वरुपी पाणी टंचाईवर मात करुन टॅंकरमुक्त गाव करण्याच्या संदर्भात नियोजन करता येईल हा यामधील एक भाग आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/MMP/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:55

श्री.दिलीपराव सोनावणे . . . .

अनेक तलाव असतील, अनेक धरणे असतील परंतु आज ती गाळाने भरल्यामुळे पाण्याचा साठा कमी होत आहे. गाळ उपसण्याचे काम असेल, नदी जोड असेल अशी कामे यानिमित्ताने करावी लागणार आहेत. आपल्याला जल-नीती देखील निश्चितपणे लोकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वॉटर हॉर्वेस्टींग असेल, जल धोरणाच्या संदर्भात आपल्याला पाणी वापरावर काही बंधन घालावी लागणार असतील, पाण्याचे संवर्धन करावे लागणार असेल तर ते देखील करणे आवश्यक आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो की, जीवन प्राधिकरणाच्या संदर्भात, स्व-जलधारा आणि भारत निर्माणच्या संदर्भात पाण्याच्या अनेक योजना आखत असताना, आज अशी स्थिती आहे की, अनेक योजना बंद पडलेल्या आहेत. त्यामुळे पैसा वाया गेला आणि तेथे वेगवेगळया पध्दतीचा भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे अशा योजनांच्या कामाची चौकशी करुन, तेथे पारदर्शकपणे काम करता येईल काय हे देखील पहावे लागणार आहे. ग्रामीण भागामध्ये जेथे पाण्याचा साठा असतो, तेथे शिवकालीन साठवण बंधारे बांधण्याच्या योजना हाती घेतल्या तर निश्चितपणे यातून मार्ग निघेल आणि आपल्याला पाण्याचा प्रश्न सोडविता येईल . म्हणून आज अतिशय महत्वाच्या विषयावर विचार मांडत असताना शासनाच्या माध्यमातून जल प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत निश्चितपणे प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. आज या चांगल्या विषयावर बोलण्यासाठी मला संधी मिळाली याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .4 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय चांगल्या विषयाच्या संदर्भातील चर्चेला सुरुवात झालेली आहे. मी या चर्चेमध्ये भाग घेताना एका गोष्टीचा उल्लेख करु इच्छितो आणि त्या माध्यमातून मी माननीय मंत्री महोदयांना आणि माननीय राज्यमंत्री महोदयांना एका गोष्टीची कल्पना देणार आहे.

सभापती महोदय, जल स्वराज्य हा केंद्र शासनाचा अतिशय चांगला प्रकल्प आहे. पण तो प्रकल्प राबविताना त्यावर कोणाचाही अंकुश नाही. आता दुसऱ्या टप्प्यामध्ये सुध्दा या कामासाठी पावणे बाराशे किंवा बाराशे कोटी रुपयांच्या जवळपास निधी मिळत आहेत. पण त्याचबरोबर या ठिकाणी बऱ्याच अधिकाऱ्यांकडून मनमानी होत आहे. मी एक उदाहरण देऊ इच्छितो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 75 गावांमध्ये जल स्वराज्य योजना राबविलेली आहे. यासाठी 18 महिन्यांची मुदत होती. यासाठी मुदत संपल्यानंतर देखील दोन वेळा मुदतवाढ दिलेली आहे.पण 75 गावांपैकी आज फक्त ग्राम पंचायतने 4 जल स्वराज्यच्या योजना ताब्यात घेतलेल्या आहेत. हा एका जिल्ह्यापुरता विषय नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा प्रकारच्या योजना अपूर्णावस्थेमध्ये आहेत. येथे काम करण्यासाठी डेप्युटी इंजिनिअरला 25-25 टक्के जास्त सॅलरी दिली जाते. मग याबाबतीत रेग्युलर काम करीत असताना जिल्हा परिषदेला किंवा पाणी पुरवठा विभागाला तेथील जे जे.ई. असतील, तेथील डेप्युटी इंजिनिअर असतील किंवा कोणी क्लार्क असतील तर तेथील जिल्हा परिषदेकडेच या योजना द्याव्यात. ही योजना ग्राम पातळीपर्यंत जावी असा शासनाचा निर्णय असला तरी तेथील सरपंच, ग्रामसेवक किंवा तेथील कमिटी.....आता कमिटी-कमिटी मध्ये देखील वाद झाले आहेत. आता आपण यासंबंधातील सर्क्युलरमध्ये बदल केलेला आहे. पण आता तेथे सरपंच यांनी अध्यक्ष व्हावे की गावातील कोणी अध्यक्ष व्हावे यावरुन देखील वाद सुरु झाले आहेत. कारण ग्राम पंचायतीला ही सर्वात मोठी कामे हाताळताना फार कठीण जात आहे. शासन तेथे वेगळी यंत्रणा राबवित आहे. पण माझी या निमित्ताने मागणी आहे की, या योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविल्या जाव्यात आणि या योजनांमध्ये पारदर्शकता येण्यासाठी काय-काय करता येईल ? या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. एकेका जिल्ह्यामध्ये जल स्वराज्याच्या गाडया असतात, आता सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशा तीन गाड्या आहेत.आपण त्यांची जर बिले पाहिली तर मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, या सगळयावर जो खर्च होत आहे, त्याचा आपण विचार करावा. ही योजना पाहिजे तर ग्राम पंचायतीकडे द्यावी पण जिल्हा

. . . .4 एफ-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली . . . .

परिषदेचे जे जे.ई., डेप्युटी इंजिनिअर असतील, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर असतील यांचे या कामावर कशा प्रकारे निरीक्षण राहील यादृष्टीने प्रयत्न करावेत, तरच ही योजना योग्य प्रकारे राबविली जाईल. कारण याबाबतीत एक नियम आहे की, तुम्हाला गावामध्ये 15 वर्षापर्यंत दुसरी योजना राबविता येणार नाही. म्हणून या योजनेचा वापर कशा प्रकारे जास्तीतजास्त करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, काल आणखी एक गोष्ट झालेली आहे की, सन 2002 आणि 2010-2011 साठी वार्षिक जिल्हा आराखड्यातून "साधी विहीर" लेखाशीर्ष, 2215/7182 हे शासनाने काढूनच टाकलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

आपल्याला कल्पना आहे की, कोकणात ग्रामीण भागात भौगोलिक रचना फार वेगळी आहे. त्या ठिकाणी जलस्वराज्य योजना होईलच असे नाही. त्या ठिकाणी साध्या विहिरी घ्याव्यात. पण तो हेडच शासनाने काढलेला आहे. तो हेड परत निर्माण करावा अशी मी मागणी करतो. या ठिकाणी पाण्याच्या संदर्भात बरीच चर्चा झाली. जाता जाता कोयनेच्या पाण्याच्या संदर्भात एक विषय मांडतो. त्याबाबत मी ठरावाव्दारे सुध्दा दोन वेळा चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. आज मुंबईचा विचार केला तर या ठिकाणी दररोज 420 कोटी लिटर पाण्याची मागणी आहे आणि आपण 320 कोटी लिटर पाणीपुरवठा करतो. परंतु त्या ठिकाणी 67 टीएमसी पाणी समुद्रात वाहून जाते. या संदर्भात मी सातत्याने मागणी करतो. मी शासनाला धन्यवाद देईन की अंशत: शासनाने मागणी मान्य केली. त्यासंदर्भात जो रिपोर्ट द्यावयाचा आहे त्या अनुषंगाने शासनाने सर्व्हे करण्यासाठी 1 कोटी रुपये दिले. पेंडसे समितीचा अहवाल सुध्दा आलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, मुंबई, कोकण या सगळ्या भागातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सुटेल एवढी ताकद त्या पाण्यामध्ये आहे. त्यावर शासनाने विचार करुन त्यादृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न करता येतील ते करावे अशी मी विनंती करतो.

जलनीती आखताना भारत निर्माण योजना असेल, जलस्वराज्य योजना असेल, जिल्हा परिषदेच्या योजना असतील याबाबत विचार करीत असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना आपण बंद केल्या. परंतु त्यांच्या ज्या मोठ्या योजना आहेत त्या कोकणातील भौगोलिक रचनेमुळे ग्रामीण भागात यशस्वी होत नाहीत. त्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या छोट्या छोट्या योजना चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. म्हणून ग्रामीण भागात भौगोलिक रचनेचा विचार करुन त्या ठिकाणी छोट्या छोट्या योजना कराव्यात अशी मागणी मी या निमित्ताने करतो. भारत निर्माण, जलस्वराज्य किंवा ज्या विविध योजना आहेत त्या एकत्रित कराव्यात आणि त्यांचे चांगल्या प्रकारे नियोजन करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो. जलस्वराज्य योजना तसेच भारत निर्माण योजनेमध्ये लोकप्रतिनिधींचा, आमदारांचा समावेश कसा करुन घेता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ MMP/ KGS

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना आज या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेब तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलत असताना मी सांगेन की, महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात सुध्दा आपण एका गोष्टीला सामोरे जात आहोत आणि अजूनही संपूर्ण राज्यभर सर्व गावांच्या बाबतीत आपण पेयजलाचा प्रश्न सोडवू शकलेलो नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी समग्र विचार एकत्रितपणे समोर ठेऊन राज्याची पाण्याची गरज, जिल्हावार गरज लक्षात घेऊन नदीच्या स्त्रोतानुसार तालुकावार आणि गाववार विभागणी करावी अशी मी मागणी करतो. प्रत्येक गावाची गरज भागविण्याच्या दृष्टीने आपल्याला नियोजन करावे लागणार आहे असे मला वाटते. पाण्याच्या नियोजनाच्या बाबतीत आपण सर्व व्यवस्था करीत असताना पाहतो की, काही वेळा अचानक दुष्काळ पडला किंवा काही संकट आले तर आपण वेगळ्या प्रकारचा निधी देतो किंवा वेगळ्या योजना राबवून त्या ठिकाणी पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न करतो. मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, या राज्यामध्ये काही कायम दुष्काळी तालुके आहेत आणि त्या तालुकयात प्रत्येक वर्षी काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना त्या कायम दुष्काळी भागात असणाऱ्या काही गावांना कायम वर्षभर टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. माझ्या कवठेमहांकाळ तालुक्यातील अशी अनेक गावे सांगता येतील कीज्या ठिकाणी वर्षभर टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. कवठेमहांकाळ तालुक्यातील लंगरपेठ या गावात वर्षभर टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. जो अवकाळी पाऊस झाला त्यामुळे काही लोकांचे नुकसान झाले. फयान वादळ झाले त्यामुळे नुकसान झाले. असे नुकसान होऊ नये. त्या ठिकाणी जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये मोठा पाऊस झाला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

गावामध्ये कोणत्या तारखेला टँकर येणार आहे त्याची लोक वाट पहात असतात. पण काही दिवसांपूर्वी आमच्या भागात अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसाचा लाभ काय झाला असेल तर पाण्याचे टँकर लावणे लांबणीवर पडले. लोकांना पिण्याचे पाणी मिळाले. म्हणजे कोणाला हा अवकाळी पाऊस म्हणजे संकट वाटले असेल, परंतु आमच्या गावाला या अवकाळी पावसामुळे पाणी मिळाले आहे. परंतु अशा नैसर्गिक आपत्तीची वाट न पाहण्याची वेळ येऊ नये. मंत्री महोदय, सुध्दा दुष्काळी भागातील आहेत. त्यामुळे दुष्काळी भागातील, दुष्काळी जनतेच्या समस्यांचा त्यांचा अतिशय गाढा अभ्यास आहे. म्हणून आपल्याला विनंती करावयाची आहे की, कायम स्वरुपी हा प्रश्न निकाली काढावा. त्यासाठी विहिरी बांधाव्यात, तलावाची कामे हाती घ्यावी, नळ पाणीपुरवठा योजना घ्याव्या. मी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास मंडळाचा अध्यक्ष आहे. या महामंडळाला निधी दिला जात नाही म्हणून मी नेहमी बोलत असतो. कवठेमहांकाळ तालुक्यात रांजणी फार्म आहे. त्याठिकाणच्या विहिरीला भरपूर पाणी आहे. त्या फार्मच्या शेजारी 6-6 हजार लोकवस्तीची गावे आहेत. त्या गावांना पाणी टंचाई असल्यामुळे मी माझ्या महामंडळाच्या अधिका-यांना कामाला लावले. सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्वांनी एकत्र बसून ती विहिर अधिग्रहित करण्याची सूचना तहसीलदारांना दिली. त्या विहिरीच्या पाण्यावर नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्यात आली आहे. एखाद्या वेळी शेळयांना पाणी मिळाली नाही तरी चालेल, वैरणीची योजना कमी झाली तरी चालेल, परंतु त्या गावातील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी ती विहिर अधिग्रहित करुन आजुबाजूच्या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला आहे हे मी अभिमानाने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी मुद्दाम आठवण करुन देऊ इच्छितो की, पुराणातही पाण्याचे नियोजन केल्याचे आढळून येते. 800 वर्षापूर्वीचा इतिहास पाहिला तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी या राज्यामध्ये अनेक विहिरी खोदल्या होत्या याचे पुरावे सापडतात. ज्याला बारव असे म्हणतात. सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार यांनी सांगितले की, नाशिक जिल्हयात चांदवड

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.रमेश शेंडगे...

तालुक्यात अहिल्यादेवी होळकर यांनी विहिरी खोदलेल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मग मंगळवेढा तालुका असेल, सांगोला तालुका असेल या भागांमध्येही त्यांनी विहिरी खोदल्या होत्या. या विहिरी दुष्काळात सुध्दा आटत नाहीत असे नियोजन अहिल्यादेवी होळकर यांनी केले होते. तशाप्रकारे शासनाने पाण्याचे नियोजन करावे अशी विनंती करतो. या वर्षातील अर्थसंकल्पातील योजना पाहिल्या तर ग्रामीण जनतेला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा जरुर होईल आणि तो केला जावा अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या सदनाचे आदरणीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर याठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पाणी हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मला यानिमित्ताने सांगावेसे वाटते की, पाणी मोठे लबाड असते, पाणी प्रेतांना तरंगत ठेवते, जीवितांना भिजवत ठेवते, पाणी मोठे लबाड असते. आपला देश स्वतंत्र होऊन 50 वर्षापेक्षा अधिक काळ झाला आहे. राज्यात सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. परंतु या राज्यात 2000 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, असे का व्हावे ? या राज्याच्या अर्थसंकल्पात दरवर्षी पाणी पुरवठा करण्यासाठी तरतूद केली जाते. परंतु त्यासाठी एक ठोस कृती आराखडा का तयार केला जात नाही ? प्रत्येक गावासाठी लागणारे पाणी, तेथील लोकसंख्येचा विचार करुन पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत केले जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्वतंत्रपणे काम करीत आहे. या योजनांसाठी कोटयवधी रुपये खर्च होतात. परंतु त्या योजना टिकत नाहीत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विक्रम काळे...

त्या योजनातून पाणी लोकांपर्यन्त पोहोचते काय याचा आढाचा घेण्याची गरज निर्माण झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांना मी धन्यवाद देतो. आपण ग्रामीण भागातील आहात. या चळवळीतून आपण आलेला आहात. शेवटच्या माणसाला पाणी मिळाले पाहिजे याबद्दल आपल्या मनात कोठल्याही प्रकारची शंका नाही. पण योजनांची अंमलबजावणी ज्या पध्दतीने व्हायला पाहिजे त्या पध्दतीने ती होत नाही. आपण जल स्वराज्याच्या योजना ग्रामीण भागामध्ये राबविल्या. या जल स्वराज्य योजनांची आज काय अवस्था आहे ? आम्ही पंचायती राज समितीच्या माध्यमातून या जल स्वराज्य योजनांचा आढावा घेतला. कोणत्या पध्दतीने या योजनेची कामे होतात ? या योजनांसाठी कोटयवधी रुपयाचा निधी ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेला आहे. त्याना कोणत्याही प्रकारचे तांत्रिक ज्ञान नसते. पाईप कोणते खरेदी करायचे, टाकीचे बांधकाम कसे करायचे, पंप कोणते खरेदी करायचे इत्यादी बाबींचे कोणतेही ज्ञान ग्रामपंचायतस्तरावर नसते. हे सर्व काम सरपंचाला करावे लागते. तांत्रिक सल्ला देण्याचे काम अधिकारी करतात, परंतु त्यांच्यावर कोणतीही जबाबदारी निश्चित केलेली नसल्यामुळे काम बरोबर होत आहे की नाही याचे त्यांना काही देणे घेणे नसते. खरे म्हणजे पिण्याच्या पाण्याच्या योजना करीत असताना त्या चिरकाल राहतील अशा केल्या पाहिजेत. ज्या प्रमाणे जीवन प्राधिकरणाकडून, जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविल्या जातात त्याप्रमाणे जल स्वराज्य योजना देखील पूर्वी प्रमाणेच जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत राबविली गेली पाहिजे. ग्रामपंचायत स्तरावर सरपंचाकडून जेव्हा योजना राबविली जाते त्यावेळी योजना बरोबर राबविली गेली नाही, भ्रष्टाचार झाला तर कोणाला दोषी धरणार ? सरपंच हा लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्याला दोषी धरले जात नाही. कारण तो कोणत्या तरी पक्षाचा असतो किंवा कोणाचे तरी हितसंबंध जोपासले गेलेले असतात. पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी कोट्यवधी रुपये खर्च होत असताना त्या योजनेतून लोकांना पाणी मिळावयास पाहिजे. आपण पाहतो की, योजना केल्यानंतर पहिली एक-दोन वर्षे योजना चालते आणि नंतर ती बंद पडते. पाण्याचे स्त्रोत असताना लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आम्ही पाहिलेली आहे. म्हणून या जल स्वराज्य योजनेमध्ये आमुलाग्र बदल करावा लागेल. अशा प्रकारची सूचना आम्ही पंचायती राज समितीच्या माध्यमातून देखील

..2..

(श्री. विक्रम काळे...

ग्रामविकास विभागाला केलेली आहे.

पाण्याचा जपून वापर करावा यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आपण प्रचार आणि प्रसार करीत आहात. मध्यंतरीच्या काळामध्ये विहीर आणि बोअर पुनर्भणाची योजना राबविली. पण या योजनेची अंमलबजावणी किती झाली ? या योजनेला लोकांचा किती प्रतिसाद मिळाला ? या विहीर आणि बोअर पुनर्भरण योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने कोणताही ठोस असा कार्यक्रम आखला नाही. सर्वसामान्य माणसाने किंवा शेतक-यांने विहीर किंवा बोअरचे पुनर्भरण करण्याचे ठरविले तर त्यासाठी 5 ते 10 हजार रुपये खर्च येतो. हा खर्च ते करु शकत नाहीत. तेव्हा शासनाने लोकसहभागाच्या माध्यमातून 50 टक्के अनुदान देऊन ही योजना राबविली तर विहीर आणि बोअर पुनर्भरण योजनेला चांगला प्रतिसाद मिळेल आणि निश्चितपणे पाणी अडविले आणि जिरविले जाईल. पिण्याच्या पाण्याच्या योजना अनेक गावांना केलेल्या आहेत. 10-15 गावांच्या किंवा 20-30 गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना केल्या जातात. पाण्याचा स्त्रोत आणि उपलब्धता पाहून या योजना केलेल्या असतात. परंतु त्या योजनेद्वारे शेवटपर्यन्त पाणी पोहोचत नाही. उदा. 30 गावांची मिळून पिण्याच्या पाण्याची योजना असेल तर शेवटच्या 30व्या गावाला पाणी पुरवठा पोहोचत नाही.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.........

कारण एखादी योजना पूर्ण झाली की त्या योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही निधी त्यांच्याकडे नसतो. कोणतीही ग्रामपंचायत त्यासाठी पैसा देऊ शकत नाही. ग्रामीण भागातील लोक कर भरु शकत नाहीत हे अनेक प्रकरणांमध्ये सिध्द झालेले आहे. ग्रामीण भागातील सोडा, परंतु ज्या शहरी भागातील महापालिका आहेत, ज्यांना कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळते त्या महापालिका पाण्याचे बिल भरु शकत नाहीत. महाराष्ट्र राज्यात जीवन प्राधिकरणाची महापालिका आणि नगरपालिकांची मोठया प्रमाणात थकबाकी आहे. 3245.34 कोटी रुपये एवढी रक्कम थकलेली आहे. मग कसे चालायचे प्राधिकरण? कसा कर्मचाऱ्यांचा पगार व्हायचा? कशा योजना आणायच्या? कसे पाणी पाजायचे? असे प्रश्न प्राधिकरणामध्ये निर्माण झाले आहेत. महापालिका आणि नगरपालिकांकडे 3245 कोटी रुपयांची थकबाकी आहे. ती थकबाकी वसूल केली पाहिजे. एकीकडे आपल्याला कनेक्शन तोडता येत नाही. पाणी जीवनाशी निगडित असल्यामुळे नगरपालिकांच्या पाण्याचे कनेक्शन कट करता येत नाही. याचा गैरफायदा घेतात की काय अशी शंका येते. यासाठी कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे. ग्रामीण भागातील पैसे वसूल होणार नाहीत. परंतु शहरी भागातील नगरपालिका आणि महापालिकांकडे जी 3245 कोटी रुपयांची थकबाकी आहे ती प्राधान्याने वसूल केली पाहिजे. निश्चितपणे त्या माध्यमातून अनेक योजना राबविता येतील. आज 871 योजना जीवन प्राधिकरणाकडे आहेत. त्यातील जवळपास 60 टक्के योजना बंद आहेत. त्या कशामुळे बंद आहेत याचा आढावा घेतला पाहिजे. शेवटी एवढा निधी खर्च करुन त्यातील कितपत योजना सफल होतात? शेवटच्या घटकापर्यंत पाणी कितपत पोहोचते? पाणी उपलब्ध असताना शेवटच्या घटकापर्यंत ते पोहोचत नाही ही शोकांतिका आहे. त्यासाठी एक ठोस कृती कार्यकम आखून प्रत्येक गाव टँकरमुक्त झाला पाहिजे. मंत्रीमहोदयांच्या कार्यकाळात ते अशी योजना आखतील आणि सर्वांना पाणी उपलब्ध करुन देतील व गौरवास पात्र ठरतील अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद.

-----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सत्तारुढ पक्षाच्या वतीने मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अगोदरच्या वक्त्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांवर न बोलता ज्या मुद्यांना स्पर्श झालेला नाही तेवढ्याच मुद्यांना मी स्पर्श करणार आहे. पिण्याचे पाणी, शेतीला उपयोगाचे पाणी आणि औद्योगिक क्षेत्राला लागणारे पाणी या तीन कारणांसाठी होणारा पाण्याचा उपयोग लक्षात घेतला तर महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या पाण्याचे स्त्रोत, त्या पाण्याच्या स्त्रोतांचे व्यवस्थापन, वॉटर मॅनेजमेंट या तीनही बाबतीत त्या त्या ठिकाणची प्राप्त परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन करण्यामध्ये आपण कमी पडतो. त्याचे दुष्परिणाम आपल्याला पाणी टंचाईमध्ये पहावयास मिळतात. या तीनही बाबतीत चांगला समन्वय घडवून पाण्याचा उपयोग कसा करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, आज नागरीकरण वाढत आहे, शहरीकरण वाढत आहे. परंतु मुळचे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आहेत त्यांचे जतनीकरण करण्याकडे दुर्लक्ष होत आहे. नद्या बुजविणे, ओढे-नाले बुजविण्यामुळे पाण्याचे स्त्रोत नष्ट होणे, पुन्हा नवीन स्त्रोत निर्माण करणे यापेक्षा नैसर्गिक स्त्रोतांचे जतनीकरण करण्याबरोबर नवीन स्त्रोतांचा शोध घेणे आणि मानवनिर्मित पाण्याचे स्त्रोत निर्माण केले आहेत त्यांचे जतनीकरण केले पाहिजे. यात सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे वॉटर डिस्ट्रिब्यूशन. पाण्याच्या वितरणाकडे कमालीचे दुर्लक्ष होत आहे. शहरामध्ये एका माणसाला पाणी दिले जाते त्याच्या 10 टक्के सुध्दा पाणी खेड्यामध्ये देत नाही.

नंतर 4के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे ........

खेड्यात तर तीन-तीन, चार-चार दिवस पाणीपुरवठा होत नाही, शहरात मात्र मुबलक स्वरुपात पाणी मिळते. अशा प्रकारे समतोल पध्दतीने पाण्याचे वितरण होत आहे म्हणून पाण्याचे नियोजन आवश्यक आहे पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. शहरातील माणूस हा खेड्यातील माणसापेक्षा जास्त महत्वाचा आहे की काय अशी मला शंका येते. पाणी टंचाईवर पाण्याचे वितरण हा देखील एक उपाय आहे म्हणून त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

त्याचबरोबर समुद्राच्या पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे. अशा प्रकारे विचार करुन त्यादृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे.

त्यानंतर पाणी टंचाईला जलसिंचन योजना अथवा जीवन प्राधिकरण असो या सर्व ठिकाणी जो प्रचंड भ्रष्टाचार बोकाळलेला आहे तो देखील कारणीभूत आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. हा भ्रष्टाचार निपटून काढला आणि पाण्याचे गैरव्यवस्थापन जर दूर केले तरी देखील बरीच मदत होईल. कारण कोट्यवधी रुपये आपण पाण्यावर खर्च करीत असतो परंतु प्रत्यक्ष या योजनांचा फायदा मात्र होत नाही हा विषय गंभीर आहे. यासंबंधी विचार केला तरी आपल्याला चांगलीच मदत होऊ शकेल व त्यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी विनंती करुन अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा करण्याची संधी मिळाल्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

-------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, एका महत्वाच्या विषयाच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे. यामध्ये राज्याबरोबरच मुंबईतील पाण्याचा विषय देखील तितकाच महत्वाचा आहे परंतु माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव सभागृहात उपस्थित नाहीत. ते सभागृहात हजर असावयास पाहिजे होते.

श्री. लक्ष्मणराव ढोबळे : महोदय, माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी मला नोट्स घेण्याबाबत विनंती केली असून मी तशा नोट्स घेत आहे.

श्री. दिवाकर रावते : या प्रस्तावावर बोलताना मी प्रथम असे सांगणार आहे की, या राज्यात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई असते त्याप्रमाणे यावर्षी देखील संपूर्ण राज्य पाण्याच्या प्रश्नावर पेटलेले आहे आणि सभागृहात मात्र अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा सुरु आहे. सत्तारुढ पक्षाचा हा प्रस्ताव असल्याने मला यावर बोललेच पिाहजे, आपली मते मांडलीच पाहिजे. मी बोललो नाही तर पाणी कोठून येईल अशा प्रकारची भावना झाली असून या चिंतेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी जे विचार सदनात मांडले आहेत ते ऐकल्यानंत मला बोलण्याची इच्छा नाही.

महोदय, गेल्या दहा वर्षाचा अक्कलशुन्य कारभार कसा होता हे प्रत्येकाच्या तोंडून ऐकताना मला आनंद होत होता. पण हे विचार मांडत असताना त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना कळले नाही की दहा वर्षांपासून आपणच सत्तेवरआहोत त्यामुळे पाण्याची जी उद्ध्वस्तता या राज्यात निर्माण झाली तो कारभार सुध्दा आपलेच लोक करीत होते. या काळात फक्त मंत्री बदलले, पण खाते मात्र तुमच्याकडेच होती. तरी देखील हे सांगताना त्यांना काही वाटलेच नाही. राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेली 20238 गांवे असताना सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे प्रस्ताव मांडण्यात सुध्दा दुर्भिक्ष्यच दिसून येत होते हे दुर्दैव आहे. राज्याच्या ग्रामीण भागाला समृध्दी देण्याचे वचन देत असलेल्या या सरकारला माहीत नाही की खेड्यातील आमच्या आया-बहिणी मैलोन्मैल पायी जाऊन पाणी आणतात असे आपल्याच तोंडून हे सांगत आहेत तेव्हा माझे सरकार किती कुचकामी व एकमेव आहे हे सांगताना राज्याचे दुर्भिक्ष्य सुध्दा ते सांगत होते त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. प्रस्तावात सुध्दा पश्चिम महाराष्ट्रातील लोक राज्य करतात अशा प्रकारे राज्यातील सर्व लोकांचे मत आहे ते दृढ करण्याचे काम आपल्या प्रस्तावाने केले आहे. मुळात प्रस्तावातच म्हटले आहे की, "राज्यात तीव्र पाण्याची टंचाई असताना खास करुन पश्चिम

....3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

महाराष्ट्र" असा उल्लेख करण्याची गरज नव्हती. परंतु "पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी जिल्हे" असा उल्लेख या प्रस्तावात केलेला आहे. कोकणातील ठाणे, रायगड जिल्हे असे म्हटले असते तर समजू शकलो असतो परंतु पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांशी जिल्हे असे म्हणण्याची गरज काय होती. मग फक्त 422 टँकरच या भागात चालतात काय ? माननीय मंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे साहेब आता पुन्हा मंत्री म्हणून आलेले आहेत, मध्ये त्यांचा काही काळ गॅप पडलेला आहे....

( **सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे** )

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे, कुठे गेला पैसा, कुठे गेल्या योजना, काय केले तुम्ही ? असे जोरजोरात विचार मांडत होते. आपल्याच सरकारचे कपडे व्यवस्थित काढण्याचे काम आपलाच एक सदस्य करतो आणि खालून कुणी तरी बोलले की, "ठिबक सिंचन तुला माहिती नाही काय ?" सभापती महोदय, मी सुध्दा ग्रामीण भागात फिरतो तसेच आपण सुध्दा ग्रामीण भागातून फिरत असता. पाण्याचा विषय हा सरकारचे वाभाडे काढण्याचा विषय नाही परंतु माननीय ढोबळे साहेब आयुष्यात चांगले काम करुन दाखवण्याची तुम्हाला परमेश्वराने संधी दिलेली आहे. तुम्ही परमेश्वर मानत नाही हे मला माहिती आहे, भाग्य सुध्दा तुम्ही मानत हे सुध्दा मला माहिती आहे. परंतु तरीही तुम्हाला तुमच्या जीवनात एक चांगली संधी मिळालेली आहे. तुम्ही उपेक्षित समाजात जन्माला येऊन या ठिकाणी सन्मानाने महाराष्ट्राचे राज्यकर्ते झालेला आहात त्यामुळे तुम्हाला मिळालेल्या संधीचे सोने करण्याकरिता एकदा तरी तुम्ही प्रामाणिकपणाचा बडगा मारणार आहात का असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झालेला आहे. तुम्ही जर चांगले काम केले, चांगला निर्धार करुन योजना आखल्या व आपण लोकमान्य झालात तर मला आनंद होईल. परंतु प्रत्येक जिल्हापरिषदेमध्ये जेवढे जेवढे कोल्हापुरी बंधारे उभे केले त्यातील 70 टक्के बंधारे कसे आहेत हे आपल्याला माहिती आहे, यामध्ये किती भ्रष्टाचार झालेला आहे याची आपल्याला माहिती आहे. हे बंधारे का फुटतात, या बंधा-यात पाणी का साचत नाही, या ठिकाणच्या बंधा-यात कशा प्रकारचा भ्रष्टाचार होतो, लाखो करोडो रुपये बंधा-यासाठी खर्च करुन सुध्दा त्या बंधा-यात पाणी थांबत नाही अशी परिस्थिती ग्रामीण भागात निर्माण झालेली आहे. यासंदर्भातील लेखाजोखा घेऊन, ऑडीटची पुस्तके वाचावयाची, महालेखापालाने जेवढे म्हटले तेवढे वाचावयाचे आणि सोडून द्यावयाचे व त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. पुढचे पाठ आणि मागचे सपाट असे सुरु झालेले आहे.

जलसंधारणाच्या योजनेमध्ये पाणी अडवा-पाणी जिरवा यासाठी आपण गेल्या 15 वर्षात किती करोडो रुपये खर्च केले याचा एकदा हिशोब मांडा. मला हा हिशोब मांडण्यास वेळ कमी आहे त्यामुळे मी येथे हिशोब माडत नाही. हा हिशोब मांडल्यानंतर डोळे पांढरे होतील. आतापर्यंत आपण या योजना व्यवस्थित राबविल्या असत्या तर प्रत्येक घरा-घरात पाणी पोहचले असते व पाणी टंचाईचे दिवस आपल्याला पाहण्याची वेळ आली नसती. पाण्यासाठी आपण पैसे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

खर्च केले परंतु पाणी अडवण्याचे काम आपल्याकडून काहीही झाले नाही. आपल्या सभागृहात आपण रोजगार हमी योजनेचे कौतुक करतो. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामे करुन घेत आहोत असे छातीठोकपणे येथे सांगितले जाते परंतु दुर्दैवाने या योजेनेचे नक्की काय झाले? गोरगरिबांच्या हाताला काम मिळवून देणारी राजगार हमी योजनेचे निकष बदलवत बदलवत आता ती ठेकेदारांची योजना झालेली आहे. ठेकेदारांची योजना आपण केल्याबद्दलही दुःख नाही पण यांने काम करुन, भुकेल्या पोटाचा आधार उध्वस्त करुन तुम्हाला पाणी सुध्दा अडवता आले नाही. पाण्याच्या भ्रष्टाचारात जो पैसा गेला आहे त्यासंदर्भात या ठिकाणी माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांच्यामधील प्रामाणिकपणा जर सरकारमध्ये उतरला तर या महाराष्ट्रातील अर्धा भाग तर नेहमी पाण्याखाली राहू शकेल. सन्माननीय सदस्यांचे तडफडणे किती जरी असले तरी त्याचा काही एक उपयोग होत नाही. माननीय कुलकर्णी साहेब आपल्या भाषणात सर्व व्यथा मांडतात परंतु ते नाईलाजाने सत्ताधारी पक्षात असल्यामुळे "शेवटी मी पाठिंबा देतो" असे त्यांना बोलावे लागते. त्यांच्या बोलण्यातील त्यांची तळमळ, कळकळ आणि व्यथा ते नेहमी मांडत असतात.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पाणी टंचाईवर सत्ताधा-यानी बोलायचे ? आपले सरकार या राज्यात गेल्या 10 वर्षापासून असतांना आपण पाणी टंचाई का दूर शकला नाहीत ? का मोठ मोठी गावे पाण्यामुळे उध्वस्त झाली ? का धरणे ओस पडली? कुठे गोलमाल झाला ? मराठवाडा आणि विदर्भातील पाणी टंचाईवर आता आम्ही काय बोलायचे असा प्रश्न निर्माण होतो. कोकणातील पाणी आमच्या डोळयासमोर वाया जाते हे आपण आपल्या उघडया डोळयांनी बघतो परंतु ते पाणी अडविता येत नाही. म्हणजे असून नसल्यासारखे आणि नसून असल्यासारखे आहे. अशी अवस्था ही कोकणाचीच नाही तर मराठवाडा, विदर्भाचीही तीच स्थिती् आहे. एकाकडे पाणी आहे परंतु ते अडविता येत नाही आणि दुसरीकडे अजिबात पाणी नाही ते मिळवता येत नाही व पाणी टंचाईवर आपण चर्चा करण्यास उभे राहतो. किती बोलावे आणि काय बोलावे हा प्रश्न पडतो. पाण्याची परिस्थिती ही दिवसेंदिवस गंभीर होत जाणार आहे. या सदनामध्ये पाणी

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

टंचाईवर बोलत असतांना पापाची घागर तुम्ही डोक्यावर घेऊन, तुमचा प्रस्ताव घेऊन आला असतांना मी आपल्याला एकच सांगू इच्छितो की, तुम्ही किती उघडे आहात आणि मी किती नागडा आहे हे सांगण्यापेक्षा महाराष्ट्रातील पाणी टंचाईला आता एक मुखाने सर्वांनी एकत्र उभे राहून जनतेला आधार देण्याची पाळी आलेली आहे अशी अत्यंत भिषण पाणी टंचाई भविष्यात येणार आहे. जरा काही झाले की, कोंडीत कसे पकडता येईल हे पाहिले जाते.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मुंबई महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला बदनाम कसे करता येईल याचा विचार आपण करीत आहात. यासाठी आपण रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहात. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, आडात नाही ते पोहऱ्यात कुठून येणार ? पाणी नसेल तर ते कुठून आणणार. दगड फेकून,आंदोनल करून, एकामेकाला हाणामाऱ्या करून पाणी निर्माण करता येत नाही. लाथ मारीन तिथे पाणी काढले पाहिजे. परंतु, लाथ मारीन तेथे पैसा काढीन अशी संस्कृती आपण राज्यामध्ये रूजवली आहे. लाथ मारीन तेथे पाणी काढेन ही आपली प्रवृत्ती नसल्यामुळे आंदोलने करण्यापेक्षा पाणी कुठून येणार हे आपण प्रथम सांगावे. ते येत नसेल तर त्याकरिता आंदोलन करा. मुंबईचा पाण्याचा प्रश्न येथे सत्ताधारी पक्षाने प्रस्तावाच्या निमित्ताने मांडलेला आहे. नक्की आपल्याला काय म्हणायचे आहे हे कळेनासे झालेले आहे. 100 वर्षाच्या जुन्या पाईप लाईन्स आहेत असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? तसे जर म्हणावयाचे असेल आणि नवीन पाईप लाईन घालायची असेल तर त्यासाठी जेवढा काही खर्च येईल त्यापैकी काही भार हा राज्य शासन उचलेल. एवढेच नव्हे तर राज्य शासन बिन व्याजी कर्ज देण्यास तयार आहे, आपण ताबडतोब कामाला सुरूवात करावी, मुंबईतून काँग्रेसला निवडून देणाऱ्या जनतेला पाणी देण्यासाठी आम्ही पैसा देतो असे म्हणणयाची तरी हिंमत दाखवावी. मुंबई महानगरपालिका शिवसेना-भाजपच्या ताब्यात असल्यामुळे आपण पाणी टंचाईचा उपयोग करीत आहात. मी या सदनामध्ये सांगत आहे की, पाणी टंचाई गंभीर आहे. त्यामुळे तुम्ही कोण, आम्ही कोण हे सांगत बसण्यापेक्षा आपण लोकांना एकत्रितपणे दिलासा दिला पाहिजे. पण युतीच्या मागे लागून त्यांची बदनामी करण्याचा पण कोणी घेतला असेल तर तो योग्य होणार नाही. एवढ्या वर्षात कधीही पाण्याची लाईन फुटली नाही. पण आता वारंवार का फुटत आहे. रोजच्या रोज पाईप लाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. याबाबत आपण कोणती चौकशी करणार आहात हा देखील प्रश्न आहे.

सभापती महोदय, पाईप लाईनवरील झोपड्या निष्कासित कराव्यात असा आदेश उच्च न्यायालयाने दिलेला आहे. खंडपीठामध्ये संघर्ष कसा झाला हे देखील मी आपल्याला सांगणार आहे. खंडपीठापुढे जे भाष्य झाले ते मी आपल्याला सांगतो. 150 कि.मी.पैकी 90 कि.मी.पाईप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

लाईन जमिनीवर आहे. याच्या सुरक्षिततेसाठी आपण काय केले ? असे न्यायाधिशांनी विचारले. महानगरपालिकेने सांगितले, सर्वच पाईप लाईन जमिनीखाली पाहिजे असे कायद्यात कुठे म्हटले आहे. हा खंडपीठापुढील सवाल जबाब आहे. त्यावर खंडपीठ म्हणाले आम्ही कायद्याचे काही म्हणत नाही. मात्र जमिनीवर पाईप लाईन व्यवस्थित ठेवावी असे सांगत आहोत. त्यावेळी न्यायालयाने सांगितले 100 वर्षापासूनची पाईप लाईन आहे. आजपर्यंत त्याची कोणी चिंता केली नाही. आता त्याचा गवगवा कशासाठी सुरू आहे? खंडपीठाने जे सांगितले ते सरकारचे कान उघडण्यासाठी. न्यायालयाने असे सांगितले 100 वर्षामध्ये कराचीतून येऊन मुंबईमध्ये कोणी हल्ला केला नव्हता. परंतु, आता जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत चालली आहे. पाईप लाईनमधील पाण्यात कोणी विष टाकून घातपात केला तर... या चिंतेने लोक त्रस्त झाले आहेत. याची ताबडतोब दखल घ्या. ही सर्व चिंता लक्षात घेऊन पाईल लाईन भोवती असलेल्या झोपडपट्ट्या ताबडतोब काढून टाका अशा प्रकारचे आदेश दिले. पाईप लाईनच्या बाजूला असलेल्या झोपडपट्ट्या काढण्यासाठी सरकारकडून पोलीस बंदोबस्त मिळत नाही, ही महापालिकेची रडारड आहे.

सभापती महोदय, लोंढे आवरण्याकरिता मी एक विधेयक आणले आहे. पण त्यापासून मला रोखले आहे. हे विधेयक का आणले हे सांगण्यासाठी मला एक दीड तास लागणार आहे. मला घटनात्मक मुद्यावर चर्चा करावयाची आहे. मी संधीची वाट पाहतो आहे. त्याला महत्व किती आहे हे मी येथे उद्धृत करीत आहे. न्यायालयाने महापालिकेला दम भरून विचारले की, लोंढे येत आहेत, आपण कसे थांबविणार. आयुक्तांनी उच्च न्यायालयाला सांगितले लोंढे रोखणे आमचे काम नाही. आम्ही कुठे-कुठे लक्ष ठेवणार. न्यायालयाने महापालिका आयुक्तांना तंबी भरली मग पालिका हवी कशाला. उच्च न्यायालय खवळले. झोपड्या हटविण्याची समिती नेमली. चिडलेल्या न्यायालयाने आमच्या महापालिका आयुक्तांना विचारले. खरे म्हणजे आपल्या मुख्य सचिवांना विचारायला पाहिजे होते. पाईप लाईनचे संरक्षण करण्याकरिता झोपड्या हटविणे आवश्यक आहे. म्हणून मी विचारले की, श्री.भास्करराव जाधव कुठे आहेत. आमचे श्री.ढोबळे साहेब नोंद घेत आहेत. त्यांनी या मुद्यासंबंधी सभागृहात उत्तर देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

.माननीय मंत्री महोदयांच्या कोणत्याही उत्तरापेक्षा मुंबईच्या पाणी पुरवठयाच्या संदर्भात जी काही परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबतीत सरकारची भूमिका ऐकणे फार महत्वाचे आहे.

सभापती महोदय, उच्च न्यायालयाने जी समिती नेमली होती त्यामध्ये राज्याचे मुख्य सचिव,पोलीस महासंचालक, महानगरपालिकेचे आयुक्त आणि अर्थ सचिव यांचा समावेश आहे झोपडया हटविण्यासाठी काय केले जाऊ शकते यासंबंधीचा आराखडा समितीने तयार करावा आणि सहा आठवडयात त्याचा अहवाल सादर करावा अशा प्रकारचा आदेश न्यायालयाने दिला होता 30 जुलै 2009 रोजी न्यायालयाने हा आदेश दिला असून आठ महिन्यानंतर मी हा मुद्दा येथे उपस्थित करीत आहे तेव्हा सहा आठवडयामध्ये या समितीने कोणता अहवाल दिला होता . मुंबईला पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्या धोक्यात आहेत असे न्यायालयाला वाटते त्या संदर्भात समितीने कोणता अहवाल दिला, कोणती सुरक्षा दिली, किती झोपडया हटविल्या गेल्या आहेत, किती झोपडया हटविण्याचे बाकी राहिले आहेत आणि मुंबईला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी धोक्यापासून केव्हा मुक्त करणार आहात ? याचे उत्तर आजच्या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांकडून आले पाहिजे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये मुंबईतील जलवाहिन्यांच्या संदर्भात अत्यंत गभीर स्वरुपाची व टीकात्मक चर्चा उपस्थित केलेली आहे.त्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मुंबईतील नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांनासुध्दा पाणी उपलब्ध होत नाही. राज्यामध्ये अनेक ठिकाणी पाण्याची भीषण टंचाई निर्माण झालेली असून ती मानव निर्मित किती ठिकाणी आहे आणि निसर्ग निर्मित किती ठिकाणी आहे याचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांना मी जाता जाता एवढेच सांगू इच्छितो की, पश्चिम महाराष्ट्रात बहूतेक जिल्हे पाणी टंचाईने व्यापलेले आहेत असा खास उल्लेख या प्रस्तावात करण्यात आलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात जे पाणी उपलब्ध आहे त्यातील 70 टक्के पाणी ऊसाला दिले जाते उर्वरित 30 टक्के पाणी इतर पिकांना दिले जाते .राज्यामध्ये पाणी टंचाई

2..

श्री.दिवाकर रावते ....

निर्माण झालेली असताना ऊसाला पाणी देणे थांबवले पाहिजे. पुढच्या वर्षी ऊस गाळपाच्या वेळी कारखान्यांचे काय होईल याची चिंता न करता महाराष्ट्रातील माणसाला पाण्यावाचून तडफडावे लागणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. राज्यातील शेतकरी जर जगला तर ऊस पिकवू शकेल जर तो मेला तर ऊस कसा पिकवू शकेल. ? महाराष्ट्रामध्ये 2011 साली जो 30 लाख मे.टन ऊस निर्माण होणार आहे त्याची लागवड आता करण्यात आलेली आहे. या ऊसाला मोठया प्रमाणावर पाणी लागणार आहे.तेव्हा हे पाणी देण्याचे थांबवले तरी पश्चिम महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. तेव्हा ऊसाचे पाणी थांबविण्यात येणार आहे काय ? या शेतक-यांना 25 हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी . ऊस जाळल्यानंतर एकरी 25 हजार रुपये नुकसान भरपाई दिली होती तेव्हा ऊसाचे पाणी थांबविल्यामुळे या शेतक-यांना एकरी 25 हजार रुपये दिले तरी चालतील असे मला सागावयाचे आहे. एक वेळ आपल्याला पैसे निर्माण करता येतील परंतु पाणी निर्माण करता येणार नाही. ऊसाला लागणारे पाणी जरी दोन तीन महिने थांबविण्यात आले तरी पश्चिम महाराष्ट्रातील पाण्याची टंचाई काही प्रमाणात कमी होईल असे मला वाटते तेव्हा मी आता सुचविल्याप्रमाणे कृती करण्याची शासनाची हिंमत आहे काय ? ही हिंमत शासन दाखवू शकणार नाही . व्हॅट सर्व वस्तूंना लावण्यात आला परंतु ऊसाला लावण्यात आलेला नाही अशा प्रकारची शासनाची मानसिकता आहे .पाण्या वाचून माणसे तडफडून मेली तरी चालतील परंतु ऊसाला द्यावयाचे पाणी थांबवू शकत नाही अशा प्रकारची शासनाची मानसिकता आहे. सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांनी पाणी टंचाईच्या सदर्भात हा प्रस्ताव आणला आहे . राज्यातील जनता येत्या दीड महिन्यात पाण्यावाचून तडफडणार आहे व पाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे तेव्हा त्यांना पाणी दिले पाहिजे असे जर शासनाला प्रामाणिकपणे वाटत असेल तर ऊसाला पाणी देण्याच्या बाबतीत निर्बंध घालणार आहात किंवा नाही असा प्रश्न मी या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित करतो सन्माननीय मंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांना एवढेच सांगतो की आज जी परिस्थिती निमाण झालेली आहे त्यापेक्षा अधिक बिकट परिस्थिती उद्या निर्माण होऊ शकेल कारण दिवसेंदिवस पर्यावरणामध्ये बदल होत चालला आहे . ग्लोबल वॉर्मिगच्या संदर्भात सभागृहामध्ये

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

मध्यंतरी चर्चा उपस्थित करण्यात आली होती. आज जी परिस्थिती आहे त्यापेक्षा बिकट परिस्थिती पुढच्या वर्षी निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करोडो रुपये पाणी पुरवठयाच्या विविध योजनासाठी खर्च केले जात आहेत परंतु त्यात भ्रष्टाचार होत असतो. हे मी आपल्याला मनापासून आणि प्रामाणिकपणे सांगतो . तसेच मघाशी मी आपला उल्लेख मुद्दाम आणि जाणीवपूर्वक केला होता. सामाजिक जाणिवा आणि भान असलेले आपले व्यक्तिमत्व आहे तेव्हा तुमच्याकडून माझ ी अशी अपेक्षा आहे की, स्वतंत्रपणे सीआयडी मार्फत या योजनांची चौकशी करण्यात यावी भ्रष्टाचार करणारे जे कोणी अधिकारी आहेत त्यांना शिक्षा करा भ्रष्टाचार करुन लोकांना पाण्यापासून तडफडण्याची वेळ ज्यांनी आणली आहे त्यांना तुरुंगाची हवा खायला लावा. अधिकारी प्रचंड भ्रष्टाचार करीत असतात त्यांना योग्य ती शिक्षा झाली पाहिजे.राज्यातील जनतेला पाणी कसे देता येईल याची चिंता करीत असतांना पाणी पुरवठा योजनेत भ्रष्टाचार करणा-या
झारीतील शुक्राचार्यांना उद्ध्वस्त करण्यात येणार आहे किंवा नाही हा प्रश्न मी आपल्याला विचारतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री जमा यांचे हिंदी भाषण (श्रीसरफरे यांच्याकडे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी ने नियम 260 के अन्तर्गत पाणी टंचाई के बारे में जो प्रस्ताव दिया है, उस पर मैं अपने विचार प्रकट करने के लिए खड़ा हूँ. माननीय सदस्य श्री रावते जी ने इस बारे में बहुत विस्तार से बताया है. यह प्रस्ताव जल नीति के बारे में नहीं है, बल्कि पाणी टंचाई की जो विशेष परिस्थिति पैदा हुई है, उस बारे में है. इस वर्ष सूखे की वजह से हमें यह अधिक महसूस हो रही है. कुछ दिन पूर्व नागपुर में हमारी एक मीटिंग हुई. नागपुर जिले का सर्वेक्षण करने के बाद ऐसा लगा कि महाराष्ट्र शासन ने बहुत उपाय किए हैं, पाणी पुरवठा विभाग ने भी कुछ कार्रवाई की है, भारत सरकार ने भी बहुत सारी योजनाएं बनाई है और महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ने भी काम किया है. यह एक गंभीर विषय है, इसलिए इस पर विस्तार से चर्चा होनी चाहिए.

सभापति महोदय, मेरे 2-3 सुझाव हैं. माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत ने वाटर माफिया की बात की. हमें पानी का कंजरवेशन करना चाहिए, हमें पानी को प्रिजर्व करना चाहिए और उसका वेस्टेज रोकना चाहिए. पानी का वेस्टेज रोकने के लिए अगर कोई कानून बनाने की आवश्यकता हो तो वैसा कानून भी हमें बनाना चाहिए. हमने फोरेस्ट के संरक्षण के लिए फोरेस्ट कंजरवेशन एक्ट बनाया है. इसी प्रकार से पानी का वेस्टेज रोकने के लिए कानून बनाना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र में नागरीकरण तेजी से हो रहा है. बड़े बड़े कम्पलेक्स बन रहे हैं, आई.टी. पार्क बन रहे हैं, कॉरपोरेट ऑफिस बन रहे हैं. इनको रेन वाटर के हारवेस्टिंग की व्यवस्था करनी चाहिए. शहरी विकास विभाग को इनसे कहना चाहिए कि ये लोग करोड़ो रुपए की बिल्डिंग बनाते हैं, इसलिए इनको सेल्फ वाटर सोर्स के लिए भी बजट बनाना चाहिए. वाटर सोर्स को डीप ड्रिल करना चाहिए और इनको अपने लिए खुद पानी की व्यवस्था करनी चाहिए, ताकि महानगरपालिका के ऊपर बोझ न पड़े. ये सारी बातें कानून बनाकर कम्पलसरी करनी चाहिए.

सभापति महोदय, श्री. गुजराथी जी ने पानी के रि-साइकलिंग के बारे में कहा. यह बहुत अच्छी प्रोसस है. हमें पानी की रि-साइकलिंग प्रोसस को एक्टिवेट करना होगा. मुंबई के तीन तरफ समुद्र है. कई अरब देशों में पीने का पानी नहीं होता है, वे लोग समुद्र के पानी का ट्रीटमेंट करके उसे पीने योग्य बनाते हैं. मुंबई के आस-पास समुद्र है, मुंबई के लिए भी हम इसी

. . . 4O- 2



. . . . श्री. सय्यद जमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तरह से पानी की कोई योजना बना सकते हैं.  यह पानी मंहगा जरुर होता है, लेकिन इस पर विचार किया जा सकता है. पानी की कमी को दूर करने के लिए हमें लाँग टर्म प्लानिंग करनी होगी.

सभापति महोदय, विदर्भ में पानी की टंचाई सब से अधिक है.  विदर्भ और मराठवाडा के 17 हजार से ज्यादा गांवों में पानी की कमी है.  वहां के जिलाधिकारी ने पानी की कमी को दूर करने के लिए योजना बनाई है. वहां पर हॅंड-पंप लगाए जा रहे हैं, उनको गहरा किया जा रहा है. जवाहर विहिर योजना के अन्तर्गत कुँओं की सफाई की जा रही है.  लेकिन इस वर्ष की गंभीरता को देखते हुए शासन को बजटरी सपोर्ट प्रोवाइड करने का काम प्राथमिकता के आधार पर करना होगा. हमारा बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम, बजट डिले सिस्टम हो गया है और इस वजह से बहुत से काम नहीं होते हैं. पानी की कमी दूर करने के बारे में नागपुर महानगरपालिका की एक मीटिंग हुई थी, लेकिन इसकी व्यवस्था महाराष्ट्र सरकार के पाणी पुरवठा विभाग को करनी चाहिए. नागपुर, चंद्रपुर और यवतमाल में कई कारणों से ग्राउन्ड वाटर नीचे जा रहा है, इसको रोकने के लिए सरकार को लाँग टर्म प्लानिंग करनी चाहिए.

सभापति महोदय, यवतमाल जिले के वणी तालुके में कोल माइनिंग अधिक होता है और इस वजह से ग्राउन्ड वाटर टेबल नहीं है, वहां पर पानी का स्तर नीचे चला गया है और जब बोर करने की बात आती है तो हमारा प्रयोग बेकार हो जाता है. इसको रोकने के लिए सरकार को उपाय-योजना करनी चाहिए.

सभापति महोदय, 2009 में नागपुर के भूजल विकास और व्यवस्थापन के बारे में चर्चा हुई थी.  मेरी सरकार से मांग है कि नागपुर और अमरावती डिवीजन के लिए पानी से संबंधित सभी विभागों की एक मीटिंग लेकर पानी की कमी को दूर करने के लिए अगर कुछ शार्ट टर्म प्लानिंग हो सकती है तो उसकी व्यवस्था करनी चाहिए.

सभापति महोदय, मेरा आखिरी मुद्दा कामठी की जल पुरवठा योजना के बारे में है.  इसके लिए महाराष्ट्र जीवन प्राधिकरण का दो-ढाई करोड़ रुपए का बजट है. मैं माननीय मंत्री महोदय से अनुरोध करुंगा कि वे इस बारे में विशेष ध्यान दें. नदी से हमें इन्टेक बोर-बेल को मजबूत

. . . 4O-3



. . . . श्री. सय्यद जमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करना है और इस तरह से हमें ज्यादा पानी मिलेगा. कामठी नगरपरिषद को 1 लाख रुपए जमा करने थे, उन्होंने 50 हजार रुपए जमा कर दिए हैं. मेरी मांग है कि इस योजना को जल्दी से जल्दी पूरा किए जाए. इसके साथ ही मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

*************

. . . भाषण पूर्ण, नंतर एपी रणदिवे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी महत्वाच्या आणि अत्यंत ज्वलंत प्रश्नाकडे नियम 260 अन्वये लक्ष वेधलेले आहे, त्यामध्ये चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्य सर्वश्री. अरुण गुजराथीजी, सुभाष चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती अलका देसाई, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री. दिलीपराव सोनावणे, राजन तेली, विक्रम काळे, रमेश शेंडगेजी, भगवान साळुंखेजी, दिवाकर रावतेजी आणि सय्यद जामासाहेब आणि इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली असून काही सूचनाही केलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी ही गोष्ट नाकारणार नाही की, आपल्या राज्यामध्ये यावर्षी निश्चितपणे पाण्याची तीव्र टंचाई आहे. या विषयाच्या संबंधात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, 50 पैशापेक्षा कमी आणेवारी जाहीर झाली असली तरी त्याचा आणि या टंचाईचा काहीही संबंध नाही. आणेवारी ही पिकावर अवलंबून आहे.त्यामुळे याठिकाणी 20 हजार गावांचा जो आकडा दिसत आहे, पण तशी परिस्थिती नाही. मी हे नाकारणार की, आपल्या राज्यामध्ये टंचाई आहे. पण जेवढी तीव्र परिस्थिती आहे असे जे म्हटले जात आहे, तेवढी ती नाही. आपल्या राज्यामध्ये दरवर्षी पाण्याची टंचाई भासते आणि याची कारणे अनेक आहेत. एक म्हणजे काही भागात म्हणजे कोकण, ठाणे इ.ठिकाणी फार मोठया प्रमाणात पाऊस पडतो आणि त्याला लागून असलेल्या सह्याद्रीच्या खालच्या भागामध्ये ज्याला आपण रेन शॅडो एरिया असे म्हणतो किंवा डी.पी.ए.पी.एरिया म्हणतो, त्याठिकाणी फार कमी म्हणजे 200 मि.मि.पाऊस पडतो. शेवटी भूगर्भातील आणि जमिनीवरील पाण्याचा स्त्रोत हा पावसावर अवलंबून असतो. मागच्या दोन-तीन वर्षापासून आपल्या राज्यामध्ये कमी पाऊस पडत आहे आणि यावर्षी तर खूपच कमी पाऊस पडलेला आहे. तरीपण मध्यंतरी फयान चक्रीवादळ आले आणि त्यामुळे आपल्या राज्यामध्ये फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. परंतु त्याबरोबरच हेही खरे आहे की, नाशिक, कोकण किंवा पश्चिम महाराष्ट्रातील जी धरणे आहेत, त्यातील पाण्याची पातळी नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये थोडी वाढलेली आहे.मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : पाण्याची पातळी वाढली असेल तर माननीय मंत्री महोदय ते घाबरत-घाबरत का सांगत आहेत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, तसे नाही. शासनाने अनेक वर्षापासून अनेक पाणी पुरवठा योजनांवर खर्च केलेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

सभापती महोदय, मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये जवळपास 83 हजार हॅबिटेशन्स् किंवा गाव-वाडया आहेत आणि त्याठिकाणी जवळपास 28 हजार ग्राम पंचायती आहेत. एक काळ असा होता की, एका गावामध्ये किंवा एका वाड्यामध्ये हपसा पंप दिला की तो गावातील लोकांसाठी पुरेसा होत असे किंवा गावामध्ये एकच विहीर असली तरी त्यातून सर्व गावाला पुरेसे पाणी मिळत असे, त्यामध्ये ते गाव पूर्णपणे कव्हर होत आहे असे समजले जात असे. पण आपल्या राज्याची जसजशी प्रगती झाली, त्याप्रमाणे लोकांच्या अपेक्षाही वाढलेल्या आहेत. लोकांची अशी अपेक्षा आहे की, आता आम्हाला घरगुती कनेक्शन मिळणे आवश्यक आहे आणि कोणत्याही राज्याने प्रगती केल्यानंतर पाण्याचे घरगुती कनेक्शन किंवा लोकांना घरपोच पाणी मिळाले पाहिजे अशी लोकांची अपेक्षा असणे ही गोष्ट स्वाभाविक आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

जे पाणी शहरामध्ये मिळते तशी अपेक्षा ग्रामीण भागातील लोक ठेवतात. एका गावाला आपण पूर्णपणे कव्हर केल्यानंतर किंवा काही प्रमाणामध्ये योजना केल्यानंतर पुन्हा आपण दुसरी योजना करतो. अगोदर आपण फक्त विहीर बांधली होती. आता त्या ठिकाणी वितरण व्यवस्था करीत आहोत. वितरण व्यवस्था केल्यानंतर त्या ठिकाणी ईएसआर किंवा ओव्हर हेड टाकीचे बांधकाम सुरु आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतर सुध्दा आजही टंचाई आहे. शासन आपल्याला योजना बांधून देऊ शकते पण शेवटी पाण्याचा स्त्रोत हा निसर्गावर अवलंबून आहे याबद्दल दुमत नाही. पण जोपर्यंत आपण स्त्रोत बळकट करणार नाही, भूगर्भातील पाण्याची पातळी जोपर्यंत वर आणणार नाही तोपर्यंत हा प्रश्न दरवर्षी कोणत्या ना कोणत्या भागात, ज्या भागामध्ये पाऊस कमी पडला त्या भागात टंचाई भासणार आहे याबद्दल दुमत नाही. यासोबतच आणखी एक तीव्र प्रश्न निर्माण होतो. काही भागामध्ये आपण पाहतो की, काही स्त्रोत आहेत पण ते दूषित आहेत. त्यामुळे मागच्या दोन वर्षामध्ये आपल्या राज्यामध्ये जेवढे दूषित स्त्रोत आहेत त्या ठिकाणी प्राधान्य देऊन त्या त्या गावामध्ये पर्यायी सोर्स निर्माण करण्याचा शासनाने प्रयत्न केला. दुसरी एक गोष्ट अशी निदर्शनास येत आहे की, जसे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत आहे तसे स्त्रोत दूषित होण्याचे प्रमाण सुध्दा वाढत आहे. त्यामुळे सतत ही प्रोसेस चालू राहते. काही ठिकाणी आपण स्त्रोत निर्माण करतो परंतु काही वर्षानंतर तो स्त्रोत कोरडा पडतो. काही ठिकाणी स्त्रोत चांगला असतो पण नंतर तो दूषित होतो. त्यामुळे असे चालू राहणार हे मी नाकारणार नाही पण मी आपल्याला सागू इच्छितो की, शासन निश्चितपणे यामध्ये लक्ष घालत असून शासन प्रयत्नशील आहे.

काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण एक आराखडा तयार करुन एका टप्प्यामध्ये जेवढे शक्य आहे, आपल्या राज्याचे जेवढे हॅबिटेशन्स आहेत त्या ठिकाणच्या पाण्यापुरवठा योजनांचा एक आराखडा तयार करुन ठरलेल्या कालावधीमध्ये तो पूर्ण केला पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2010-2011, 2011-2012 या वर्षात जवळपास 24 हजार ग्रामपंचायतींचा आराखडा तयार केलेला आहे. त्याची अंमलबजावणी आम्ही दोन वर्षामध्ये पूर्ण

...2...

RDB/ ST/ KGS/

श्री. रणजित कांबळे .....

करणार आहोत. 2005-06, 2006-07, 2007-08 आणि 2008-09 मध्ये म्हणजे चार वर्षामध्ये आपण जवळपास 28 हजार ग्रामपंचायती किंवा हॅबिटेशन्स टॅकल केलेले आहेत. पुढच्या दोन वर्षात आपण 24 हजार टॅकल करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहोत. एक आराखडा सुध्दा तयार केलेला आहे. तो निश्चितपणे दोन वर्षात पूर्ण करणार आहोत. पण मी मागे सांगितले त्याप्रमाणे जोपर्यंत आपण पाण्याचे स्त्रोत आणि त्याच्यासोबत जलसंधारणाची कामे पूर्ण करणार नाहीत किंवा त्यांच्या बाबतीत प्राधान्य देणार नाही तोपर्यंत ही पाणीटंचाई वांरवार भासणार आहे. त्यामुळे मी मागे या सभागृहामध्ये सांगितले होते तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता त्याप्रमाणे आपला जो ग्राऊंड वॉटर रेग्युलेटरी ॲक्ट आहे त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राऊंड वॉटर रेग्युलेटरी ॲक्ट अस्तित्वात आहे पण तो 1993 चा आहे. आपण त्यामध्ये अनेक दुरुस्त्या करीत आहोत. या सभागृहामध्ये आपण तो ॲक्ट आणणार आहोत. पण या दुरुस्त्या करणे अत्यंत आवश्यक आहे. याचे कारण असे की, आपल्या राज्यामध्ये 1531 वॉटरशेड्स आहेत त्यापैकी जवळपास 66 वॉटरशेड ओव्हर एक्स्प्लॉयटेड आहेत. 3 वॉटरशेड्स फारच क्रिटीकल आहेत. 127 वॉटरशेड्स सेमी क्रिटिकल आहे. 4 वॉटरशेड्स क्वालिटी ॲफेक्टेड आहेत आणि 1331 वॉटरशेड्स सेफ झोनमध्ये येतात. जे वॉटरशेड क्रिटिकल आणि सेमी क्रिटिकल आहेत त्या भागामध्ये जोपर्यंत आपण जलसंधारणाची कामे करणार नाही, पाण्याची पातळी वर आणणार नाही तोपर्यंत कोणत्याही परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी नियोजन करणे कठीण होते. हे करु शकत नाही असे नाही. जसे नगर जिल्ह्यामध्ये राळेगणसिध्दी किंवा हिवरेबाजार अशी जी गावे आहेत, जो डीपीएपीचा भाग आहे किंवा ज्या भागामध्ये तीव्र टंचाई होती

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

त्यांनी चांगले नियोजन करुन जलसंधारणाची कामे गाव पातळीवर घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविला आहे. केवळ अहमदनगर जिल्हयातच नाही तर जालना जिल्हयातील काही गावांमध्ये लोक सहभागातून जलसंधारणाची कामे केलेली आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची योजना कायम स्वरुपी सक्षम राहते. ती यापुढेही सुरु रहावीत किंवा त्या स्त्रोताचे बळकटीकरण करण्याचे काम बंधनकारक करणार आहोत.

सभापती महोदय, टंचाईचा आराखडा दरवर्षी ठरविला जातो. साधारणपणे सप्टेंबर ते जून असे त्याचे 3 टप्पे असतात. तात्पुरती पाणी पुरवठा योजना, नवीन विहिरी घेणे, विहिरींचे खोलीकरण करणे, हापशाच्या दुरुस्तीची कामे केली जातात. या कामांचे शासनाने नियोजन केलेले आहे. टप्पा एक व दोनची कामे आतापर्यंत झालेली आहेत. कामाचे नियोजन करीत असताना अनेक जिल्हाधिका-यांनी त्यांच्या स्तरावर भौगोलिक परिस्थितीनुरुप प्रस्ताव तयार केले होते. त्यांनी जे प्रस्ताव प्रस्तावित केले होते त्याबाबत मार्च महिन्यामध्ये असे निदर्शनास येत आहे की, जिल्हाधिका-यांनी मोठया प्रमाणावर आराखडे तयार केले होते, पण त्या गावांना सध्या टंचाई भासत नाही. सातारा जिल्हाधिका-यांनी जवळपास 431 गावात टंचाई घोषित केली होती. परंतु आजची परिस्थिती पाहिली तर केवळ 67 गावांमध्ये टंचाई आहे. नगर जिल्हाधिका-यांनी 556 गावात टंचाई घोषित केली होती. परंतु या क्षणी 140 गावांमध्ये टंचाई आहे. पुढील काळामध्ये या गावांमध्ये टंचाई भासणार नाही असा माझ्या बोलण्याचा अर्थ होत नाही. माझ्यासमोर जी आकडेवारी आहे त्यावरुन असे दिसते की, तेथे टंचाई आहे हे मी नाकारीत नाही. या गावांमध्ये टंचाई भासणार आहे. परंतु काही ठिकाणी ती मार्चमध्ये, काही ठिकाणी ती एप्रिलमध्ये असू शकते. त्यामुळे जीएसडीएला या सर्व परिस्थितीची पाहणी करावी तसेच स्वत: तपासून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. 4-5 जिल्हाधिका-यांनी जास्तीचे प्रस्ताव पाठविले आहेत असे त्यांच्या निदर्शनास आले आहे. कदाचित त्यांनी प्रिकॉशनरी मेजर्स म्हणून प्रस्ताव सादर केले असतील. परंतु त्यांच्या आराखडयानुसार शासनाने तरतूद करुन दिलेली आहे. त्यामुळे या क्षणी तेवढया गावामध्ये टंचाई भासत नाही.

2...

NTK/ ST/ D/ KGS/ MMP/

श्री.रणजित कांबळे......

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये टँकरने पाणीपुरवठा होत असल्याचा उल्लेख केला होता. माझ्या माहितीनुसार सध्या 750 टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या वर्षी 645 गावांमध्ये पाण्याची टंचाई भासत आहे. मागील वर्षी सुध्दा 612 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई होती. त्यावेळी राज्यात वेगळे चित्र होते अशातील भाग नाही. त्यावेळीही शासनाने पाण्याच्या टंचाईवर मात केली होती आणि यावर्षी सुध्दा मात केली जाईल. त्यासाठी शासनाने आराखडा तयार केलेला आहे.

सभापती महोदय, यानिमित्ताने मी राज्यातील धरणांबाबत माहिती सांगू इच्छितो. पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकणामध्ये तीव्र पाण्याची टंचाई आहे असे बोलले गेले. खरे पाहता या क्षणी मराठवाडा व विदर्भात पाण्याची टंचाई आहे. विशेषत: अमरावती विभागात मोठया प्रमाणावर पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. मराठवाडयात नांदेड, लातूर या जिल्हयांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे. अमरावती विभागात वाशिम व यवतमाळ जिल्हयांमध्ये तीव्र पाणी टंचाई आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

या प्रश्नाच्या संदर्भात शासनाला जी जी पावले उचलावी लागतील, ज्या ज्या उपाययोजना कराव्या लागतील त्यासंबंधीचा आराखडा तयार केलेला आहे. त्यासाठी निधीची कमतरता नाही. आता पर्यन्त 176 कोटीचे वितरण झालेले आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी मुंबईतील पाईप फुटीच्या संदर्भात, टँकर लॉबीचा संदर्भात मुद्दे मांडले. मुंबईला पाणी पुरवठा करणारी पाईप लाइन जुनी असून ती बदलण्याचे काम सुरु आहे. हे काम जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून होत आहे. आतापर्यन्त 348 कि.मी. पाईपलाईनचे काम झालेले आहे. 263 कि.मी. पाईपलाईनच्या मजबुतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. हे सर्व काम तीन वर्षाच्या आत पूर्ण होईल. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबईच्या आजूबाजूला असलेल्या तलावातील पाण्याचे नियोजन कसे करणार अशी विचारणा केली. संपूर्ण मुंबईची पाण्याची गरज 3 हजार एमएलडी आहे. मुंबईला जो पाणी पुरवठा होतो त्यातील 35 टक्के पाण्याची गळती होते, चोरी होते. पाण्याची चोरी आणि गळती रोखण्याची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. वारंवार होणा-या पाईपफुटीमागे माफीयांचा हात आहे असा उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी केला. परंतु असे काही असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी माफीयांची यादी आहे असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, एकाच ठिकाणी जर पाईप फुटीचे प्रकार घडले असते तर ते एकवेळ आपण समजू शकलो असतो. परंतु विविध 16 ठिकाणी पाईपफुटीचे प्रकार घडलेले आहेत. या उन्हाळ्याच्या दिवसात हे प्रकार जास्त झाल्यामुळे लोकांना त्यांची झळ बसलेली आहे. पाणी पुरवठ्याच्या पाईप लाईनवर असलेल्या झोपड्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. परंतु तो काहीसा राजकीय स्वरुपाचा प्रश्न असल्यामुळे...

श्री. दिवाकर रावते : मुंबई उच्च न्यायालयाने या झोपड्या काढण्यासंबंधीचे आदेश दिलेले आहेत. आपण सर्वांनी मिळून या प्रश्नाला तोंड द्यायला पाहिजे. असे असताना आपण हा प्रश्न राजकीय स्वरुपाचा आहे असे म्हणत असाल तर ते बरोबर नाही.

श्री. रणजित कांबळे : झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन 4 वर्षाच्या आत करण्यात येईल असे मुंबई महानगरपालिकेने हायकोर्टामध्ये सांगितलेले आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.....

सभापती महोदय, महापालिकेच्या रेकॉर्डनुसार 1995 पूर्वीच्या 6687 झोपड्या, 1995 ते 2000 काळातील 2103 झोपड्या आणि त्यानंतर आजपर्यंत उभ्या राहिलेल्या नवीन 6193 झोपड्या अशा एकूण जवळपास 15790 झोपड्या आहेत. मुंबई महानगरपालिकेने हायकोर्टात 2009 साली जे ॲफिडेव्हीट सादर केले त्यानुसार त्यांनी सांगितले आहे की, आम्ही चार वर्षाच्या आत पुनर्वसन करणार आहोत. म्हणजे 2013 पर्यंत पुनर्वसन केले जाणार आहे. काही सन्माननीय सदस्यांनी ठाणे परिसरात नव्याने लोकसंख्या वाढत आहे त्याबाबत कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार असा प्रश्न उपस्थित केला आहे. मुंबईत सध्या पाण्याची काय परिस्थिती आहे असाही प्रश्न उपस्थित केला आहे. मुंबईमध्ये आजच्या तारखेला जवळपास 3, 13, 440 एमएलडी पाण्याचा साठा उपलब्ध असून 15 टक्के पाणी कपात सुरु असली तरी 15 जुलैपर्यंत पुरेल इतका पाणी साठा उपलब्ध आहे. ठाण्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेता कोणत्या प्रकारची उपाययोजना केली या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, जीवन प्राधिकरणाने ठाणे आणि नवी मुंबई या दोन ठिकाणी पॅरा अर्बन योजना मंजूर केली आहे. टेमघर आणि पिसे धरणाच्या माध्यमातून 60 एमएलडी पाणी घेऊन 69 गावांना पाणीपुरवठा योजना करण्यासाठी पॅरा अर्बन योजना आखली असून त्या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. जो आराखडा शासनाने तयार केला आहे त्या माध्यमातून निश्चितपणे राज्यातील पाणी टंचाईवर मात करीत असताना कोणत्याही प्रकारे ती गावे पाण्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी शासन घेणार आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, पाणी टंचाईच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर सन्माननीय मंत्रीमहोदयांनी समर्पक उत्तर दिले आहे. त्यांनी सभागृहाला आणि महाराष्ट्रातील जनतेला शाश्वत केले आहे. काही विभागांमध्ये पाणी टंचाई असली, पिण्याच्या पाण्याची टंचाई असली तरी सुध्दा राज्य शासनाच्या वतीने त्या संदर्भात खबरदारी शासनाने घेतली आहे. मंत्री महोदयांनी जी भूमिका याठिकाणी शासनाच्या वतीने मांडली त्यातून योग्य तो मॅसेज राज्यामध्ये जाईल आणि कोणत्याही परिस्थिती येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी राज्यामध्ये अशी काही भीषण पाणी टंचाई राहणार नाही अशी भूमिका राज्य शासनाच्या माध्यमातून सन्माननीय मंत्रीमहोदयांनी याठिकाणी मांडली आहे. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. या प्रस्तावावर चांगल्या प्रकारे साधकबाधक चर्चा झाली. विरोधी पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी......

रावते, डॉ.नीलम गोऱ्हे आणि अन्य सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला, सत्तारुढ पक्षाच्या वतीने अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. दोन-अडीच तास चांगली साधकबाधक चर्चा झाली. पाण्याच्या प्रश्नावर जागरुकतेने शासन कसे नियोजन करणार आहे या संदर्भात भूमिका विषद केली त्याबाबत मी शासनाचे आभार मानतो.

**तालिका सभाप**ती (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

---------

(नंतर 4यू.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पवनचक्की लावण्याकरिता सुझलॉन कंपनीने गुंतवणूकदारांशी संगनमत करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**मु.शी.**: धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पवनचक्की लावण्याकरिता सुझलॉन कंपनीने गुंतवणूकदारांशी संगनमत करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक या विषयावरील तारांकित प्रश्न क्र. 527 ला दिनांक 22 डिसेंबर, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक ) : महोदय, "धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील पवनचक्की लावण्याकरिता सुझलॉन कंपनीने गुंतवणुकदारांशी संगनमत करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक" या विषयावरील तारांकित प्रश्न क्र.527 ला दिनांक 22 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर, श्री. अनिल परब यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न क्र. 527 उपस्थित केला होता त्या प्रश्नाला अतिशय मोघम स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे की, "30 दिवसाच्या आत संबंधितांवर कारवाई केली जाईल" याबाबतीत मंत्री महोदयांकडून खुलासा अपेक्षित आहे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : महोदय, धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील पवनचक्की लावण्याकरिता सुझलॉन कंपनीने गुंतवणुकदारांशी संगनमत करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक या अनुषंगाने जो तारांकित प्रश्न उपस्थित केला होता त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. यासंदर्भात धुळे व नंदुरबार जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जी माहिती दिली त्याच्या आधारे मी सांगू इच्छितो की, सुझलॉन कंपनीने शेतकऱ्यांकडून अशा प्रकारच्या जमिनी घेतल्या अशी प्रकरणे या भागात नाहीत म्हणून जो प्रश्न सदस्यांनी उपस्थित केला त्याच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारे अमुक सर्व्हे नंबरची जमीन, अमुक गावातील जमीन घेतली, तिला मोबदला दिला नाही अथवा कमी पैसे दिले किंवा उशिरा पैसे दिले अशा प्रकारची कुठलीच तक्रार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, सन्माननीय सदस्यांचा अर्धा-तास चर्चा लावण्याचा हेतू हाच होता की धुळे-नंदुरबार जिल्हयाच्या संदर्भात तपशील त्यांच्याकडे असावा. परंतु ज्या तारांकित प्रश्नाच्या आधारे अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे त्याला उत्तर देताना सांगलीमध्ये अशी काही प्रकरणे आढळून आली आहेत त्यामुळे विधानसभेतील व विधानपरिषदेतील काही सदस्यांची मिळून समिती स्थापन केली होती. हे उत्तर जून 2009 मध्ये दिले होते. त्यावेळेस असे सांगण्यात आले होते की, एक महिन्यात यासंदर्भातील अहवाल सादर करु. त्यानंतर डिसेंबर, 2009 च्या अधिवेशनात पुन्हा हाच प्रश्न विचारल्यानंतर त्याचेही उत्तर आलेले आहे. आता आपण मार्चमध्ये पोहचलो आहोत. म्हणून सांगलीच्या संदर्भात वारंवार सदनात चर्चा झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांना मी आठवण करुन देऊ इच्छितो की, या जिल्ह्यातील काही केसेस तर गुन्हेगारी स्वरुपाच्या असून त्यानुसार कलमे लावण्यात आली होती. अशा प्रकारे वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये या पवन चक्क्यांच्या संदर्भात प्रश्न निर्माण झाले. सातारा जिल्ह्यात सुध्दा अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता म्हणून माझा प्रश्न असा आहे की, अन्य जिल्ह्यांच्या बाबतीत जी चौकशी करण्यात आली आहे त्यातून काय साध्य झाले आहे ? तसेच गुन्हे अन्वेषण विभागाच्या माध्यमातून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आणि गावकऱ्यांचा विरोध असताना सुझलॉन कंपनीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली ? शासनाची या सर्व गोष्टींवर देखरेख करणारी यंत्रणा कोणती आहे व ती कशा पध्दतीने काम करीत आहे ?

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : महोदय, मुळात हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी उपस्थित केला असून त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, धुळे-नंदुरबार अथवा अन्यत्र सांगली किंवा सातारा जिल्ह्यांमध्ये असे प्रकार घडले, ही गोष्ट खरी आहे...

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

तासगाव, कवठेमहांकाळ, शिराळा, खानापूर येथून तक्रारी आलेल्या आहेत. तासगावच्या एकूण तक्रारी 1509 असून, कवठेमहांकाळच्या तक्रारी 1902 असून शिराळयाच्या 295 तक्रारी आहेत व खानापूरच्या 50 तक्रारी आहेत अशा सर्व मिळून 3756 तक्रारी आहेत. या तक्रारींचे स्वरुप निरनिराळे आहे. सांगली जिल्हयात खरेदी विक्रीमध्ये फसवणकीच्या तक्रारी 731 आहेत, अतिक्रमण झाल्याच्या 259 तक्रारी आहेत, विजेचे खांब व तारा ओढण्याच्या संदर्भातील तक्रारी 867 आहेत, पाणी गेल्याच्या संदर्भातील तक्रारी 841 आहेत, पिकाच्या नुकसानीबाबत 184 तक्रारी आहेत व इतर तक्रारी 978 आहेत. अशा एकूण 3756 तक्रारी सांगली जिल्हयातील आहेत. या सर्व व्यवहाराची चौकशी करण्याकरिता 6 मार्च, 2010 रोजी समिती स्थापन करण्यात आली आहे. अप्पर मुख्य सचिव महसूल हे अध्यक्ष व चौकशी अधिकारी, अप्पर मुख्य सचिव, वने हे सदस्य, सचिव असतील, ऊर्जा, सदस्य आणि महासंचालक महाऊर्जा हे सदस्य सचिव असून या घटकांची समिती गठण करण्यात आलेली आहे. पवन ऊर्जेच्या जमिनी खरेदी करण्याच्या घोटाळयाच्या संदर्भातील चौकशी करण्याकरिता त्रीसदस्य समिती गठीत झाली असून या चौकशीचा अहवाल समिती स्थापन केल्यापासून 8 महिन्याच्या आत करुन त्यामध्ये झालेल्या शेतक-यांची फसवणूक, शेतक-यांच्या जमिनीचा त्यांच्या संमतीशिवाय घेतलेला ताबा यासर्व बाबतीत त्यांनी चौकशी करावी आणि संबंधितांविरुध्द कारवाई प्रस्तावित करुन तो अहवाल सभागृहास सादर करावा अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या प्रश्नावर या सभागृहात वारंवार चर्चा झालेली आहे. आपण यासंदर्भात 8 महिन्याची मुदत परत मागितलेली आहे. मधील काळात शेतक-यांना संरक्षण देण्यासाठी आपण कोणती योजना करणार आहात ? या ठिकाणी 3000 तक्रारी आहेत त्यामुळे ज्या ठिकाणी अतिक्रमण करण्यात आलेले आहे अशा प्रकरणात आपण स्थगिती दिली पाहिजे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सनमाननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. तक्रारींची सख्या 3756 आहे. तक्रारींची संख्या मोठी असल्यामुळे यातील तक्रारीच्या संदर्भात संबंधितांचे जाबजबाब नोंदविण्याकरिता 8 महिन्याचा कालखंड लागणार आहे. मी आपल्याला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

एकच सांगतो की, शेतक-यांची फसवणूक झाली असेल तर संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल, फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. त्याच बरोबर ज्या शेतक-यांच्या जमिनी त्यांची परवागनी न घेता ताब्यात घेतल्या असतील तर त्यांच्या ताब्यातून त्या जमिनी काढून त्या जमिनी पुन्हा शेतक-यांच्या ताब्यात दिल्या जातील. जे घटक यामध्ये जबाबदार आहेत, ज्यांनी शेतक-यांना मन:स्ताप दिलेला आहे त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची विशेष बैठक गुरुवार दिनांक 15 एप्रिल, 2010 रोजी सकाळी 10.45 ते दुपारी 12.30 या वेळेत होईल. या बैठकीत अर्धातास चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन: भरेल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन परवा गुरुवार, दिनांक 15 एप्रिल, 2010 रोजी सकाळी 10.45 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 8 वाजून 18 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 15 एप्रिल,2010 च्या सकाळी 10.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही